# नगरपरिषद सातारा

# सातारा

# लेखा परीक्षण अहवाल

# 2020-2021 ते 2021-2022

सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, सातारा
जिल्हा परिषद विस्तारित इमारत, दुसरा मजला

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे नगरपरिषद सातारा यांनी 2020-2021 ते 2021-2022 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, सातारा

जिल्हा परिषद विस्तारित इमारत, दुसरा मजला

**नगरपरिषद सातारा, जिल्हा सातारा**
**लेखापरीक्षण अहवाल सन 2020-21 आणि 2021-22**

---

जा.क्र;स्था. 3 /व/ले.प.अ/न.प.सातारा/2020-21-22/सातारा / 20८ दिनांक- ११/०४/२०23

सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
म.रा.सातारा यांचे कार्यालय,

प्रेषक,

मा.सहसंचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
पुणे विभाग,पुणे

प्रति,

मा.अध्यक्ष,
नगरपरिषद सातारा

नगपरिषद सातारा,जिल्हा सातारा सन 2020-21 आणि 2021-22 या वर्षाचे लेखापरिक्षण श्री.नितिन यादव,(सहायक संचालक प्र.), श्री.सुधीर चव्हाण, श्री शितलकुमार बोबडे, श्री.माधव शिंदे, (स.ले.प.अ.), श्री.सुधाकर शिंदे, श्री.वाळु ससाणे,श्री.मिलिंद जगताप, श्रीमती रंजना भदाणे श्री.प्रशांत झाल्टे, (व.ले.प.), श्रीम.ज्योती रायबागकर, श्रीम.पुनम शिदे ,श्री.विवेक चांगण, श्री.अजितकुमार खाडे, श्री.विशाल सावंत, श्रीम.निलम चौधर, श्री.इरफाण मुलाणी, श्री.संदिप उंडे, श्रीम.तेजल पवार, श्री.सागर जगताप, श्रीम.श्वेता फडतुरे, श्री.ज्ञानेश्वर वणवे (क.ले.प.) स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा यांनी मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे नियम 4 अन्वये दिनांक 06/12/2022 ते दिनांक 21/03/2023 या कालावधीत पूर्ण केले. पुनर्विलोकन व अंतिमीकरण श्री. गणेश पाटील, मा.सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा,पुणे विभाग,पुणे दिनांक ११/०४/२०२३ रोजी चर्चा करुन अंतिमीकरण केले आहे.

लेखापरिक्षण कालावधीत खालील प्रमाणे अधिकारी व पदाधिकारी नगपरिषदेचा कारभार पहात होते.

| अ क्र | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | सौ.माधवी संजोग कदम | नगराध्यक्षा | 01/04/2020 ते 26/12/2021 |
| 2 | श्री.अभिजीत बापट | प्रशासन अधिकारी | 27/12/2021 ते 31/03/2022 |
| 3 | श्री.शंकर गोरे | मुख्याधिकारी | 01/04/2020 ते 06/07/2020 |
| 4 | श्रीमती रंजना गगे | मुख्याधिकारी | 07/07/2020 ते 11/08/2020 |
| 5 | श्री.अभिजीत बापट | मुख्याधिकारी | 11/08/2020 ते 31/03/2020 |

मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा

(अभिजीत बापट)
प्रशासक
तथा
मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा

Joint Director
Local Fund Accounts Audit
Pune Division, Pune

# सभा इतिवृत्त

विषय - सातारा नगरपरिषद, सातारा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ लेखापरिक्षण संदर्भात प्रवेशपरिषद (ENTRY CONFEREANCE)

सातारा नगरपरिषद, सातारा कार्यालयातील दिनांक ०६/१२/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रवेश परिषद आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस मा.लेखापाल (सहा.संचालक) यांच्या अधिनस्त नगरअभियंता, लेखापरिक्षक, आस्थापना विभाग प्रमुख व इतर सर्व विभाग प्रमुख आणि कर्मचारी उपस्थित होते.

सदर बैठकीस खालील चर्चा व निर्देश करण्यात आले.

१. सर्वांचा परिचय करुन घेण्यात आला व उपस्थितांची स्वाक्षरी घेण्यात आली.
२. मागील लेखा आक्षेपांचे अनुपालन अनुषंगिक पूर्ततेसह पथकास तपासणी करीता सादर करणे बाबत सुचित करण्यात आले.
३. लेखापरिक्षण हे सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या वर्षाचे होणार असल्याचे निर्देश दिले.
४. लेखापरिक्षण कालावधी दिनांक ०६/१२/२०२२ पासून दिनांक २८/०२/२०२३ पर्यंत असून सर्व संबंधित लेखे व अभिलेखे, नस्त्या, नोंदवहयासह पथकास वेळेत उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित केले.
५. लेखापरिक्षण काळात विहीत वेळेत अभिलेखे सादर न केल्यास रक्कम रुपये २५,०००/- दंडाची तरतूद असल्याची सर्वांना जाणीव करुन दिली.

वरील प्रमाणे बैठकीमध्ये चर्चा व संबंधित विषयाबाबत निर्देश देण्यात आले. यावेळी मा.सह.संचालक (प्र), मा.लेखापरिक्षा अधिकारी, वलेप व कलेप हे उपस्थित हेते.

कनिष्ठ लेखा परिक्षक यांनी सर्वाचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

सहा.संचालक (प्र)
स्थानिक निधी लेखापरिक्षा, सातारा

लेखापाल (सहा.संचालक)
सातारा नगरपरिषद, सातारा

अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ........ 8

**I PART I :मागील लेखा परीक्षण अहवाल ........ 9**

नगरपरिषद सातारा ........ 9

**PART II ........ 22**

नगरपरिषद सातारा ........ 22

**कलम ९ अ खालील आक्षेप ........ 23**

1 अर्थसंकल्पीय तरतुद व खर्चावरील निरीक्षणे... ........ 24

2 मत्ता व दायित्व तयार न केलेबाबत ........ 28

3 सन 2020-21-22 चे वार्षिक लेखेबाबत तसेच तिमाही आणि वार्षिक लेख्यांचे प्रसिध्दीकरण न केलेबाबत. ........ 29

4 शिक्षक व शिक्षकेत्तर वेतन सेवानिवृत्ती वेतन यावर मंजूर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा खर्च 2020-2021 ........ 30

5 अंतर्गत लेखा परीक्षण न केलेबाबत ........ 31

6 सोनगाव कचरा डेपो येथे ओला व सुका कचरा पक्रिया करणेसाठी आवशयक मशिनरी पुरविणे खर्चाबाबत. ........ 32

7 पेठ सदरबझार रिमांडहोम चौक ते अमेरिकन चर्च अखेर रस्ता डांबरीकरण करणे. ........ 34

8 प्रभाग क्र.2 पेठ सदरबझार कॅनॉल चौक करिअप्पा चौक ते जरंडेश्वर नाका अखेर पाईप ड्रेन करणे.. 36

9 प्रभाग क्र.7 पेठ गुरुवार सावकार गॅरेज नगरपरिषद सार्वजनिक शौचालय ते जुने बीफ मार्केट परदेशी घर पिछाडी अखेर रिटेनिंग वॉल करणे ........ 38

10 जिल्हा परिषद चौक ते सर्किट हाउस से श्री छ. सुमिराजे उद्यान चौक ते भीमाबाई आंबेडकर कॉलनी चौक अखेर रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे ........ 41

11 बांधकाम विभागाकडील सर्वसाधारण अनियमिततांबाबत ........ 43

12 प्रभाग क्रमांक 10 (अ) निसर्ग कॉलनी व कावरे कॉलनी अंतर्गत ठिकाणी गटरावर SLAB टाकणे, गटर करणे व पाईपपाईन करणे ........ 45

13 प्रभाग क्रमांक 17 पेठ रामाचा गोट पंचवटी अपार्टमेंट समोरील खारी विहीर परिसरामधील मारुती मंदिरामागे रस्त्याच्या लगत संरक्षक भिंत बांधणे ........ 46
14 जुन्या कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावुन त्यादवारे घनकचरा व्यवस्थापना करीता जागा उपलब्ध करुन देणे खर्चाबाबत. (बायोमायनिंग) ........ 47
15 पंतप्रधान आवास योजनेतून झालेल्या अनुदान वाटप व इतर खर्चाबाबत ........ 51
16 नगरपरिषदेच्या विविध विभागामध्ये लागणारे कार्यालयीन सहाय्यक कंत्राटी स्वरुपात पुरविणेबाबत ........ 51
17 जंतुनाशके खरेदीतील अनियमिततेबाबत. ........ 53
18 शिक्षक व शिक्षकेत्तर वेतन सेवानिवृत्ती वेतन यावर मंजूर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा खर्च 55

**कलम ९ ब खालील आक्षेप ........ 56**

19 रजा रोखीकरण रक्कम जादा अदा केलेबाबत (शोभा भिकु वायदंडे) ........ 57
20 रजा रोखीकरण रक्कम जादा अदा केलेबाबत (हणमंत रामू बाबर ) ........ 58
21 श्री छत्रपती शाहू कला मंदिर या नाट्यगृह इमारती मधील स्टेजचे नुतनीकरण करणे व मेकअप रूमसाठी फर्निचर करणे नवीन साऊंड सिस्टीम करणे ........ 59
22 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत 3 ठिकाणी कम्पोस्टिंग पिट बांधणे कामातील अनियमिततेबाबत 62
23 प्रभाग क्रमांक 17 मधील कोल्हटकर आळी अनंत इंग्लिश स्कूल प्रतापसिंह हायस्कूल राजवाडा येथील रस्ते डांबरीकरण करणे ........ 67
24 प्रभाग क्रमांक 2 ब पेठ सदरबझार शॉपिंग सेंटर येथील रस्ते डांबरीकरण करणे. ........ 69
25 प्रभाग क्रमांक 5 पेठ गोडोली खंदारे वस्ती ओढ्यास आर.सी.सी गटर संरक्षक भिंत बांधणे. ........ 71
26 मंगळवार पेठ डफळे हौद चौक ते विश्वेश्वर मंदिर ते मारुती मंदिर अखेर रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमिततेबाबत ........ 72
27 सोनगाव कचरा डेपो येथे स्टॉर्म वाटर ड्रेन बांधणे कामातील ........ 77
28 प्रभाग क्रमांक 7 पेठ मल्हार जेल शेजारील ओडा ते हरी मिस्तरी गारेज ते खंडोबा माळ पाईप ड्रेनकरणे. ........ 81
29 पेठ सदरबझार 442 नगरपरिषद कर्मचारी चाळ दुरुस्त करणे. ........ 82

30 अमृत कार्यक्रमांतर्गत सातारा शहराची भुयारी गटर योजना कामाबाबत. ..... 83

31 गणेशोत्सव सन 2020 करीता मोठया गणेशमुर्ती विसर्जनासाठी तलावास प्लास्टीक लायनर बसविणे. ..... 87

32 भिमाबाई आंबेडकर हौसिंग सोसायटी येथे पाणी टाकी बांधणे. ..... 89

33 प्रभाग क्रमांक 8 शनिवार चौक ते बुधवार नाका व अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. ..... 91

34 अंजली कॉलनी, सुयोग कॉलनी व कवारे कॉलनी अर्कशाळा नगर कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे 93

35 प्रभाग क्र. 11, महात्मा फुले भाजी मंडई ते नृसिंह मंदिर, जुना मोटर स्टँड येथील रस्ते डांबरीकरण करणे 96

36 प्रभाग क्र.2 सदर बझार कॅनॉल चौक ते मोना स्कूल जरंडेश्वर नाका रस्ता रुंदीकरण डांबरीकरण करणे 99

37 प्रभाग क्र. 15 अ पेठ माची शंकराचार्य मठ रोड ते नाला अखेर संरक्षक भिंत बांधणे कामाबाबत . 102

38 प्रभाग क्र.7 पेठ गुरुवार ढोर गल्ली पूल ते करपे हॉस्पिटल ओढा अखेर संरक्षक भिंत बांधणे ...... 104

39 प्रभाग क्र.7 पेठ गुरुवार ढोर गल्ली पूल ते करपे हॉस्पिटल ओढा अखेर संरक्षक भिंत बांधणे ...... 106

40 प्रभाग क्रमांक 5 पेठ गोडोली भैरोबा मंदिर जवळ ओपन जिम तयार करणे बाबत ..... 108

41 सोनगाव कचरा डेपो येथे कुंपणभिंत बांधणे ..... 109

42 प्रभाग क्र. 16 ते 20 मधील दैनंदिन घरोघरी जाऊन कचरा संकलन करून सोनगाव कचरा डेपो येथे पोहोच करणे कामाबाबत. ..... 113

43 प्रभाग क्र. 1 ते 15 मधील दैनंदिन घरोघरी जाऊन कचरा संकलन करून सोनगाव कचरा डेपो येथे पोहोच करणे कामाबाबत. ..... 119

44 स्वच्छ महाराष्ट्र अभियानंतर्गत देण्यात आलेल्या शौचालय अनुदानाबाबत ..... 126

45 पाणी पुरवठा विभागासाठी ब्लिचींग पावडर व अॅलम (तुरटी) खरेदीतील अनियमितते बाबत.. 127

46 सातारा शहरातील पाणी पुरवठा अंतर्गत विविध ठिकाणी व्हॉल्व ऑपरेटर (घंटेवारी) करणेसाठी मजुर पुरवठा करणे ..... 131

47 जकातवाडी फिल्ट्रेशन प्लॅन्ट पंप हाऊस व उपळी के टी वेअर शहापुर पंप हाऊस चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे ..... 136

48 सातारा शहरातील ½ इंची ते 18 इंची व्यासाच्या वितरण नलिकेचे लिकेज काढणे व प्लंबिंग साहित्य पुरवणे ..... 140

49 कोविड 19 मुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या अंत्यविधी साठी झालेल्या खर्चाबाबत. .......... 143
50 पथविक्रेत्यांना नगरपरिषदेमार्फत कोविड संसर्ग आपत्ती कालावधीत अनुदान अदा करणे बाबत 146
51 पाणी पुरवठा विभागाकडील पाईपलाईन लिकेज व नगरपरिषदेच्या मालकीची बोअरींग दुरुस्तीवर झालेल्या खर्चाबाबत .......... 147
52 पथदिवे देखभाल व दुरुस्ती खर्चाबाबत. .......... 149
53 न.प.हद्दीमध्ये हायमास्ट दिवे बसविणे,पोल बसविणे, शिफटींग करणे,न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल करणे कामातील अनियमिततेबाबत (सन 2016-17 ठेक्याप्रमाणे) 152
54 न.प.हद्दीमध्ये हायमास्ट दिवे बसविणे,पोल बसविणे शिफटींग करणे,न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल करणे कामातील अनियमिततेबाबत (सन 2019-20 ठेक्याप्रमाणे) 155
55 सन 2021/2022 या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता धारकांकडे मोठया प्रमाणात कर थकबाकी असलेबाबत. .......... 159
56 शाहू चौक ते मोती चौक ते डी.सी.सी.बँक अखेरचा रस्ता डांबरीकरण करणे खर्चाबाबत. .......... 161
**कलम ९ क खालील आक्षेप .......... 165**
**------------------- निरंक ------------------- .......... 166**
**कलम ९ ड खालील आक्षेप .......... 168**
57 नगरपरिषदेमध्ये द्विनोंदीय लेखापध्दतीची अंमलबजावणी करणेबाबत. .......... 169
58 5 टक्के दिव्यांग कल्याण योजना खर्चाबाबत .......... 169
59 5 टक्के दुर्बल घटक कल्याण योजना खर्चाबाबत .......... 170
60 नगरपरिषदेच्या चतुर्थश्रेणी महिला व पुरुष कर्मचा-यांना पावसाळयात काम करणा-यांना रेनकोट व रेणीसुट पुरविणे कामाच्या नस्तीतील उणिवांबाबत. .......... 171
61 रोख रक्कम हाताळणा-या कर्मचा-यांचे जामीन कदबे न घेतलेबाबत .......... 173
62 जी. आय. एस. मॅपिंग प्रणालीची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही न केलेबाबत. .......... 173
63 मालमत्ता कर मंडळ स्थापन न केलेबाबत .......... 174
64 सन 2021/2022 मध्ये पाणीपट्टी मागणी नोंदवही न ठेवलेबाबत. .......... 174

65 कर्जनिवारण निधी (सिंकींग फंड)ची स्थापना न केलेबाबत ........ 175
66 सन 2021/2022 मध्ये पाणीपट्टी मागणी नोंदवही न ठेवलेबाबत ........ 176
67 जामीन कदबे उपलब्ध करणे बाबत (शिक्षण मंडळ) ........ 177
68 मुख्याधिकारी यांनी लेख्यांची तपासणी करणेबाबत. ........ 177
69 वार्षिक प्रशासकीय तपासणीबाबत ........ 178
70 स्थावर, जंगम, अमूर्त मत्तांची नोंदवही न ठेवल्याने झालेल्या अनियमिततेबाबत. ........ 179
71 सातारा नगरपालिका २०२०-२१-२२ कार्यवृत्तांत नोंदवहीतील अनियमिततांबाबत. ........ 179
72 सुरक्षा अनामत रकमांबाबत ........ 180
73 नगरपरिषद स्वनिधी व इतर सर्व शासकीय योजनांच्या बँक ताळमेळ बाबत ........ 181
74 विविध भागांसाठी फलेक्स बोर्ड बनविणे व रंगविणे कामातील अनियमिततेबाबत. ........ 182
75 सेवानिवृत्तीवेतन नोंदवही बाबत ........ 183
76 सातारा नगरपरिषदेकडील CCTV खरेदीच्या कामातील अनियमिततेबाबत ........ 184
77 सातारा नगरपरिषद कार्यालयात CCTV बसविणे कामाच्या अनियमिततेबाबत ........ 186
78 बांधकाम परवाना नोंदवहीबाबत ........ 187
79 नगरपरिषद हदीतील अनधिकृत बांधकामांबाबत ........ 189
80 नगरपरिषदे कडील अग्निशमन वाहन खर्चाबाबत ........ 191
81 वृक्ष लागवड, त्यांचे जतन व वृक्ष गणना करणे याबाबत. ........ 192
82 करवसुलीच्या संगणकीय आज्ञावली MAINET (मायनेट) बाबत ........ 193
83 मालमत्तेचे पुनर्निर्धारण व नगरपंचायतीचे उत्पन्न वाढविणेबाबत ........ 194
84 संगणकीकृत लेखे मुद्रित स्वरुपात न ठेवलेबाबत ........ 195
85 भांडवली मूल्यावर कर आकारणी न केलेबाबाबत ........ 195
86 पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने विशेष पाणीपट्टी दराची आकारणी न केलेमुळे नगरपरिषद निधीचे नुकसान झालेबाबत. ........ 196
87 अपूर्ण बांधकामांबाबत ........ 198
88 स्वच्छ महाराष्ट्र अभियानमधील अनियमिततेबाबत ........ 199
89 कोविड संदर्भात वरद एजन्सीकडून करणेत आलेल्या खरेदीतील अनियमिततेबाबत. ........ 200
90 सार्वजनिक शौचालय सफाई ठेक्यातील अनियमिततेबाबत. ........ 203
91 जन्म मृत्यू नोंदणी फी शासन निधीमध्ये जमा न केलेबाबत ........ 206

92 पावती पुस्तके व पावती पुस्तके साठा नोंदवहीबाबत ........ 206
93 गणेश मंडप डेकोरेटर्स यांना प्रदान रकमेतील अनियमिततेबाबत ........ 207
94 बंद व जुनी वाहने निर्लेखनाबाबत ........ 210
95 सातारा नगर परिषदेचे पेठ केसरकर येथील मंगल कार्यालयाबाबत ........ 211
96 नगरपरिषदे अंतर्गत असलेल्या व्यापारी गाळे थकीत भाडे रक्कमेबाबत. ........ 212
97 महिला बालकल्याण योजना खर्चाबाबत ........ 214
98 दावे व खटले यांच्या संबधातील खर्चाबाबत. ........ 215
99 प्रभागनिहाय रस्ते गटारे, मंडई, गाळ काढणे, साफसफाई इत्यादी विविध कामांसाठी सेवापुरविणे ठेक्यातील अनियमिततांबाबत ........ 216
100 वृक्ष प्राधीकार निधीबाबत. ........ 219
101 पाणीपट्टी मापक जोडण्यासाठी गृहजोडणी नोंदवही न ठेवलेबाबत ........ 220
102 सन 2021/2022 या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता धारकांकडे मोठया प्रमाणात पाणीपट्टी थकबाकी असलेबाबत. ........ 221
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ........ 2
**विवरणपत्रे व जोडपत्रे** ........ 3

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | | 44 | | |
| सामान्य प्रशासन | 15, 16 | 56 | | 71, 72, 73, 74, 75 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14 | 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 40, 41 | | 95, 96 |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | | 53, 54 | | 76, 77 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 17 | 45, 46, 47, 48, 49, 50, 51, 52 | | 101 |
| लेखा विभाग | 1, 2, 3, 4, 5 | 19, 20 | | 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70 |
| नगर रचना | | | | 78, 79 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | | | | 102 |
| कर निर्धारण व संकलन | 18 | 55 | | 81, 82, 83, 84, 85, 86, 87 |
| आरोग्य | | 42, 43 | | 88, 89, 90 |
| वाहन विभाग | | | | 94 |
| विधी विभाग | | | | 98 |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | 6 | | | |
| भांडार | | | | 92, 93 |
| पर्यावरण किंवा प्रदूषण नियंत्रण विभाग | | | | 99, 100 |
| महिला व बालकल्याण विभाग | | | | 97 |
| अग्निशमन विभाग | | | | 80 |
| जन्म मृत्यु नोंदणी विभाग | | | | 91 |

## I Part I :मागील लेखा परीक्षण अहवाल

***नगरपरिषद सातारा***

भाग एक

नगरपरिषद शिक्षण मंडळ, सातारा, जिल्हा सातारा

मागील लेखापरीक्षण अहवाल

प्रलंबित परिच्छेदांचे विवरणपत्र

मागील अहवालातील खालील परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा.आयुक्त, पुणे विभाग यांचे कडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार चालू आहे.

| अ.क्र. | लेखापरीक्षण वर्ष | प्रलंबित परिच्छेद | पीआरसी परिच्छेद | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | 1951-52 | 21 | | 1 |
| 2 | 1954-55 | 8(अ) परिशिष्ट ब, परिशिष्ट ड (6) | | 1 |
| 3 | 1955-56 | 7 परिशिष्ट (ब-14) | | 1 |
| 4 | 1956-57 | 1 | | 1 |
| 5 | 1959-60 | 16 परिशिष्ट (ब) (14 व 16) | | 2 |
| 6 | 1960-61 | परिशिष्ट क्रमांक 4, परिशिष्ट क्रमांक क, ब, 17 | | 1 |
| 7 | 1961-62 | 8 परिशिष्ट ब (5 व 28) 34 व 37(4) | | 2 |
| 8 | 1962-63 | 8 परिशिष्ट 10,11 | | 1 |
| 9 | 1963-64 | 6 परिशिष्ट (ब) (28,12)<br>4 परिशिष्ट (ब)(2,3,4,9) | | 2 |
| 10 | 1965-66 | 8,9,13,14 | | 4 |
| 11 | 1966-67 | 3,5,7,8, | | 3 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | 1967-68 | 1 | | 1 |
| 13 | 1968-69 | 8,12,19,22 | | 4 |
| 14 | 1969-70 | 7,10,11,25 | | 4 |
| 15 | 1970-71 | 7,9,15,16,18,21,25,30अ | | 8 |
| 16 | 1971-72 | 7,9,12,13,14,15,16,17,18,19,20,27,29,31 | | 14 |
| 17 | 1972-73 | 9,10,12,13,14 | | 5 |
| 18 | 1973-74 | 7,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21(ब)(3) | | 14 |
| 19 | 1974-75 | 4,5,6,8,9(अ),10,11,12,13,14,15,16,17,20 | | 14 |
| 20 | 1975-76 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27 | | 25 |
| 21 | 1976-77 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17 | | 15 |
| 22 | 1977-78 | 3,4,5,6,7,8,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>21(अ) | | 28 |
| 23 | 1978-79 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26 | | 24 |
| 24 | 1979-80 | 3,4,5,6,,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33 | | 31 |
| 25 | 1980-81 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35 | | 33 |
| 26 | 1981-82 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33 | | 30 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 27 | 1982-83 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25(अ,ब,क),26,27,28,29,30,31,32,33,34,35,<br>36,37,38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51 | | 49 |
| 28 | 1983-84 ते<br>1984-85 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,<br>38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,<br>55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71 | | 69 |
| 29 | 1985-86 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,<br>38,39,40 | | 42 |
| 30 | 1986-87 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,25,26,27,28,29,30,31,32,33,34 | | 31 |
| 31 | 1987-88 ते<br>1989-90 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,<br>39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,<br>55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69 | | 67 |
| 32 | 1990-91 ते<br>1992-93 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,<br>39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,<br>55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,72,73,74,75 | | 73 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 33 | 1993-94 ते 1994-95 | 3,4,5,6,6ब,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20, 21,22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42 | | 41 |
| 34 | 1995-96 ते 1998-99 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38, 39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54, 55,56,57,58,59,60,61,62,63,64,65 | | 63 |
| 35 | 1999-00 ते 2001-02 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38, 39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54, 55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81 | | 79 |
| 36 | 2002-03 ते 2003-04 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38, 39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54, 55,56,57,58 | | 56 |
| 37 | 2004-05 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25 | | 23 |
| 38 | 2005-06 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36 | | 34 |
| 39 | 2006-07 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21, 22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38 | | 36 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 40 | 2007-08 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,<br>22,23,24,25,26 | | 26 |
| 41 | 2008-09 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,<br>21,22,23,24 | | 24 |
| 42 | 2009-10 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,<br>21,22,23,24,25 | | 25 |
| 43 | 2010-11 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,<br>21,22,23,24 | | 24 |
| 44 | 2011-12 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19 | | 19 |
| 45 | 2012-13 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13 | | 19 |
| 46 | 2013-14 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,<br>21 | | 13 |
| 47 | 2014-15 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13 | | 21 |
| 48 | 2015-16 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13 | | 13 |
| 49 | 2016-17 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13 | | 13 |
| एकुण | | | | 1129 |

भाग पहिला (मागील लेखापरीक्षण)

नगरपरिषद सातारा सन 2020-21 ते 2021-22

मागील लेखापरीक्षण अहवालातील थकीत परिच्छेद मागील अहवालातील खालील परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा. आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार चालू आहे.

| लेखापरीक्षण वर्ष | प्रलंबित परिच्छेद क्रमांक | | एकुण परिच्छेद | पंरास/नागरी स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद व सांकेतांक क्रमांक | पंरास/नागरी स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालनातील अंतर्भूत परिच्छेदांचा संक्षिप्त तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| | स्वनिधी | शासन निधी(केंद्र व राज्य) | | | |
| 1972-73 | 8 | - | 1 | - | - |
| 1976-77-78 | 62 | 7 | 2 | - | - |
| 1978-79-80 | 3,83 | 33 | 3 | - | - |
| 1980-81-82 | 5,26,34,35,37,81,82 | - | 7 | - | - |
| 1982-83-84 | 8,32,39,44,53,94, 106 | 37 | 8 | - | - |
| 1984-85-86 | 8,17,18 | - | 3 | - | - |
| 1986-87 | 15,66,82,102 | 13,14 | 6 | - | - |
| 1987-88-89-90 | 7,10,17,25,26,27,38, 51,66,102,145,188, 197,215, | - | 14 | - | - |
| 1992-93 | 26,27,32,45,70,71, 87,94,106(2) | 22 | 10 | - | - |
| 1996-97-98-99 | 5,10,17,23,25,30,31, 32,33,47,48,58,60, 93,104,109,121,145, | 9 | 25 | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 147,151,168,187,<br>198,200 | | | | |
| 1999-00-01 | 16,44,55,64,69,71,<br>175,176,180,193,<br>206,221 | - | 12 | - | - |
| 2001-02-03 | 5,22,42,44,46,47,48,<br>54,92,97,103,105,<br>106,111,115,117,<br>128 | - | 17 | - | - |
| 2003-04 | 6,16(ब),18,22,44,46,<br>47,48,49,55,58,61,<br>70,77,82,84 | - | 16 | - | - |
| 2004-05 | 14,17,18,24,30,32,<br>34,36,50,56,57,65,<br>94,95,96,97 | - | 16 | - | - |
| 2005-06 | 5,6,19,20,23,25,38,<br>39,40,43,45,46,62,<br>76,81,89 | - | 16 | - | - |
| 2006-07 | 4,6,8,9,11,14,18,24,2<br>5,33,34,38,39,44,<br>45,46,47,49,51,55,<br>60,61,63,64,66,67,<br>69,71,73,74,75,77,<br>78,79,81,82,83,84, | - | 46 | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 86,87,92,93,94,95,<br>99,100 | | | | |
| 2008-09 | 4,5,6,7,8,10,11,12,<br>13,15,16,17,21,22,<br>24,26,34,35,41,43,<br>44,45,46,47,52,53,<br>55,57,63,64,65,66,<br>71 | - | 33 | - | - |
| 2009-10 | 7,8,9,11,14,16,17,<br>20,22,23,25,26,27,<br>28,29,30,31,32,33,<br>34,36,39,40,42,43,<br>46,47,48,51,52,54,<br>55,56,58,59,60,61,<br>62,63,64,72,73,74,<br>75 | - | 44 | - | - |
| 2010-11 | 4,5,7,8,12,14,16,18,19,20,21,23,24,28,<br>33,34,35,36,37,40,<br>45,47,54,58,61,62,<br>66,67,69,71,72,73,<br>74,79 | 6 | 35 | - | - |
| 2011-12 | 3,4,5,6,8,9,10,11,13, | 7 | 59 | 13 – 3.78 | 13 – वॉर्ड क्रमांक 27 रविवारपेठ सर्वोदय कॉलनी, |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 14,16,19,20,22,23,<br>24,27,30,36,40,41,<br>44,45,46,47,48,49,<br>50,51,52,53,54,55,<br>57,58,60,61,62,63,<br>64,65,66,67,68,69,<br>71,74,75,77,79,80,<br>81,82,83,85,86,87,<br>88 | | | 16 – 3.79<br>46 – 3.80<br>79 – 3.443(25) | येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे आणि संरक्षक भिंत बांधणे.<br>16 – पाणी पुरवठा विभागाकडील तुरटी व टीसीएल साठा विसंगतीबाबत.<br>46 – विना निवीदा केलेल्या खरेदीबाबत.<br>79 – थकीत गाळा भाडे/इमारत भाडे/भुई भाडे/शाळा भाडे |
| 2012-13 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,1<br>1,12,13,14,15,16,<br>17,18,19,20,21,22,<br>23,24,25,26,27,28,<br>29,30,31,32,33,34,<br>35,37,38,39,40,41,<br>42,43,44,45,46,47,<br>48,49,50,51,52,53,<br>54,55,56,57,58,59,<br>60,61,62,63,64,65 | 36 | 65 | 12 – 3.175<br>13 – 3.176<br>24 – 3.177<br>4-3.66(34)<br>63,64-3.662(29) | 12 – जंतुनाशके खरेदीतील अनियमिततेबाबत.<br>13 – ब्लिचींग पावडर खरेदीतील अनियमिततेबाबत.<br>24 –वाहन वापरातील जादा झालेल्या खर्चाबाबत.<br>4- दुहेरी नोंद लेखापध्दतीप्रमाणे लेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झालेबाबत.<br>63,64-थकीत गाळा भाडे/भुई भाडे/शाळा भाडे |
| 2013-14 | 1,3,4,5,6,8,9,10,11,<br>12,13,14,15,16,18,<br>20,21,22,27,29,33, | 2,7,17,19,23,24,<br>25,26,28,30,31,32,<br>37,43,55,57,58,59,<br>61,69,70,76 | 82 | 22-3.121<br>23-3.122<br>24-3.123 | 22- हायप्रेशर सोडियम व्हेपर दिवे खरेदी खर्चाबबात.<br>23- एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेअंतर्गत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 34,35,36,38,39,40,<br>41,42,44,45,46,47,<br>48,49,50,51,52,53,<br>54,56,60,62,63,64,<br>65,66,67,68,71,72,<br>73,74,75,77,78,79,<br>80,81,82 | | | 43-3.124<br>70-3.125<br>67-3.483(52)<br>28-3.484(28)<br>6-3.487(32) | (IHSDP) योजनेअंतर्गत घरकुल बांधकामाबाबत व पायाभूती सुविधा खर्चाबाबत.<br>24-लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केलेबाबत.<br>43- UIDSSMT योजनेसाठी नगरपालिका हिस्सा (लोकवर्गणी) भरणेबाबत.<br>70- शासकीय विमा निधीचे कपातीबाबत.<br>67- संकलित कर (आकार पाणी/पाणीपट्टी/घरपट्टी/वृक्षकर/अग्निशमन कर/मोबाईल टॉवर कर)<br>28- थकीत गाळा भाडे/इमारत भाडे/भुई भाडे/शाळा भाडे<br>6- दुहेरी नोंद लेखापध्दतीप्रमाणे लेखे न ठेवलेबाबत. |
| 2014-15 | 1,5,6,7,13,14,16,18,19,20,21,22,23,24,<br>25,26,28,30,35,36,<br>38,39,40,41,42,44,<br>45,46,48,49,50,51,<br>52,53,54,55,56,57,<br>58,59,60,61,62,63,<br>64 | 2,3,4,8,9,10,11,12,<br>15,17,27,29,31,32,<br>33,34,37,43,47 | 64 | - | - |
| 2015-16 | 1,2,3,4,5,8,9,10,11, | 6,7,16,18,23,26,<br>27,31,32,33,34,35, | 73 | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 12,13,14,15,17,19,<br>20,21,22,24,25,28,<br>29,30,38,46,47,48,<br>49,50,52,54,56,57,<br>58,59,60,61,62,63,<br>64,65,66,67,69,70,<br>71,72,73 | 36,37,39,40,41,42,<br>43,44,45,51,53,55,<br>68 | | | |
| 2016-17 | 2,4,5,6,7,8,9,10,11,<br>12,13,14,15,18,19,<br>20,21,23,31,32,33,<br>34,35,36,37,38,39,<br>40,41,42,43,44,45,<br>46,47,48,49,50,51,<br>52,57,58,59,60,61,<br>62,63,64,65,66,68,<br>69,70,71,72,73,75,<br>77,78,79,80,81,85,<br>87,88,89,90 | 1,3,16,17,22,24,<br>25,26,27,28,29,30,<br>53,54,55,56,67,74,<br>76,82,83,84,86 | 90 | - | - |
| 2017-18 | 2,4,5,6,7,8,9,10,12,<br>13,14,16,17,18,19,<br>21,22,23,24,25,26,<br>27,29,30,32,33,35,<br>36,37,38,39,40,41, | 1,3,11,15,20,28,<br>31,34,42,43,49,54,<br>56,57,58,59,60,62,<br>65,73,79,81,82,93,<br>98,101 | 101 | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 44,45,46,47,48,50,<br>51,52,53,55,61,63,<br>64,66,67,68,69,70,<br>71,72,74,75,76,77,<br>78,80,83,84,85,86,<br>87,88,89,90,91,92,<br>94,95,96,97,99,100 | | | | |
| 2018-19 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,<br>12,13,14,16,17,18,<br>19,21,22,23,24,25,<br>26,27,29,30,32,33,<br>35,36,37,38,39,40,<br>41,42,44,45,46,47,<br>48,50,51,52,53,55,<br>58,61,63,64,66,67,<br>68,69,70,71,72,74,<br>75,76,77,78,80,83,<br>84,85,86,87,88,89,<br>90,91,92,94,95,96,<br>97,99,100 | 11,15,20,28,31,34,<br>43,49,54,56,57,59,<br>60,62,65,73,79,81,<br>82,93,98,101 | 101 | - | - |
| 2019-20 | 3,4,6,7,9,10,14,15,<br>17,18,21,24,25,26,<br>27,28,29,30,31,32, | 1,2,5,8,11,12,13,<br>19,20,22,23,38,39,<br>40,41,42,47,48,49, | 71 | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 33,34,35,36,37,43,<br><br>44,45,46,50,51,52,<br><br>53,54,55,56,57,58,<br><br>61,62,63,64,65,67,<br><br>68,69,70,71 | 59,60,66 | | | |
| एकुण | 851 | 169 | 1020 | 17 | |

# Part II

## *नगरपरिषद सातारा*

## भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ, ब, क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## 1 अर्थसंकल्पीय तरतुद व खर्चावरील निरीक्षणे..

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद साताराचे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरिक्षणामध्ये अर्थसंकल्प,पुनर्विनियोजन विवरण पत्राचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे उणिवा/अनियमीतता निर्दशनास आल्या. यावर लेखापरीक्षणामध्ये पुढीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहेत.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.404 ते 425 मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करुन अंदाजपत्रक तयार केलेले नाही. नगरपरिषदेचा खर्च हा अपेक्षित जमा रकमेच्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्यक्षात जमा रक्कम कमी झाली तरी खर्च मात्र अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे करण्यात येतो. जमा रक्कम कमी प्राप्त झाल्यामुळे त्याची भरपाई इतर निधीतून/उपलब्ध निधीतुन केल्यामुळे इतर अत्यावश्यक बाबींसाठी निधी कमी पडून नगरपरिषदेची आर्थिक स्थिती खालावत जाते त्यामुळे नगरपरिषदेच्या दायीत्वामध्ये वाढ होत राहते.

२. महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग शासन पत्रक्र.जीईएन-1093/794/प्र.क्र.66/नवि-14/दिनांक 17/04/1993, महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग शासन निर्णयक्र.जीईएन-1093/1198/नवि-14,दिनांक 30/06/1993, दिनांक 14 जुलै 1993, दिनांक 30 डिसेंबर 2006 व दिनांक 8 नोव्हेंबर 2010 अन्वये वार्षिक एकुण उत्पन्नापैकी बांधील खर्च वजा जाता राहिलेल्या निव्वळ महसुलातील 5 टक्के इतका निधी हा महिला व बालकल्याणासाठी राखून ठेवणे आवश्यक असुन त्याप्रमाणे प्रत्यक्षात खर्च करणे आवश्यक आहे. तथापी महिला व बालकल्याणासाठी एकुणरु.39,00,000/-इतकी तरतुद केली असुन प्रत्यक्षात रु. 22,12,291/-इतका खर्च करण्यात आलेला महिला व बालकल्याणासाठी स्वतंत्र रोकडवही ठेवलेली नसून रोकडवही अभावी एकुण अनुशेष,महिला व बालकल्याणासाठी केलेला खर्च रु.221291/- वजा जाता एकुण रक्कम रु.3678709/-इतका कमी खर्च केलेला आहे. त्यामुळे अनुशेष ठेऊन महिला व बालकल्याणच्या लाभार्थ्यांना त्यांच्या देय लाभापासुन वंचीत ठेवलेले आहे असे दिसून येते.

3.नमुना दाखल खाली नमुद केलेप्रमाणे बाबनिहाय तरतुद करुनही कमी प्रमाणात खर्च करण्यात आलेला आहे, किंवा खर्च निरंक ठेवला आहे. त्यामुळे त्या शिर्षातील लाभार्थी त्यांच्या देय लाभापासुन वंचित राहीलेले आहेत. म्हणजेच अंदाजपत्रक बनविताना लेखासंहितेमधील तरतुदींचा विचार करण्यात आलेला नाही.ही बाब वित्तीय औचित्यास अनुकुल नाही असे दिसून आले.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सुधारित अंदाजपत्रकीय | प्रत्यक्षखर्च | कमीखर्च | जादाखर्च |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | तरतुद | | | |
| **अ)महसुली खर्च** | | | | | |
| 1 | वेतनखर्च (साप्रवि) | 213000000 | 197797261 | 15202739 | -- |
| 2 | वेदयकिय प्रतिपूर्ती देयक | 3000000 | 2289061 | 710939 | -- |
| 3 | कर्मचारी सुरक्षा साहित्य | 100000 | 00 | 100000 | -- |
| 4 | अंत्यसंस्कार मंडळांना अर्थ साहय्य | ० | ४९८२५४ | ४९८२५४ | -- |
| 5 | कार्यालयीन स्टेशनरी इ. | 700000 | 529797 | 170403 | -- |
| 6 | कंत्राटी अभियंता वेतन | 570000 | 177000 | 393000 | -- |
| 7 | खाजगी टँकर भाडे | 700000 | 365815 | 334185 | -- |
| 8 | मोजणी फी | 200000 | 76874 | 123126 | -- |
| 9 | टॅक्स कन्सल्टंट फी | 500000 | 60750 | 439250 | -- |
| 10 | पाणी तपासणी फी | 150000 | 2400 | 147600 | -- |
| 11 | सर्वसाधारण जाहिराती | 200000 | 96748 | 103252 | -- |
| 12 | सॉफ्टवेअर देखभाल दुरुस्ती | 200000 | 00 | 200000 | -- |
| | **ब)भांडवली खर्च** | | | | -- |
| 13 | शाहू कला मंदीर सुधारणा | 4543000 | 1842950 | 2700050 | -- |
| 14 | सी सी टी व्ही कॅमेरे बसविणे (२०-२१) | २०००००० | ४४६८८५५ | २४६८८५५ | -- |
| 15 | गटारे दुरुस्ती | 28000000 | 9180035 | 18819965 | -- |
| 16 | मागासवर्गीय दुर्बल घटक योजना | 9180000 | 2316830 | 6863170 | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 17 | महिला व बाल कल्याण कार्यक्रम | 3900000 | 2212291 | 1687709 | -- |
| 18 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना | 130000000 | 85039546 | 44960454 | -- |
| 19 | अल्पसंख्यांक विकास कार्यक्रम | 1500000 | 00 | 1500000 | -- |
| 20 | नगरोत्थान योजना | 246332158 | 00 | 246332158 | -- |
| 21 | 14 वा वित्त आयोग | 4,40,00000 | 3,53,73,872 | 8626128 | -- |

4.वरीलप्रमाणे मागासवर्गीय व दुर्बल घटकांसाठी तसेच अल्पसंख्यांक जनतेसाठी करावयाच्या खर्चाबाबत तरतूद असूनही उदासिनता दिसून येते.तसेच नगरोत्थान योजनेमध्ये रक्कम शिल्लक असूनही खर्च निरंक असून रुपये 24.63 कोटी रुपये अखर्चीत निधी आहे, यामुळे विकास कामे रखडली, शिवाय शासकीय निधी अडकून पडला असे दिसून येते.

5.14वा वित्त आयोग सन 2019 अखेर संपूर्ण रक्कम खर्च करावयाची असतांना सन 2021-22 अखेर रुपये 86,26,000/- इतकी रक्कम अखर्चीत आहे वरीलप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतूद व खर्चाचा मेळ घेतला असता काही लेखाशिर्षांखाली 50 टक्के रक्कम अखर्चीत राहीली आहे. ही बाब निश्चितपणे अव्यवहार्य ठरते.

6.नगरपरिषद प्रशासन,संचालनालय,मुंबई यांचे स्थायी निर्देश क्र.05 क्र.नपसु 00/प्र.क्र.24/2000/1/ दि.13 ऑक्टोबर 2000 नुसार नगरपरिषदेचा खर्च हा अपेक्षित जमा रकमेच्या प्रमाणात करण्याचे निर्देश आहेत. अंदाजपत्रकीय जमा रक्कमा हया 100 टक्के प्राप्त होतील अश्या पध्दतीची कार्यवाही केली पाहीजे.काही बाबींवर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जादा रक्कम जमा झाली असल्याचे उल्लेखनीय कार्य झाले आहे.वर्ष 2020-21 मध्ये हॉटेल अनुज्ञप्ती फी चा अंदाज रुपये 5000/- इतका होता, तथापि रुपये 3,44,880/- इतकी प्रत्यक्ष जमा झाली. परंतु वर्ष 2021-22 मध्ये तरतूद निरंक आणि जमा देखील निरंक आहे. ही याबाबतची तर्कसंगत कारणे स्पष्ट होणे आवश्यक आहे. खाली नमुद केलेप्रमाणे जमा शिर्षाच्या रक्कमा या अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा कमी प्राप्त झालेल्या आहेत. त्या 100 टक्के प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यवाही केलेचे दिसत नाही. त्यामुळे वित्तीय तुट र्निमाण होत असुन नगरपरिषदेच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होत आहे.

| अ.क्र. | जमेचेशिर्ष | सुधारित अंदाजपत्रकीय तरतुद | प्रत्यक्षजमा | कमीजमा | जादाजमा |
|---|---|---|---|---|---|
| **महसुलीजमा** | | | | | |
| 1 | संकलितकर | 130000000 | 108973008 | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | विशेषपाणीपट्टी | 35700000 | 26691552 | | |
| 3 | विशेषशिक्षणकर | 6400000 | 4730611 | | |
| 4 | अग्नीशमनकर | 2562000 | 1565401 | | |
| 5 | अग्नीशमनसेवाशुल्क | 50000 | 120000 | | |
| 6 | वृक्षकर | 50000000 | 3404655 | | |

7.महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 कलम 101 (6) व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.426 ते 430 मधील तरतुदींच्या अधीन राहुन नमुना नं. 90 मध्ये मंजुर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाच्या कक्षेत व अर्थसंकल्पामध्ये मंजूर मर्यादेंच्या बाहेर न जाता एकाच मुख्य शिर्षाखाली एका उप-शीर्षातुन दुस-या उप-शीर्षामध्ये किंवा एका गौणशीर्षातून दुस-या गौणर्शीर्षात पुर्नर्विनियोजन करता येते. अशा पुर्नर्विनियोजनाचे विवरणपत्र नगरपरिषदेच्या पुढील सभेत सादर करणे आवश्यक आहे. तथापी नगरपरिषदेने नमुनानं. 90 मध्ये विहित केलेल्या नमुन्यात पुनर्विनीयोजन विवरणपत्रक तयार केलेले नाही. त्यामुळे अर्थसंकल्पाच्या कक्षेत व अर्थसंकल्पामध्ये मंजूर मर्यादेंच्या बाहेर न जाता एकाच मुख्यशिर्षाखाली एका उप-शीर्षातुन दुस-या उप-शीर्षामध्ये किंवा एका गौणशीर्षातून दुस-या गौणर्शीर्षात पुर्नर्विनियोजन केलेबाबत खात्री करता आली नाही.

महसुली जमेमध्ये गतवर्षीच्या तुलनेत विवीध शिर्ष/उपशिर्षामध्ये एकुणरु.23,51,51,585/-इतक्या रकमेची वाढ दर्शविण्यात आलेली असुन महसुल खर्चातील विवीध शिर्ष/उपशिर्षा मध्ये एकुण रु.21,04,87,181/-इतक्या रकमेची घट दर्शवली आहे. तसेच भांडवली खर्चाच्या विवीध शिर्ष/उपशिर्षामध्ये एकुणरु.42,84,35,869/-इतक्या रकमेची मागील वर्षाच्या तुलनेत वाढ दर्शविण्यात आलेली आहे. भांडवली जमेतील विवीध शिर्ष/उपशिर्षामध्ये एकुण रु.32,24,24,762/-इतक्या रकमेची घट दर्शवली आहे. म्हणजेच महसुली व भांडवली खर्चामध्ये एकुण झालेली बचत/घट नियमबाहयपणे मंजुर केलेली आहे. पुनर्विनियोजन विवरणपत्रकास स्थायी समिती सभेने व प्रशासक यांनी अंतिम मंजुरी प्रदान केलेली आहे.अधिनियमातील व लेखासंहितेतील तरतुदींच्याविरुध्द पुर्नर्विनियोजन अंदाजपत्रकास मान्यता दिलेली असल्याने झालेल्या अनियमिततेस शासनाचे क्षमापन घेतलेचे दाखवावे.

8.महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्र.बीसीसी 1085/93/सीआर 8/85/नवि-10/दिनांक 2 फेब्रुवारी 1988 अन्वये नगरपालिकांनी आपल्या महसूली उत्पन्नाचा बांधील खर्च वजा जाता 5 टक्के भाग दुर्बल घटकांच्या म्हणजेच अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवणे आवश्यक असुन त्याप्रमाणे प्रत्यक्षात खर्च करणे आवश्यक आहे. मागासवर्गीय दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी एकुण रु. 9180000/-इतकी तरतुद केली असुन प्रत्यक्षात रु. 2316830/-इतका जादा खर्च करण्यात आलेला आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा 68631701/-इतका जादा खर्च केलेला आहे. नगरपरिषदेने अनाधिकाराने मागासवर्गीय दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी स्वतंत्र रोकडवही ठेवलेली नसुन रोकडवही नसल्याने

एकुण अनुशेष 2021/22 अखेर किती कमी/जादा झाला आहे, अनुशेष किती याचा बोध होऊ शकत नाही.. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा या शिर्षाखाली रुपये 13,00,00,000/- इतकीतरतूद असून रुपये 8,50,39,546/- इतकाच खर्च झालेला आहे. सदर खर्च तरतूदीपेक्षा 35% कमी खर्च झाला आहे. केलेला खर्च मागासवर्गीय वस्ती मध्येच केल्याबाबत नोंदी दिसून आल्या नाहीत. सदरच्या नोंदी लोकसंख्येनुसार विकासकामे पूर्ण करणे आवश्यक आहे.

9.महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग शासन निर्णयक्र.-दिव्यांग-2018/प्र.क्र.52/18/नवि-28,दिनांक 10 मे 2018 अन्वये खर्च योग्य निधी पैकी किमान 5 टक्के इतका निधी हा दिव्यांग व्यक्तींना दारिद्रय निर्मुलन योजने अंतर्गत राखून ठेवणे आवश्यक असुन त्याप्रमाणे प्रत्यक्षात खर्च करणे आवश्यक आहे. तथापी दिव्यांग कल्याणासाठी तरतुद केली नसुनही बाब नियमांचा भंग करणारी आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा महसुली जमेच्या 3,30,18,333/- इतका कमी खर्च केलेला आहे. नगरपरिषदेने दिव्यांग कल्याणासाठी स्वतंत्र रोकडवही ठेवलेली नाही. रोकडवही अभावी करावयाचा खर्च असणारी तरतूद करावयाचा खर्च आणि एकुण अनुशेष समजून आला नाही.

10.महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 कलम 101 (1अ) नुसार नगरपरिषदेने वेगवेगळया सेवां वर मागील वर्षी किती खर्च करण्यात आला आणि त्या सेवांपासुन किती उत्पन्न प्राप्त झाले, एकुणच किती तुट निर्माण झाली, अशी तुट कोणत्या निधीतुन/कोणत्या उत्पन्नातुन भरुन काढण्यात आली या बाबतचा अहवाल चालू वर्षाच्या अर्थसंकल्पासोबत सादर करणे आवश्यक आहे तथापी असा अहवाल अर्थसंकल्पासोबत सादर करण्यात आलेला नाही त्याचे नियोजन नसल्याने दरवर्षीप्रमाणे त्रुटींची वारंवारीता कायम आहे. ही बाब निश्चितपणे नगरपरिषदेचे नुकसान करणारी आहे तरी उपरोक्तबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

DATNBYM8601 (Ref No : 119, Hmm No : 12)

## 2 मत्ता व दायित्व तयार न केलेबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 0 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा, सन 2020-2021 ते 2021-2022 चे लेखापरीक्षणामध्ये मत्ता दायित्व सादर करणेबाबत टिपण क्र. ५ दि. 06/१२/2022 अन्वये सुचित करण्यात आले होते. त्यास अनुसरुन अनुपालन सादर न झाल्याने खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

१.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 387 नुसार नमुना नं 81 व 16 व 17 जंगम मालमत्ता व स्थावर मालमत्ता नोंदवही व नियम 62 व 250 नुसार नमुना नं 21 मध्ये जड संग्रह साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही ठेवुन प्रमाणित केली नसल्याने मत्तेमध्ये नगरपरिषदेच्या मालमत्ता जसे इमारती, जमिनी, गाळे, रस्ते व इतर चल संपत्ती, फर्निचर, वाहने इ. व अचल संपत्तीची नोंद मत्तेमध्ये ठेकेदाराची/ पुरवठादाराची किती देयके व ठेवी

प्रलंबित आहे याबाबत खात्री होत नाही. महाराष्ट्र राज्य विकास मंडळाची वीज बिल थकबाकी किती आहे याबाबत नोंद् वह्यांची पडताळणी करता आली नाही.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 387 मधील नमुना नं.80 मध्ये अस्थायी मत्ता व दायित्व मत्ता व दायित्व विवरण पत्र ठेवलेले नाही. मत्ता व दायित्व यांचे विवरणपत्र नमुना नं.80 प्रमाणे तयार करून प्रशासकीय अहवालासोबत जोडलेले नाही. प्रशासकीय अहवालाची प्रत मा. संचालक स्थनिक निधी लेखा परीक्षा यांना सादर केलेली नाही.

३.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील तरतुदी प्रमाणे ठेवावयाच्या नोंदवह्या व अन्य अभिलेखे न ठेवल्याने मत्ता व दायित्व सबंधी पडताळणी करता आली नाही.

DATNBYM8601 (Ref No : 50, Hmm No : 5)

## 3 सन 2020-21-22 चे वार्षिक लेखेबाबत तसेच तिमाही आणि वार्षिक लेख्यांचे प्रसिध्दीकरण न केलेबाबत.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | ० | **लेखाशीर्ष** | : | ०० | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : | 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020-2021 ते 2021-2022 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये सन 2020-2021-2022 चे वार्षिक लेखे मा. जिल्हाधिकारी, सातारा व मा. संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य यांना न पाठविलेबाबत व तिमाही आणि वार्षिक लेख्यांचे प्रसिध्दीकरण बाबत टिपण क्र. १२ दि.०७ /१२/२०२२ अन्वये सुचित करण्यात आले. त्यास अनुसरुन अनुपालन सादर न झाल्याने खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1.वार्षिक लेख्याची पडताळणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 कलम 102 उपकलम (3) अन्वये नगरपरिषदेने वार्षिक लेख्यांचा गोषवारा विहित नमुन्यात तयार करुन तो प्रथम सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, पुणे यांचेकडून प्रमाणित करून तद्नंतर मा. संचालक, नगरविकास विभाग, मा. जिल्हाधिकारी आणि मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रत्येक वर्षी 31 जुलै पूर्वी पाठविला पाहिजे.

2.तसेच लेख्यासोबत अंदाजित व प्रत्यक्षात आकडयांतील प्रमुख फरकांचे स्पष्टीकरण केलेले निवेदनपत्र जोडणे आवश्यक आहे.

3.महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिकनगरी अधिनियम 1965 मधील कलम 103 च्या आवश्यकतेनुसार तिमाही व वार्षिक लेखे जनतेच्या निरिक्षणांसाठी खुले असले पाहिजेत, तसेच सदर तिमाही लेख्यांना मंजूरी व

प्रसिध्दीकरण करणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4.उपरोक्त नमूद केलेनुसार नगरपरिषदेने वार्षिक लेखे लेखाशीर्ष निहाय विहित नमुन्यात ठेवण्यात आलेला नसल्याने सदरचे वार्षिक लेखे प्रमाणित करता येत नाही. सदरचे वार्षिक लेखे विहित नमुन्यात ठेऊन योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

5.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक लेखाप-2016/संक्र.254/नवि-31 दि. 18.6.2016 नुसार नगरपरिषदेने सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेले वार्षिक लेखे संबंधित जिल्हा स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाकडे प्रमाणीकरणासाठी सादर करणे आवश्यक राहील असे सर्व नगरपरिषदांना सूचित करण्यात आलेले असतानाही नगरपरिषदेने तशी कार्यवाही केलेली नाही. सदरचे वार्षिक लेखे विहित नमुन्यात ठेऊन योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

DATNBYM8601 (Ref No : 52, Hmm No : 12)

## 4 शिक्षक व शिक्षकेत्तर वेतन सेवानिवृत्ती वेतन यावर मंजूर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा खर्च 2020-2021

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद शिक्षण मंडळ, सातारा 2020-2021 चे लेखापरीक्षणात दानाची तपासणी केली असता खाली नमूद केल्याप्रमाणे मंजूर अंदाजपत्रकातील तरतूदीपेक्षा कमी /जादा खर्च केला आहे.

| अ. क्र. | लेखाशीर्ष | आर्थिक तरतूद | खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1. | शिक्षक व शिक्षकेतर वेतन | 67175000 | 69027303 | - | 1852303 |
| 2. | सेवानिवृत्ती वेतन | 45000000 | 35768025 | 9231975 | - |
| | एकूण | 112175000 | 104795328 | 9231975 | 1852303 |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत

1.शिक्षक व शिक्षकेत्तर वेतन यावर मंजुर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा रक्कम रुपये 1852303/- जादा खर्च झाला आहे. जादा केलेल्या खर्चा बाबत खुलासा करावा व भविष्यात वास्तववादी अंदाजपत्रक तयार करण्याची दक्षता घ्यावी.

2.सेवानिवृत्ती वेतन यावर मंजुर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा रक्कम रुपये 9231975/- कमी खर्च झाला आहे. कमी केलेल्या खर्चा बाबत खुलासा करावा व भविष्यात वास्तववादी अंदाजपत्रक तयार करण्याची दक्षता घ्यावी

DATSBCM7401 (Ref No : 106, Hmm No : 46)

## 5 अंतर्गत लेखा परीक्षण न केलेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2020/2021 ते 2021/2022 चे लेखापरीक्षण वेळी लेखा विभागाने नगरपरिषदेच्या लेख्यांचे अंतर्गत लेखा परीक्षण करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 28 मधील नियम 391, 392, 393 व 394 अन्वये लेखापरीक्षकांची कर्तव्ये नमूद केलेली असून त्यानुसार ते नगरपरिषदेच्या उत्पन्न व खर्चावर देखरेख ठेवतील तसेच मंजूर केलेल्या अर्थसंकल्पात तरतूद व मंजुरी असल्याखेरीज कोणताही खर्च होणार नाही याची दक्षता घेतील. देय असलेल्या व मिळालेल्या सर्व रकमांचा विनाविलंब हिशोब लावणे व त्याचे अचूकपणे वर्गीकरण करणे, सर्व वेतन व भत्ते व नियत सहाय्यक अनुदाने यांस मंजूर खर्चाव्यतिरिक्त इतर खर्चासाठी रक्कम अदा झालेली नाही हे पाहणे, ऋण, ठेव, कर्ज, आगाऊ रक्कमा यांचे लेखे ठेवणे, निलंबन व वित्तप्रेषण यांचे लेखापरीक्षण करणे, खरेदी केलेल्या वस्तूंची सर्व देयके तपासणे, प्राप्त मालाची योग्य लेख्यात नोंद घेतल्याची खात्री करणे, योग्य मंजुरीखेरीज इतर खर्चाची देयके अदा झालेली नसून योग्य प्रमाणके व मंजूर नकाशे, अंदाजपत्रक व मुल्यांकनाप्रमाणे देयकाचे प्रदान केल्याबाबतची खात्री करणे, रोखवही, वर्गीकृत नोंदवह्या, विवरणपत्रे, लेखे अचूक असल्याची खात्री करणे इत्यादी सर्व कामे यथोचितरित्या करणे तसेच अंतर्गत लेखापरीक्षकांनी वरीलप्रमाणे नियंत्रण व लेखे अद्यावत ठेऊन भविष्यात नगरपरिषदेचे उत्पन्न वाढविणे व भविष्यात होणारी अनियमितता टाळणे याबाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. नगरपरिषदेकडील ताळेबंद, उत्पन्न व खर्च विवरणपत्र आणि प्राप्त रकमा व प्रदाने यांचे लेखे, वित्तीय विवरणपत्रे या व इतर अनुषंगिक लेख्यांचे अंतर्गत लेखापरीक्षण करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 28 मधील नियम 391 मध्ये नमूद केलेनुसार अंतर्गत लेखापरीक्षकाने वितीय वर्षाच्या शेवटी तीन महिन्यांच्या आत लेखापरीक्षण करून लेखापरीक्षण अहवाल नियमात 01 ते 06 बाबी नमूद केलेनुसार नगरपरिषदेस अहवाल सादर करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 28 मधील नियम 392 मध्ये नमूद केलेनुसार अंतर्गत

लेखापरीक्षक यांनी निकटच्या पुढील महिन्याच्या पहिल्या पंधरावडयात प्रत्येक महिन्याच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करेल तसेच नियम 392 अनुसार अधिनियम आणि नियमांच्या तरतुदीस अधिन राहून लेखापरीक्षक वैशिष्ट्यपूर्ण अंतर्गत नियंत्रण आणि परिणामकारकता लक्षात घेऊन त्यास योग्य वाटेल अशा रितीने आणि व्यवसायिक मानके आणि व्यवसायास अनुसरून लेखापरीक्षण करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4.विविध लेख्यांच्या जमेच्या रक्कमांची व खर्चाच्या देयकांची अंतर्गत लेखापरीक्षण केलेली नसल्यामुळे लेख्यांची स्थिती अपूर्ण असते त्यामुळे अंतर्गत लेखापरीक्षण होणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5.महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 77 अनुसार नगरपरिषदेच्या सर्व लेख्यांवर नियंत्रण व देखरेख मुख्याधिकारी यांनी ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

06. मा.संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे परिपत्रक क्र. एम.सी.के./१1187/सी.आर. 126/1 दिनांक 15/11/1998 नुसार कोणतेही आर्थिक प्रकरण अंतर्गत लेखापरीक्षक यांनी तपासल्याशिवाय मुख्याधिकारी यांनी मंजूर करू नये. तसे केल्यास त्यांची आर्थिक जबाबदारी मुख्याधिकारी यांची राहील असे स्पष्ट नमूद केलेले असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

DATSBCM7401 (Ref No : 114, Hmm No : 46)

## 6 सोनगाव कचरा डेपो येथे ओला व सुका कचरा पक्रिया करणेसाठी आवशयक मशिनरी पुरविणे खर्चाबाबत.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरिक्षण वर्षात सोनगाव कचरा डेपो येथे ओला व सुका कचरा पक्रिया करणेसाठी आवशयक मशिनरी पुरविणेसाठी घनकचरा व्यवस्थापन निधी अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन मंजूर आराखडा तरतुदीनुसार 14 वा वित्त आयोग निधीतून खर्च केलेला आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | 1039500/- |
| प्रशासकीय मान्यता | शासन निर्णय क्रमांक स्व.म.अ./प्र.क्र.103/नवि-34 दिनांक 10/11/2017 |
| तांत्रिक मान्यता | मुख्य अभियंता म.जि.प्रा.,पुणे -जाक्र./मअ.पुणे /तांशा/846 दि.25/02/2017 |
| निविदा प्रसिद्धी | ई निविदा |

| | |
|---|---|
| निविदा मंजुर दर | अंदाजपत्रकिय दराने |
| मंजुर निविदा धारकाचे नांव | न्यू साई फायबर मिरज |
| कामाचे आदेश | जा.क्र./सा.न.प./साबा/581 सातारा न.प. दिनांक-06/10/2020 |
| खर्च | |

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1323 | 12/02/2021 | 9355500 |
| 922 | 21/10/2021 | 1392412 |
| एकूण | | 10747912 |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालिल प्रमाणे.

1) उपरोक्त प्रशासकीय मंजुरी आदेश नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक स्व.म.अ./प्र.क्र.103/नवि-34 दिनांक 10/11/2017 मधील नमूद अटी नुसार घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या अहवालात नमूद उपकरणे/मशीन/यंत्रे इत्यादी खरेदी GEM P पोर्टल वरूनच खरेदी करणे बंधनकारक राहील व याशिवाय इतर पद्धतीचा अवलंब करून खरेदी केल्यास ती आर्थिक अनियमितता समजून शासनामार्फत पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्ट नमूद असताना देखील नगरपरिषद सातारा ने नियमबाह्य ई निविदा पद्धतीचा अवलंब करून सदरची मशिनरी खरेदी करण्यात आली आहे.

2) उपरोक्त खरेदीसाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या अहवालात रक्कम रुपये 1039500/- तरतूद असताना व त्या रकमेस तांत्रिक व प्रशासकीय मान्यता असताना नगरपरिषदेने अतिरिक्त Kकेबल साठी रक्कम रुपये 84112/- व 1200 cfm क्षमतेचे ब्लोअर मोटार सह या बाबीसाठी रक्कम रुपये 268800/- असा एकूण 352912/- इतका खर्च कोणत्याही प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेशिवाय नियमबाह्य खर्च संबधित पुरवठादार यांना आदा करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर कामामध्ये आर्थिक अनियमितता झालेली दिसून येते.

3) उपरोक्त खरेदीसाठी 3 वेळेस निविदा प्रसिध्द करून देखील 26/12/2018 अखेर मुदत वाढ देऊन देखील दोनच निविदा प्राप्त झालेल्या होत्या परंतु तांत्रिक लिफाफा उघडलेनंतर दोन्ही निविदाधारकांकडे EPF प्रमाणपत्र नसलेल्याचे दिसून येते.त्यानंतर नगरपरिषदेने संबधितांशी पत्रव्यवहार करून सदरचे प्रमाणपत्र मागणी केले त्यानुसार न्यू साई फायबर मिरज यांनी EPF प्रमाणपत्र नंतर सादर केलेले आहे.तसेच मीरा स्टील फॅब्रिकेशन फायबर्स यांनी EPF ACT 1952 नुसार मधील नमूद तरतुदीपेक्षा कर्मचारी संख्या कमी असल्याने EPF नियम लागू होत नाही असे कळविले आहे.असे असतना नगरपरीषदेणे तसेच मीरा स्टील फॅब्रिकेशन फायबर्स यांची निविदा अपात्र ठरविली आहे.

वास्तविक उपरोक्त काम हे वस्तू पुरवठ्याचे आहे तसेच नियमाप्रमाणे EPF नियम लागू नसताना देखील EPF नोंदणी प्रमाणपत्र नाही या कारणाने निविदा अपात्र केली आहे सदर बाब नियमबाह्य आहे.

4) खरेदी केलेल्या मशिनरीची नोंद जंगम मालमत्ता नोंदवाहिला करणे आवश्यक आहे तशी कार्यवाही करून त्यासंबधी अभिलेखे उपलब्ध करून पूर्तता सादर करावी.

5) उपरोक्त नमूद प्रशासकीय मान्यता आदेश नुसार घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवालात नमूद विविध कामांसाठी 14 वा वित्त आयोग निधीतून खर्च करण्यासाठी एकूण रक्कम रुपये 82808000/- इतक्या रकमेस प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सबब सदर रकमेच्या अधिन राहून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवालात नमूद विविध कामासाठी खर्च करणे आवश्यक आहे परंतु सदर अहवालात नमूद कामांसाठी यापूर्वी झालेल्या खर्चाचा तपशील उपलब्ध झाला नाही त्यामुळे मंजूर रकमेच्या अधिन राहून खर्च झालेबाबत खात्री पटत नाही तरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवालात नमूद केलेल्या कांमासाठी 14 वा वित्त आयोग निधिमधून आजअखेर झालेला खर्च हा रक्कम रुपये 82808000/- च्या अधिन राहून झालेबबाबत खात्री पटवावी.

उपरोक्त 01 ते 05 मध्ये नमूद बाबींची पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DLFSGJM9401 (Ref No : 15, Hmm No : 62)

## 7 पेठ सदरबझार रिमांडहोम चौक ते अमेरिकन चर्च अखेर रस्ता डांबरीकरण करणे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

| | |
|---|---|
| कामाचे नांव | पेठ सदरबझार रिमांडहोम चौक ते अमेरिकन चर्च अखेर रस्ता डांबरीकरण करणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 813800/- |
| प्रशासकीय मान्यता | मा. नगराध्यक्ष, जा.क्र. 659 दिनांक 8/1/2020 रक्कम रुपये 813800/- |
| तांत्रिक मान्यता | जा.क्र. सानप/साबां-543 दिनांक 6/1/2020 रक्कम रुपये 813800/- |
| निविदा प्रसिध्दीचे माध्यम | दैनिक लोकमत |
| निविदा प्रसिध्दीचा दिनांक | दिनांक 11/1/2020 |
| प्राप्त निविदांची संख्या | तीन |

| | |
|---|---|
| मान्य निविदा धारकाचे नांव | मे. रजिया कन्स्ट्रक्शन |
| दर मंजुरीचा ठराव करारपत्र | मा. नगराध्यक्ष यांची मान्यता दिनांक 5/3/2020 |
| कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | जा.क्र. सानप/साबां-1373 दिनांक 18/3/2020 |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | दिनांक 10/5/2020 |
| कामाचा कालावधी | 60 दिवस |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक | 121 पान क्रमांक 18,19 |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 910-11/11/2020 रक्कम रुपये 879413/- पहिले व अंतिम देयक |

नगरपरिषद साताराचे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील कामांची नस्ती तपासली असतां, पेठ सदरबझार रिमांडहोम चौक ते अमेरिकन चर्च अखेर रस्ता डांबरीकरण करणे या कामावर रक्कम रुपये 879413/- एवढा खर्च केला असून सदर खर्चातील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण2011/प्र.क्र.467 रस्ते दिनांक 21/11/2011 मधील 1ड अनुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे परंतू तशी कार्यवाही केलेली नाही.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/ प्र.क्र. 109/ राप 2 दिनांक 22.03.2005 व परिपत्रक दिनांक 22.03.2009 प्रमाणे बांधकामावर वापरणेत येणारे साहित्य वापरापुर्वी त्यातील 50% साहित्याची चाचणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळाच्या प्रयोगशाळेतुन करुन घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील नियम 61, 62 व 120 नुसार नमुना क्र. 12 मध्ये कामाच्या / योजनेच्या प्रगतीची नोंदवही ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्याच प्रमाणे उक्त कामाच्या खर्चावरील प्रगतीच्या नोंदीची पडताळणी वित्त विभागाकडील नमुना क्र. 82 नियम 87 प्रमाणे करण्यात आलेले नाही.

4. महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहिता 2013 नियम 138 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर नगरपंचायत लेखापाल व लेखापरीक्षक यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच रक्कम अदा केलेल्या प्रमाणक क्रमांक व दिनांक नमूद नाही. महाराष्ट्र शासन

बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 नियम 15 नुसार मोजलेली मापे मान्य असल्याबाबत मक्तेदाराची स्वाक्षरी मोजमाप पुस्तकावर नाही तसेच नियम 13 ते 15 नुसार लेखा शाखेने मोजमाप पुस्तकात लाल शाईने कर्णरेषा मारून रद्द केलेले नाहीत.

5. रस्त्याचे काम ज्या ठिकाणी केले आहे, सदर जागा मालकी हक्काबाबत अभिलेखे नस्तीसोबत उपलब्ध न झाल्याने सदर काम नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेमध्येच झालेबाबत पडताळणी करता येत नाही.

DLFABKM8801 (Ref No : 29, Hmm No : 117)

## 8 प्रभाग क्र.2 पेठ सदरबझार कॅनॉल चौक करिअप्पा चौक ते जरंडेश्वर नाका अखेर पाईप ड्रेन करणे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : रस्ते अनुदान सन 2017-18 | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : शासन निधी | **कलम** | : 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

प्रभाग क्र.2 पेठ सदरबझार कॅनॉल चौक करिअप्पा चौक ते जरंडेश्वर नाका अखेर पाईप ड्रेन करणे

| | |
|---|---|
| कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | 10,00,000/- |
| प्रशासकीय मान्यता | जिल्हाधिकारी सातारा यांचे पत्र क्रमांक :- जाक्र. साशा/नपा/(वि.रस्ता.अनु.)/2741/2019 सातारा दिनांक 7.02.2019 रुपये 1000000/- करिता |
| तांत्रिक मान्यता | कार्यकारी अभियंता, मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग सातारा जा.क्र.सानप/साबां/तां.अ./आदेश क्र./124 दि. 12.09.2018 रु. 10,00,000/- |
| निविदा प्रसिद्धीचे माध्यम/तपशिल | दैनिक ऐक्य 14.09.2019 |
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक | दिनांक 14.09.2019 |
| प्राप्त निविदांची संख्या | 3 |
| मान्य निविदा दर धारकाचे नाव | ओमकार दत्तात्रय भंडारे |
| दर मंजुरीचा ठराव | में स्थायी समिती ठराव क्रमांक 375 दिनांक 18.2.2020 |
| मंजूर दर | 4.00 जादा दराने |

| | |
|---|---|
| करारपत्र | 600/- दिनांक : 8.02.2020 |
| कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | जा.क्र./सानप/सा.बां/97 दिनांक 26.06.2020 |
| कामाचा कालावधी | 3 महिने (90 दिवस) |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष् ठ क्रमांक | M.B. NO. 110 page 23 to 24, |
| काम सुरु दिनांक : 26.06.2020 | काम पुर्णत्वाचा दिनांक : 25.10.2020 |

| प्र.क्र व दिनांक | देयकाची स्थूळ रक्कम | देयकातील कपातीचा तपशील | | | | | गौणखनिज + त्यावरील उपकर | निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुरक्षा ठेव रक्कम | आयकर 2% | कामगार कल्याण उपकर 1% | कामगार विमा 1% | GST 2 % | | |
| 960 /13.11.2020 | 902397 | 45120 | 9024 | 9024 | 4512 | 18048 | 3498 | 813171 |
| | 149505 | 7475 | 1495 | 1495 | 748 | 2990 | 0 | 135302 |
| | 94303 | 4715 | 943 | 943 | 472 | 1886 | 1477 | 83867 |
| एकूण | 1146205 | 57310 | 11462 | 11462 | 5732 | 22924 | 4975 | 1032340 |

याबाबतचे लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक -सीएटी/2017/प्र.क्र. 08/इमा-2 दिनांक09.2018 मधील 1.1 नुसार प्रस्तुत कामाची ई-निविदा जाहिरात जिल्हा स्तरावरील एका मराठी वर्तमानपत्रात आणि राज्य स्तरावरील दोन मराठी व एका हिंदी वर्तमानपत्रात व राष्ट्रीय स्तरावरील एका हिंदी व दोन इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे तथापि सातारा नगरपरिषदेने प्रस्तुत कामाची ई-निविदा नोटीस जिल्हा स्तरावरील एका मराठी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे निविदेला व्यापक प्रसिद्धी मिळाली नाही. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयांचे उल्लंघन झाले आहे.

2.उक्त नमूद शासन निर्णयातील1 नुसार प्रथम वेळी ई-निविदा प्रसिद्धीचा कालावधी कमीत कमी 25 दिवस ठेवणे आवश्यक असता प्रस्तुत कामी नगरपरिषदेने 7 दिवसाचा कालावधी दिला आहे. निविदाधारकांना निविदा भरणेसाठी पुरेसा कालावधी उपलब्ध झालेला नाही. सदर बाब नियमबाह्य आहे.

3.प्रशासकीय मान्यता अट क्र. 8 नुसार त्रयस्थ संस्थेकडून काम सुरु असताना वेळोवेळी तांत्रिक लेखापरीक्षण करून

घेणे आवश्यक असता सदर कामी नगरपरिषदेने तांत्रिक लेखापरीक्षण करून घेतेलेले नाही.

4.निविदा मंजूर करताना मक्तेदार यांना रुपये 10000/- सुरक्षा अनामत भरणा करणे कामी नगर परिषदेचे नगरअभियंता यांनी आदेशीत केलेनुसार सुरक्षा अनामत भरणा पावती नस्तीसोबत पहावयास मिळाली नाही. सदर पावती लेखापरीक्षणास उपलब्ध करून सुरक्षा अनामत भरणा केलेची खात्री करावी.

5.प्रस्तुत कामाची मुदत 3 महिने (दिनांक09.2020 पर्यंत ) असताना मक्तेदार यांनी मुदत वाढीसाठी अर्ज केलेला नाही. सदरचे काम दिनांक 25.10.2020 रोजी पूर्ण झाले आहे. त्यामुळे काम पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. तथापि सदर विलंबाबाबत नगरपरिषदेने मक्तेदारावर दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. विलंब आकार वसूल करणे आवश्यक आहे.

6.नस्ती सोबत जोडलेल्या काम पूर्णत्वाचा दाखला मुख्याधिकारी यांनी प्रमाणित केलेला नाही.

7.संचालक नगरपरिषद संचालनालय यांचे स्थायी निदेश क्र. 37 जा.क्र.नपप्रसं-1005/विकासकामे/43 /05 दिनांक 3 जानेवारी 2006 मधील अ.क्र. 29,30 व 31 अन्वये एक लाख व त्यावरील खर्चाच्या विकास कामाचा माहीती फलक कामाच्या ठिकाणी ठेकेदाराने स्वखर्चाने लावणे आवश्यक आहे.

8.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011चे नियम 135 नूसार नगरअभियंता व मुख्याधिकारी यांनी काम चालू असतांना केलेले निरीक्षक अहवाल नस्तीसोबत जोडलेले नाहीत.

9.प्रस्तुत कामाची नोंद नगरपंचायती कडील स्थावर मालमत्ता नोंदवहीस घेणेत आलेली नाही.

DATDPRF7601 (Ref No : 40, Hmm No : 61)

## 9 प्रभाग क्र.7 पेठ गुरुवार सावकार गॅरेज नगरपरिषद सार्वजनिक शौचालय ते जुने बीफ मार्केट परदेशी घर पिछाडी अखेर रिटेनिंग वॉल करणे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा सन 2018-19 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

प्रभाग क्र.7 पेठ गुरुवार सावकार गॅरेज नगरपरिषद सार्वजनिक शौचालय ते जुने बीफ मार्केट परदेशी घर पिछाडी अखेर रिटेनिंग वॉल करणे

| | |
|---|---|
| कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | 7498664/- |
| प्रशासकीय मान्यता | जिल्हाधिकारी सातारा यांचे पत्र क्रमांक:- जाक्र. साशा/नपा/(लो.आ.सा.ना.व.सु.यो., 18-19)/728 सातारा दिनांक |

| | |
|---|---|
| | 7.02.2019 रुपये 7498664/- करिता |
| तांत्रिक मान्यता | कार्यकारी अभियंता, मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग सातारा<br>जा.क्र.चिशा/तां.मं./2523/2018 दि. 10.12.2018 रु. 7498664/- |
| निविदा प्रसिद्धीचे माध्यम/तपशिल | दैनिक सामना 15.02.2019 |
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक व कालावधी | दिनांक 15.02.2019, 7 दिवस(15.02.2019 ते 22.02.2019) |
| प्राप्त निविदांची संख्या | 3 |
| मान्य निविदा दर धारकाचे नाव | ओमकार दत्तात्रय भंडारे |
| दर मंजुरीचा ठराव | में स्थायी समिती ठराव क्रमांक 38 दिनांक 4.09.2019 |
| मंजूर दर | 4.90 जादा दराने |
| करारपत्र | 7500/- दिनांक : 7.09.2019 |
| कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | जा.क्र./सानप/सा.बां/570 दिनांक 18.09.2019 |
| कामाचा कालावधी | 3 महिने (90 दिवस) |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक | M.B. NO. 110 page no. 28, M.B. 61 page no. 291 to 292 |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | 30.12.2020 |

| प्र.क्र व दिनांक | देयकाची स्थूळ रक्कम | देयकातील कपातीचा तपशील | | | | | गौणखनिज + त्यावरील उपकर | निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुरक्षा ठेव रक्कम | आयकर 2% | कामगार कल्याण उपकर 1% | कामगार विमा 1% | GST 2 % | | |
| 1372/12.02.2022 | 2854855 | 127449 | 25490 | 25490 | 25490 | 50890 | 59923 | 2540033 |
| 124/30.05.2020 | 4994708 | 222978 | 44596 | 44596 | 44596 | 89192 | 48629 | 4500121 |
| एकूण | 7849563 | 350427 | 70086 | 70086 | 70086 | 140082 | 108552 | 7040154 |

याबाबतचे लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक -सीएटी/2017/प्र.क्र. 08/इमा-2 दिनांक 27.09.2018 मधील 1.1 नुसार प्रस्तुत कामाची ई-निविदा जाहिरात जिल्हा स्तरावरील एका मराठी वर्तमानपत्रात आणि राज्य स्तरावरील दोन मराठी व एका हिंदी वर्तमानपत्रात व राष्ट्रीय स्तरावरील एका हिंदी व दोन इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे तथापि सातारा नगरपरिषदेने प्रस्तुत कामाची ई-निविदा नोटीस जिल्हा स्तरावरील एका मराठी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे निविदेला व्यापक प्रसिद्धी मिळाली नाही. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयांचे उल्लंघन झाले आहे.

2.उक्त नमूद शासन निर्णयातील 2.1 नुसार प्रथम वेळी ई-निविदा प्रसिद्धीचा कालावधी कमीत कमी 25 दिवस ठेवणे आवश्यक असता प्रस्तुत कामी नगरपरिषदेने 7 दिवसाचा कालावधी दिला आहे. निविदाधारकांना निविदा भरणेसाठी पुरेसा कालावधी उपलब्ध झालेला नाही. सदर बाब नियमबाह्य आहे.

3.उक्त नमूद शासन निर्णयातील परिच्छेद 5.2 नुसार निविदा प्रसिद्ध करणे , उघडणे, कागदपत्रांची पडताळणी करणे, प्राप्त तक्रारींचे निवारण करणे, मंजूर करणे व कंत्राटदारास कार्यारंभ देणे इत्यादी कार्यवाहीसाठी कमाल 55 दिवस कालमर्यादा निश्चित केली आहे. प्रस्तुत कामाची निविदा दिनांक 15.02.2019 ला प्रसिद्ध केलेपासून मक्तेदाराला दिलेला कार्यादेश दिनांक 18.09.2019 पर्यंत 7 महिन्याचा कालापव्यय झाला आहे.

4.प्रस्तुत कामाची मुदत 3 महिने (दिनांक 17.12.2019 पर्यंत ) असताना मक्तेदार यांनी मुदत वाढीसाठी अर्ज केलेला नाही. सदरचे काम दिनांक 30.12.2020 रोजी पूर्ण झाले आहे. काम पूर्ण होण्यास एक वर्ष विलंब झाला आहे. तथापि सदर विलंबाबाबत नगरपरिषदेने मक्तेदारावर दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. विलंब आकार वसूल करणे आवश्यक आहे.

5.महाराष्ट्र नगरपरिषदलेखा संहिता, 2011 मधील नियम 141 नुसार रकमेचे प्रदान करताना एकूण देयकापैकी 10 टक्के रक्कम दोष दायित्व कालावधी समाप्त झाल्यावर देणे आवश्यक असता नगरपरिषदेने देयकाची सर्व रक्कम मक्तेदारास अदा केली आहे. ही बाब नियमबाह्य आहे.

6.संचालक नगरपरिषद संचालनालय यांचे स्थायी निदेश क्र. 37 जा.क्र.नपप्रसं-1005/विकासकामे/43 /05 दिनांक 3 जानेवारी 2006 मधील अ.क्र. 29, 30 व 31 अन्वये एक लाख व त्यावरील खर्चाच्या विकास कामाचा माहीती फलक कामाच्या ठिकाणी ठेकेदाराने स्वखर्चाने लावणे आवश्यक आहे.

7.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 190 ते 194 नुसार प्रस्तुत कामाची नोंद नगरपंचायती कडील स्थावर मालमत्ता नोंदवहीस घेणेत आलेली नाही.

## 10 जिल्हा परिषद चौक ते सर्किट हाउस से श्री छ सुमिराजे उद्यान चौक ते भीमाबाई आंबेडकर कॉलनी चौक अखेर रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : | 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा सन2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षण वर्षात सातारा नगरपरिषदकडील जिल्हा परिषद चौक ते सर्किट हाउस ते श्री छ सुमित्राराजे उद्यान चौक ते भीमाबाई आंबेडकर कॉलनी चौक अखेर रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे ध्यानस्तीची तपासणी केली असतात्यामध्ये आढळून आलेल्याउणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्रायखालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

कामाचे नाव-जिल्हा परिषद चौक ते सर्किट हाउस ते श्री छ. सुमित्राराजे उद्यान चौक ते भीमाबाई आंबेडकर कॉलनी चौक अखेर रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे

नागरोत्थान (जिल्हास्तर)

अंदाजपत्रकीय रक्कम 7499907

प्रशासकीय मान्यता जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा /नपा/साशा995 दिनांक 19.03.2020 रक्कमरुपये 74999071-

तांत्रिक मान्यता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जा.क्र. चिशा/तां.मं./2535/ 27.11.2019 मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग,सातारादि. 27.11.2019 रक्कम रुपये 7499907/-

मंजूर निविदादर 9.99% कमी दराने

निविदाप्रसिध्दी 22/05/2020

मंजूर निविदाधारकाचे नाव श्री गणेश कंन्सट्रक्शन

कार्यारंभ आदेश दिनांक 413 दिनांक 28.09.2020

कामाचा मुळ कालावधी 300 दिवस

| मोजमाप पुस्तक क्रमांक व पृष्ठ क्र. मोजमाप पुस्तक क्रमांक 96 पान क्रमांक 80-83

मोजमाप पुस्तक क्रमांक 96 पानक्रमांक 89-90

आर्थिक वर्ष 2020-21 व 2021 मध्ये सदर कामावरती झालेला खर्च

प्रमाणाकक्रमांक 164 दिनांक 10.05.2021 रक्कमरुपये - 2717663

प्रमाणाकक्रमांक 1467दिनांक 09.03.2021रक्कमरुपये 4723317

एकूण खर्च- 7439980 मक्तेदार : श्री गणेश कन्सट्रक्शन

1.सदर कामाच्या मोजमापपुस्तक क्रमांक 96 पानक्रमांक 80 ते90 ची तपासणी केली असता त्यामध्ये 1622.55 cum इतके गौण खनिज वापरलेचे आढळून आले. त्यांचीरॉयल्टी 1622.55. 141.24= 229331 रुपये इतकी रक्कम ठेकेदाराला अदा करण्यात आलेली आहे. सदरकामासाठी जे गौण खनिज मटेरीअल वापरले आहे त्याची रॉयल्टी ची रक्कम ठेकेदाराने मा. तहसीलदार सातारा यांचेकडे भरल्याच्या पावत्या सादर केलेल्या आहेत.

पावती क्रमांक 1 GRN MH008604289 रक्कम 200000 नाव- विजय सावंत

पावती क्रमांक 2 GRN MH009335397 रक्कम34600 नाव- श्री गणेश कन्सट्रक्शन

पावती क्रमांक 3 GRN MH001225410 रक्कम40600 नाव -श्री गणेश कंन्सट्रक्शन

वरील पावत्यांमधील क्रमांक 3 ची पावती हि 15.06.2020 ची आहे मात्र काम सुरु दिनांक 28.09.2020 आहे त्यामुळे सदर मटेरीअल याच कामासाठी आणलेची खात्री करता येत नाही. तसेच उपलब्ध करून दिलेल्या पावत्यांची एकूण रक्कम 275200 इतकी आहे आणि या कामातील गौण खनिज शुल्क 229331 इतके असल्यामुळे या कामात वापरलेल्या मटेरीअल चीच रॉयल्टी असलेबाबत खात्री करता येत नाही.

सदर जमा केलेल्या पावत्यांवरती हे मटेरीअल याच कामाच्या वापरासाठी आणत असल्याबद्दल कामाचे नाव नमूद नाही तसेच सदर मटेरीअल वाहतूक करण्यासाठी जे पास दिले जातात ते लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या नाहीत.जमा केलेल्या रॉयल्टी भरलेच्या पावत्या मधील क्रमांक 1 ची पावती ( रक्कम 2 लक्ष) श्री शंकर सावंत यांच्या नावे आहे त्यामुळे ती लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. सबब उपरोक्त प्रमाणे रक्कम रुपये 229331 च्या गौण खनिज वाहतुकीचे पास व गौण खनिज भरल्याच्या श्री गणेश कन्सट्रक्शन यांच्या सदर कामाच्या नावासहित पावत्या उपलब्ध नसल्याने रक्कम रुपये 229331 वसूल करून लेखापरीक्षणास सदर रॉयल्टी शासन खाती भरून अनुपालन सादर कराये

2.तसेच सदर कामाच्या अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तकची तपासणी केली असता त्यामध्ये SUB ESTIMATE || मधील बाब क्रमांक 2,3,4 साठी with स्काडा दर दिलेले आहेत. काम करत असताना स्काडा प्रणाली न वापरलेने सदर जादा गेलेले दर परीगणित करून वसूल करून घेणे आवश्यक आहे.

बाब 2 एकूण खर्च 492929

बाब 3एकूण खर्च 655505

बाब 4 एकूण खर्च 1384435

3.प्रशासकीय मान्यतेतील अटींप्रमाणे 75% खर्च शासन निधीमधून निधी मधून झाला असल्याची खात्री पटवावी. व 25% खर्च नगरपरिषदनिधी मधून झाला असल्याची खात्री पटवावी.

उपरोक्तनुसार १ ते 3 उणीवांची साधार पुर्तता दाखवावी

DATMSSM6801 (Ref No : 49, Hmm No : 13)

## 11 बांधकाम विभागाकडील सर्वसाधारण अनियमिततांबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | ० | **लेखाशीर्ष** | : | ०० | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : | 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा, सन 2020-2021 ते 2021-2022 च्या लेखापरीक्षण कालावधीत, बांधकाम विभागाकडील अभिलेख्यांची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत टिपण क्र. १३ दि. ०७/१२/२०२२ अन्वये सुचित करण्यात आले. त्यास अनुसरुन अनुपालन सादर न झाल्याने खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहीता 2011 मधील नियम 120 नुसार कार्यादेश नोंदवही नमुना क्रमांक 12 मध्ये विहित नमुन्यात ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2.महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण2013/प्र.क्र.467 रस्ते दिनांक 21/11/2013 मधील 1ड अनुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे परंतू तशी कार्यवाही केलेली नाही.

3.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहीता 2011 मधील नियम 135 अनुसार नगर परिषदेने कार्यान्व्यीत केलेल्या सर्व कामांची मोजमापे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंत्याने तपासणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4.विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य् यांचेकडील पत्र क्र. प्रविनि-2314/देयक कपात रक्कम/संकिर्ण/अभि 3 दि. 31/03/2015 नुसार कामावरील मजुरांचा विमा न उतरविल्यास कपात करावयाच्या रकमेचा तपशिल नमूद केलेला आहे. नगरपरिषदेकडील बांधकाम विभागाच्या विकास कामांच्या नस्ती तपासता कोणत्याही मक्तेदाराने काम सुरु करण्यापूर्वी मजूरांचा विमा काढलेला नाही परिणामी उपरोक्त परिपत्रकानुसार रक्कम कपात करुन विमा संचालनालयास पाठविलेली आहे. वास्तविक काम सुरु असताना विमा काढल्यास कामादरम्यान अपघात झाल्यास त्याचा लाभ मजूरांना मिळू शकतो. तसेच भविष्यात अशा कामादरम्यान अपघाताची मोठी घटना घडल्यास नगरपरिषदेवर त्याचे दायित्व येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कामाचा विमा काढल्यानंतर मक्तेदारास विहीत कालमर्यादेत काम करणे बंधनकारक राहते. या सर्व बाबींचा विचार करता नगरपरिषदेने ने यापुढे कामाचा आदेश

देताना मक्तेदाराने कामगारांचा विमा काढणे बंधनकारक करावे.

5.बांधकाम विभागाकडील नस्तीची तपासणी केली असता रक्कम रुपये 3 लक्षचे वरील विकास कामांस ई निविदा केलेली आहे. परंतू सदर नस्तीस निविदा कागदपत्रे जोडण्यात आली नाहीत. त्यामुळे निविदेची कार्यवाही तसेच ठेकेदाराची काम करण्याची क्षमता लेखापरीक्षणास दिसून येत नाही.

6.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहीता 2011 मधील नियम क्रमांक 139 नुसार नगरअभियंता यांनी नियम 210 मध्ये नमुद केलेल्या प्रपत्रामध्ये काम पुर्णत्वाचा दाखला नमुना नंबर 62 अन्वये देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 62, 190 व 191 नुसार नमुना क्र. 16 मधील स्थावर मालमत्तांची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने विकास कामे यापूर्वी झाले होते किंवा कसे तसेच विकास कामांच्या नोंदी सदर नोंदवहीस घेतलेबाबत साधार खुलासा करण्यात यावा.

8.महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहिता 2011 नियम 138 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर नगरपरिषद लेखापाल व लेखापरीक्षक यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच रक्कम अदा केलेल्या प्रमाणक क्रमांक व दिनांक नमूद नाही. तसेच महाराष्ट्र शासन बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 नियम 15 नुसार मोजलेली मापे मान्य असल्याबाबत मक्तेदाराची स्वाक्षरी मोजमाप पुस्तकावर नाही तसेच नियम 13 ते 15 नुसार लेखा शाखेने मोजमाप पुस्तकात लाल शाईने कर्णरिषा मारून रद्द केलेले नाहीत.

9.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2008/प्र.क्र.335/नवि-33 दिनांक 28/03/2018 नुसार विकास कामाच्या दर्जाची त्रयस्थ यंत्रणेकडून तांत्रिक लेखापरीक्षण झाले बाबतची कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

10.महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहिता 2011 नियम 137 नुसार सर्व झालेल्या कामाची तपशीलवार माहिती ज्यात देणेत आलेले साहित्य, कामाची रक्कम, काम पूर्ण होण्याचा अंदाजित दिनांक घेऊन मोजमाप पुस्तक ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे नोंदवही ठेवलेली नाही तसेच कामच्या रक्कमेचा गोषवारा(Abstract) काढलेला नाही.

11. निविदा नगरपरिषद प्रशासन संचालनालय, आदेश क्रमांक नप्रसा/निविदा मागविणे/05/प्र.क्र.151/05/09 दिनांक 29/12/2005 मधील अ.क्र. 33 अन्वये या निविदेची प्रसिध्दी एक राज्यस्तरीय दैनिकात व एक जिल्हास्तरीय दैनिक अशा दोन ठिकाणी प्रसिध्दी करणे आवश्यक होते. मात्र अशी प्रसिध्दीची कार्यवाही केलेली नाही.

## 12 प्रभाग क्रमांक 10 (अ) निसर्ग कॉलनी व कावरे कॉलनी अंतर्गत ठिकाणी गटरावरSlab टाकणे, गटर करणे व पाईपपाईन करणे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020-21 व 2021 च्या लेखापरीक्षण वर्षात सातारा नगरपरिषदकडील प्रभाग क्रमांक 10 (अ) निसर्ग कॉलनी व कावरे कॉलनी अंतर्गत ठिकाणी गटरवर Slab टाकणे, गटर करणे व पाईपपाईन करणे नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष 2020-21 व 2021 मध्ये सदर कामावरती झालेला खर्च

1.प्रमाणाक क्रमांक 1535 दिनांक 17.03.2021 रक्कम रुपये ndash; 419217.एकूणखर्च 419217

मक्तेदार- श्री रोहित प्रकाश जाधव

मोजमापपुस्तिका: 123 पान क्रमांक 54

1.

सदर कामाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम दिसून येत होत्या.

Sub Estimate r.c.c गटर 21756

Sub Estimate r.c.c. slab - 318483

एकूण 340239

12% gst-40829

Total 381068

Sub Estimate pipe drain - 18791

Total 399900

सदर कामाच्या अंदाजपत्रकानुसार p/c brick masonory chamber of size 60-45 हि बाब

2 नग 5302 दर =10604

अशा प्रकारे करणे आवश्यक असताना मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता त्यामध्ये सदर बाब

46 नग *5302 दर = 243892

एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आलेला आहे. सदर चेंबर वर झालेला खर्च हा अंदाजपत्रकीय पेक्षा खूप जास्त आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात चेंबर वरती खर्च करण्याचे प्रयोजन लेखापरीक्षणास सादर करावे

DATMSSM6801 (Ref No : 61, Hmm No : 13)

## 13 प्रभाग क्रमांक 17 पेठ रामाचा गोट पंचवटी अपार्टमेंट समोरील खारी विहीर परिसरामधील मारुती मंदिरामागे रस्त्याच्या लगत संरक्षक भिंत बांधणे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : | 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020-21 व 2022 च्या लेखापरीक्षण वर्षात सातारा नगरपरिषदकडील प्रभाग क्रमांक 17 पेठ रामाचा गोट पंचवटी अपार्टमेंट समोरील खारी विहीर परिसरामधील मारुती मंदिरामागे रस्त्याच्या लगत संरक्षक भिंत बांधणे नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष 2020-21 व 2022 मध्ये सदर कामावरती झालेला खर्च

प्रमाणाक क्रमांक 1036 दिनांक 11.12.2020 रक्कम रुपये एकूणखर्च- 901122

मक्तेदार: श्री रजिया कंस्ट्रक्शन

मोजमापपुस्तिका: 63 पान क्रमांक 194

1.शासन निर्णय संकीर्ण -2015/प्र.क्र.90/न.वि. 16 दिनांक 16 जानेवारी 2016 मधील 4 ड नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील रस्त्यांची देखरेख -दुरुस्ती, - डांबरीकरण, मोठ्या प्रमाणात नादुरूस्त झालेल्या रस्त्यांची पुर्नबांधणी, रस्ता- पुल व रेल्वे-पुल बांधणी, पदपथ बांधणी, भुयारी रस्ता इत्यादी रस्ता व तद्अनुषंगिक बाबींचा विकासाची कामे "रस्ता अनुदान " अंतर्गत हाती घेण्यात यावीत. रस्ता विकासाव्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्रकारची कामे हाती घेण्यात येवू नयेत असे नमूद असताना सदर रस्ते अनुदान निधी मधून संरक्षक भिंतीचे काम करण्यात आलेले आहे सदर खर्च करण्यामागील प्रयोजन स्पष्ट करावे.

2.. मा. जिल्हाधिकारी सातारा यांची या कामाची प्रशासकीय मान्यता जा.क्र. साशा/नपा/(विस्तार अनुदान ) 2166/2019 सातारा दिनांक 3/7/19 अन्वये प्राप्त झालेली आहे सदर प्रशासकीय आदेशातील अट क्रमांक 9 अन्वये शासनाच्या ज्या आदेशाद्वारे तसेच ज्या शासन निर्णयाच्या अंतर्गत नपास अनुदानप्राप्त झालेले आहे. त्यातील सर्व अटी

व शर्ती, तांत्रिक मंजुरी देणाऱ्या सक्षम प्राधिकारी यांनी नमूद केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करण्याची जबाबदारी मुख्याधिकारी यांची राहील. मात्र तरीही नियमबाह्यपणे खर्च झालेला आहे

उपरोक्तनुसार १ ते 2 उणीवांची साधार पुर्तता दाखवावी

DATMSSM6801 (Ref No : 62, Hmm No : 13)

## 14 जुन्या कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावुन त्यादवारे घनकचरा व्यवस्थापना करीता जागा उपलब्ध करुन देणे खर्चाबाबत. (बायोमायनिंग)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : | 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

| | |
|---|---|
| कामाचे नाव | जुन्या कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावुन त्याव्दारे घनकचरा व्यवस्थापनाकरीता जागा उपलब्ध करुन देणे |
| निधी | 14 वा वित्त आयोग व स्वच्छ महाराष्ट्र अभियान |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 64072222/- |
| प्रशासकीय मान्यता | मे. सर्वसाधारण सभा ठराव क्र.56 दि.10/04/2017<br><br>1.नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.स्वमअ-2017/प्र.क्र.103/नवी-34 दिनांक 10/11/2017 (संपुर्ण घनकचरा व्यवस्थापनाकरीता) पैकी बायोमायनिंग करीता रुपये 29061281/-<br><br>2.नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.स्वमअ-2018/प्र.क्र.329/नवी-34 दिनांक 13/11/2018 (बायोमायनिंग करीता) |
| मंजूर मक्तेदाराचे नाव | सेव्ह एन्वॉरमेंट मॅनेजमेंट ॲण्ड इंजि.प्रा.लि. पुणे |
| तांत्रिक मान्यता | मुख्य अभियंता मजीप्रा पुणे, जा.क्र.मुअपुणे /ता.शा /सातारा घनकचरा/200 दि.19/01/2019 (रुपये 64072222/-)मधील बाब क्र.18 अन्वये ॲबस्ट्रॅक्ट शीट बाब क्र.1 नुसार मुळ दर प्रति घ.मी.रुपये 192/-आहेत.मात्र पत्र क्र.SMD/SMMU/SWM/966/18-19 DT.29/09/2018 अन्वये सदरचे दर महा जी प्राधि (CPDM CELL) ठाणे यांचे पत्र क्र.383 दि 09/07/2018 अन्वये सुधारीत दर रुपये 429/- एवढे |

| | |
|---|---|
| | असुन त्यावर 10 टक्के H.A. ॲड करुन रुपये 471.90 या दरानुसार प्रदान |
| तां. मान्यता | मंजुर निविदा15 टक्के कमी दराने तथापी सदरचे वाढीव दर मुळ दराच्या 123 टकके इतके जास्त येतात. नगरपरिषदेने निविदा मंजुरपुर्व वाटाघाटी केल्याचे आढळले नाही |
| निविदा रक्कम | 54461388/- (15 % कमी दराने) अंतिम देय रक्कम 54461388/- फक्त (सिमित) |
| कामाचे आदेश<br><br>कामाची मुदत | सानप/आरोग्य/28 दिनांक 12/05/2020<br><br>6 महिने दि.12.11.2020 पुर्वी |
| मुद्रांक शुल्क | 55000/- |
| मोजमाप पुस्तक क्र. व पान नं. | 133/1,2,3 |
| दंड | दंड लागु प्रतिदिन 0.05 प्रमाणे वसुली करावी (अट क्र.7.2.1) |
| मुदतवाढ | मुदतवाढ आदेश नस्तीत आढळुन आला नाही. |
| काम सुरु दिनांक काम पूर्ण दिनांक | 12/05/2020<br>07/07/2021 |

शा.नि दि 10/11/2017 मधील निधी वितरण कार्यपध्दती 3.4 नुसार प्रकल्प मंजुर झाल्यानंतर मुळ प्रकल्प किंमतीमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/कार्यान्वियीत यंत्रणेची राहील राज्यशासना मार्फत त्याकरीता कोणतेही वाढीव अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.सबब या अतिरिक्त झालेल्या खर्चाकरीता उपरोक्त शा नि दि 03/08/2015 मधील (III)1आ) अन्वये मा.जिल्हाधिकारी यांची प्रशा.मान्यता घेणे आवश्यक त्याचप्रमाणे तांत्रिक मंजुरी दिनांक 29/01/2019 अनुसार सिटी सॅनिटेशन प्लॅन्ट यास शासनाची मान्यता , महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,घनकच-याचे भौतिक व रासायनिक पृथ:करण याबाबत पाणी व माती तपासणी शासन मान्य प्रयोगशाळेतुन करणे व घनकचरा संबधी प्रक्रियेबाबत NEERI NAGPUR या संस्थेकडुन तांत्रिक सहमती घेणे बंधनकारक आहे. इतर परवानग्या निविदा प्रक्रियेपुवी बंधनकारक राहतील परंतु त्यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

| **प्र.क्र.** | **दिनांक** | **रक्कम** | **तपशिल** |
|---|---|---|---|
| **1521** | **17/03/2021** | **16338217** | **प्रथम रनिंग देयक** |

| | | | |
|---|---|---|---|
| **168** | **17/05/2021** | **8359820** | **दुसरे रनिंग देयक** |
| **395** | **09/07/2021** | **7978395** | **तिसरे रनिंग देयक** |
| | **एकुण** | **32676432** | |

नगरपरिषद सातारा सन 2020-21-22 चे लेखापरीक्षण करताना उपरोक्त् बाबत खालीलप्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहेत

1.शासन परिपत्रक,क्र.जीईएन/ 1093/ 2365/ प्र.क्र. /26/ 93/नवि-14 दि.20.10.1993, नगरपंचायत संचालनालय, स्थायी निर्देश क्र.36 नप्रस निविदा मागविणे /05/प्रक्र./151/05/9 दि.5/06/2006 अन्वये व नगरपंचायत अधिनियम 1965 चे कलम 93(6) तसेच न.प.लेखासंहिता 2011 परिशिष्ट 3 खंड 19 अन्वये तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय,क्रमांक सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दिनांक 27 सप्टेंबर,2018 नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.50.00 लक्षपेक्षा जास्त असल्याने जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील दैनिकामध्ये जाहिरात देऊन स्पर्धात्मक दर प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे, तथापि नगर परिषदेने याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळले नाही.

2.घनकचरा व्यवस्थापन डीपीआर नुसार सर्वंकष कामांकरीता प्रदान केलेली मुळ प्रशासकीय मान्यता नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.स्वमअ-204/ प्र.क्र.103/ नवी-34 दिनांक 10/11/2017 मध्ये नमुद अनिवार्य उददीष्टे घनकचरा निर्मीती जागीच 100 टक्के विलगीकरण व विलगीकृत वाहतुक,कंपोस्ट खत/ बायोमिथेनायझेशन प्रक्रिया करणे,खत निर्मीतीचा हरित महासिटी कंपोस्ट हा ब्रॅण्ड मिळवुन त्या नावाने विक्री करणे,सुक्या कच-याचे दुय्यम विलगीकरण करुन पुनर्वापर अथवा विक्री करावी इ.चे पालन झाले/होत असल्याबाबत अभिलेखे आढळले नाहीत.

3.महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 10/11/2017 मधील निधी zwj;वितरण कार्यपध्दती 3.4 नुसार प्रकल्प मंजुर झाल्यानंतर मुळ प्रकल्प किंमतीमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/कार्यान्वित यंत्रणेची राहील. राज्य शासनामार्फत त्याकरीता कोणतेही वाढीव अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही. सबब या अतिरिक्त झालेल्या खर्चाकरीता उपरोक्त शासन निर्णय दिनांक 3/8/2015 मधील (iii) 1-आ अन्वये मा. zwj;जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे तांत्रिक मंजुरी दिनांक 29/1/2019 अनुसार सिटी सॅनिटेशन प्लांट यास शासनाची मान्यता, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, घनकचऱ्याचे भौतिक व रासायनिक पृथ्थकरण याबाबत पाणी व माती तपासणी शासन मान्य प्रयोग शाळेतून करणे व घनकचरा संबंधी प्रक्रियेबाबत NEERI NAGPUR या संस्थेकडून तांत्रिक सहमती घेणे बंधनकारक आहे. इतर परवानग्या निविदा प्रक्रियेपूर्वी बंधनकारक राहतील परंतू त्यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

4.नस्तीमधील कामाच्या प्रगतीबाबतचे अभिलेखे पडताळले असता नगरपरिषदेचे मक्तेदारास दिलेले पत्र जा.क्र.सानप/साबां/1212 दिनांक 26/03/2021 व स्मरणपत्र क्र.746 दिनांक 03/08/2021 नुसार (बायोमायनिंग केल्यानंतर वेगळे होणारे काही घटक नगरपरिषदेने निश्चीत केलेल्या भू-भराव(land fill) क्षेत्रामध्ये टाकत असल्याचे

निर्देशनास आले आहे.सदरची बाब चुकीची व अयोग्य आहे.सर्व घटक काढुन त्याची योग्य रित्या विल्हेवाट लावावी व भू-भरावाची जागा पुर्णपणे रिकामी करुन दयावी असे दिनांक 26/03/2021 च्या पत्रान्वये कळवुन देखील जागा पुर्णपणे रिकामी करण्यात आली नाही.असे नमुद आहे.) यानुसार स्मरणपत्र कालावधी म्हणजेच जवळपास 5 महिने मक्तेदाराने याबाबत कार्यवाही केलेची दिसत नाही.सबब निविदा शर्तीचा भंग झाल्याने निविदा अटी शर्ती पृष्ठ क्र 35 वरील शर्त क्रमांक 6.2 मधील रकाना 1 नुसार घनकचरा व्यवस्थापन नियम व अन्य पर्यावरण विषयक निकष याचे पालन न केल्याने प्रति घटना प्रति दिन रुपये 1000/- प्रमाणे अथवा सक्षम प्राधिकरणाने विहित केल्यानुसार अधिकचा दंड आणि कारवाई करणे आवश्यक आहे.सबब 5 महिन्याकरीता दंडाची रक्कम होणा-या दिवसानुसार परिगणित करुन वसुल करणे आवश्यक आहे.

5.निविदा शर्तीमधील बाब क्र.6 कामाची व्याप्ती मधील (i) ते (xxviii) इतक्या कामाच्या प्रगतीबाबतच्या अटी शर्तीचे पालन होत असलेबाबत नगरपरिषदेने नियंत्रण ठेवण्याची कार्यवाही केल्याबाबत क्रमवार अभिलेखे ठेवल्याचे आढळले नाही.उदा.अट क्रमांक viii नुसार कच-याचा सर्वात वरचा थर ताज्या कच-याचा असल्याने तो जैविक घटक वापरुन कुजवला पाहिजे तसेच अन्य अटी नुसार दुर्गंधी येता कामा नये,विलगीकृत घनकच-यापासुन खत तसेच माती व विविध घटक यांचे वर्गीकरण केले पाहिजे तयार होणा-या उपयोगी मालाचे साठा,पॅकिंग,मार्केटींग व विक्री मक्तेदाराच्या खर्चाने करावयाची आहे.उर्वरित घनकचरा याची विल्हेवाट घनमीटर व वाहनांच्या खेपा यानुसार नोंद ठेवायची आहे.इ.याबाबत नियमित कार्यवाही झाल्याचे अभिलेखे आढळले नाहीत.

6.नस्तीमधील त्रयस्थ लेखापरीक्षणाबाबतचा पत्रव्यवहार पाहता जा.क्र.सानप/आरोग्य/78/1 दिनांक 02/07/2020 अन्वये सहयोगी प्राध्यापक सिविल इंजि.विभाग कॉलेज ऑफ इंजि.पुणे डॉ.ईश्वर सोनार यांना थेट अग्रेषित केले आहे.वास्तविक याबाबतचा पत्रव्यवहार मा.प्राचार्य अथवा विभाग प्रमुख यांचे नावे करणे आवश्यक होते.अथवा सदरचे सह.प्राध्यापक यांना कॉलेज ऑफ इंजि.पुणे यांनी प्राधिकृत केलेबाबतचे पत्र आवश्यक होते सबब डॉ.सोनार यांचेशी थेट संपर्क काय आधारे साधला याबाबत साधार खुलासा आवश्यक आहे.

7.नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देश क्र.36 दि.29/12/2005 मधील परि क्र.30 व महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 16 (i) तसेच नगरपालिका लेखा संहिता 2011 परिशिष्ट 4 खंड 17 नुसार निविदा धारकांकडून निविदा संदर्भात पदाधिका-यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे अनुसुची अ मधील प्रतिज्ञापत्र निविदेसोबत जोडलेले नाहीत. तसेच तसेच नगरपालिका लेखा संहिता 2011 परिशिष्ट 3 खंड 6 नुसार निविदा समिती गठीत केल्याचे व निविदा मंजुर केल्याचे कागदपत्रे नाहीत.

8.कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 (EPFO) कायदयानुसार मक्तेदार कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमांचा भरणा करीत असलेबाबतचे अभिलेख्यांची पडताळणी केल्याबाबत पुर्तता आवश्यक आहे.

## 15 पंतप्रधान आवास योजनेतून झालेल्या अनुदान वाटप व इतर खर्चाबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये पंतप्रधान आवास योजनेतून झालेल्या अनुदान वाटप व इतर अनुषंगिक खर्चाबाबत अर्धसमास पत्र क्र. 75 दि. 6/2/2023 अन्वये अभिलेखे मागणी करण्यात आली होती. सदरबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.सन 2018-19 च्या DPR प्रमाणे नगरपरिषदेने एकूण 188 घरकुल लाभार्थ्यांसाठी अनुदान मागणी केली आहे. तथापि त्यापैकी फक्त 84 लाभार्थ्यांनी घरकुल बांधकाम पूर्ण केल्याचे दिसते. व त्यांना अनुदान वाटप करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग शासन निर्णय संकीर्ण-2018/प्र.क्र. 36/ग्रु.नि.धो.-2 दि. 8/2/2019 मधील मुद्दा क्र. 2 नुसार केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या ज्या घरकुलांचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही ते रद्द होणार नसल्याने त्यांचे बांधकाम लवकर सुरु करण्याची सर्वस्वी जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणांची राहील असे नमूद आहे. असे असताना बहुतांश घरकुलांचे बांधकाम झालेले नाही. तसेच विलंबाने झाले आहे. सदरबाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

2.सन 2020-21 च्या रोखवहीनुसार दि. 1/4/2020 ची सुरुवातीचे शिल्लक व सदर योजनेचे बँक खाते ICICI बँक खाते क्र. 646001002841 दि. 1/4/2020 रोजीची सुरुवातीची शिल्लक यामध्ये तफावत दिसुन येते

3.प्रधानमंत्री आवास योजना रोखवही व बँक पासबुक नोंदी अपुर्ण असल्याने यामधील सुरुवातीची शिल्लक, अखेरची शिल्लक व तफावतीबाबत लेखापरीक्षणात अभिप्राय देता येत नाहीत तरी तात्काळ सदर बाबी पुर्ण करुन सादर कराव्यात तसेच वर्ग रकमा व एकत्रित रकमेचा रोकडवही व विविध बॅक खात्याशी ताळमेळ घेवुन खुलासा सादर करावा

AGRSRBM7301 (Ref No : 69, Hmm No : 46)

## 16 नगरपरिषदेच्या विविध विभागामध्ये लागणारे कार्यालयीन सहाय्यक कंत्राटी स्वरुपात पुरविणेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये भांडार विभागाकडील सहाय्यक कंत्राटी कामगार पुरविणे बाबतची नस्तीची पडताळणी केली असता त्याबाबत लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1.महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस.-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे प्र.क्र.2.9.4 नुसार वस्तू/सेवा खरेदी समिती गठीत करुन त्या समितीने निविदा प्रारूप तयार करणेपासून निविदेची अंतिम वाटाघाटी करणेपर्यंतची संपूर्ण कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु नगरपरिषद द्वारे अशी समिती गठीत न करताच मुख्याधिकारी यांचे स्वाक्षरीने कार्यवाही करणेत आल्याचे दिसून येते. तसेच सदर निविदेबाबतची जाहिरात स्थानिक व राज्यस्तरीय वर्तमानपत्रामध्ये देणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

2.दर कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर 2021 चे देयक पाहता रक्कम रु. 6,32,386/- चे देयकासोबत 33 कर्मचारी यांची यादी सोबत जोडली आहे. परंतु प्रत्यक्षात निविदा टेंडर 30 कर्मचारी यांचेकरिता असताना तीन अधिक कर्मचारी यांना वेतन अदा केले आहे. सदरबाबत साधार खुलासा करण्यात यावा अन्यथा जादा अदा रक्कम परीगणित करून संबंधितांकडून वसूल करून भरणा केल्याची पूर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

3.देयकासोबत कंत्राटी कर्मचारी कोणत्या शाखेत काम करतात, त्यांनी काय काम केले याचा शाखाप्रमुख यांच्या अभिप्रायासह अहवाल उपलब्ध नाही

4.कर्मचारी हे कंत्राटी स्वरूपाचे असताना त्यांची वेतन देयके पाहता माहे सप्टेंबर 2021 मध्ये 29 दिवस काम केल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात सर्व शासकीय कार्यालय हे शनिवार- रविवार रोजी सुट्टी असते. तसेच इतर शासकीय सुट्ट्या असतात. अशावेळी अशा कर्मचारी यांचे सुट्टीचे दिवसाचे वेतन अदा केलेचे दिसून येते. सदरबाबत जादा अदा रक्कम परीगणित करून संबंधितांकडून वसूल करून भरणा केल्याची पूर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

5.नस्तीसोबत स्थायी समितीचा ठराव क्र. 285 दि. 26/8/2021 नुसार 30 कंत्राटी कामगार यांचा ठराव घेतला आहे. परंतु त्याप्रमाणे नगरपालिकेने प्रशासकीय मान्यतेचा आदेश काढलेला नाही. तसेच नगरपालिकेचा दि. 2/9/2021 चा कार्यादेश पाहता तो 33 कर्मचारी यांचेकरिता कुठल्या आधारे देण्यात आला याबाबत खुलासा करण्यात यावा. 3 कर्मचारी यांना नियमबाह्यरित्या वेतन अदा झाले आहे. त्याबाबत माहे सप्टेंबर 2021 पासून पुढील काळातील रक्कम परीगणित करून संबंधितांकडून वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दर्शवावी

6.कार्यादेश हा दि. 2/9/2021 रोजी दिला असताना कर्मचारी यांचे हजेरी अहवाल पाहता दि. 1/9/2021 पासून ते दि. 30/9/2021 पर्यंत हजेरीच्या स्वाक्षरी आहेत. व बिल 29 दिवसाचे काढलेचे दिसते. दि. 1/9/2021 रोजी संबंधित कंत्राटदाराला कार्यादेश दिला गेला नसताना कर्मचारी कसे कामावर रुजू झाले याबाबत साधार खुलासा करण्यात यावा. तसेच सुट्टीच्या दिवसांचे वेतन अदा केला आहे ताबाबत साधार खुलासा करण्यात यावा. अन्यथा जादा अदा रक्कम वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दर्शवावी.

## 17 जंतुनाशके खरेदीतील अनियमिततेबाबत.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-2021 ते 2021-2022 चे लेखापरिक्षण कालावधीत आरोग्य विभागासाठी जंतुनाशके खरेदीची नस्ती तपासली असता त्यावरील उणिवांबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| जाहिरात प्रसिध्दी | 18.08.2018 ई निविदा प्रसिध्दी |
| निविदी उघडाल्याचा दिनांक | 24.8.2018 |
| निविदामंजुरी | सर्वसाधारण सभा ठराव नं. 1023 दिनांक 11.09.2018 |
| पुरवठादार | मे.एस.आर.बी.इंडस्ट्रीज सोलापुर. |
| करारनामा | मुद्रांकशुल्करु.500 |
| पुरवठा आदेश | सानप/भांडार/8/सातारा/न.पा.सातारा दि. 9.5.2019 |
| ठेका कालावधी | वार्षिक |
| वार्षिक खर्च | 16265750/- |

.

देयकाचा तपशिल

| सन | प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 2020-2021 | 924 दि. 11/11/2020 | 423950 |
| 2020-2021 | 940 दि. 12/11/2020 | 1057500 |
| 2020-2021 | 980 दि. 25/11/2020 | 3039800 |
| 2020-2021 | 1428 दि. 02/03/2021 | 3039800 |
| 2020-2021 | 1514 दि. 17/03/2021 | 539800 |

| | | |
|---|---|---|
| 2021-2022 | 29 दि. 08/04/2021 | 4097300 |
| 2021-2022 | 315 दि. 18/06/2021 | 1000000 |
| 2021-2022 | 382 दि. 01/07/2021 | 784781 |
| 2021-2022 | 506 दि. 03/08/2021 | 700000 |
| 2021-2022 | 589 दि. 13/08/2021 | 300000 |
| 2021-2022 | 1654 दि. 10/03/2022 | 6176800 |
| | एकुण | 21159731 |

नगरपरिषद साताराचे सन 2020-2021 ते 2021-2022 चे लेखापरिक्षण कालावधीत आरोग्य विभागासाठी जंतुनाशके खरेदीची नस्ती तपासली असता त्यावरील उणिवांबाबत अनुपालन सादर न झाल्याने खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1.महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक : भाखसं- 2014/प्र.क्र. 82/भाग III/उद्योग 4, दिनांक 01/12/2016 मधील नियम 3.3.2 (अ) नुसार पुनर्प्रत्यायी आदेश फक्त एकदाच देता येईल आणि त्याचे मूल्य आणि संख्या सुरुवातीच्या आदेशाच्या 50% किंवा रुपये दहा कोटी यापैकी जे कमी असेल, त्यापर्यंतची खरेदी करता येईल असे असताना मागील सन 2020-2021 ते 2021-2022 मधील पुरवठादार यांची मुदत दिनांक 24/10/2019 रोजी संपली असल्याने सन 2020-2021 आणि सन 2021-2022 साठी ई-निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक होते. मात्र नगरपरिषदेने सन 2019-2020 मधील पुरवठादार यांना नियमबाह्यरित्या मुदतवाढ दिलेली आहे.

2.सदर पुरवठादार यांनी मुदतवाढीसाठी विहीत मुदतीत अर्ज केलेबाबतचे तसेच मुदतवाढ दिलेबाबतचे अभिलेखे नस्तीसोबत उपलब्ध झाले नाहीत.

3.आरोग्य विभागाने भांडार विभागाकडून जंतुनाशके मागणी केलेबबातचे मागणी अर्ज लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही

4.सदर खरेदीबाबत अंदाजपत्रकामध्ये तरतुद करण्यात आलेली नाही

5.सदर पुरवठा केलेली जंतुनाशके आरोग्य विभागाने कोणत्या कोणत्या विभागामध्ये उपयोगात आणली याबाबत आरोग्य कर्मचारी यांनी वापर केलेबाबतच्या स्वाक्ष-या किंवा अहवाल नस्तीसोबत उपलब्ध झाले नाहीत.

## 18 शिक्षक व शिक्षकेत्तर वेतन सेवानिवृत्ती वेतन यावर मंजूर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा खर्च

**योजना** :
**लेखाशीर्ष** : 00
**वसुलपात्र** : 0.00/-

**निधी** : नगर परिषद स्व-निधी व शासन निधी
**कलम** : 9अ
**अंतिम अमान्य** : 0.00/-

नगरपरिषद शिक्षण मंडळ, सातारा 2021-2022 चे लेखापरीक्षणात दानाची तपासणी केली असता खाली नमूद केल्याप्रमाणे मंजूर अंदाजपत्रकातील तरतूदीपेक्षा कमी /जादा खर्च केला आहे.

| अ. क्र. | लेखाशीर्ष | आर्थिक तरतूद | खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1. | शिक्षक व शिक्षकेतर वेतन | 79215000 | 63173945 | 16041055 | - |
| 2. | सेवानिवृत्ती वेतन | 45000000 | 46433154 | - | 1433154 |
| | एकूण | 124215000 | 109607099 | 16041055 | 1433154 |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.शिक्षक व शिक्षकेत्तर वेतन यावर मंजुर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा रक्कम रुपये 16041055/- जादा खर्च झाला आहे. जादा केलेल्या खर्चा बाबत खुलासा करावा व भविष्यात वास्तववादी अंदाजपत्रक तयार करण्याची दक्षता घ्यावी.

2.सेवानिवृत्ती वेतन यावर मंजुर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा रक्कम रुपये 1433154/- कमी खर्च झाला आहे. कमी केलेल्या खर्चा बाबत खुलासा करावा व भविष्यात वास्तववादी अंदाजपत्रक तयार करण्याची दक्षता घ्यावी

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा  नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## 19 रजा रोखीकरण रक्कम जादा अदा केलेबाबत(शोभा भिकु वायदंडे)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : | 7886.00/- |

1) नाव : शोभा भिकु वायदंडे

2) जन्म दिनांक: 11/02/1960

3) नगरपरिषद सेवेत कायम झाल्याचा दिनांक: 02/04/1985

4) निवृत्तीचे कारण : नियत वयोमान

5) सेवानिवृत्तीचा दिनांक : 28/02/2020

6) निवृत्तीवेतन प्रारंभ दिनांक: 01/03/2020

7) सेवेमधील अनहर्तकाली सेवकाल: ----

8) निवृत्तीवेतन सेवाकालः 34 वर्षे 10 महिने 26 दिवस

9) अंतिम वेतन रुपये: 33700/-

सातारा नगरपरिषद सातारा सन 2020/2021 चे लेखापरीक्षणात सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या नस्तीची व सेवापुस्तकाची तपासणी केली असता प्रमाणक क्रमांक 22 दि 28/7/2020 रक्कम रुपये 248884/ नुसार 227 दिवसाच्या अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा केली आहे परन्तु सेवापुस्तकांची तपासणी केली असता दिनांक 28/12/16 ते 3/12/2016एकुण 6 दिवस अर्जित रजा उपभोगण्याबाबत सेवापुस्तकामध्ये नोंद असताना रजा लेख्यामधुन सदरची रजा कमी न केल्याने खाली नमुद केले - प्रमाणे 6 दिवसाच्या अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा झाली आहे..

6 दिवस/80x (33900+ 5729) 39429/- =7886/-

जादा अदा झालेली रजा रोखीकरणाची रक्कम रु 7886/- वसूल होणे आवश्यक आहे.

DATBPSM6701 (Ref No : 108, Hmm No : 105)

## 20 रजा रोखीकरण रक्कम जादा अदा केलेबाबत(हणमंत रामू बाबर )

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 17086.00/- |

1) नाव : हणमंत रामू बाबर

2) जन्म दिनांक: 11/04/1961

3) नगरपरिषद सेवेत कायम झाल्याचा दिनांक: 01/02/1984

4) निवृत्तीचे कारण : नियत वयोमान

5) सेवानिवृत्तीचा दिनांक : 30/04/2021

6) निवृत्तीवेतन प्रारंभ दिनांक: 01/05/2021

7) सेवेमधील अनहर्तकाली सेवकालः 1 वर्ष 5 महिने 28 दिवस

8) निवृत्तीवेतन सेवाकाल: 35 वर्षे 9 महिने 2 दिवस

9) अंतिम वेतन रुपये: 33700/-

सातारा नगरपरिषद सातारा सन 2021/2022 चे लेखापरीक्षणात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अदा करणेत आलेल्या रजा रोखीकरण नस्तीची व सेवापुस्तकांची तपासणी केली असता हणमंत रामू बाबर यांना प्रमाणक क्रं 88 दिनांक 3/11/2021 रक्कम रुपये 333833/- नुसार 254 दिवस अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करणेत आली आहे परन्तु त्यांचे सेवापुस्तकांची तपासणी केली असता 191 दिवस असाधारण रजेची नोंद असताना अर्जित रजा रोखीकरण रक्कम अदा करताना महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मधील 51 (3) नुसार 191 दिवस रजेच्या 10% म्हणजेच 19 दिवस अर्जित रजा रजा लेख्यामधुन कमी न केलेने त्यांना खाली नमुद केलेप्रमाणे अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम जादा अदा करणेत आली आहे:

19 दिवस/30x (33700+5729) = 17086/-

रजा रोखीकरण जादा अदा रक्कम रुपये 17086/- वसुल होणे आवश्यक आहे.

## 21 श्री छत्रपती शाहू कला मंदिर या नाट्यगृह इमारती मधील स्टेजचे नुतनीकरण करणे व मेकअप रूमसाठी फर्निचर करणे नवीन साऊंड सिस्टीम करणे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 7097.00/- |

| | |
|---|---|
| कामाचे नाव :- 1. श्री छत्रपती शाहू कला मंदिर या नाट्यगृह इमारती मधील स्टेजचे नुतनीकरण करणे व मेकअप रूमसाठी फर्निचर करणे | |
| कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | 23,48,744/- |
| प्रशासकीय मान्यता | जिल्हाधिकारी सातारा यांचे पत्र क्रमांक :- जाक्र. साशा/नपा(वै.यो.प्र.मा.)/ 4212/2018 सातारा दि. 26.12.2018 रु. 5912651/- |
| तांत्रिक मान्यता | कार्यकारी अभियंता, मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग सातारा जा.क्र. चि.शा/तां.मं/ 2478/2018 दि. 15.12.2018 रु. 5972651 |
| निविदा प्रसिध्दीचे माध्यम /तपशिल | दैनिक तरुण भारत |
| निविदा प्रसिध्दीचा दिनांक व कालावधी | दिनांक 16.01.2019 , 21 दिवस (17.01.2019 ते 6.02.2019) |
| प्राप्त निविदांची संख्या | 4 |
| मान्य निविदा दर धारकाचे नाव | तुकाराम दिगंबर सुतार |
| दर मंजुरीचा ठराव व मंजूर दर | नगराध्यक्ष व मुख्याधिकारी समितीची मान्यता दिनांक 12.07.2019, 1 % कमी दराने |
| निविदा मान्य आदेश | दिनांक 18.09.2019 |
| करारपत्र | 1800/- दिनांक नमूद नाही |
| कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | जा.क्र./सानप/सा.बा./606 दिनांक 18.09.2019 |
| कामाचा कालावधी | 4 महिने (दिनांक 19.01.2020) |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक | M.B. NO.118 page 5-6 , M.B. NO.63 page 200 , M.B. NO.132 page 200 |

| काम सुरु दिनांक : 19.09.2019 | काम पुर्णत्वाचा दिनांक |
|---|---|

| प्र.क्र व दिनांक | देयकाची स्थूळ रक्कम | देयकातील कपातीचा तपशील | | | | | गौणखनिज + त्यावरील उपकर | निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुरक्षा ठेव रक्कम | आयकर 2% | कामगार कल्याण उपकर 1% | कामगार विमा 1% | GST 2 % | | |
| 119/29.05.2020 | 1226630 | 54760 | 10952 | 10952 | 10952 | 21904 | - | 1117110 |
| 1647/31.03.2021 | 1121276 | 50057 | 10011 | 10011 | 10011 | 20023 | - | 1021163 |
| एकूण | 2347906 | 104817 | 20963 | 20963 | 20963 | 41927 | - | 2138273 |

कामाचे नाव :- 2. श्री छत्रपती शाहू कला मंदिर येथे नवीन साऊंड सिस्टीम बसविणे

| | |
|---|---|
| कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | 3235630/- |
| प्रशासकीय मान्यता | |
| तांत्रिक मान्यता | |
| निविदा प्रसिध्दीचे माध्यम व दिनांक | दैनिक सांजवात दिनांक 23.02.2019 |
| निविदा प्रसिध्दीचा कालावधी | 7 दिवस (23.02.2019 ते 2.03.2019) |
| प्राप्त निविदांची संख्या | 4 |
| मान्य निविदा दर धारकाचे नाव | जे. डी. |
| दर मंजुरीचा ठराव व मंजूर दर | स्थायी समिती ठराव क्र. 77 दिनांक 4.09.2019, 1 % कमी दराने |
| निविदा मान्य आदेश | दिनांक 18.09.2019 |
| करारपत्र | 2600/- दिनांक 18.09.2019 |
| कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | जा.क्र./सानप/विद्युत/70 दिनांक 18.09.2019 |
| कामाचा कालावधी | 15 दिवस |

| | |
|---|---|
| मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक | M.B. NO.11 page 69 |
| काम सुरु दिनांक | 1.01.2020 |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | 14.06.2020 |

| प्र.क्र व दिनांक | देयकाची स्थूळ रक्कम | देयकातील कपातीचा तपशील | | | | | गौणखनिज + त्यावरील उपकर | निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुरक्षा ठेव रक्कम | आयकर 2% | कामगार कल्याण उपकर 1% | कामगार विमा 1% | GST 2 % | | |
| 1156/27.01.2021 | 3228898 | 288295 | 57659 | - | 28829 | 57659 | - | 2796456 |

1. जिल्हाधिकारी सातारा यांचे पत्र क्रमांक :- जाक्र. साशा/नपा(वै.यो.प्र.मा.)/ 4212/2018 सातारा दि. 26.12.2018 रु. 5912651/- नुसार श्री छत्रपती शाहू कला मंदिर या नाट्यगृह इमारती मधील स्टेजचे नुतनीकरण करणे व मेकअप रूमसाठी फर्निचर करणे नवीन साउंड सिस्टीम करणे कामी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असता नगरपरिषदेने श्री छत्रपती शाहू कला मंदिर या नाट्यगृह इमारती मधील नवीन साउंड सिस्टीम करणे कामी स्वतंत्र निविदा मागविली आहे. महाराष्ट्र शासन , नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक - नपावै-२०१७ /प्र.क्र.१७२-ब/नवि-१६ दिनांक २६ मार्च २०१८ मधील मुद्दा क्रमांक ६ नुसार प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीची एकत्रित निविदा करणे बंधनकारक असता सातारा नगरपरिषदेने प्रस्तुत कामाची निविदा विलगीकरण करून केली आहे. सदरची बाब नियमबाह्य आहे.

2. सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका चे नियम 136 व 141 मधील II(i) ते (iv) नुसार सदर कामाचे एकत्रित अंदाजपत्रक तयार करून दोन्ही विभागाच्या समन्वयाने काम करणे शक्य असता नगरपरिषदेने प्रस्तुत कामाची फोड करुन दोन वेगवेगळी अंदाजपत्रके तयार करून कार्यादेश दिले आहेत. दोन्ही विभागाकडील प्रस्तुत कामाची नस्ती तपासली असता असे निदर्शनास येते की दोन विभागात समन्वय न राहिल्याने काम सुरु होण्यास व पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. मक्तेदाराकडून विलंब आकार वसूल करणे आवश्यक आहे.

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक -सीएटी/2017/प्र.क्र. 08/इमा-2 दिनांक2018 मधील 1.1 नुसार प्रस्तुत कामाची ई-निविदा जाहिरात जिल्हा स्तरावरील एका मराठी वर्तमानपत्रात आणि राज्य स्तरावरील दोन मराठी व एका हिंदी वर्तमानपत्रात व राष्ट्रीय स्तरावरील एका हिंदी व दोन इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे तथापि सातारा नगरपरिषदेने प्रस्तुत कामाची ई-निविदा नोटीस जिल्हा स्तरावरील एका मराठी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे निविदेला व्यापक प्रसिद्धी मिळाली नाही. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयांचे उल्लंघन झाले आहे.

4. उक्त नमूद शासन निर्णयातील1 नुसार प्रथम वेळी ई-निविदा प्रसिद्धीचा कालावधी कमीत कमी 25 दिवस ठेवणे

आवश्यक असता प्रस्तुत कामी नगरपरिषदेने 21 व 7 दिवसाचा कालावधी दिला आहे. निविदाधारकांना निविदा भरणेसाठी पुरेसा कालावधी उपलब्ध झालेला नाही. सदर बाब नियमबाह्य आहे.

5. महाराष्ट्र शासन , नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक: एमसीओ- 2018/प्र.क्र.45/नवि-14 दिनांक 27 सप्टेंबर 2018 नुसार अधिनियमातील सुधारित तरतुदीच्या अनुषंगाने, थेट निवडून आलेल्या नगराध्यक्षांना विकास कामाच्या वित्तीय व संविदा मंजुरीचे अधिकार प्रधान केले आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.1(अ) नुसार रुपये 1 कोटी पेक्षा कमी अंदाजपत्रकीय किंमत असणाऱ्या विकास कामांच्या प्रस्तावांना वित्तीय मंजूरी देण्याचे अधिकार असतील (ब) नुसार तथापि एका वित्तीय वर्षात अशा मंजूरी दिलेल्या विकास कामांच्या प्रस्तावांची किंमत ही शासकीय अनुदानाच्या 15% व विकास कामासाठी निर्धारित केलेल्या नगरपरिषद निधीच्या 15% पेक्षा अधिक नसेल. प्रस्तुत कामाची तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये 597265/- ची असता नगरपरिषदेने कामाची विभागणी करून निविदा मजूर केल्या आहेत. ही बाब नियमबाह्य आहे.

6. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत वरील रकमेच्या 1 टक्के मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामाचा करारनामा करतांना रुपये 1900/- च्या मुद्रांकावर करणे आवश्यक असातंना निविदाधारकाकडून रुपये 1800/- च्या मुद्रांकावर करारनामा केला आहे. उर्वरीत रक्कम रुपये 100/- वसुल करुन पुर्तता दाखवावी.

7. प्रस्तुत कामी (क्र.1)मक्तेदाराकडून सुरक्षाठेव रोखीने भरून घेणे आवश्यक असता नगरपरिषदेने मुख्याधिकारी यांचे नावे ठेव पावती घेतली आहे. सदर ठेवीची व्याजाची रक्कम नगरपरिषद फंडात जमा होणे आवश्यक आहे. तथापि सदर ठेवीचे व्याज नगरपरिषद फंडात जमा न झाल्याने व्याज रक्कम रुपये 6997/- चे नगरपरिषदेचे नुकसान झाले आहे. काम क्र. 1 च्या नस्ती सोबत जोडलेल्या काम पूर्णत्वाचा दाखल्यावर काम कधी पूर्ण झाले याबाबत दिनांक नमूद नाहीत. सदरचा दाखला मुख्याधिकारी यांनी प्रमाणित केलेला नाही.

8. संचालक नगरपरिषद संचालनालय यांचे स्थायी निदेश क्र. 37 जा.क्र.नपप्रसं-1005/विकासकामे/43 /05 दिनांक 3 जानेवारी 2006 मधील अ.क्र. 29, 30 व 31 अन्वये एक लाख व त्यावरील खर्चाच्या विकास कामाचा माहीती फलक कामाच्या ठिकाणी ठेकेदाराने स्वखर्चाने लावणे आवश्यक आहे.

9. प्रस्तुत कामाची नोंद नगरपंचायती कडील स्थावर मालमत्ता नोंदवहीस घेणेत आलेली नाही.

DATDPRF7601 (Ref No : 3, Hmm No : 60)

## 22 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत 3 ठिकाणी कम्पोस्टिंग पिट बांधणे कामातील अनियमिततेबाबत

**योजना** : **लेखाशीर्ष** : स्वच्छ भारत अभियान **वसुलपात्र** : 0.00/-

(

**निधी** : शासन निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 24959.00/-

| | |
|---|---|
| कामाचे नांव | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत 3 ठिकाणी कम्पोस्टिंग पिट बांधणे |
| लेखाशिर्ष | स्वच्छ भारत अभियान(नागरी) अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प |
| प्रशासकीय मंजुरी | नगरविकास विकास विभाग शासन निर्णय क्र. स्वमअ-२०१७/प्र.क्र.१०३/नवि-३४ दि. 10/11/2017 |
| तांत्रिक मंजुरी | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग पुणे, मुख्य अभियंता जा.क्र.मु.अ.(पुणे) तां.शा/८४६ दिनांक २५/५/२०१६ |
| अंदाजपत्रकीय रक्कम | प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये 1126692/- |
| कंत्राटदाराचे नांव | मे. रजिया कंस्ट्रक्शन, सातारा |
| मंजूर निविदा दर | अंदाजपत्रकीय रकमेच्या 6.50 % टक्के कमी दराने |
| कामाचा आदेश व दिनांक | जा. क्र./सा.न.प/सा.बां./४९८ दि. १०/९//२०१८ |
| कामाची मुदत | ३ महिने |
| काम पुर्ण दिनांक | नमूद नाही |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक | 14 पृष्ठ क्र. 1 ते 2 |
| करारनामा | रुपये 500/- |
| प्रमाणक क्रमांक दिनांक | प्र.क्र. 684 दि.7/9/2021 रक्कम रु. 334383 |

कपातींचा तपशील

| स्थूल रक्कम | सुरक्षा ठेव | GST | आयकर | कामगार उपकर | विमा | रॉयल्टी | दंड | अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 334383 | 16719 | 6688 | 6688 | 3344 | 3344 | --- | -- | 297600 |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत 3 ठिकाणी कम्पोस्टिंग पिट बांधणे या कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदरबाबत खालीलप्रमाणे

अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.सदर कामाचा प्रशासकीय मान्यता आदेश नगरविकास विकास विभाग शासन निर्णय क्र. स्वमअ-२०१७/प्र.क्र.१०३/नवि-३४ दि. 10/11/2017 नुसार स्वच्छ भारत अभियान(नागरी) अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प या संपूर्ण कामास र. रु. 15.3481 कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पैकी रक्कम रु.5.0481 कोटी केंद्रशासन हिस्सा, 2.0192 कोटी राज्यशासन हिस्सा असून उर्वरित रक्कम रु. 8.2808 लाख नगरपरिषद स्वहीस्सा(14 वित्त आयोगामधून रु. 8.2808 कोटी) आहे. सदर प्रकल्पासाठी प्राप्त निधी प्रचलित धोरणानुसार विहित केलेल्या बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडून ठेवणे अनिवार्य राहील असे नमूद आहे. परंतु उपरोक्त देयक पाहता संपूर्ण देयक 14 वित्त आयोग निधीतून अदा केल्याचे दिसते. त्यामुळे नगरपरिषदेने सदर प्रकल्पासाठी स्वतंत्र बँक खाते ठेवले होते किंवा कसे? इतर निधीतून सदर बाबीवर काही खर्च करण्यात आला किंवा कसे? व सदर प्रकल्पावर आजतागायत एकूण किती खर्च करण्यात आला याबाबत साधार खुलासा करण्यात यावा.

2.महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. बीसीए-2009/प्र.क्र./108/कामगार-7अ/मंत्रालय, मुंबई दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर या खाती अंदाजित रकमेच्या 01% उपकराची रक्कम रुपये 11267/- देयकातून कपात करून भरणा करणे आवश्यक असताना अदा देयकातून रक्कम रु. 3344/- कपात करण्यात आली आहे. कमी कपात रक्कम रु. 7923/- वसूल करून भरणा करणे आवश्यक आहे.

3.मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या कामासाठी रक्कम रुपये 500 किंमतीचा मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 1126692/- असल्याने मुद्रांक शुल्क रक्कम रुपये 700/- वर कार्यकरार करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 500/- च्या मुद्रांकावर कार्यकरार केल्याने कमी मुद्रांक रक्कम रुपये 200/- वसुल करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

4.खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

5.महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रं. गौखनि/10/1009/ प्रक्र209 ख दिनांक 11/2/2010 व अधिसूचना दिनांक 11/5/2015 अन्वये प्रति घमी रुपये 141.34 प्रमाणे गौण खनिजाची रककम संबंधित मक्तेदार यांचेकडुन रक्कम वसुल करून भरणा करण्याच्या सूचना आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. रस्ते 6/दरसूची/7618 दि. 11.09.2019 अन्वये दि. 1.7.2019 पासून सर्व गौण खनिज रकमेवर 2% अधिभार व वाळूवर 10 टक्के जिल्हा मिनरल फौंडेशन सेस आकारणी करण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार वाळूसाठी रक्कम रु.

158.29 प्रती घमी. व इतर गौणखनिजांसाठी रक्कम रु. 144.16 प्रती घमी रॉयल्टी आकारणी करून भरणा करणे आवश्यक आहे. सदर कामाच्या बाब क्रमांक 2 व 3 मध्ये वापरलेले वाळूचे एकूण परिमाण 7.69 घनमीटरची 158.29 घनमीटर दराने रक्कम रुपये 1217/- कपात करणे आवश्यक आहे.

6.महाराष्ट्र शासन बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 नियम 15 नुसार मोजलेली मापे मान्य असल्याबाबत मक्तेदाराची स्वाक्षरी मोजमाप पुस्तकावर नाही तसेच नियम 13 ते 15 नुसार लेखा शाखेने मोजमाप पुस्तकात लाल शाईने कर्णरेषा मारून रद्द केलेले नाहीत.

7.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. नगरो-2015/प्र. क्र. 64/नवि-33 दि. 27/5/2016 मधील मुद्दा क्र. 7 नुसार निधी वितरीत झाल्यापासून तीन महिन्यात निविदा अंतिम करून कार्यादेश देणे अनिवार्य आहे असे असताना सदर कामास प्रशासकीय मान्यता व निधी विनियोगासाठी मान्यता दि. 10/11/2017 रोजी प्राप्त झालेली आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका नियम क्र. 217 नुसार निविदा मंजूर झाले पासून 30 दिवसाचे आत कामाचा कार्यादेश देणे आवश्यक असताना सदर बाबत निविदा लिफाफा दि. 9/4/2018 रोजी उघडण्यात आला असताना कार्यादेश दि. 10/9/2018 रोजी देण्यात आला आहे. त्यामुळे अनियमितता झाली आहे. सदर विलंबाबाबत साधार खुलासा करण्यात यावा.

8.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 139 अन्वये नमुना क्र. 62 मध्ये काम पूर्णत्वाचा अहवाल नस्तीसोबत दिसून येत नाही. त्यामुळे विहित मुदतीत काम पूर्ण झाल्याबद्दल खात्री होत नाही. पूर्तता सादर करण्यात यावी.

9.नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी आदेश क्र. 37 दि. 3 जानेवारी 2006 मधील परिच्छेद क्र. 29,30 व 31 अन्वये रु. 1 लाखांवरील विकासकामांचे माहितीफलक साईटवर कंत्राटदराने स्वखर्चाने लावावयाचे असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

10.महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग मॅन्युअल मधील नियम 132 ते 135 अन्वये तांत्रिक मान्यतेपूर्वी / अगोदर प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना सदर कामाकरिता तांत्रिक मान्यता 25/5/2016 रोजी तांत्रिक मान्यता घेणेत आलेली असून दिनांक 10/11/2017 रोजी प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

11.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र. 62,145, 256 नुसार नमुना नं. 13 प्राप्त देयकांची नोंदवही विहित नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. तशी नोंदवही न ठेवल्याने दुबार देयके अदा झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही

12.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र. 131 व 132 नुसार नुसार मूळ अंदाजपत्रकात मंजुरी प्राधिकारी यांच्या मान्यतेशिवाय कोणतेही फेरबदल करण्यात येऊ नयेत. कामाचे संकल्पचित्र व आराखड्यात बदल करण्यात येऊ नयेत, तसेच मूळ अंदाजपत्रकात 10 टक्के पेक्षा जास्त बदल असल्यास सुधारित अंदाजपत्रक तयार

करण्यात यावे. असे नमूद आहे. तसेच B1 निविदा फॉर्म मधील अट क्र. 38 अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरू नये तसेच एखाद्या बाबीतील तरतूदीमध्ये 25% पेक्षा जास्त वाढ होत असेल किंवा खर्चात 5000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्या कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही झालेली नाही.

| अ.क्र. | तपशिल | तरतूद परिमाण | प्रत्यक्ष काम | वाढ/ घट | दर | वाढीव कामासाठी अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बाब क्र. 1 Excavation for foundation | 69 CuM | 2.70 | -66.3 | 123 | --- |
| 2 | बाब क्र. 2 Providing dry trap rubble soling | 21 CuM | --- | ---- | 919 | --- |
| 3 | बाब क्र. 3 P/L in situ RCC M10 | 21 CuM | 13.509 | - 7.491 | 4070 | --- |
| 4 | बाब क्र. 4 P/L IInd class BB Mesonry | 25 CuM | 38.376 | 13.376 | 5940 | 79453 |
| 5 | बाब क्र. 5 Plastering | 620 SqM | 548.6 | -71.4 | 121 | --- |
| 6 | बाब क्र. 6 P/L PVC Pipe | 320 RMT | 60 | -260 | 133 | --- |
| | एकूण | | | | | 79453 |

उपरोक्त बाबींचे अवलोकन केले असता अंदाजपत्रकीय तरतूद व प्रत्यक्षात झालेले काम यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. सदर बाबत सुधारित अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून येत नाही. साधार खुलासा करण्यात यावा. अन्यथा जादा अदा रक्कम वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दर्शवावी.

13.सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य दरसूची 2018-19 मधील जनरल नोट नुसार कामाच्या बाबीसाठी SCADA प्रणालीचा वापर न केल्यास संबंधित बाबीच्या अंतिम दरातून 10 % रक्कम कपात करण्यात यावी अशा सूचना आहेत. असे असताना बाब क्र. 3. PL M-10 साठी SCADA प्रणाली वापरल्याचे दिसून येत नाही. सबब M-10 साठीचा अंतिम दर रक्कम रु. 4070 चे 10% रक्कम रु. 407 प्रमाणे एकूण परिमाण 376 घमी साठी होणारी रक्कम रु. 15619/- ची कपात करणे आवश्यक होते. त्यामुळे सदरची जादा अदा रक्कम वसूल करण्यात यावी.

उपरोक्त बाबींच्या पुर्ततेस्तव रक्कम रु. 24959/- लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहेत.

## 23 प्रभाग क्रमांक 17 मधील कोल्हटकर आळी अनंत इंग्लिश स्कूल प्रतापसिंह हायस्कूल राजवाडा येथील रस्ते डांबरीकरण करणे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : | 6388.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020-21 व 2021 च्या लेखापरीक्षण वर्षात सातारा नगरपरिषदकडील प्रभाग क्रमांक 17 मधील कोल्हटकर आळी अनंत इंग्लिश स्कूल प्रतापसिंह हायस्कूल राजवाडा येथील रस्ते डांबरीकरण करणे च्या नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | प्रभाग क्रमांक 17 मधील कोल्हटकर आळी अनंत इंग्लिश स्कूल प्रतापसिंह हायस्कूल राजवाडा येथील रस्ते डांबरीकरण करणे |
| निधी | रस्ते अनुदान |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 1719050 |
| प्रशासकीय मान्यता | जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा क्र./नपा/साशा 714 08/03/2018 रक्कम रुपये 1719050/- |
| तांत्रिक मान्यता | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जा.क्र. चि शा/तां.मं./653/2018 मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग, सातारा दि. 24/01/2018 रक्कम रुपये 1719050/- |
| मंजूर निविदा दर | 4.50% जादा दराने |
| निविदा प्रसिध्दी | 6/04/2018 |
| मंजूर निविदाधारकाचे नाव | ए.एस.कंन्सट्रक्शन |
| कार्यारंभ आदेश दिनांक | 631 दिनांक 06/10/2018 |
| कामाचा मुळ कालावधी | 120 दिवस |

| मोजमाप पुस्तक क्रमांक व पृष्ठ क्र. | मोजमाप पुस्तक क्रमांक 118 पान क्रमांक 30 |
|---|---|

आर्थिक वर्ष 2020-21 व 2021 मध्ये सदर कामावरती झालेला खर्च

1) प्रमाणाक क्रमांक 1652 दिनांक 31/03/2021 रक्कम रुपये ndash; 338797
2) प्रमाणाक क्रमांक 173 दिनांक 09/06/2020 रक्कम रुपये ndash; 1380247
3) प्रमाणाक क्रमांक दिनांक 24-04-2021 रक्कम रुपये ndash; 83868

एकूण खर्च - 1802912

मक्तेदार : ए. एस. कंन्सट्रक्शन

मोजमाप पुस्तिका : 118 पान क्रमांक 30-33

1. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत वरील रकमेच्या1 टक्के मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. सदर कामाचा कार्यकरारानुसार 1300 रुपयांच्या मुद्रांकावरती करारनामा करून घेणे आवश्यक असताना रक्कम रुपये 800 च्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे कमी वसूल मुद्रांक शुल्क 500 रुपये वसुल करुन शासनास भरणा केलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

2. सदर कामासाठी मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता जावक क्र.साशा/नपा७१४ दिनांक 08/03/2018 अन्वये रक्कम रुपये 1719050 एवढ्या रकमेला मान्यता मिळाली होती. मात्र सदर कामावर उपरोक्त प्रमान्कांवये 1802912 इतका खर्च झालेला आहे. प्रशासकीय रकमेपेक्षा जास्त झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणास खुलासा करावा.

3. सदर काम हे विशेष रस्ता अनुदान निधी मधून मंजूर झालेले असताना सदर कामावर 14 व्या वित्त आयोग निधी मधून नियमबाह्यपणे 83868 इतका खर्च करण्यात आलेला आहे.सदराचा जादा खर्च हा मान्य लेखाशिर्षाव्यतिरिक्त इतर निधीमधून खर्च करण्यात आलेला आहे.

4. सदर कामाची निविदा 2018_DMA_303949_17 या टेंडर आयडी अन्वये Mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली होती. ऑनलाईन निविदेची सर्व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर कामासाठी कार्यारंभ आदेश देणे आवश्यक असताना ऑनलाईन निविदेची कार्यवाही पूर्ण न करता कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

5. मोजमाप पुस्तक क्रमांक 118 पान क्रमांक 30 ते 33 अन्वये सदर कामाच्या मुल्यांकनाची तपासणी केली असता

कामाचे मुल्यांकन 1797024 एवढे झालेले आहे मात्र सदर कामावर मुल्यांकनापेक्षा जादा खर्च (1802912) झाल्याचे प्रथमदर्शी दिसून येते. सदर कामावर जादा झालेला 5888 इतका खर्च वसूल करून घेणे आवश्यक आहे.

DATVBSM9301 (Ref No : 10, Hmm No : 71)

## 24 प्रभाग क्रमांक 2 ब पेठ सदरबझार शॉपिंग सेंटर येथील रस्ते डांबरीकरण करणे

**योजना** :  **लेखाशीर्ष** : 00  **वसुलपात्र** : 0.00/-

**निधी** : शासन निधी  **कलम** : 9ब  **अंतिम अमान्य** : 12930.00/-

नगरपरिषद सातारा सन 2020-21 व 2021 च्या लेखापरीक्षण वर्षात सातारा नगरपरिषदकडील प्रभाग क्रमांक 2 ब पेठ सदरबझार शॉपिंग सेंटर येथील रस्ते डांबरीकरण करणे च्या नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | प्रभाग क्रमांक 2 ब पेठ सदरबझार शॉपिंग सेंटर येथील रस्ते डांबरीकरण करणे |
| निधी | रस्ते बांधणी |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 10,00000 |
| प्रशासकीय मान्यता | जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा क्र./नपा/साशा 353 23/01/2019 रक्कम रुपये 999699/- |
| तांत्रिक मान्यता | 999699 दिनांक 24/01/2019 |
| मंजूर निविदा दर | 18% जादा दराने |
| निविदा प्रसिध्दी | 01.02.2019 |
| मंजूर निविदाधारकाचे नाव | मे.रजिया कंस्ट्रक्शण |
| कार्यारंभ आदेश दिनांक | जा.नं. 1012 दिनांक 16/01/2020 |
| कामाचा मुळ कालावधी | 90 दिवस |
| मोजमाप पुस्तक क्रमांक व पृष्ठ क्र. | मोजमाप पुस्तक क्रमांक 121 पान क्रमांक 17 व |

| | |
|---|---|
| | मोजमाप पुस्तक क्रमांक 120 पान क्रमांक 33 |

आर्थिक वर्ष 2020-21 व 2021 मध्ये सदर कामावरती झालेला खर्च

प्रमाणाक क्रमांक 481 दिनांक 27/08/2020 रक्कम रुपये - 722272

प्रमाणाक क्रमांक 699 दिनांक 08/09/2021 रक्कम रुपये - 407630

एकूण खर्च - 1129902

मक्तेदार : मे रजिया. कंन्सट्रक्शन

1.सदर कामाच्या मोजमाप पुस्तकावरून कामाच्या मुल्यांकनाची तपासणी केली असता कामाचे मुल्यांकन 1129902 एवढे झालेले आहे. कामाच्या मूल्यांकनात 21709 रुपये रॉयल्टी व 1900 रुपये तांत्रिक तपासणी फी साठी असे एकूण 23609 रुपये अदा करण्यात आलेले आहेत. तसेच त्याच 23609 रकमेवरती 18% निविदा जादा दराची रक्कम व 12% जीएसटी ची रक्कम अनुक्रमे 4249 व 3343 एवढी रक्कमेची जादा अदाई झालेली आहे सदर रक्कम वसूल करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त प्रमाणे 7592 रुपये संबंधित ठेकेदाराकडून वसूल करून पूर्तता करणे आवश्यक आहे.

2.सदर कामासाठी प्रशासकीय मान्यता जावक क्र. सर्वसाधारण दिनांक 23/01/2019 अन्वये रक्कम रुपये 999699 एवढ्या रकमेला मान्यता मिळाली होती. मात्र सदर कामावर उपरोक्त प्रमान्कांवये 1129902 इतका खर्च झालेला आहे. प्रशासकीय रकमेपेक्षा जास्त झालेल्या खर्चाबाबतचे अनुपालन आवश्यक कागदपत्रांसह लेखापरीक्षणास सादर करावे

3.कामाच्या मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता त्यामध्ये item no 4 प्रमाणे केलेल्या कामासाठी with SCADA प्रणाली चे दर अदा करण्यात आलेली आहेत मात्र कामामध्ये स्काडा प्रणाली वापरल्याचे आढळून आले नाही त्यामुळे सदर बाबीसाठी जादा अदा झालेली रक्कम वसूल करून घेणे आवश्यक आहे. रक्कम वसूल करून पूर्तता सादर करावी.

4.कामासाठी वापरण्यात आलेल्या डांबराच्या खरेदी पावत्या लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेल्या नाहीत.

5.सदर कामासाठी पीडब्लूडी विभागाचा सन 2017-18 चा डीएसआर वापरला आहे त्यामधील 4.2(iii) नुसार जर ठेकेदाराने कामाचा विमा काढलेला नसेल तर त्याच्या प्रथम देयकामधून कामाच्या रकमेच्या 1% इतकी रक्कम वसूल करून घेणे आवश्यक आहे मात्र विभागाने सदर कामाच्या देयकातून 0.5% रक्कम वसूल करून घेतलेली आहे त्यामुळे 0.5% म्हणजेच 5338 इतकी रक्कम कमी वसूल करून घेतलेली आहे त्यामुळे रक्कम रुपये 5338 वसूल करून पूर्तता करून घेणे आवश्यक आहे.

## 25 प्रभाग क्रमांक 5 पेठ गोडोली खंदारे वस्ती ओढ्यास आरसी.सी गटर संरक्षक भिंत बांधणे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : शासन निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : 3719.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020-21 व 2021 च्या लेखापरीक्षण वर्षात सातारा नगरपरिषदकडील प्रभाग क्रमांक 5 पेठ गोडोली खंदारे वस्ती ओढ्यास आर.सी.सी गटर संरक्षक भिंत बांधणे च्या नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | प्रभाग क्रमांक 5 पेठ गोडोली खंदारे वस्ती ओढ्यास आर.सी.सी गटर संरक्षक भिंत बांधणे |
| निधी | लो.आ.भा.ना.व.सु.योजना |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 721830 |
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा जा.क्र.298 दिनांक 7/08/2018 रक्कम- 721820 |
| तांत्रिक मान्यता | जा.क्र.सानप/सांबां 130 दिनांक 15/11/2018 |
| मंजूर निविदा दर | 4.99% जादा दराने |
| निविदा प्रसिध्दी | 16.02.2019 |
| मंजूर निविदाधारकाचे नाव | सोहन विठ्ठल दुधाळ |
| कार्यारंभ आदेश दिनांक | जा.नं. 548 दिनांक 16/01/2019 |
| कामाचा मुळ कालावधी | 90 दिवस |
| मोजमाप पुस्तक क्रमांक व पृष्ठ क्र. | मोजमाप पुस्तक क्रमांक 96 पान क्रमांक 66,67 |

आर्थिक वर्ष 2020-21 व 2021 मध्ये सदर कामावरती झालेला खर्च

प्रमाणाक क्रमांक 327 दिनांक 27/07/2020 रक्कम रुपये - 743769

एकूण खर्च - 743769

मक्तेदार : सोहन विठ्ठल दुधाळ

1. सदर कामासाठी प्रशासकीय मान्यता सर्वसाधारण सभा जा.क्र.298 दिनांक 7/08/2018 रक्कम- 721820 एवढ्या रकमेला मान्यता मिळाली होती. मात्र सदर कामावर उपरोक्त प्रमान्कांवये 743769 इतका खर्च झालेला आहे. प्रशासकीय रकमेपेक्षा जास्त झालेल्या खर्चाबाबतचे सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन अनुपालन आवश्यक कागदपत्रांसह लेखापरीक्षणास सादर करावे.

2. सदर कामासाठी पीडब्लूडी विभागाचा सन 2017-18 चा डीएसआर वापरला आहे त्यामधील 4.2(iii) नुसार जर ठेकेदाराने कामाचा विमा काढलेला नसेल तर त्याच्या प्रथम देयकामधून कामाच्या रकमेच्या 1% इतकी रक्कम वसूल करून घेणे आवश्यक आहे मात्र विभागाने सदर कामाच्या देयकातून 0.5% रक्कम वसूल करून घेतलेली आहे त्यामुळे 0.5% म्हणजेच 37419 इतकी रक्कम कमी वसूल करून घेतलेली आहे त्यामुळे रक्कम रुपये 3719 वसूल करून पूर्तता करून घेणे आवश्यक आहे.

3. सदर कामासाठी कार्यारंभ आदेश दिनांक 18/09/2019 रोजी देण्यात आला होता व कामाची मुदत 90 दिवस इतकी होती त्यामुळे सदर काम हे 90 दिवस इतक्या मुदतीत पूर्ण होणे आवश्यक होते अन्यथा मुदतीनंतरच्या प्रत्येक दिवसासाठी विहित मुदत ठेकेदाराकडून वसूल करून घेणे आवश्यक आहे मात्र ठेकेदारासोबत नगरपरिषदेने केलेल्या ठरावात अशा प्रकारच्या दंडाची तरतूद न केल्याने दंडाची रक्कम परीगणित करता येत नाही. अशा प्रकारची तरतूद न केल्याने कामासाठी उशीर होण्याची शक्यता वाढते याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करून पुढील कामांमध्ये दंडाची तरतूद करणे आवश्यक आहे.

DATVBSM9301 (Ref No : 12, Hmm No : 112)

## 26 मंगळवार पेठ डफळे हौद चौक ते विश्वेश्वर मंदिर ते मारुती मंदिर अखेर रस्ता डांबरीकरण करणे कामातील अनियमिततेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : वैशिष्ट्यपूर्ण अनुदा | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : | 73337.00/- |

| | |
|---|---|
| कामाचे नांव | मंगळवार पेठ डफळे हौद चौक ते विश्वेश्वर मंदिर ते मारुती मंदिर अखेर रस्ता डांबरीकरण करणे |
| लेखाशिर्ष | वैशिष्ट्यपूर्ण अनुदान योजना |
| प्रशासकीय मंजुरी | जिल्हाधिकारी कार्यालय सातारा क्र. साशा/नप/वै.प्र.मा सातारा/५१८/२०१६ दि. 9/3/2016 |

| | |
|---|---|
| तांत्रिक मंजुरी | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग सातारा, कार्यकारी अभियंता जा.क्र.चि.शा./तां.म/2063/2015 दिनांक 8/12/2015 |
| अंदाजपत्रकीय रक्कम | प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये 4946505/- |
| कंत्राटदाराचे नांव | श्री अरुण शिवाजीराव देसाई |
| मंजूर निविदा दर | अंदाजपत्रकीय रकमेच्या 4.99 टक्के जादा दराने |
| कामाचा आदेश व दिनांक | जा. क्र./सा.न.प/सा.बां./108 दि. 3/5/2016 |
| कामाची मुदत | 6 महिने |
| काम पुर्ण दिनांक | नमूद नाही |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक | 125 पृष्ठ क्र. 25 ते 27 |
| करारनामा | रुपये 4500/- |
| प्रमाणक क्रमांक दिनांक | प्र.क्र. 106 दि.27/4/2021 रक्कम रु. 1140147 |

कपातीचा तपशील

| स्थूल रक्कम | सुरक्षा ठेव | GST | आयकर | कामगार उपकर | विमा | रॉयल्टी | दंड | अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1140147 | 57007 | 22802 | 11401 | 11401 | 26031 | --- | -- | 1011505 |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील मंगळवार पेठ डफळे हौद चौक ते विश्वेश्वर मंदिर ते मारुती मंदिर अखेर रस्ता डांबरीकरण करणे या कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.सदर कामाचा प्रशासकीय मान्यता आदेश जिल्हाधिकारी कार्यालय सातारा क्र. साशा/नप/वै.प्र.मा सातारा/५१८/२०१६ नुसार वैशिष्ट्यपूर्ण योजना अनुदानातून रक्कम रु. 4946505/- साठी सदर कामास प्रशासकीय मान्यता अदा करण्यात आली आहे. तसेच आदेशातील अट क्र. 2 नुसार 10 टक्के हिस्सा नगरपरिषदेने भरणे बंधनकारक राहील असे नमूद आहे. उपरोक्त अदा देयक पाहता नगरपरिषदेने 14 वित्त आयोग निधीतून अदा केले आहे. सदर देयक 14 वित्त आयोग निधीतून अदा करण्याबाबतचा प्राधिकार व 14 वित्त आयोग विकास आराखडा लेखापरीक्षणास सादर करण्यात यावा. तसेच नगरपरिषदेने 10 टक्के स्वहीस्सा रक्कम भरणा केल्याबाबत साधार खुलासा करण्यात यावा.

2.महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. बीसीए-2009/प्र.क्र./108/कामगार-7अ/मंत्रालय, मुंबई दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर या खाती अंदाजित रकमेच्या 01% उपकराची रक्कम रुपये 49465/- देयकातून कपात करून भरणा करणे आवश्यक असताना अदा देयकातून रक्कम रु. 11401/- कपात करण्यात आली आहे. कमी कपात रक्कम रु. 38064/- वसूल करून भरणा करणे आवश्यक आहे.

3.खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. परंतु कामाच्या Sub estimate 1 बाब क्र. 3 वापरण्यात आलेल्या 190 घमी मुरुमासाठी रॉयल्टी रक्कम रु. 26855/- वसूल करून शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

4.महाराष्ट्र शासन बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 नियम 15 नुसार मोजलेली मापे मान्य असल्याबाबत मक्तेदाराची स्वाक्षरी मोजमाप पुस्तकावर नाही तसेच नियम 13 ते 15 नुसार लेखा शाखेने मोजमाप पुस्तकात लाल शाईने कर्णरेषा मारून रद्द केलेले नाहीत

5.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. नगरो-2015/प्र. क्र. 64/नवि-33 दि. 27/5/2016 मधील मुद्दा क्र. 7 नुसार निधी वितरीत झाल्यापासून तीन महिन्यात निविदा अंतिम करून कार्यादेश देणे अनिवार्य आहे असे असताना सदर कामास प्रशासकीय व निधी विनियोगासाठी मान्यता दि. 9/3/2016 रोजी प्राप्त झालेली आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका नियम क्र. 217 नुसार निविदा मंजूर झाले पासून 30 दिवसाचे आत कामाचा कार्यादेश देणे आवश्यक असताना सदर बाबत निविदा लिफाफा दि. 31/3/2016 रोजी उघडण्यात आला असताना कार्यादेश दि. 3/5/2016 रोजी देण्यात आला आहे. त्यामुळे अनियमितता झाली आहे. सदर विलंबाबाबत साधार खुलासा करण्यात यावा.

6.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 139 अन्वये नमुना क्र. 62 मध्ये काम पूर्णत्वाचा अहवाल नस्तीसोबत दिसून येत नाही. त्यामुळे विहित मुदतीत काम पूर्ण झाल्याबद्दल खात्री होत नाही. पूर्तता सादर करण्यात यावी.

7.नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी आदेश क्र. 37 दि. 3 जानेवारी 2006 मधील परिच्छेद क्र. 29,30 व 31 अन्वये रु. 1 लाखांवरील विकासकामांचे माहितीफलक साईटवर कंत्राटदराने स्वखर्चाने लावावयाचे असताना तशी कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

8.महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग मॅन्युअल मधील नियम 132 ते 135 अन्वये तांत्रिक मान्यतेपूर्वी / अगोदर प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना सदर कामाकरिता तांत्रिक मान्यता 8/12/2015 रोजी तांत्रिक मान्यता घेणेत आलेली असून दिनांक 9/3/2016 रोजी प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

9.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र. 62,145, 256 नुसार नमुना नं. 13 प्राप्त देयकांची नोंदवही विहित नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. तशी नोंदवही न ठेवल्याने दुबार देयके अदा झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही

10.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र. 131 व 132 नुसार नुसार मूळ अंदाजपत्रकात मंजुरी प्राधिकारी यांच्या मान्यतेशिवाय कोणतेही फेरबदल करण्यात येऊ नयेत. कामाचे संकल्पचित्र व आराखड्यात बदल करण्यात येऊ नयेत, तसेच मूळ अंदाजपत्रकात 10 टक्के पेक्षा जास्त बदल असल्यास सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. असे नमूद आहे. तसेच B1 निविदा फॉर्म मधील अट क्र. 38 अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरू नये तसेच एखाद्या बाबीतील तरतूदीमध्ये 25% पेक्षा जास्त वाढ होत असेल किंवा खर्चात 5000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्या कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही झालेली नाही.

Sub estimate No. I

| अ.क्र. | तपशिल | तरतूद परिमाण | प्रत्यक्ष काम | वाढ घट | दर | वाढीव कामासाठी अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बाब क्र. 1 Excavation for roadways | 37.50 CuM | 704.28 | 666.78 | 137.50 | 91682.25 |
| 2 | बाब क्र. 2 Disposal of excavated material | 37.50 CuM | 704.20 | 666.78 | 174.21 | 116159.74 |
| 3 | बाब क्र. 3 Supplying hard murum | 20 CuM | 190 | 170 | 478.97 | 81424.9 |
| 4 | बाब क्र. 4 Spreading Hard murum | 20 CuM | 190 | 170 | 55 | 9350 |
| 5 | बाब क्र. 5 Compacting HM | 100 SqM | 927.38 | 827.38 | 6.60 | 5460.708 |
| 6 | बाब क्र. 6 P/L Stone aggregate | 15 Sqm | 152.58 | 137.58 | 1900.35 | 261450.15 |

Sub estimate No. II

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PL tack coat | --- | --- | --- | --- | --- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | PL MPM | 1460 Sqm | 1107.23 | --- | --- | --- |

Sub estimate No. III

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PA Tack coat | 8893.50 | 9020.72 | 127.22 | 24.06 | 3060.91 |
| 2 | PL Bituminous macadam | 4658.50 | 4847.65 | 189.15 | 353.97 | 66953.42 |

Sub estimate No. IV

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation for foundation | 7.35 Cum | 146.89 | 139.54 | 176 | 24559 |
| 2 | PL in situ M10 | 1.05 | 19.78 | 18.73 | 4581.46 | 85810.74 |
| 3 | PL in situ M20 Foundation | 1.13 | 27.99 | 26.86 | 5910.22 | 158748.50 |
| 4 | PL in situ M20 Pardi | 1.35 | 28.07 | 26.72 | 10602.82 | 283307.35 |
| 5 | PF TMT FE500 | 223.90 Kg | 3255kg | 3.0311 mt | 57200 | 173378.92 |
| 6 | Filling in plinth | 1.80cum | 16.64 | 14.84 | 71.50 | 1061.06 |
| 7 | Disposal of excv. material | 5.55cum | 130.25 | 124.7 | 174.21 | 21723.98 |

Sub estimate No. V

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation for foundation | 40.25 | 90.92 | 50.67 | 145.2 | 7357.28 |
| 2 | Providing RCC pipe 300mm | 50 mtr | 208.70 | 158.70 | 652 | 103472.4 |
| 3 | Lowering jointing pipe | 50 mtr | 208.70 | 158.70 | 184.8 | 29327.76 |
| 4 | Refilling trenches | 25.93 | 52.77 | 26.84 | 66 | 1771.44 |
| 5 | Disposal of excv material | 14.32 | 65.40 | 51.08 | 191.47 | 9780.28 |
| 6 | PC BB Mesonry chamber | 5 | 25 | 20 | 5148 | 102960 |

उपरोक्त बाबींचे अवलोकन केले असता अंदाजपत्रकीय तरतूद व प्रत्यक्षात झालेले काम यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. त्यामुळे वास्तववादी अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रत्यक्ष कामातील तफावतीबाबत सुधारित अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून येत नाही. सदर बाबत साधार खुलासा करण्यात यावा. अन्यथा जादा अदा रक्कम वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दर्शवावी.

11.तांत्रिक मान्यता आदेशामध्ये कामाच्या विविध बाबींसाठी घेतलेल्या दरांबाबत दरपृथ्थकरण तक्ता सोबत जोडलेला नाही. त्यामुळे तांत्रिक मान्यता आदेशातील दर्शविलेले दर योग्य असल्याबात खात्री होत नाही. कामाच्या त्रयस्थ लेखापरीक्षण अहवालात नमूद केल्याप्रमाणे कॉंक्रीट बाबींसाठी स्काडाप्रणालीप्रमाणे दर अंदाजपत्रकात नमूद करण्यात आले आहेत. तथापि स्काडाप्रणालीचा वापर कॉंक्रीट बाबींसाठी करण्यात आला नसल्याचे नमूद आहे. त्यामुळे

सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांचे परिपत्रक दि. 21/8/2014 नुसार कॉंक्रीटचा दर प्रतीघनमीटर र.रु. 111/- ने कमी करावा असे नमूद आहे. त्यानुसार सदर कामामध्ये वापरण्यात आलेल्या एकूण 75.84 घमी कॉंक्रीट साठी प्रती घमी 111/- दराने रक्कम रु. 8418/- कपात करून भरणा केल्याची पूर्तता दर्शवावी.

उपरोक्त बाबींच्या पुर्ततेस्तव रक्कम रु. 73337/- संबंधितांकडून वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दर्शवावी.

DATSPUM8301 (Ref No : 20, Hmm No : 107)

## 27 सोनगाव कचरा डेपो येथे स्टॉर्म वाटर ड्रेन बांधणे कामातील

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : | स्वच्छ भारत अभियान ( | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 274505.00/- |

| | |
|---|---|
| कामाचे नांव | सोनगाव कचरा डेपो येथे स्टॉर्म वाटर ड्रेन बांधणे |
| लेखाशिर्ष | स्वच्छ भारत अभियान(नागरी) अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प |
| प्रशासकीय मंजुरी | नगरविकास विकास विभाग शासन निर्णय क्र. स्वमअ-२०१७/प्र.क्र.१०३/नवि-३४ दि. 10/11/2017 |
| तांत्रिक मंजुरी | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग पुणे, मुख्य अभियंता जा.क्र.मु.अ.(पुणे) तां.शा/८४६ दिनांक २५/५/२०१६ |
| अंदाजपत्रकीय रक्कम | प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये 6621746/- |
| कंत्राटदाराचे नांव | श्री नवनाथ अर्जुन वालेकर |
| मंजूर निविदा दर | अंदाजपत्रकीय रकमेच्या 5.40 टक्के कमी दराने |
| कामाचा आदेश व दिनांक | जा. क्र./सा.न.प/सा.बां./1026 दि. १७/२/२०१८ |
| कामाची मुदत | ६ महिने |
| काम पुर्ण दिनांक | नमूद नाही |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक | 18 पृष्ठ क्र. 1 ते 2 |

| | |
|---|---|
| करारनामा | रुपये 5800/- |
| प्रमाणक क्रमांक दिनांक | प्र.क्र. 685 दि.7/9/2021 रक्कम रु. 4187814/- |

कपातींचा तपशील

| स्थूल रक्कम | सुरक्षा ठेव | GST | आयकर | कामगार उपकर | विमा | रॉयल्टी | दंड | अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4187814 | 209391 | 83756 | 41878 | 41878 | 41878 | --- | -- | 3769033 |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सोनगाव कचरा डेपो येथे स्टॉर्म वाटर ड्रेन बांधणे या कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.सदर कामाचा प्रशासकीय मान्यता आदेश नगरविकास विकास विभाग शासन निर्णय क्र. स्वमअ-२०१७/प्र.क्र.१०३/नवि-३४ दि. 10/11/2017 नुसार स्वच्छ भारत अभियान(नागरी) अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प या संपूर्ण कामास र. रु. 15.3481 कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पैकी रक्कम रु.5.0481 कोटी केंद्रशासन हिस्सा, 2.0192 कोटी राज्य शासन हिस्सा असून उर्वरित रक्कम रु. 8.2808 लाख नगरपरिषद स्वहीस्सा(14 वित्त आयोगामधून रु. 8.2808 कोटी) आहे. सदर प्रकल्पासाठी प्राप्त निधी प्रचलित धोरणानुसार विहित केलेल्या बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडून ठेवणे अनिवार्य राहील असे नमूद आहे. परंतु उपरोक्त देयक पाहता संपूर्ण देयक 14 वित्त आयोग निधीतून अदा केल्याचे दिसते. त्यामुळे नगरपरिषदेने सदर प्रकल्पासाठी स्वतंत्र बँक खाते ठेवले होते किंवा कसे? इतर निधीतून सदर बाबीवर काही खर्च करण्यात आला किंवा कसे? व सदर प्रकल्पावर आजतागायत एकूण किती खर्च करण्यात आला याबाबत साधार खुलासा करण्यात यावा.

2.उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्र. 4.2 नुसार व घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी विहित मुदतीत करणे अपेक्षित आहे. त्यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

3.महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. बीसीए-2009/प्र.क्र./108/कामगार-7अ/मंत्रालय, मुंबई दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अन्वये इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर या खाती अंदाजित रकमेच्या 01% उपकराची रक्कम रुपये 66217/- देयकातून कपात करून भरणा करणे आवश्यक असताना अदा देयकातून रक्कम रु. 41878/- कपात करण्यात आली आहे. कमी कपात रक्कम रु. 24339/- संबंधितांकडून वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दर्शवावी.

4.मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या कामासाठी रक्कम रुपये 500 किंमतीचा मुद्रांक शुल्क आकारणे

आवश्यक आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 6621746/- असल्याने मुद्रांक शुल्क रक्कम रुपये 6200/- वर कार्यकरार करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 5800/- च्या मुद्रांकावर कार्यकरार केल्याने कमी मुद्रांक रक्कम रुपये 400/- वसुल करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

5.खाण व खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम 1957 महसुल व वनविभाग मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन)(सुधारणा) नियम 2015, दिनांक 11 मे 2015 नुसार वाहतूक करुन कामात वापरण्यात आलेले गौण खनिजाची प्रती ब्रास रुपये 400 व प्रती घमी 141.34 प्रमाणे वसुली करुन शासनास भरणा करणे आवश्यक आहे. बाब क्रमांक 4 व 5 मध्ये 341.11 घमी वाळू साठी रॉयल्टी रक्कम 48212/- कपात करून भरणा करणे आवश्यक आहे. तसेच बाब क्रमांक 2 व 3 मध्ये एकूण 771.64 घमी म्हणजेच 272.66 ब्रास गौण खनिज वापरलेचे दिसते तथापि नस्तीसोबत फक्त 22 ब्रास चे चलणे जोडली आहेत. उर्वरित 250.66 घमी साठी रॉयल्टी रक्कम 35428/- कपात करणे आवश्यक आहे. अशी एकूण रक्कम रु. 83641/- कपात करून भरणा करणे आवश्यक आहे. तसेच बाब क्र. 1 मध्ये एकूण 2484.68 घमी खुदाई केली असताना त्यातून निघालेले मटेरियल न वापरता बाब क्र. 3 मध्ये जोता भराई साठी 473.02 घमी मटेरियल रक्कम रु. 341/- प्रती घमी दराने बाहेरून आणून वापरले आहे. त्यासाठी अदा रक्कम रु. 161299.82 लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

6.महाराष्ट्र शासन बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 नियम 15 नुसार मोजलेली मापे मान्य असल्याबाबत मक्तेदाराची स्वाक्षरी मोजमाप पुस्तकावर नाही तसेच नियम 13 ते 15 नुसार लेखा शाखेने मोजमाप पुस्तकात लाल शाईने कर्णरेषा मारून रद्द केलेले नाहीत

7.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. नगरो-2015/प्र. क्र. 64/नवि-33 दि. 27/5/2016 मधील मुद्दा क्र. 7 नुसार निधी वितरीत झाल्यापासून तीन महिन्यात निविदा अंतिम करून कार्यादेश देणे अनिवार्य आहे असे असताना सदर कामास प्रशासकीय मान्यता व निधी विनियोगासाठी मान्यता दि. 10/11/2017 रोजी प्राप्त झालेली आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका नियम क्र. 217 नुसार निविदा मंजूर झाले पासून 30 दिवसाचे आत कामाचा कार्यादेश देणे आवश्यक असताना सदर बाबत निविदा लिफाफा दि. 3/1/2018 रोजी उघडण्यात आला असताना कार्यादेश दि. 17/12/2018 रोजी देण्यात आला आहे. त्यामुळे अनियमितता झाली आहे. सदर विलंबाबाबत साधार खुलासा करण्यात यावा

8.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 139 अन्वये नमुना क्र. 62 मध्ये काम पूर्णत्वाचा अहवाल नस्तीसोबत दिसून येत नाही. त्यामुळे विहित मुदतीत काम पूर्ण झाल्याबद्दल खात्री होत नाही. पूर्तता सादर करण्यात यावी.

9.नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी आदेश क्र. 37 दि. 3 जानेवारी 2006 मधील परिच्छेद क्र. 29,30 व 31 अन्वये रु. 1 लाखांवरील विकासकामांचे माहितीफलक साईटवर कंत्राटदराने स्वखर्चाने लावावयाचे असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही

10.महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग मॅन्युअल मधील नियम 132 ते 135 अन्वये तांत्रिक मान्यतेपूर्वी / अगोदर प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना सदर कामाकरिता तांत्रिक मान्यता 25/5/2016 रोजी तांत्रिक मान्यता घेणेत आलेली असून दिनांक 10/11/2017 रोजी प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

11.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र. 62,145, 256 नुसार नमुना नं. 13 प्राप्त देयकांची नोंदवही विहित नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. तशी नोंदवही न ठेवल्याने दुबार देयके अदा झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

12.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र. 131 व 132 नुसार नुसार मूळ अंदाजपत्रकात मंजुरी प्राधिकारी यांच्या मान्यतेशिवाय कोणतेही फेरबदल करण्यात येऊ नयेत. कामाचे संकल्पचित्र व आराखड्यात बदल करण्यात येऊ नयेत, तसेच मूळ अंदाजपत्रकात 10 टक्के पेक्षा जास्त बदल असल्यास सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. असे नमूद आहे. तसेच B1 निविदा फॉर्म मधील अट क्र. 38 अन्वये अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे काम होणे आवश्यक आहे. कामातील एका बाबीमध्ये झालेली बचत दुस-या बाबीवर वापरू नये तसेच एखाद्या बाबीतील तरतूदीमध्ये 25% पेक्षा जास्त वाढ होत असेल किंवा खर्चात 5000/- पेक्षा जादा वाढ होत असल्यास त्या कामास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची निरीक्षण टिपणीद्वारे पूर्वमान्यता घेवूनच काम करणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही झालेली नाही.

| अ.क्र. | तपशिल | तरतूद परिमाण | प्रत्यक्ष काम | वाढ/ घट | दर | वाढीव कामासाठी अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बाब क्र. 1 Excavation for foundation | 1317.5 CuM | 2484.68 | 1167.18 | 123.2 | 143796.57 |
| 2 | बाब क्र. 2 Providing dry trap rubble soling | 142.5 CuM | 298.62 | 156.12 | 918.5 | 143396.22 |
| 3 | बाब क्र. 4 P/L in situ RCC M15 | 47.5CuM | 159.11 | 111.61 | 5632 | 628587.52 |
| 4 | बाब क्र. 5 P/L in situ RCC M25 | 270 CuM | 637.89 | 367.89 | 6561.50 | 2413910.23 |
| | एकूण | | | | | 3329690.54 |

उपरोक्त बाबींचे अवलोकन केले असता अंदाजपत्रकीय तरतूद व प्रत्यक्षात झालेले काम यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. त्यामुळे नगरपरिषदेने वास्तववादी अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर बाबत सुधारित अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही. साधार खुलासा करण्यात यावा. अन्यथा जादा अदा रक्कम वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दर्शवावी.

13.तांत्रिक मान्यता आदेशामध्ये कामाच्या विविध बाबींसाठी घेतलेल्या दरांबाबत दरपृथ्थकरण तक्ता सोबत जोडलेला नाही. त्यामुळे तांत्रिक मान्यता आदेशातील दर्शविलेले दर योग्य असल्याबात खात्री होत नाही. कामाच्या त्रयस्थ लेखापरीक्षण अहवालात नमूद केल्याप्रमाणे कॉंक्रीट बाबींसाठी स्काडाप्रणालीप्रमाणे दर अंदाजपत्रकात नमूद करण्यात आले आहेत. तथापि स्काडाप्रणालीचा वापर कॉंक्रीट बाबींसाठी करण्यात आला नसल्याचे नमूद आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांचे परिपत्रक दि. 21/8/2014 नुसार कॉंक्रीटचा दर प्रतीघनमीटर र.रु. 111/- ने कमी करावा असे नमूद आहे. त्यानुसार सदर कामामध्ये वापरण्यात आलेले 797/- घमी कॉंक्रीट बाबींसाठी प्रती घमी रक्कम रु. 111/- दराने होणारी रक्कम रु. 88467/- संबंधितांकडून वसूल करून भरणा केल्याची पूर्तता दर्शवावी.

उपरोक्त बाबींच्या पुर्ततेस्तव रक्कम रु. 274505/- लेखापरीक्षणास अंतिम अमान्य करण्यात येत आहेत.

DATSPUM8301 (Ref No : 21, Hmm No : 108)

## 28 प्रभाग क्रमांक 7 पेठ मल्हार जेल शेजारील ओडा ते हरी मिस्तरी गारेज ते खंडोबा माळ पाईप ड्रेनकरणे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 700.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020-21 व 2021 च्या लेखापरीक्षण वर्षात सातारा नगरपरिषदकडील प्रभाग क्रमांक 7 पेठ मल्हार जेल शेजारील ओडा ते हरी मिस्तरी गारेज ते खंडोबा माळ पाईप ड्रेनकरणे नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष 2020-21 व 2021 मध्ये सदर कामावरती झालेला खर्च

प्रमाणाक क्रमांक 99 दिनांक 2.05.2019 रक्कम रुपये - 2993043

प्रमाणाक क्रमांक 125 दिनांक 30.05.2020 रक्कम रुपये - 473823

एकूण खर्च - 3466866

मक्तेदार : श्री रफिक मोहम्मद शेख

मोजमाप पुस्तिका : 126 पान क्रमांक 07-12

मोजमाप पुस्तिका : 107 पान क्रमांक 47-49

1. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे

मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत वरील रकमेच्या 0.1 टक्के मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. घेतलेले मुद्रांक शुल्क 3800 रुपये घेणे आवश्यक मुद्रांक शुल्क 4500. सदर कामाचा कार्यकरारानुसार कमी वसूल मुद्रांक शुल्क 700 वसुल करुन शासनास भरणा केलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

2. सदर कामासाठी 4750875 अनुदान जिल्हा अधिकारी कार्यालय सातारा क्र/साशा/नपा/सातारा न प दलितव/852 सातारा दिनांक 17.0.32018 अन्वये पाप्त झालेले आहे मात्र सदर कामावर 3466866 एवढा खर्च झालेला आहे. बाकी शिल्लक अखर्चित अनुदान 1284009 शासनाला परत केल्याची पूर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

DATMSSM6801 (Ref No : 24, Hmm No : 104)

## 29 पेठ सदरबझार 442 नगरपरिषद कर्मचारी चाळ दुरुस्त करणे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 11291.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020-21 व 2021 च्या लेखापरीक्षण वर्षात सातारा नगरपरिषदकडील पेठ सदरबझार 442 नगरपरिषद कर्मचारी चाळ दुरुस्त करणे नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष 2020-21 व 2021 मध्ये सदर कामावरती झालेला खर्च

प्रमाणाक क्रमांक 2120 दिनांक 30.03.2019 रक्कम रुपये - 1604514

प्रमाणाक क्रमांक 491 दिनांक 27.08.2021 रक्कम रुपये - 473556

एकूण खर्च - 2078070

मक्तेदार : श्री धनंजय दिनकर कदम

मोजमाप पुस्तिका : 106 पान क्रमांक 20-22 आणि 43-44

1. सदर कामामधून 1% प्रमाणे विमा ची रक्कम कपात करून घेणे आवश्यक असताना 0.5% प्रमाणे विम्याची रक्कम कपात करण्यात आलेली आहे.

कपात केलेली रक्कम - 10391

कपात करणे आवश्यक - 20782

कमी वसूल विमा रक्कम - 10391

सदर रक्कम वसूल करून लेखापारीक्षनास पूर्तता सादर करावी.

2. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत वरील रकमेच्या 0.1 टक्के मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. घेतलेले मुद्रांक शुल्क 500 रुपये घेणे आवश्यक मुद्रांक शुल्क 1400. सदर कामाचा कार्यकरारानुसार कमी वसूल मुद्रांक शुल्क 900 वसुल करुन शासनास भरणा केलेबाबत पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

3.सादर कामाच्या कार्यारंभ आदेशान्वये कामाचा पूर्णत्वाचा कालावधी 90 दिवस इतका होता कार्यारंभ आदेश दिनांक 23/04/2018 मात्र सदर कामाच्या पूर्णत्वाच्या दाखल्याची तपासणी केली असता सदर काम 31/12/2020 रोजी पूर्ण झाल्याचे आढळून येते. सबब काम पूर्ण करण्यास 29 महिने व 8 दिवस इतका विलंब झालेला आहे. कामाच्या पूर्णत्वासाठी मुदतवाढ दिल्याचे नस्तीवरून आढळून आले नाही. झालेल्या विलंबाबाबत विलंब दंड आकारण्यात आलेला नाही तसेच करारनाम्यात दंडाची तरतूद केलेली नाही.

DATMSSM6801 (Ref No : 25, Hmm No : 103)

## 30 अमृत कार्यक्रमांतर्गत सातारा शहराची भुयारी गटर योजना कामाबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 1739845.00/- |

| | |
|---|---|
| कामाचे नांव | अमृत कार्यक्रमांतर्गत सातारा शहराची भुयारी गटर योजना कामाबाबत. |
| प्रशासकीय मान्यता | 1. सह सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक अमृत 2017/प्र.क्र. 429/नवि-33 दिनांक 25/8/2017<br>2. सह सचिव नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्रमांक अमृत 2022/प्र.क्र.24/नवि-33 दिनांक 28/4/2022 |
| तांत्रिक मान्यता | मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पत्र क्रमांक मु.अ. (पुणे) तांशा-3/सातारा/भुगयो/1704 दिनांक 18/9/2017 तांत्रिक मान्यता रक्कम रुपये 518012600/- |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 502924892/- सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये 433843000/- |

| | |
|---|---|
| मक्तेदाराचे नांव | मे. एस. ए. इन्फ्रा |
| निविदा रक्कम | रक्कम रुये 459900691/- |
| कामाची मुदत | 18 महिने (मार्च 2023 अखेर मुदतवाढ दिली आहे.) |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र./सानप/साबां/45 दिनांक 21/4/2018 |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | 103 पान क्रमांक 3 ते 48<br>114 पान क्रमांक 2 ते 8<br>115 पान क्रमांक 17 ते 42<br>113 पान क्रमांक 1 ते 21 व 23 ते 38<br>114 पान क्रमांक 2 ते 40 व 63<br>137 पान क्रमांक 3 ते 58 |

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | |
|---|---|---|---|
| 1133 | 27/11/2019 | 8707772 | पहिले व धावते देयक |
| 1584 | 16/01/2019 | 12514821 | दुसरे व धावते देयक |
| 212 | 06/07/2019 | 599107 | तिसरे व धावते देयक |
| 212 | 06/07/2019 | 11372191 | चौथे व धावते देयक |
| 452 | 07/11/2019 | 6281769 | पाचवे व धावते देयक |
| 622 | 20/08/2019 | 7537355 | सहावे व धावते देयक |
| 928 | 14/10/2019 | 6955154 | सातवे व धावते देयक |
| 962 | 11/02/2019 | 13727767 | आठवे व धावते देयक |
| 1049 | 14/11/2019 | 14989291 | नववे व धावते देयक |

| | | | |
|---|---|---|---|
| 1630 | 13/03/2020 | 7702739 | दहावे व धावते देयक |
| - | - | 7539413 | अकरावे व धावते देयक |
| - | - | 14460011 | बारावे व धावते देयक |
| - | - | 14998310 | तेरावे व धावते देयक |
| 343 | 24/06/2021 | 12935709 | चौदावे व धावते देयक |
| 932 | 21/10/2021 | 3281534 | |
| - | - | 17092024 | |
| - | - | 9709531 | |
| एकुण | | 170404498 | |

नगरपरिषद साताराचे सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरिक्षण कालावधीत अमृत कार्यक्रमांतर्गत सातारा शहराची भुयारी गटर योजना अंदाजपत्रकीय रकमेच्या 50 टक्के केंद्र सरकार, 25 टक्के राज्य सरकार व 25 टक्के नगरपालिका स्वनिधीतून करेण्यात येणार असून सदर कामामध्ये मलशुध्दीकरण केंद्र, रायझिंग मेन, गुरुत्व मलवाहिनी, मलउपसा केंद्र, यांत्रिकी उपकरणे व ॲटोमेशन इत्यादी कांचा समावेश आहे. सदरचे काम 32.21 किमीचे असून पैकी 26.815 किमी एवढे काम पुर्ण झालेले आहे व 5.395 किमी काम अद्याप अपुर्ण आहे. नगरपालिकेच्या विषय क्रमांक 18 ठराव क्रमांक 24 अन्वये तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदरचे कामासाठी मार्च 2023 अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच सदर योजनेकरीता सन 2021-22 या आर्थिक वर्षापर्यंत रक्कम रुपये 170404498/- एवढा खर्च केला आहे. सदर खर्चातील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सदर कामाचे मक्तेदार एस. ए. इन्फ्रा यांचे दिनांक 30/4/2018 रोजीचे पत्रानुसार कामासाठी 800mm आरसीसी पाईपऐवजी 900mm आरसीसी पाईप वापरणेस परवानगी मिळावी यासाठी पत्र देण्यात आले आहे. त्यानुसार नगरपालिकेने ठेकेदार यांना तसे करण्याबाबत कोणतीही परवानगी दिलेली नसतांना ठेकेदार यांनी डिझाईनप्रमाणे व मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे काम न करतां 82.50 मीटर लांबीचे कुपर कॉलनी सर्विस रोड सदरबझार येथे प90mm आरसीसी पाईप टाकल्या असल्याबाबतचे पत्र नगरपालिकेने दिनांक 27/9/2018 रोजी नगरपालिकेस देण्यात आले आहे. म्हणजेच डिझाईनप्रमाणे व मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे काम होत नसल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 120 नुसार नमुना नंबर 12 मध्ये कार्यादेश नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत वरील रकमेच्या 0.1 टक्के मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. सदर कामाच्या करारनाम्यासाठी रक्कम रुपये 423100/- च्या मुद्रांकावर करारनामा केला आहे. उर्वरीत करारन्याची रक्कम रुपये 35800/- वसुलात आणून पुर्तता दाखवावी.

4. सदरचे कामाचे निविदा नस्ती, करारनामा व कार्यारंभ आदेशाचे लेखापरीक्षण केले असता कामास कार्यादेश दिनांक 21/4/2018 रोजी देण्यात आला असून कामाची मुदत 18 महिन्यांची असतांना परंतू सदरचे काम लेखापरीक्षण कालावधीपर्यंत अपुर्ण स्थितीत असलेचे उपलब्ध अभिलेख्यांवरुन दिसून येते. कामास विलंब झालेने योजनेचा उद्देश विहित कालावधीत सफल झालेला नाही.

5. कामाच्या करारनाम्यातील अट क्रमांक 8 नुसार कामाचा विमा Directorate of Insurance, Maharashtra State, Mumbai यांचेकडूनच उतरविला जावा असे नमुद असतांना मक्तेदार यांनी तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच विमा संचालक, मुंबई महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्रमांक प्रविली/2303/सहविमा/जिप/संकिर्ण/अभियांत्रिकी एफ-2 दिनांक 27/6/2003 व विमा संचालनालयाचे पत्र दिनांक 16/11/2007 नुसार कामावरील मजूरांचा व कामाच्या रकमेच्या 1 टक्के विमा उतरविणे आवश्यक आहे. त्यामुळे विमा रक्कम रुपये 1704045/- वसुलात आणून पुर्तता होणे आवश्यक आहे.

6. प्रशासकीय मान्यता आदेशातील अट क्रमांक 4.6 प्रमाणे प्रशासकीय मंजुरी आदेश दिल्यापासून 45 दिवांत कामाचे आदेश देण्यात यावेत असे नमुद आहे. परंतू याप्रमाणे कार्यवाही न करता कामाचे आदेश 7 महिने उशिराने देण्यात आले आहेत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

7. प्रशासकीय मान्यता आदेशातील अट क्रमांक 4.18 नुसार प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जागा प्रत्यक्ष ताब्यात असल्याची खातरजमा कार्ादेश देण्यापूर्वी करण्यात यावी असे नमुद असतांना नगरपालिकेने जागा उपलब्ध करुन दिले नाही. त्याबाबत मक्तेदार यांनी नगरपालिकेस दिलेल्या पत्रांवरुन दिसून येते. सदरबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

8. कामावर देखरेख ठेवण्यासाठी सुशिक्षित व्यवस्थापक/इंजिनीयर ची नेमणुक मक्तेदाराने करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे कामाचा दर्जा योग्य असल्याबाबतची खात्री करता आली नाही.

9. कामाचे इस्टीमेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे असल्याचे संबंधित कर्मचारी यांनी सांगितले तथापि सदरचे इस्टीमेट नगरपालिकेकडे असणे आवश्यकता असून लेखापरीक्षणासाठी सादर केले नाही.

10. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण उपबंध अधिनियम 1952 मधील तरतुदीनुसार नगरपरिषदेने ठेकेदारास रक्कम प्रदान करताना कामावर नेमलेल्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी च्या भविष्य निर्वाह निधी

अंशदान व वर्गणीची रक्कम कपात करुन संबंधितांच्या खात्यावरुन भविष्य निर्वाह निधी संघटणेकडे वर्ग केली असल्याबाबत चलने आढळली नाहीत.

उपरोक्त पुर्ततेस्तव 1739845/- वसुलपात्र करणेत येत आहे.

DLFABKM8801 (Ref No : 27, Hmm No : 115)

## 31 गणेशोत्सव सन 2020 करीता मोठया गणेशमुर्ती विसर्जनासाठी तलावास प्लास्टीक लायनर बसविणे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 4397.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

| | |
|---|---|
| कामाचे नांव | गणेशोत्सव सन 2020 करीता मोठया गणेशमुर्ती विसर्जनासाठी तलावास प्लास्टीक लायनर बसविणे. |
| प्रशासकीय मान्यता | मे. स्थायी समिती ठराव क्रमांक 95 दिनांक 14/8/2020 |
| तांत्रिक मान्यता | मा. नगरअभियंता जा.क्र. 625 दिनांक 3/3/2020 |
| निविदा प्रसिध्दीचे माध्यम | ई निविदा |
| निविदा प्रसिध्दीचा दिनांक | दिनांक 8/8/2020 दैनिक पुढारी |
| प्राप्त निविदांची संख्या | तीन |
| मान्य निविदा दर धारकाचे नांव | श्री. रोहित प्रकाश जाधव, अंदाजपत्रकीय दराने |
| दर मंजुरीचा ठराव करारपत्र | मा. नगराध्यक्ष यांची मान्यता |
| करारपत्र | दिनांक 26/8/2020 |
| कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.सारान/सीबी/305 दिनांक 26/8/2020 |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | दिनांक 20/10/2020 |
| कामाचा कालावधी | 60 दिवस |

| | |
|---|---|
| मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक | 128/08 |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 1515-27/3/2021 रक्कम रुपये 585227/- |

नगरपरिषद साताराचे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील कामांची नस्ती तपासली असतां, गणेशोत्सव सन 2020 करीता मोठया गणेशमुर्ती विसर्जनासाठी तलावास प्लास्टीक लायनर बसविणे या कामावर रक्कम रुपये 565227/- एवढा खर्च केला असून सदर खर्चातील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. सदर कामासाठी दिनांक 8/8/2020 दैनिक पुढारी रोजी दैनिक पुढारी या दैनिकात ई निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदेस प्रतिसाद म्हणून 1) तुकाराम सुतार, 2) रजिया कन्स्ट्रक्शन, 3) सुजित भोसले यांनी कामाचे निविदा अर्ज भरला. निविदा भरणेसाठी दिनांक 13/1/2020 ते 27/1/2020 अशी तारीख ठरविण्यात आली असून निविदा उघडण्याची तारीख 30/1/2020 अशी ठरविण्यात आली होती. असे असतांना निविदा दिनांक 25/2/2020 रोजी उघडण्यात आल्याचे नस्तीवरुन दिसून येते. सबब सदर अनियमिततेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण2011/प्र.क्र.467 रस्ते दिनांक 21/11/2011 मधील 1ड अनुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबर खरेदीसाठी चलनाची स्थळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे परंतू तशी कार्यवाही केलेली नाही.

3. सदरचे काम SSR 2019-20 प्रमाणे करण्यात आले असून नस्तीसोबत RATE ANALYSIS CHART जोडलेला नाही. पुर्तता होणे आवश्यक आहे.

4. नगरपरिषद संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 3/1/2006 मधील बाब क्रमांक 6 नुसार तसेच महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगरी लेखासंहीता नियम 135 नुसार नगर परिषदेने कार्यान्वित केलेल्या सर्व कामांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करण्यात येईल आणि अशी कामे महिन्यातून किमान एकदा नगर अभियंता तपासतील परंतु नगर परिषद सातारा ने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विकास/1098/प्र.क्र.2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र.प्रविनिय/2300/सहविमा/सांबावि/संकिर्ण/फ दिनांक 20/4/2001 व सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक 0.5 टक्के दराने विमा रक्कम कपात केली आहू. उर्वरीत रक्कम रुपये 4397/- वसुल करुन पुर्तता दाखवावी.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 4397/- वसुलपात्र करणेत येत आहे.

## 32 भिमाबाई आंबेडकर हौसिंग सोसायटी येथे पाणी टाकी बांधणे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 4141.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

| | |
|---|---|
| कामाचे नांव | भिमाबाई आंबेडकर हौसिंग सोसायटी येथे पाणी टाकी बांधणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रक्कम रुपये 874200/- |
| तांत्रिक मान्यता | जा.क्र.नगरअभियंता 553 दिनांक 6/1/2020 |
| निविदा प्रसिध्दीचे माध्यम | दैनिक लोकमत |
| निविदा प्रसिध्दीचा दिनांक | दिनांक 12/6/2020 |
| प्राप्त निविदांची संख्या | तीन |
| मान्य निविदा दर धारकाचे नांव | रोहन राजेंद्र मुतकर |
| दर मंजुरीचा ठराव करारपत्र | स्थायी समिती ठराव क्रमांक 80 दिनांक 14/8/2020 |
| करारपत्र | दिनांक 28/9/2020 |
| कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.सानप/साबां-411 दिनांक 28/9/2020 |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | 5/7/2021 |
| कामाचा कालावधी | 100 दिवस |
| मोजमाप पुस्तिका क्रमांक व पृष्ठ क्रमांक | 110 पान क्रमांक 34 ते 37 |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 456-22/10/2021 रक्कम रुपये 828262/- पहिले व अंतिम देयक |

नगरपरिषद साताराचे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील कामांची नस्ती तपासली असतां, भिमाबाई आंबेडकर हौसिंग सोसायटी येथे पाणी टाकी बांधणे या कामावर रक्कम रुपये 828262/- एवढा खर्च केला असून सदर खर्चातील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत

आहेत.

1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/ प्र.क्र. 109/ राप 2 दिनांक 22.03.2005 व परिपत्रक दिनांक 22.03.2009 प्रमाणे बांधकामावर वापरणेत येणारे साहित्य वापरापुर्वी त्यातील 50% साहित्याची चाचणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळाच्या प्रयोगशाळेतुन करुन घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

2. महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहिता 2013 नियम 138 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर नगरपंचायत लेखापाल व लेखापरीक्षक यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच रक्कम अदा केलेल्या प्रमाणक क्रमांक व दिनांक नमूद नाही. महाराष्ट्र शासन बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 नियम 15 नुसार मोजलेली मापे मान्य असल्याबाबत मक्तेदाराची स्वाक्षरी मोजमाप पुस्तकावर नाही तसेच नियम 13 ते 15 नुसार लेखा शाखेने मोजमाप पुस्तकात लाल शाईने कर्णरेषा मारून रद्द केलेले नाहीत.

वास्तविक उपरोक्त प्रकरणामध्ये प्रदानासंबधी अदाकर्त्याने ज्यास असे देयक अदा करण्यात आले आहे याबाबत पुढील महिन्याच्या 10 तारखेपर्यंत अथवा पुढील देयक अदा करण्यापूर्वी आगोदर आदा केलेल्या देयकाच्या **GSTR1 FILE** केल्याचे प्रमाणपत्र /कर दायित्व अदा केलेबाबात प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक असताना उपरोक्त कामासंबधी असे प्रमाणपत्र मक्तेदार यांचेकडून घेण्यात आले नाही.म्हणून मक्तेदार यांनी सादर केलेला GST नंबर ची gst.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर पडताळणी केली असताना सन 2020-21 व 2021-22 या वर्षात मक्तेदार यांनी नगरपरीषदेला पुरविलेल्या सेवेबद्दल मासिक विहित मुदतीमध्ये GSTR1 फिल करणे आवशयक असताना तशी कार्यवाही केलेबाबत दिसून येत नाही.त्यामुळे सदर कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे दिसून येते.

7) शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.एफ.एफ.सी.2020/प्र.क्र.56/नवि-4 दिनांक 28/10/2020 मधील परिच्छेद 3 अन्वये अ वर्ग नगरपरीषदेच्या बाबतीत 30 लाखापर्यंत प्रशाकीय मान्यता देण्याचे अधिकार मुख्यधिकारी यांना असतील व त्यापेक्षा जास्त रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार हे जिल्हाधीकार्यांना असतील असे नमूद असताना उपरोक्त खर्चापैकी सन 2021-22 मध्ये नगरपरिषदेने 15 वा वित्त आयोग निधीतून प्रमाणक क्रमांक 272,1078,1809 अन्वये एकूण रक्कम रुपये 2020288/-इतका खर्च केलेला आहे परंतु सदर खर्च करणेपूर्वी सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी घेणे आवशयक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

8) करारनामा अट क्रमांक 46(6) अन्वये GPS यंत्रणा बंद असल्यास 200/- रुपये प्रती दिवस प्रती घंटागाडी याप्रमाणे दंड आकारण्यात येईल अशी तरतूद केली आहे परंतु उपरोक्त खर्चाची मासिक देयके तपासली असता त्याबरोबर एप्रिल 2020, मे 2020 ,जून 2020 ,जून 2021 या महिन्याचे GPS रिपोर्ट उपलब्ध झाले नाही सबब सदरचे रिपोर्ट उपलब्ध करून पूर्तता सादर करावी अन्यथा करारनामा अटी मध्ये नमूद तरतुदीप्रमाणे दंडाची परिगणणा करून रक्कम संबधितांकडून वसूल करून पूर्तता सादर करावी.

9) घंटागाडी दैनदिन चालविणे संबधित करारनामा अट क्रमांक 32 अनव्ये कचरा संकलन काम वर्षाचे 365 दिवस करणे आवशयक आहेकोणत्याही प्रसंगी अडचण झाल्यास दुसऱ्या बदली ड्रायवरची व्यवस्था करणे आवश्यक आहे एव्हडे करून देखील खाडा झाला तर दंड आकारण्यात येईल असे असताना घंटागाडी चे जी.पी.एस.रिपोर्ट बघता काही दिवशी काही किंवा एखाद्या घंटागाडीचे रनिंग झालेले नाही अथवा कमी झाले आहे.असे असताना संबधित मक्तेदाराने पर्यायी व्यवस्था केली असल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.जर तशी पर्यायी व्यवस्था केली नसेल तर मग करारनामाप्रमाणे दंडाची रक्कम का वसूल करण्यात आली नाही याबाबत खुलासा करावा.

10) कामगार विमा शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विकास/1088/प्रक्र2889/शासन दिनांक 19/8/1998 विमा संचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. प्रविनि/2300/सहविमा/बां/संकीर्ण/सांबा दिनांक 20/4/2001 व समक्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्यास आदेशान्वये कंत्राटी कामाच्या एक टक्क्याप्रमाणे विमा उतरविणेसाठी कपात करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे. उपरोक्त मक्तेदार यांनी कामगारांचा विमा काढला असले बाबतची फक्त जुलै 2020 ,ऑगष्ट2020 ,सप्टेंबर 2020 ,नोव्हेंबर 2020, नोव्हेंबर 2021, या महिन्यांचे कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाली उर्वरित महिन्यांचे विमा भरले बाबतचे अभिलेखे उपलब्ध करून पूर्तता सादर करावी अन्यथा देयकाच्या मूळ रकमेच्या 01% रक्कम वसूल करून पूर्तता सादर करावी.

11) करारनामा अट क्रमांक 47 अनव्ये कर्मचार्यांच्या EPFeEPF चलन सादर केलेनंतर चालू महिन्याचे मक्तेदार यांना देयक आदा केले जाईल व EPF ACT नुसार आवश्यक प्रती कर्मचारी EPF भरणेची जबाबदारी मक्तेदारची राहील अन्यथा मक्तेदार यांच्या देयकातून सदरची रक्कम कपात करण्यात येईल असे असताना EPFeEPF एप्रिल 2020, मे 2020, सप्टेंबर 2020, नोव्हेंबर2020 एप्रिल 2021, मे 2021, जून 2021 ,जुलै2021, सप्टेंबर 2021, ऑक्टोंबर 2021,

डिसेंबर 2021, महिन्यांचे चलन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.सदरची चलने उपलब्ध करून पूर्तता सादर करावी.अन्यथा EPF ACTEPF ACT नुसार आवशयक ती प्रती कर्मचारी रक्कम संबधितांकडून वसूल करून पूर्तता सादर करावी.

12) कचरा संकलनानंतर त्याची वाहतूक घंटागाडीमधून कचरा डेपो पर्यंत कोणत्या वाहनांद्वारे करणेत आला याबाबत कंत्राटदाराचा/ स्वच्छता निरीक्षकाचा घनकचरा व्यवस्थापन प्रणाली 2000 चे प्रकरण क्रमांक 23.2.2.4(a),(b) नुसार परिपूर्ण अहवाल तसेच त्या वाहनांनी कोणत्या ठिकाणाहून कचरा संकलित केला व तो कचरा कोठे खाली केला याबाबत कंत्राटदाराचा/ स्वच्छता निरीक्षकाचा परिपूर्ण अहवाल व कचरा डेपोवर प्राप्त झालेनंतर किती वाहनांमधून कचरा आला, एका वाहनाच्या किती फेऱ्या झाल्या, त्यावरील वाहनचालकाचे नाव, कोणत्या मार्गावरील वाहन होते, त्या वाहनामधून किती टन कचरा डेपोवर खाली करणेत आला ई. बाबतचा डेपो Manager याचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

उपरोक्त 01 ते 12 मध्ये नमूद बाबींची पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DLFSGJM9401 (Ref No : 17, Hmm No : 64)

## 43 प्रभाग क्र. 1 ते 15 मधील दैनंदिन घरोघरी जाऊन कचरा संकलन करून सोनगाव कचरा डेपो येथे पोहोच करणे कामाबाबत.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 3945143.00/- |

नगरपरिषद सातारा ने सन 2020-21 ते 2021-22 या कालावधीत नगरपरिषद मालकीच्या 30 घंटागाडी मार्फत सर्व निवासी व बिननिवासी मिळकती मधील घनकचरा घरोघरी जाऊन संकलन करून सोनगाव कचरा डेपो येथे पोहोच करणे यासाठी घंटागाडी साठी चालक,कामगार, इंधन पुरविणे व गाड्यांची वार्षिक देखभाल दुरुस्ती,आवशयक तेव्हडे ट्रॅक्टर ट्रॉली पुरविणे या कामासाठी प्रभाग क्र. 01 ते 05 ,प्रभाग क्र. 06 ते 10, व प्रभाग क्र. 11 ते 15 अशा तीन वेगवेगळ्या निविदा प्रसिध्द करून सर्वात कमी दर असलेल्या भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना तीन स्वतंत्र कार्यादेश देण्यात आलेलेल आहे सदर बाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | प्रभाग क्र. 01 ते 05 -6695805/-<br>प्रभाग क्र. 06 ते 10- 6595547/-<br>प्रभाग क्र. 11 ते 15- 6595547/- |

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | जिल्हाधिकारी कार्यालयाकडील पत्र- क्र.साशा/नपा/(14 वा वि.आ.प्र.मा घ.व्य.सातारा न.प)19-2020, सातारा दि.13/03/2020 |
| तांत्रिक मान्यता | महाराष्ट्र जी.प्रा.जल व्यवस्थापन विभाग -<br>जा.क्र.चि.शा./तां.म./2092/2019 दिनांक-16/09/2019<br>जा.क्र.चि.शा./तां.म./2092/2019 दिनांक-16/09/2019<br>3) जा.क्र.चि.शा./तां.म./2092/2019 दिनांक-16/09/2019 |
| निविदा प्रसिद्धी | ई निविदा |
| निविदा मंजुर<br>(वार्षिक) | प्रभाग क्र. 1 ते 05 -5586979/-<br>प्रभाग क्र. 06 ते 10- 5538940/-<br>प्रभाग क्र. 11 ते 15- 5538940/- |
| मंजुर निविदा धारकाचे नांव | भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे |
| मुळ कामाचे आदेश | प्रभाग क्र. 1 ते 05 - जा.क्र.सानपा/आरोग्य/369 दिनांक-23/03/2020<br>प्रभाग क्र. 06 ते 10 -जा.क्र.सानपा/आरोग्य/370 दिनांक-23/03/2020<br>प्रभाग क्र. 11 ते 15-जा.क्र.सानपा/आरोग्य/371 दिनांक-23/03/2020 |
| खर्च | |

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|
| 103 | 28/05/2020 | 1518775 | 25/03/2020 ते 24/04/2020 |
| 402 | 12/08/2020 | 1539536 | 25/04/2020 ते 24/05/2020 |
| 402 | 12/08/2020 | 1539572 | 25/05/2020 ते 24/06/2020 |
| 615 | 25/09/2020 | 1539554 | 25/06/2020 ते 24/07/2020 |

| | | | |
|---|---|---|---|
| 653 | 05/10/2020 | 1539554 | 25/07/2020 ते 24/08/2020 |
| 793 | 24/10/2020 | 1539554 | 25/08/2020 ते 24/09/2020 |
| 959 | 13/11/2020 | 1539554 | 25/09/2020 ते 24/10/2020 |
| 1084 | 24/12/2020 | 1539554 | 25/10/2020 ते 24/11/2020 |
| 1257 | 01/02/2021 | 1539554 | 25/11/2020 ते 24/12/2020 |
| 1400 | 25/02/2021 | 1539554 | 25/12/2020 ते 24/01/2021 |
| 1400 | 25/02/2021 | 1539554 | 25/01/2021 ते 24/02/2021 |
| 87 | 26/04/2021 | 1539554 | 25/02/2021 ते 24/03/2021 |
| 273 | 10/06/2021 | 1539554 | 25/03/2021 ते 24/04/2021 |
| 298 | 17/06/2021 | 1539554 | 25/04/2021 ते 24/05/2021 |
| 571 | 13/08/2021 | 1539554 | 25/05/2021 ते 24/06/2021 |
| 726 | 09/09/2021 | 1539554 | 25/06/2021 ते 24/07/2021 |
| 845 | 04/10/2021 | 1539554 | 25/07/2021 ते 24/08/2021 |
| 982 | 27/10/2021 | 1539554 | 25/08/2021 ते 24/09/2021 |
| 1077 | 03/11/2021 | 1539554 | 25/09/2021 ते 24/10/2021 |
| 1420 | 20/01/2022 | 1539554 | 25/10/2021 ते 24/11/2021 |
| 1513 | 15/02/2022 | 1539554 | 25/11/2021 ते 24/12/2021 |
| 1655 | -- | 1539554 | 25/12/2021 ते 24/01/2021 |
| | एकूण | 33849409 | |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 36 मधील परिच्छेद क्रमांक 18 प्रमाणे कामाची विभागणी करुन कामे करण्यास प्रतिबंध केला असताना देखील प्रभाग क्रमांक 1 ते 20 च्या कचरा संकलन साठी चार वेगवेगळया निविदा प्रसिध्द करून नगरपरिषदेने एकाच कामाचे विभाजन केलेले दिसून येते सदर बाब नियमबाह्य आहे.

2) स्थायी आदेश क्रमांक 36 मध्ये नमूद मुद्दा 09 नुसार प्रथम तांत्रिक मंजुरी, प्रशासकीय मंजुरी घेतले नंतरच निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना उपरोक्त कामासाठी 14 वा वित्त आयोग निधीतून खर्च करणेसंबधी दिनांक दि.13/03/2020 अन्वये प्रशाकीय मान्यता मिळाली परंतु नगरपरीषदेणे त्यापूर्वीच त्यापूर्वीच निविदा पक्रिया राबवली आहे सदर बाब नियमबाह्य आहे.

3) उपरोक्त नमूद प्रमाणे भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे त्यांना कार्यादेश दिनांक 23/03/2020 अन्वये दिनांक 31/03/2021 अखेर काम करणेबाबत आदेश देणेत आला होता.तसेच त्यांना मुदतवाढ देऊन माहे जानेवारी 2022 अखेर रक्कम अदा करणेत आली आहे. परंतु महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मध्ये कोणतीही तरतूद नसताना मुदतवाढ देणेत आलेली आहे.तसेच नंतरचे कार्यादेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

4) उपरोक्त कामासाठी घेतलेली तांत्रिक मान्यता दिनांक-16/09/2019 पासून एक वर्षापर्यंत वैध असतना त्यानंतर सन 2021-22 मध्ये खर्च करताना तांत्रिक मान्यता न घेता नियमबाह्य खर्च झालेला दिसून येतो.सदर बाबत साधार खुलासा करावा.

5) नव्याने करारनामा न केल्याने शासनाचे मुद्रांक शुल्क रकमेचे नुकसान झालेले आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 आर्टिकल 63 मध्ये दिनांक 20 एप्रिल 2015 नुसार कंत्राटात मांडलेली रक्कम किंवा मूल्य दहा लाख रुपयापेक्षा कमी असल्यास रक्कम रुपये 500/- चे मुद्रांक शुल्क तसेच दहा लाख रुपयापेक्षा जादा असल्यास रक्कम रुपये 500/- अधिक दहा लाख रुपयाच्या वरील रकमेवर 0.1% यानुसार सदर कामाकरिता सन 2021-22 साठी रक्कम रुपये 16200/- इतक्या रकमेच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झाली नाही त्यामुळे 16200/- इतके मुद्रांकाचे नुकसान झालेले आहे. तरी कमी रक्कम रुपये 16200/- वसूल करून शासनाकडे भरणे आवश्यक आहे.

6) निविदा प्रसिद्धी नोटीस मधील अट क्रमांक 7 मध्ये नमूद असले प्रमाणे निविदा सादर करताना भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र ,सन 2018-19 आयकर भरलेचे प्रमाणपत्र ,अनुभव दाखले सादर करणे आवश्यक होते.परंतु उपरोक्त मंजूर निविदाधारक भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांनी सादर केलेले कागदपत्रे तपासली असता सदर निविदेसोबत सादर केलेले कागदपत्रे हि भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे या संस्थेच्या भागीदार असलेल्या श्रीमती शिल्पा संदीप कुलकर्णी यांच्या वैक्तिक मालकीच्या बालाजी अर्थमूवर्स लॅन्ड डेव्हलपर्स या संस्थेची जोडण्यात आली आहे.तसेच जून 2019 मध्ये भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे या संस्थेची स्थापना झालेमुळे सन 2018-19 आयकर

भरलेचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याचे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र जोडले आहे.त्याचबरोबर नस्ती सोबत दिनांक 04/01/2020 रोजीचे भविष्य निर्वाह निधी चे प्रमाणपत्र जोडले आहे वास्तविक निविदा भरण्याची अंतिम मुदत दिनांक 16/12/2019 असताना दिनांक 04/01/2020 रोजीचे म्हणजे निविदा मुदत संपलेनंतर प्राप्त झालेले प्रमाणपत्र जोडले आहे. अशा प्रकारे तांत्रिक लिफाफा मध्ये संबधित संस्थेचे आवश्यक कागदपत्रे नसताना देखील तात्रिक लिफाफा मंजूर करून आर्थिक लिफाफा उघडण्यात आला आहे.त्यामुळे सदरच्या कामातील निविदा पक्रीयेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली दिसून येते.

7) भारत सरकार, वित्त मंत्रालय अधिसूचना क्रमांक 12/2017-केंद्रीय कर(दर) दिनांक 28/06/2017 अन्वये संविधांच्या अनुच्छेद 243W मध्ये नमूद नगरपरिषदेकडे सोपविलेल्या कार्याशी संबधित सेवा ( काम करार किंवा कोणत्याही वस्तूच्या पुरवठ्यासह इतर संमिश्र पुरवठा वगळता) प्रदान केली असल्यास अशा सेवेवर GST लागू नाही असे नमूद केले आहे.तसेच अनुच्छेद 243W मध्ये घनकचरा व्यवस्थापन या कामाचा समावेश होत असल्याने उपरोक्त कामामध्ये GST लागू नसताना संबधित मक्तेदार यांना सन 2020-21 व 2021-22 या आर्थिक वर्षात मूळ रकमेवर 12% GST दर खालिल प्रमाणे आदा केलेला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | 12% प्रमाणे होणारी GST रक्कम | 2% देयकातून कपात केलेली टी.डी.एस. रक्कम | 10% मक्तेदार यांना आदा GST रक्कम |
|---|---|---|---|---|
| 103 | 28/05/2020 | 162725 | 30375 | 132350 |
| 402 | 12/08/2020 | 164950 | 30790 | 134160 |
| 402 | 12/08/2020 | 164954 | 30791 | 134163 |
| 615 | 25/09/2020 | 164952 | 30791 | 134161 |
| 653 | 05/10/2020 | 164952 | 30791 | 134161 |
| 793 | 24/10/2020 | 164952 | 30791 | 134161 |
| 959 | 13/11/2020 | 164952 | 30791 | 134161 |
| 1084 | 24/12/2020 | 164952 | 30791 | 134161 |
| 1257 | 01/02/2021 | 164952 | 30791 | 134161 |
| 1400 | 25/02/2021 | 164952 | 30791 | 134161 |
| **1400** | **25/02/2021** | 164952 | 30791 | 134161 |
| 87 | 26/04/2021 | 164952 | 30791 | 134161 |
| 277 | 10/06/2021 | 164952 | 30791 | 134161 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 298 | 17/06/2021 | 164952 | 30791 | 134161 |
| 571 | 13/08/2021 | 164952 | 30791 | 134161 |
| 726 | 09/09/2021 | 164952 | 30791 | 134161 |
| 845 | 04/10/2021 | 164952 | 30791 | 134161 |
| 982 | 27/10/2021 | 164952 | 30791 | 134161 |
| 1077 | - | 164952 | 30791 | 134161 |
| 1420 | 20/01/2022 | 164952 | 30791 | 134161 |
| 1513 | 15/02/2022 | 164952 | 30791 | 134161 |
| 1655 | -- | 164952 | 30791 | 134161 |
| | एकूण | 3626717 | 676985 | 2949732 |

उपरोक्त प्रमाणे संबधित मक्तेदार यांना प्रतेक महिन्याच्या बिलात प्रदान झालेली 10% GST रक्कम रुपये 2949732/- व 2% देयकातून कपात केलेली टी.डी.एस. रक्कम जी शासनखाती संबधित मक्तेदार यांच्या GST नंबरवर रक्कम रुपये 676985/- भरणा केली आहे. तसेच संबधित मक्तेदार यांना उपरोक्त सदर कामासाठी gst लागू नसलेने सदरच्या टी.डी.एस. रकमेचा परतावा मिळाल्याची शक्यता नाकारता येत नाही.संबधित मक्तेदार यांना सदर टी.डी.एस. रकमेचा परतावा मिळाला नसला तरी शासनाकडून सदरच्या रकमेचा नगरपरिषदेने परतावा मिळविणे आवश्यक आहे कारण ज्या कारणासाठी अनुदान प्राप्त झाले ते त्याच बाबीवर खर्च करणे आवशयक आहे अन्यथा योजनेचा उद्देश साध्य होणार नाही. सबब उपरोक्त नियमबाह्य प्रदान झालेली एकूण रक्कम रुपये 3626717/- बाबत योग्य ती कार्यवाही करून ती वसुलात आणून अथवा परतावा मिळवून संबधित निधीमध्ये जमा करण्यात यावी.

वास्तविक उपरोक्त प्रकरणामध्ये प्रदानासंबधी अदाकर्त्याने ज्यास असे देयक अदा करण्यात आले आहे याबाबत पुढील महिन्याच्या 10 तारखेपर्यंत अथवा पुढील देयक अदा करण्यापूर्वी आगोदर आदा केलेल्या देयकाच्या **GSTR1 FILE** केल्याचे प्रमाणपत्र /कर दायित्व अदा केलेबाबत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक असताना उपरोक्त कामासंबधी असे प्रमाणपत्र मक्तेदार यांचेकडून घेण्यात आले नाही.म्हणून मक्तेदार यांनी सादर केलेला GST नंबर ची gst.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर पडताळणी केली असताना सन 2020-21 व 2021-22 या वर्षात मक्तेदार यांनी नगरपरीषदेला पुरविलेल्या सेवेबद्दल मासिक विहित मुदतीमध्ये GSTR1 फिल करणे आवशयक असताना तशी कार्यवाही केलेबाबत दिसून येत नाही.त्यामुळे सदर कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे दिसून येते.

8) शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.एफ.एफ.सी.2020/प्र.क्र.56/नवि-4 दिनांक 28/10/2020 मधील परिच्छेद 3 अन्वये अ वर्ग नगरपरीषदेच्या बाबतीत 30 लाखापर्यंत प्रशाकीय मान्यता देण्याचे अधिकार मुख्यधिकारी यांना असतील व त्यापेक्षा जास्त रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार हे जिल्हाधीकार्यांना असतील असे

नमूद असताना उपरोक्त खर्चापैकी सन 2021-22 मध्ये नगरपरिषदेने 15 वा वित्त आयोग निधीतून प्रमाणक क्रमांक 273 ,298,842,982 अन्वये एकूण रक्कम रुपये 6158216/- इतका खर्च केलेला आहे परंतु सदर खर्च करणेपूर्वी जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही सदर बाब नियमबाह्य आहे.

9) करारनामा अट क्रमांक 46(6) अन्वये GPS यंत्रणा बंद असल्यास 200/- रुपये प्रती दिवस प्रती घंटागाडी याप्रमाणे दंड आकारण्यात येईल अशी तरतूद केली आहे परंतु उपरोक्त खर्चाची मासिक देयके तपासली असता त्याबरोबर एप्रिल 2020, मे 2020 ,जून 2020 ,जून 2021 या महिन्याचे GPS रिपोर्ट उपलब्ध झाले नाही सबब सदरचे रिपोर्ट उपलब्ध करून पूर्तता सादर करावी अन्यथा करारनामा अटी मध्ये नमूद तरतुदीप्रमाणे दंडाची परिगणणा करून रक्कम संबधितांकडून वसूल करून पूर्तता सादर करावी.

10) घंटागाडी दैनदिन चालविणे संबधित करारनामा अट क्रमांक 32 अनव्ये कचरा संकलन काम वर्षाचे 365 दिवस करणे आवशयक आहेकोणत्याही प्रसंगी अडचण झाल्यास दुसऱ्या बदली ड्रायवरची व्यवस्था करणे आवश्यक आहे एव्हडे करून देखील खाडा झाला तर दंड आकारण्यात येईल असे असताना घंटागाडी चे जी.पी.एस.रिपोर्ट बघता काही दिवशी काही किंवा एखाद्या घंटागाडीचे रनिंग झालेले नाही अथवा कमी झाले आहे.असे असताना संबधित मक्तेदाराने पर्यायी व्यवस्था केली असल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.जर तशी पर्यायी व्यवस्था केली नसेल तर मग करारनामाप्रमाणे दंडाची रक्कम का वसूल करण्यात आली नाही याबाबत खुलासा करावा.

उदाहरण दाखल खालील प्रमाणे .

| गाडी क्रमांक | दिनांक | जी.पी.एस.रिपोर्ट नुसारधावलेले कि.मी. |
|---|---|---|
| MH11-2-1B | 01/04/2021 ते 06/04/2021 | 00 |
| MH11CH7278 | 08/08/2021 ते 12/08/2021 | 00 |
| MH11-29-14B | 01/05/2021 ते 31/05/2021 | 00 |
| सर्व गाडी | 15/07/2021 ते 17/07/2021 | 00 |
| MH11CH7240 | 25/08/2021 ते 31/08/2021 | 00 |
| MH11CH7226 | 21/12/2021 ते 22/12/2021 | 00 |

11) कामगार विमा शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विकास/1088/प्रक्र2889/शासन दिनांक 19/8/1998 विमा संचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. प्रविनि/2300/सहविमा/बां/संकीर्ण/सांबा दिनांक 20/4/2001 व समक्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8 मे 2002 अन्वये वित्त विभागाच्यास आदेशान्वये कंत्राटी कामाच्या एक

टक्क्याप्रमाणे विमा उतरविणेसाठी कपात करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे. उपरोक्त मक्तेदार यांनी कामगारांचा विमा काढला असले बाबतची कोणतीही कागदपत्रे नगर पालिकेस सादर केलेली नसलेने उपरोक्त सर्व देयकामधून मूळ रकमेच्या 01% रक्कम रुपये 302226/- कपात करून घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

12) करारनामा अट क्रमांक 47 अनव्ये कर्मचार्यांच्या EPFeEPF चलन सादर केलेनंतर चालू महिन्याचे मक्तेदार यांना देयक आदा केले जाईल व EPF ACT नुसार आवश्यक प्रती कर्मचारी EPF भरणेची जबाबदारी मक्तेदारची राहील अन्यथा मक्तेदार यांच्या देयकातून सदरची रक्कम कपात करण्यात येईल असे असताना EPFeEPF चलन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.सदरची चलने उपलब्ध करून पूर्तता सादर करावी.अन्यथा EPF ACT नुसार आवशयक ती प्रती कर्मचारी रक्कम संबधितांकडून वसूल करून पूर्तता सादर करावी.

13) कचरा संकलनानंतर त्याची वाहतूक घंटागाडीमधून कचरा डेपो पर्यंत कोणत्या वाहनांद्वारे करणेत आला याबाबत कंत्राटदाराचा/ स्वच्छता निरीक्षकाचा घनकचरा व्यवस्थापन प्रणाली 2000 चे प्रकरण क्रमांक 23.2.2.4(a),(b) नुसार परिपूर्ण अहवाल तसेच त्या वाहनांनी कोणत्या ठिकाणाहून कचरा संकलित केला व तो कचरा कोठे खाली केला याबाबत कंत्राटदाराचा/ स्वच्छता निरीक्षकाचा परिपूर्ण अहवाल व कचरा डेपोवर प्राप्त झालेनंतर किती वाहनांमधून कचरा आला, एका वाहनाच्या किती फेऱ्या झाल्या, त्यावरील वाहनचालकाचे नाव, कोणत्या मार्गावरील वाहन होते, त्या वाहनामधून किती टन कचरा डेपोवर खाली करणेत आला ई. बाबतचा डेपो Manager याचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

उपरोक्त 01 ते 13 मध्ये नमूद बाबींची पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DLFSGJM9401 (Ref No : 18, Hmm No : 65)

## 44 स्वच्छ महाराष्ट्र अभियानंतर्गत देण्यात आलेल्या शौचालय अनुदानाबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : | 6000.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणात नगरपरिषदकडील स्वच्छ महाराष्ट्र अभियानंतर्गत देण्यात आलेले शौचालय अनुदान प्रमाणके तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत :-

१.शा.नि.नगर विकास विभाग क्र.स्वभाअ २०१५/प्र.क्र.23 /नवि/34 दि.१५ मे २०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान मुदत कालावधी २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत होता. तरी अनुदानाचा वापर सन 2020-21 मध्ये करण्यात आला आहे.

२. .शा.नि.नगर विकास विभाग क्र.स्वभाअ २०१५/प्र.क्र.23 /नवि/34 दि.१५ मे २०१५ मधील 3.3 अ) 6) नुसार सन २०११ च्या जनगणनेमधील उघडयावर शौचालयास जात असलेल्या कुटुंबांची आकडेवारी किंवा यासंदर्भातील अलीकडील सर्वेक्षणात उपलब्ध असलेली आकडेवारी विचारात घेवून घरो घरी जावून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां मार्फत सर्वेक्षण करून या सर्वेक्षणातील माहिती सार्वजनिक डोमेनवर उपलब्ध करण्यात यावी. सर्वेक्षणातील या माहिती संदर्भात प्राप्त झालेले सर्व दावे व हरकती यांचा पारदर्शक पध्दतीने विचार करावा. या सर्वेक्षणातील माहिती वेळोवेळी सुधारित करण्यात यावी तरी अशी कार्यवाही केलेली आढळून येत नाही.

३. शासन परिपत्रक क्र.राअरा कार्यान्वियन सूचना / /१५-१६ /दि.२७ जुलै २०१५ ३.१ स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्थापन करण्यात यावा अशी तरतूद असताना तसे केलेचे दिसून येत नाही.

४.

| प्रमाणक.क्र. | दिनांक | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| ५९४ | 21/09/2020 | ICICI,शौचालय अनुदान | ४८००० |

सदर च्या प्रमाणकान्वये शौचालय अनुदान ८ व्यक्तींना प्रती ६००० प्रमाणे दुसरा हप्ता अदा करण्यात आला आहे. त्याबाबत बँक स्क्रोल शी पडताळणी केली असता दिनांक 23/09/2020 रोजी सुरेश गायकवाड यांना दुबार हप्ता अदा करण्यात आल्याचे दिसून येते.

DATNRCF9301 (Ref No : 32, Hmm No : 77)

## 45 पाणी पुरवठा विभागासाठी ब्लिचींग पावडर वॲलम (तुरटी) खरेदीतील अनियमितते बाबत

**योजना** :  **लेखाशीर्ष** : 00 **वसुलपात्र** : 31341.00/-

**निधी** : नगर परिषद स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

नगरपरिषद सातारा येथील सन 2020- व 2021-2022 वित्तीय वर्षातील अॅलम (तुरटी) व ब्लिचींगची नस्ती तपासली असता खालील प्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे. त्यावरील उणिवांबाबत खालीलप्रमाणे पुढील प्रमाणे.

निविदेचा तपशिल पुढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 59 दिनांक 27/5/2015 |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 00 |

| | |
|---|---|
| तांत्रिक मान्यता | उपलब्ध नाही |
| निविदी उघडाल्याचा दिनांक | 23.7.2018 |
| पुरवठादार | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस पळशी स्टेशन ता.कोरेगांव ,जि.सातारा. |
| करारनामा | मुद्रांक शुल्क रु.500 |
| ठेका कालावधी | वार्षिक |

.

| प्र.क./दिनांक | रक्कम | आयकर | जी.एस.टी | सुरक्षा अनामत | निव्वळ र.रु. | | पुरवठादार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 611/24.9.2020 | 187500 | 3750 | 3750 | 9375 | 170625 | ॲलम (तुरटी) | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 626.10.2020 | 390000 | 7800 | 7800 | 19500 | 354900 | ॲलम (तुरटी) | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 97/27.4.2021 | 187500 | 3178 | 3178 | 7945 | 173199 | ॲलम (तुरटी) | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 383/1.7.2021 | 187500 | 3178 | 3178 | 9375 | 171769 | ॲलम (तुरटी) | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 858/4.10.2021 | 187500 | 3178 | 3178 | 7945 | 173199 | ॲलम (तुरटी) | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 1054/1.11.2021 | 281250 | 5625 | 5625 | 14063 | 255937 | ॲलम (तुरटी) | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 1383/13.1.2022 | 187500 | 3178 | 3178 | 7945 | 173199 | ॲलम (तुरटी) | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 1740/17.3.2022 | 318600 | 5400 | 5400 | 13500 | 294300 | ॲलम (तुरटी) | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 590/13.8.2021 | 195000 | 3900 | 3900 | 9750 | 177450/- | ब्लिचींग पावडर | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 487/3.8.2021 | 195000 | 3305 | 3305 | 9750 | 178640 | ब्लिचींग पावडर | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 662/6.10.2020 | 354900 | 7800 | 7800 | 19500 | 354900 | ब्लिचींग पावडर | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 1626/31.3.2021 | 390000 | 6610 | 6610 | 16525 | 360225 | ब्लिचींग पावडर | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| 1855/31.3.2021 | 488000 | 8271 | 8271 | 20678 | 450780 | ब्लिचींग पावडर | श्री.गुरुदत्त एंटरप्रायजेस |
| | 3550250/- | | | | | | |

खालील प्रमानकान्वये आयकर,जी.एस.टी व सुरक्षा अनामत कमी कपात केलेली आहे.

| प.क्र./दिनांक | आयकर,जी.एस.टी व सुरक्षा अनामत कपात करणे योग्य रक्कम | कपात करण्यात आलेली रक्कम | कमी कपात रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 97/27.4.2021 | 9375/- | 7945/- | 1430/- |
| 383/1.7.2021 | 16875/- | 15731/- | 1144/- |
| 487/3.8.2021 | 17550/- | 16360/- | 1190/- |
| 858/04.10.2021 | 16875/- | 14301/- | 2574/- |
| 1383/13.1.2022 | 16875/- | 14301/- | 2574/- |
| 1626/31.3.2021 | 35100/- | 29745/- | 5355/- |
| 1740/17.3.2022 | 28674/- | 24300/- | 4374/- |
| 1855/30.3.2022 | 43920/- | 37220/- | 6700/- |
| | वसुलपात्र रक्कम रुपये | | 28341/- |

सदर खर्चाबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदवण्यात येत आहे.

1.उपरोक्त देयके तपासली असता देयकातुन 2टक्के आयकर व जीएसटीची रक्कम कपात करणेची आहे.तसेच सानप/भांडार/ 129/ दि.10.10.2018 अन्वये सुरक्षा अनामत 7 टक्कयापैकी 5टक्के सुरक्षा अनामत देयकातुन वसुल करणेची आहे.तथापि नगरपालीकेने याबाबत कार्यवाही न करताच देयके अदा केलेली आहेत.याबाबत महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार नियम 147 नुसार लेखा विभागाने बिलांची तपासणी न करताच देयके मंजुर करण्यात येवुन रक्कम अदा करण्यात आल्याने नियमबाहयता झालेली आहे.तरी उपरोक्त र.रु.28341/- वसुलात आणुन शासन निधीत भरणा करावी.

2.महाराष्ट्र शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार क्र.भाखंस-201/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.01/12/2016 नुसार ई-निविदा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच मंजूर करण्यात आलेले दर हे बाजारभावाशी तुलना केली असता योग्य असलेबाबत दर मंजूर करणा-या प्राधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. मंजूर करण्यात आलेले दर हे बाजारभावाशी तुलना केली असता योग्य असलेबाबत दर मंजूर करणा-या प्राधिका-याने प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे मंजूर करण्यात आलेले दर वाजवी असल्याबाबत लेखापरीक्षाची खात्री पटत नाही.

3.दरपत्रकाची प्रसिध्दी दैनिक पुढारीमध्ये करण्यात आली आहे. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पीयुबी-1000/प्र.क्र.73/2000/34 दिनांक 1 मे 2001 व शासन शुध्दीपत्रक दिनांक 8 ऑगस्ट 2001 नुसार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देताना जिल्हा माहिती अधिकारी यांचे मार्फत जाहिरात वितरीत करुन प्रकाशित करणे आवश्यक असताना जिल्हा माहिती अधिकारी यांचे मार्फत जाहिरात वितरीत केल्याचे दिसून आले नाही.
4.नगरपरिषद प्रशासन संचालनालय निविदा मागविणे स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 अन्वये परिशिष्ट अ.क्र. 23 नुसार फेर आदेश मुळ कार्यादेशातील कालावधीनंतर सहा महिन्याच्या कालावधीपेक्षा जास्त नाही अशा कालावधीकरीता फेर आदेश देऊ शकते तसेच शासन निर्णय भांखस/2014/प्र.क्र.82/भागIII/उद्योग-4 दिनांक 1 डिसेंबर 2016 अन्वये 3.3.2 पुन:प्रत्यायी आदेश सुरुवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्यापुर्वी आवश्यक राहील. परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.तथापि नगरपरिषदेने सन 2018-2019 पासुन नव्याने ई निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक असतांनाही त्याप्रमाणे कार्यवाही न करता मुदतीनंतर देखील जुन्याच मक्तेदारांना पुरवठा आदेश देण्याचे प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे.

5.ठराव क्रमांक 1021 दिनांक 11.9.2018 नुसार सदरची निविदा सन 2019-20 या वर्षाकरिता असल्याने त्यानुसार करारनामा केला आहे. तथापी निविदेची मुदत संपल्यानंतर देखील उपरोक्त पुरवठादारांना पुढे पुरवठा आदेश सुरु ठेवला आहे.मुळ मक्त्याची मुदत संपल्याने नव्याने करारनामा करणे आवश्यक होते तथापी करारनामा न केल्याने मक्तेदार जबाबदारीपासुन मुक्त राहिला आहे.तसेच मुद्रांकपत्र शुल्क रककम रुपये 3000/- शासन निधीचे नुकसान झाले आहे.

6.नगरपरिषद सातारा पाणी पुरवठा विभाग अंतर्गत तुरटी खरेदी बाबत व ब्लीचिंग पावडर खरेदीबाबत अनुक्रमे

न.प. सर्व. सा. सभा ठराव क्र. 1021 दि.11/09/2018 नुसार मंजुरी प्रदान करणेत आली असून दि.23/07/2018 रोजी ई- निविदा प्रसिद्ध करून तुरटी खरेदीबाबत ४ निविदाकारांपैकी व ब्लीचिंग पावडर खरेदीबाबत ४ निविदाकारांपैकी श्री गुरूदत्त एंटरप्रायजेस पळशी सातारा यांचे न्यूनतम दर तुरटी प्रति किलो रुपये 18.75 व ब्लीचिंग पावडर दर प्रति किलो रुपये 39/- इतके निश्चित करणेत आले आहेत. तथापी उद्योग उर्जा व कामगार विभाग कडील शा.नि.क्र.भाखस.-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.1 डिसेंबर 2016 चे प्र.क्र. 3.1.2.1 चे नुसार वस्तू खरेदी पूर्व किंमतीचा अंदाज निश्चित करणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही झालेली नाही.

7.नगरपंचायतीने आर्थिक वर्षात रक्कम रुपये 3550250/-खरेदी केलेल्या तुरटी,क्लोरीन व टीसीएलच्या परिमाणाचे वजन काटा पावत्या नाहीत. त्यामुळे प्राप्त मालाचे वजनाअभावी कमी/जादा परिमाणाबाबत भाष्य करता येत नाही. तसेच साठा नोंदवही प्रमाणित करुन घेतली नाही.

8.स्थायी निदेश क्रमांक 27 नपप्रसं/1005/विकास कामे/43/5 दिनांक 3/1/2006 नुसार साहित्याचे शासकीय प्रयोगशाळेचा चाचणी अहवाल घेण्यात आला नाही. त्यामुळे प्राप्त मालाचा गुणात्मक दर्जा योग्य असल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

9.महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 123 नुसार खरेदीस प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे, तथापि प्रशासकीय मान्यतेच्या आदेशात किती रकमेच्या खरेदीस प्रशासकीय मान्यता दिली त्या रकमेचा उल्लेख नाही. त्यामुळे निश्चित किती रकमेच्या खरेदीस मान्यता घेण्यात आली याची खात्री करता आली नाही.

उपरोक्त उप परि च्छेद 1 ते 9 ची पुर्तता करेपर्यंत खर्चाची रक्कत रुपये आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र र.रु. 28341+3000 = 31341/-

आक्षेपाधीन र.रु. -3518909/-

DATRSDF7201 (Ref No : 76, Hmm No : 14)

## 46 सातारा शहरातील पाणी पुरवठा अंतर्गत विविध ठिकाणी व्हॉल्व ऑपरेटर(घंटेवारी) करणेसाठी मजुर पुरवठा करणे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 14090.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

| | |
|---|---|
| कामाचे नाव | सातारा शहरातील पाणी पुरवठा अंतर्गत विविध ठिकाणी व्हॉल्व ऑपरेटर (घंटेवारी) करणेसाठी मजुर पुरवठा करणे |

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | 2265120/-(सन 2017-18) |
| प्रशासकीय मान्यता | जनरल कौन्सिल ठराव क्रमांक 91 दिनांक 20/06/2017 |
| तांत्रिक मान्यता | नाही |
| निविदा मंजुर दर | 2265120/- (वार्षीक दर) |
| कामाची मुदत | 365 दिवस |
| मंजुर zwj;निविदा धारकाचे नांव | श्री टी.डी.सुतार |
| पुरवठा आदेश | 387 दिनांक 28/02/2018 |
| मुदतवाढ | ठराव क्र.302 दिनांक 07/08/2018 |
| एकुण खर्च | 8156568/- |

.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल/प्रदान महिना व निधी |
|---|---|---|---|
| 79 | 26/05/2020 | 375840 | दि.26/02/2020 ते 25/03/2020 |
| 217 | 24/06/2020 | 401760 | दि.26/03/2020 ते 25/04/2020 |
| 319 | 27/07/2020 | 764640 | दि.26/04/2020 ते 23/06/2020 |
| 504 | 02/09/2020 | 388800 | दि.24/06/2020 ते 23/07/2020 |
| 659 | 06/10/2020 | 388800 | दि.24/07/2020 ते 23/08/2020 |
| 787 | 22/10/2020 | 388800 | दि.24/08/2020 ते 23/09/2020 |
| 944 | 12/11/2020 | 453600 | दि. 24/09/2020 ते 23/10/2020 |
| 1134 | 30/12/2020 | 200000 | दि.24/10/2020 ते 23/11/2020<br>रुपये 453600/- पैकी अदा रक्कम |

| | | | |
|---|---|---|---|
| 1165 | 08/01/2020 | 253600 | दि. 24/10/2020 ते 23/11/2020<br><br>रुपये 453600/- पैकी उर्वरित रक्कम |
| 1285 | 05/02/2021 | 388800 | दि. 24/11/2020 ते 23/12/2020 |
| 1387 | 22/02/2021 | 388800 | दि. 24/12/2020 ते 23/01/2021 |
| 25 | 08/04/2021 | 387072 | दि. 24/01/20211ते 23/02/2021 |
| 235 | 09/06/2021 | 492480 | दि. 24/02/2021 ते 31/03/2021 |
| 579 | 13/08/2021 | 400000 | दि. 01/05/20211ते 30/06/2021<br><br>रुपये 810014/- पैकी अदा रक्कम |
| 694 | 08/09/2021 | 410014 | दि. 01/05/20211ते 30/06/2021<br><br>रुपये 810014/- पैकी उर्वरित रक्कम |
| 734 | 15/09/2021 | 818220 | दि. 01/07/20211ते 31/08/2021 |
| 1188 | 25/11/2021 | 422993 | दि. 01/10/20211ते 31/10/2021 |
| 1336 | 05/01/2022 | 409356 | दि. 01/11/20211ते 30/11/2021 |
| 1447 | 31/01/2022 | 422993 | दि. 01/12/20211ते 31/12/2021 |
| | **एकुण** | 8156568 | |

उपरोक्त बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत

1.महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मध्ये कोणतीही तरतूद नसताना मुदतवाढ देणेत आलेली आहे मुदतवाढ देणे अत्यावश्यक असलेबाबत खुलासा आवश्यक आहे.तसेच महाराष्ट्रशासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासननिर्णय दिनांक 1/12/2016 मधील परिच्छेद 4.3.3.2 अन्वये पुन:प्रत्यायी आदेश देण्याची प्रक्रिया राबविली नसुन संबंधितांस मक्ता नियमाबाहयरित्या पुढील कालावधीकरीता चालू ठेवला आहे. तसेच सदर शासन निर्णयातील प्रकरण 4 मधील 4.4.4 मधील 1 ते 6 बबींनुसार देकारांचे योग्य व वस्तुनिष्ठ मुल्यांकन होण्याची कार्यवाही झाल्याचे आढळले नाही.सबब सदर अत्यावश्यक कामापोटी मंजुर मक्त्याकरीता नगरपरिषदेने केलेला खर्च वाजवी असल्याचे प्रमाणित होत नाही.

2.संबंधित नस्तीची पडताळणी केली असता सदर निविदांबाबत अंदाजपत्रकीय रक्कम नमुद केली आहे.तथापी ती काय आधारे निश्चीत केली याचा बोध होत नाही. सदर कामाचे अंदाजपत्रक हे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम क्रमांक 121 प्रमाणे करुन त्यास नियम क्रमांक 124 प्रमाणे तांत्रिक मान्यता घेण्यात येईल.तथापी नस्तीमधील सदर कामाकरीता मजुर पुरवठा याबाबीसाठी मजिप्रा दरसुची सन 2017-18 क्रमांक 359/36 याचा संदर्भ नोंदला आहे.तसेच याकामाकरीता मोजमाप पुस्तकामध्ये कामाची मापे नोंदवली आहेत.सबब सदरचे काम तांत्रिक स्वरुपाचे असल्याने अंदाजपत्रक करुन त्यास तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3.उपरोक्त 387 दिनांक 28/02/2018 नुसार मक्तेदाराने व्हॉल्व ऑपरेशन करीता 22 कामगार नेमून काम करणे आवश्यक असलेचे नमुद केले आहे. तसेच ठराव क्र.302 दिनांक 07/08/2018 अन्वये अतिरिक्त 8 कामगारांसह एकुण 30 कामगार 1 ते zwj;23 ठिकाणी याकरीता आवश्यक असल्याचे नोंदले आहे.मात्र सदर कामगार वेगवेगळया ठिकाणी 2,3 अथवा 1 असे नेमले आहेत.याबाबत सदर नियुक्तीची ठिकाणे व कर्मचारी संख्या योग्य असलेबाबत तांत्रिक आधार नमुद केलेला नाही.सबब सदर योजनेकरीता कामातील उपांगानुसार आवश्यक असणारे कर्मचारी व लागणारा कालावधी त्यानुसार करावे लागणारे प्रदान योग्य झाल्याचे प्रमाणीत होत नाही.

4.नगरपालिकेच्या आस्थापनेवरील पाणी पुरवठा विभागाकडे कर्मचारी असल्याचे दिसुन येते.सदर कामाच्या मक्त्याचे स्वरुप निश्चित करतांना नगरपालिकेकडील उपलब्ध कर्मचारी यांचे कामाचा भाग निश्चित करुन उर्वरीत कामासाठी मक्ता देण्याकरीता तपशिलवार अंदाजपत्रक करणे आवश्यक होते मात्र तसे न करता मक्ता दिला आहे सबब नगरपरिषद कर्मचारी कोठे कार्यरत आहेत याबाबत खुलासा आवश्यक आहे.

5.उपरोक्त प्रशासकीय मान्यता 12 महिन्याकरीता आहे.नवीन निविदा प्रक्रीया राबविण्याऐवजी जुन्या मक्तेदारास ठेका कायम ठेवला आहे. वाढीव मुदत मंजुरीच्या ठरावानुसार कार्यादेश दिल्याचे आढळले नाही.मुळ करार 12 महिन्याकरीता वैध असल्याने विहित मुल्याच्या मुद्रांकावर नवीन करारनामा करणे आवश्यक होते तो न केल्याने सन 2019-20 ,2020-21 व 2021-22 करीता रक्कम रुपये 4230/-प्रमाणे रुपये 12690/- मुद्रांक शुल्क वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.तसेच मुळ करार रुपये 1600/- या मुद्रांकपत्रावर केला आहे.तथापी सदर कामाचे वार्षीक मुल्य रुपये 3468960/- इतके होत असल्याने रुपये 3000/- मुद्रांकावर करणे आवश्यक होते.मात्र कमी मुल्यावर केल्याने रुपये 1400/- वसुल करणे आवश्यक आहे.

6.कामगार कायदा व किमान वेतन कायदा ठेकेदारांस बंधनकारक करण्यांत आलेला आहे. त्यामुळे कामगार कायदा 1970 व नियम 1971 अन्वये कामगारांना दिले जाणारे किमान वेतन , कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण उपबंध अधिनियम 1952 मधील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीची कपात, कामगार विमा याचे पालन होणे आवश्यक आहे.तसेच निविदा शर्त क्रमांक 18 ,30 व 33 मध्ये याबाबत शर्त नमुद आहे.तथापी देयकासोबत याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे जोडलेले नाहीत. सबब मक्तेदाराकडे असलेले कामगार यांना नियमित वेतन व उपरोक्त कपाती शासन निर्देशाप्रमाणे होत असल्याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

7.वास्तविक उपरोक्त निविदा प्रक्रिया मुळात सन 2018-19 करीता आहे. त्या प्रक्रियेस विलंब झाल्याने सन 2019-20 मध्ये राबविली गेली आहे.पुर्वानुभव लक्षात घेता वेळेवर निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक व शक्य असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करता जुनाच ठेका पुढे चालु ठेवल्याने निविदेप्रक्रियेतुन मिळणा-या स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही. ठराव क्र.26 दिनांक 20/07/2019 अन्वये वाढीव मुदत 28/02/2019 रोजी संपत आहे.सदर कामासाठी 2019-20 करीता ई प्रणाली माध्यमातुन वार्षीक निविदा मागविण्यास मंजुरी दिली आहे.मात्र सन 2021-22 अखेर निविदा प्रक्रीया न करता सदर मक्तेदाराकडुन कामकाज केले आहे.सदर बाब नियमबाहय असुन त्याचे प्रदान देखील नियमबाहय झाले आहे.

8.निविदा अंदाजित रककम रुपये 2265120/- इतकी आहे.करारनाम्यात देखील याच रक्कमेचा उल्लेख आहे.मंजुर निविदेचे दर रुपये 432/- प्रमाणे 22 कामगारांकरीता सन 2018-19 करीता रुपये 3468960/- असुन वाढीव 8 मजुर धरुन सदरची रक्कम रुपये 4730400/- इतकी होते.सदरच्या रक्कमा मुळ अंदाजित निविदा रक्कमेच्या अनुक्रमे 53 टक्के व 109 टक्के इतक्या अधिक होत आहेत.सदर वाढीबाबत साधार खुलासा आवश्यक आहे. तसेच उपरोक्तप्रदान हे वाढीव रुपये 4730400/- वार्षीक एवढे जादा दराने धरुन रुपये 7095600/- एवढे वरील प्रमाणे सन 2020-21 व 2021-22 मध्ये खर्च नोंदवलेल्या 18 महिन्याकरीता होणे आवश्यक होते तथापी रुपये 8156568/- एवढे केले आहे.सदरचे प्रदान निश्चीत मक्त्यापैकी कोणत्या प्रभागात व कामकाजाच्या कोणत्या स्वरुपात अधिक झाले याबाबत तपशिलासह खुलासा आवश्यक आहे.

9.कामाची निविदेनुसार कामाचे मुळ स्वरुप मजुरी स्वरुपाचे कामगार पुरविणे असे आहे.मात्र प्रदान मोजमाप पुस्तकातील मोघम नोंदी प्रमाणे केले आहे.कोणते मजुर कोठे व किती कार्यरत होते याचा तपशिल नाही.सबब निविदेनुसार कामकाज न केल्याने सदरचा मक्ता व त्याचे प्रदान नियमानुसार झाल्याचे प्रमाणीत होत नाही.तसेच प्रदान देयक व मोजमाप पुस्तकातील नोंदी पाहता ज्या त्या महिन्यात केलेल्या कामानुसार धावते देयकाचे प्रदान करणे आवश्यक आहे तथापी प्रथम धावत्या देयकापासुन कार्यरत कर्मचारी दिवस नमुद करुन त्यातुन मागील धावत्या देयकाचे प्रदान वजा करुन येणारी रक्कम प्रदान केली जाते.उदा.दिनांक 24/02/2021 ते 31/03/2021 एकुण 36 दिवसांकरीता दर रुपये 432/- प्रमाणे रुपये 466560/-एवढे प्रदान होणे आवश्यक असता वरील पध्दतीनुसार रुपये 492480/- एवढे प्रदान केले आहे.दंडाबाबत तपशिलासह कामानुसार योग्य प्रदान झाले किंवा कसे याची साधार पुर्तता सादर करावी.सबब सदर पध्दत योग्य नसल्याने ज्या त्या महिन्यातील प्रत्यक्ष कामकाजाप्रमाणे प्रदान करणे आवश्यक आहे.

10.कामाची धावती देयके अदा करताना देयकावर व मोजमाप नोंदवहीवर धावते देयक क्रमांक व अंतिम देयक असा तपशिल नमूद न केलेने देयक धावते आहे कि अंतिम हे समजुन येत नाही. तसेच अंतिम देयक अदा करताना काम पुर्ण झाल्यानंतर एकुण झालेले काम त्यापैकी केलेले मागील प्रदान उर्वरीत प्रदान यासह एकुण करावयाचे प्रदान याबाबत अदयावत नोंद केली जात नाही.सबब यापूर्वी सदर कामावर केलेल्या एकूण खर्चाचा कोणताही मेळ लागत नाही. एकाच कामाची दुबार अदाई यामुळे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत तात्काळ सुधारणा करणे

आवश्यक आहे.तसेच उपरोक्त खर्च प्रमाणकासंदर्भात मोजमाप पुस्तके नोंदी पाहता दिनांक 31/03/2021 अखेर एकुण 35 धावती देयके नोंदली आहेत.तर दिनांक 01/04/2021 पासुन प्रथम धावते देयक नोंदले आहे.सदरच्या कामाचे स्वरुप पाहता याप्रमाणे धावत्या देयकांच्या नोंदी करण्याचे प्रयोजन समजुन येत नाही.

DATMVJM7001 (Ref No : 82, Hmm No : 105)

## 47 जकातवाडी फिल्ट्रेशन प्लॅन्ट पंप हाऊस व उपळी के टी वेअर शहापुर पंप हाऊस चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : | 13767.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

| | |
|---|---|
| कामाचे नाव | जकातवाडी फिल्ट्रेशन प्लॅन्ट पंप हाऊस व उपळी के टी वेअर शहापुर पंप हाऊस चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 3008265/- (सन 2018-19) |
| प्रशासकीय मान्यता | जनरल कौन्सिल ठराव क्रमांक 305 दिनांक 07/08/2018 |
| तांत्रिक मान्यता | जा.क्र./चिशा/तांम/2073/2018 दिनांक 12/10/2018 |
| निविदा मंजुर दर | 3158377/-- (वार्षीक दर) 4.99 टक्के जादा दराने |
| कामाची मुदत | 365 दिवस |
| मंजुर zwj;निविदा धारकाचे नांव | सातारा इलेक्ट्रीकल्स |
| कामाचा आदेश | क्र.330 दिनांक 07/03/2019 |
| मुदतवाढ | नाही |
| एकुण खर्च | 6729769/- |

.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल/प्रदान महिना व निधी |
|---|---|---|---|
| 24 | 22/04/2020 | 254458 | 35 एच पी मोटर रिवायडींग |

| | | | |
|---|---|---|---|
| 219 | 24/06/2020 | 511286 | दि.07/11/2019 ते 06/01/2020 |
| 365 | 05/08/2020 | 511286 | दि.07/01/2020 ते 07/03/2020 |
| 480 | 27/08/2020 | 98350 | 200 एच पी पंप दुरूस्ती |
| 660 | 06/10/2020 | 292814 | 200 एच पी पंप दुरूस्ती |
| 1236 | 21/01/2021 | 259833 | दि.08/03/2020 ते 07/04/2020 |
| 1577 | 26/03/2021 | 400000 | दि.08/06/2020 ते 08/12/2020<br>रुपये 1508711/- पैकी अदा रक्कम |
| 28 | 08/04/2021 | 600000 | दि.08/06/2020 ते 08/12/2020<br>रुपये 1508711/- पैकी अदा रक्कम |
| 93 | 27/04/2021 | 400000 | दि.08/06/2020 ते 08/12/2020<br>रुपये 1508711/- पैकी अदा रक्कम |
| 378 | 01/07/2021 | 336387 | दि.09/12/2020 ते 08/04/2021<br>रुपये 1005808/- पैकी अदा रक्कम |
| 480 | 03/08/2021 | 416005 | दि.09/12/2020 ते 08/04/2021<br>रुपये 1005808/- पैकी अदा रक्कम |
| 874 | 08/10/2021 | 1216074 | दि.09/04/2021 ते 08/07/2021 |
| 1029 | 01/11/2021 | 754356 | दि.09/07/2021 ते 09/10/2021 |
| 1450 | 31/01/2022 | 678920 | दि.10/10/2021 ते 09/11/2021 |
| | एकुण | 6729769 | |

उपरोक्त बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मध्ये कोणतीही तरतूद नसताना

मुदतवाढ देणेत आलेली आहे मुदतवाढ देणे अत्यावश्यक असलेबाबत खुलासा आवश्यक आहे.तसेच महाराष्ट्रशासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासननिर्णय दिनांक 1/12/2016 मधील परिच्छेद 4.3.3.2 अन्वये पुन:प्रत्यायी आदेश देण्याची प्रक्रिया राबविली नसुन संबंधितांस मक्ता नियमाबाहयरित्या पुढील कालावधीकरीता चालू ठेवला आहे. तसेच सदर शासन निर्णयातील प्रकरण 4 मधील 4.4.4 मधील 1 ते 6 बबींनुसार देकारांचे योग्य व वस्तुनिष्ठ मुल्यांकन होण्याची कार्यवाही झाल्याचे आढळले नाही.सबब सदर अत्यावश्यक कामापोटी मंजुर मक्त्याकरीता नगरपरिषदेने केलेला खर्च वाजवी असल्याचे प्रमाणित होत नाही.

2.शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/35 दिनांक 8/5/2002 व शासकीय विमा निधी यांचे पत्र दिनांक 8/9/2010 अन्वये कामगारांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. सबब उपरोक्त प्र.क्र.219,480,365,660,1230 चे देयकातुन 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक असता कमी कपात अनुक्रमे रक्कम रुपये 2556/-,492/-,2556/-,1464/- व 1299/- असे एकुण रक्कम रुपये 8367/- मक्तेदार सातारा इलेक्ट्रीकल्स वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

3.नगरपालिकेच्या आस्थापनेवरील पाणी पुरवठा विभागाकडे कर्मचारी असल्याचे दिसुन येते.सदर कामाच्या मक्त्याचे स्वरुप निश्चित करतांना नगरपालिकेकडील उपलब्ध कर्मचारी यांचे कामाचा भाग निश्चित करुन उर्वरीत कामासाठी मक्ता देण्याकरीता तपशिलवार अंदाजपत्रक करणे आवश्यक होते मात्र तसे न करता मक्ता दिला आहे सबब नगरपरिषद कर्मचारी कोठे कार्यरत आहेत याबाबत खुलासा आवश्यक आहे.

4.उपरोक्त प्रशासकीय मान्यता 12 महिन्याकरीता आहे.नवीन निविदा प्रक्रीया राबविण्याऐवजी जुन्या मक्तेदारास ठेका कायम ठेवला आहे. वाढीव मुदतीस ठरावाने मंजुरी व मुदतवाढ कार्यादेश दिल्याचे आढळले नाही.मुळ करार 12 महिन्याकरीता वैध असल्याने विहित मुल्याच्या मुद्रांकावर नवीन करारनामा करणे आवश्यक होते तो न केल्याने सन 2020-21 व 2021-22 करीता रक्कम रुपये 2700/-प्रमाणे रुपये 5400/- मुद्रांक शुल्क वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.तसेच करारनामा न केल्याने मक्तेदार अटी शर्तीपासुन मुक्त राहीला आहे.

5.कामगार कायदा व किमान वेतन कायदा ठेकेदारांस बंधनकारक करण्यांत आलेला आहे. त्यामुळे कामगार कायदा 1970 व नियम 1971 अन्वये कामगारांना दिले जाणारे किमान वेतन , कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण उपबंध अधिनियम 1952 मधील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीची कपात, कामगार विमा याचे पालन होणे आवश्यक आहे.तसेच निविदा शर्त क्रमांक 18 मध्ये याबाबत शर्त नमुद आहे.तथापी देयकासोबत याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे जोडलेले नाहीत. सबब मक्तेदाराकडे असलेले कामगार यांना नियमित वेतन व उपरोक्त कपाती शासन निर्देशाप्रमाणे होत असल्याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

6.वास्तविक उपरोक्त निविदा प्रक्रिया मुळात सन 2019-20 करीता आहे. पुर्वानुभव लक्षात घेता वेळेवर निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक व शक्य असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करता जुनाच ठेका पुढे चालु ठेवल्याने निविदेप्रक्रियेतुन मिळणा-या स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही. मुदत 07/03/2020 रोजी संपत आहे..मात्र सन

2021-22 अखेर निविदा प्रक्रीया न करता सदर मक्तेदाराकडुन कामकाज केले आहे.तसेच याबाबतचे प्रदान मंजुर निविदेप्रमाणे रुपये 3158377/- या दराने उपरोक्त सन 2020-21 व 2021-22 मध्ये खर्च 24 महिन्याकरीता रुपये 6316754/- होणे आवश्यक होते तथापी रुपये 6729769/- एवढे केले आहे. सदरचे प्रदान निश्चीत मक्त्यापैकी कोणत्या प्रभागात व कामकाजाच्या कोणत्या स्वरुपात अधिक झाले याबाबत तपशिलासह खुलासा आवश्यक आहे.

7.कामाची निविदेनुसार कामाचे मुळ स्वरुप मजुरी स्वरुपाचे कामगार पुरविणे असे आहे.मात्र प्रदान मोजमाप पुस्तकातील मोघम नोंदी प्रमाणे केले आहे.कोणते मजुर कोठे व किती कार्यरत होते याचा तपशिल नाही.सबब निविदेनुसार कामकाज न केल्याने सदरचा मक्ता व त्याचे प्रदान पुर्णत: नियमबाहय झाले आहे. कामाची धावती देयके अदा करताना देयकावर व मोजमाप नोंदवहीवर धावते देयक क्रमांक व अंतिम देयक असा तपशिल नमूद न केलेने देयक धावते आहे कि अंतिम हे समजुन येत नाही. तसेच अंतिम देयक अदा करताना काम पुर्ण झाल्यानंतर एकुण झालेले काम त्यापैकी केलेले मागील प्रदान उर्वरीत प्रदान यासह एकुण करावयाचे प्रदान याबाबत अदयावत नोंद केली जात नाही.सबब यापूर्वी सदर कामावर केलेल्या एकूण खर्चाचा कोणताही मेळ लागत नाही. एकाच कामाची दुबार अदाई यामुळे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत तात्काळ सुधारणा करणे आवश्यक आहे.

8.निविदाशर्तीनुसार नगरपरिषदेने पुरविलेले साहित्य मक्तेदाराने कामासाठी उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे..मात्र सदर साहित्याच्या दर्जाबाबतचे योग्य मानकानुसार निकष नमुद केले नाहीत. मक्तेदारास पुरवलेल्यासाहित्याच्या दर्जाची तपासणी करण्याची जबाबदारी नगरपालिकेकडील तांत्रिक कर्मचारी/अधिकारी यांचेकडे सुपुर्द केलेली नाही. सबब योग्य दर्जाच्या साहित्या अभावी वारंवार दुरुस्तीची पुनरावृत्ती झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.तसेच दुरूस्तीची आवश्यकता असल्याबाबत तसेच दुरूस्ती योग्य झाल्याबाबत नियंत्रण ठेवण्याकरीता नगरपरिषदेने पर्यवेक्षक तत्सम कर्मचारी यांची नेमणुक केल्याचे आढळले नाही.

9.महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 2011 चे नियम 258 नुसार नमुना क्र. 71 मध्ये साहित्याची मागणी करण्यात येईल, असे नमुद असतांना देयकासोबत / संचिकेसोबत अशी मागणी टीपणी स्वरुपात केल्याचे दिसुन येते. त्यामुळे मागणीच्या प्रमाणात पुरवठा करण्यात आला किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

10.निविदा अटी शर्ती क्र.22 नुसार कामावरील कामगार व पर्यवेक्षक यांची नावासह यादी व कामगार कायदयानुसार आवश्यक प्रमाणपत्रे घेतल्याचे आढळले नाही.निविदेतील शर्त क्र.33 ते 44 या शर्ती प्रत्यक्ष कामकाजासंबंधी आहेत.यामध्ये के.टी.वेअर पाणी पातळी,ट्रान्सफॉर्मर ऑईल चेक व फिल्ट्रेशन करणे,फिल्टर व उपसा केंद्र येथे लॉगबुक ठेवणे,एमबीआर लेवल चेक करणे,जलशुध्दीकरण रसायने,गॅस वापरणे इत्यादी शर्ती असुन महत्वाची शर्त दरतासाला शुध्दपाण्याची तपासणी चाचणी घेऊन त्याची नोंद स्वतंत्र रजिस्टरमध्ये ठेवणे आवश्यक आहे.मात्र याप्रमाणे कोणतीही कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे आढळले नाहीत. तसेच उपरोक्त मोटार वायडींग,पंप दुरूस्ती देयके पाहता अंदाजपत्रक व निविदा यामध्ये याबाबीं करीता स्पेसिफीक तरतुद केलेली नाही.असे असता उपरोक्त मक्तेदाराने सादर केलेली देयके काय आधारे पारित केली याचा खुलासा आवश्यक आहे.

## 48 सातारा शहरातील ½ इंची ते 18 इंची व्यासाच्या वितरण नलिकेचे लिकेज काढणे व प्लंबिंग साहित्य पुरवणे

**योजना** :    **लेखाशीर्ष** : 00    **वसुलपात्र** : 6738.00/-

**निधी** : नगर परिषद स्व- निधी    **कलम** : 9ब    **अंतिम अमान्य** : 0.00/-

| | |
|---|---|
| कामाचे नाव | सातारा शहरातील frac12; इंची ते 18 इंची व्यासाच्या वितरण नलिकेचे लिकेज काढणे व प्लंबिंग साहित्य पुरवणे |
| अंदाजपत्रकीय रक्कम | नमुद नाही |
| प्रशासकीय मान्यता | जनरल कौन्सिल ठराव क्रमांक 244 दिनांक 10/04/2018 |
| तांत्रिक मान्यता | नाही |
| निविदा रक्कम मंजुर | 7447617/- |
| निविदा मंजुर दर | स्थायी समिती ठ.क्र.1296 दिनांक 13/02/2019 |
| कामाची मुदत | 12 महिने |
| मंजुर zwj;निविदा धारकाचे नांव | सुजित व्यंकटराव भोसले |
| कामाचा आदेश | 333 दिनांक 07/03/2019 |
| एकुण खर्च | 1596461/- |

.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल/प्रदान महिना व निधी |
|---|---|---|---|
| 579 | 18/09/2020 | 467172 | लिकेज काढणे |
| 858 | 05/11/2020 | 154440 | लिकेज काढणे |
| 1531 | 19/03/2021 | 199963 | लिकेज काढणे |

| | | | |
|---|---|---|---|
| 227 | 09/06/2021 | 413191 | लिकेज काढणे |
| 1026 | 01/11/2021 | 361695 | लिकेज काढणे |
| | एकुण | 1596461 | |

.

उपरोक्त बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मध्ये कोणतीही तरतूद नसताना कामाचा ठेका कायम ठेवणेत आलेला आहे मुदतवाढ आदेश दिल्याचे आढळले नाही..तसेच महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासननिर्णय दिनांक 1/12/2016 मधील परिच्छेद 4.3.3.2 अन्वये पुन:प्रत्यायी आदेश देण्याची प्रक्रिया राबविली नसतांना संबंधितांस मुदतवाढ आदेश देखील न देता मक्ता नियमाबाहयरित्या पुढील कालावधीकरीता चालू ठेवला आहे.

2.संबंधित नस्तीची पडताळणी केली असता सदर निविदांबाबत अंदाजपत्रकीय रक्कम नमुद केलेली नाही तसेच अंदाजपत्रक देखील केलेले नाही.तथापी निविदा प्रक्रीया काय आधारे राबविली याचा बोध होत नाही. सदर कामाचे अंदाजपत्रक हे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम क्रमांक 121 प्रमाणे करुन त्यास नियम क्रमांक 124 प्रमाणे तांत्रिक मान्यता घेण्यात येईल. तसेच निविदेमध्ये एकुण 1 ते 519 कामाच्या बाबी अंर्तभुत केल्या आहेत.याकरीता 27 बाबी वगळता अन्य बाबी दरसुची प्रमाणे तुलनेसाठी ग्राहय धरल्या आहेत.तसेच दरसुची पृष्ठ क्रमांक व बाब क्रमांक याचा संदर्भ निविदेमध्ये नोंदलेला आहे.सबब सदरचे काम तांत्रिक स्वरुपाचे असल्याने अंदाजपत्रक करुन त्यास तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3.शासन निर्णय, उदयोग, उर्जा व कामगार विभाग क्र.भाखंस-201/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4 दि. 01.12.2016 नुसार मंजूर करण्यात आलेले दर हे बाजारभावाशी तुलना केली असता योग्य असलेबाबत दर मंजूर करण्या-या प्राधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. मंजूर करण्यात आलेले दर हे बाजारभावाशी तुलना केली असता योग्य असलेबाबत दर मंजूर करण्या-या प्राधिका-याने प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे मंजूर करण्यात आलेले दर हे वाजवी असल्याबाबत खात्री पटत नाही. आवश्यक पूर्तता दर्शवावी.

4.शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/35 दिनांक 8/5/2002 व शासकीय विमा निधी यांचे पत्र दिनांक 8/9/2010 अन्वये कामगारांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. सबब उपरोक्त प्र.क्र.579,858,1531,227 चे देयकातुन 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक असता कमी कपात अनुक्रमे रक्कम रुपये 1611/-,772/-,1000/- व 955/- असे एकुण रक्कम रुपये 4338/- मक्तेदार यांचेकडुन वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

5.उपरोक्त प्रशासकीय मान्यता 12 महिन्याकरीता आहे.नवीन निविदा प्रक्रीया राबविण्याऐवजी जुन्या मक्तेदारास

ठेका कायम ठेवला आहे. वाढीव मुदत मंजुरीच्या ठरावानुसार कार्यादेश दिल्याचे आढळले नाही.मुळ करार 12 महिन्याकरीता वैध असुन तो रुपये 1200/- मुल्याच्या मुद्रांकावर केला आहे.सबब त्यानुसार तेवढया मुद्रांकावर नवीन करारनामा करणे आवश्यक होते तो न केल्याने सन 2020-21 व 2021-22 मधील खर्चाकरीता रक्कम रुपये 1200/- प्रमाणे रुपये 2400/- मुद्रांक शुल्क वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

6.कामगार कायदा व किमान वेतन कायदा ठेकेदारांस बंधनकारक करण्यांत आलेला आहे. त्यामुळे कामगार कायदा 1970 व नियम 1971 अन्वये कामगारांना दिले जाणारे किमान वेतन , कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण उपबंध अधिनियम 1952 मधील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीची कपात, कामगार विमा याचे पालन होणे आवश्यक आहे.तसेच करारनामा शर्त क्रमांक 24 मध्ये याबाबत शर्त नमुद आहे.तथापी देयकासोबत याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे जोडलेले नाहीत. सबब मक्तेदाराकडे असलेले कामगार यांना नियमित वेतन व उपरोक्त कपाती शासन निर्देशाप्रमाणे होत असल्याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

7.मक्तेदारास प्रदान देयके पाहता सदर लिकेज चे काम कोठे केले याचा तपशिल नाही तसेच सदरची कामे केलेच्या नोंदी योग्य असल्याबाबत पाणी पुरवठा विभागाकडील प्राधिकृत कर्मचारी, अधिकारी यांनी प्रमाणित केले नाही.याचप्रकारे अन्य महिन्यात प्रदान केले आहे. सबब मक्तेदाराने दरमहा दर्शविलेले काम व त्यापोटी केलेले प्रदान योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही. उपरोक्त देयके ही धावती देयके आहेत.नस्तीमध्ये सन 2021-22 करीता निविदा प्रक्रिया राबविण्याचे प्रस्तावित केली आहे.सबब यापुर्वीच्या निविदेच्या अंतिम देयकाचा तपशिल त्याबाबत काम पुर्णत्वाचा दाखला लेखासंहिता 2011 नियम 139 व 141 नुसार नोंदवणे आवश्यक होते.मात्र याप्रमाणे कार्यवाही केली नसलेने आधीच्या निविदेची कार्यकक्षा पुर्ण झालेचे प्रमाणीत होत नाही.यामुळे करारनाम्यातील अटी शर्तीचे पालन झाले नसल्यास नियमाप्रमाणे विलंब आकार,दंड,शास्ती इ.कार्यवाही केलेबाबत तपशिल आढळला नाही.

8.कामाची निविदेनुसार कामाचे मुळ स्वरुप लिकेज काढणे तसेच साहित्य पुरवणे व जोडणे असे आहे.मात्र प्रदान मोजमाप पुस्तकातील मोघम नोंदी प्रमाणे केले आहे.कामाची धावती देयके अदा करताना देयकावर व मोजमाप नोंदवहीवर धावते देयक क्रमांक व तसेच अंदाजपत्रकीय तरतुद त्यापैकी केलेले मागील प्रदान चालु प्रदान उर्वरीत तरतुद याबाबत अदयावत नोंद केली जात नाही.सबब यापूर्वी सदर कामावर केलेल्या एकूण खर्चाचा कोणताही मेळ लागत नाही. एकाच कामाची दुबार अदाई यामुळे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत तात्काळ सुधारणा करणे आवश्यक आहे.मोजमाप पुस्तकातील कामाबाबत निविदेमधील संबधित कामाचा अनुक्रमांक संदर्भ नोंदला नाही.उदा.उपरोक्त प्र.क्र.227 बाबत मोजमाप नोंदी पाहता एकुण 7 बाबींकरीता कामे व त्याचे प्रदान नोंदले आहे.उदा.बाब क्र.4 supplying CI collar/ socket hellip;..etc 100mm,150mm,200mm याचा निविदेतील संदर्भ क्र.अनुक्रमे 94,96,97 असा आहे.तसेच double flanged sluice valve 100mm याचा संदर्भ क्रमांक 287 आहे.मात्र मोजमाप पुस्तकात अनुक्रमे 4 व 5 असा नोंदला आहे.सबब मोजमाप पुस्तकातील मापे व त्यानुसार केलेले प्रदान योग्य असल्याचे प्रमाणीत होत नाही.

9.साहित्य मक्तेदाराने स्वत:चे वापरावयाचे आहे.मात्र सदर साहित्याच्या दर्जाबाबतचे योग्य मानकानुसार निकष नमुद केले नाहीत. मक्तेदाराने वापरावयाच्या साहित्याच्या दर्जाची तपासणी करण्याची जबाबदारी नगरपालिकेकडील तांत्रिक कर्मचारी/अधिकारी यांचेकडे सुपुर्द केलेली नाही. करारनामा अट शर्त क्रमांक 13 नुसार शासकीय प्रयोगशाळेतुन साहित्याचा चाचणी अहवाल मक्तेदाराने आणावयाचा आहे.मात्र असे चाचणी अहवाल घेतले नाहीत.सबब योग्य दर्जाच्या साहित्या अभावी वारंवार दुरुस्तीची पुनरावृत्ती झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 2011 चे नियम 258 नुसार नमुना क्र. 71 मध्ये साहित्याची मागणी करण्यात येईल मात्र याप्रमाणे कार्यवाही केलेचे आढळले नाही.

DATMVJM7001 (Ref No : 84, Hmm No : 126)

## 49 कोविड 19 मुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या अंत्यविधी साठी झालेल्या खर्चाबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 0 | **वसुलपात्र** | : | 68088.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये कोविड 19 मुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या अंतिम संस्काराकरीता सरपण पुरवणे व अंत्यविधी (दहन) करणे यासाठी 35 प्रमाणकान्वये एकुण 14724395/- इतका खर्च श्री.आर कदम,श्री व्ही जाधव व जय भवानी सप्लायर यांचेवर झाला असुन अर्धसमास पत्र क्रमांक. दि. अन्वये करण्यात आला असुन त्यामध्ये खालील उणीवा आढळुन आल्या

उपरोक्त बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.मा.जिल्हाधिकारी कार्यालय नगरपालिका प्रशासन शाखा जा.क्र.साशा/नपा/1183/2020 दिनांक 06/04/2020 अन्वये नगरपालिका नगरपंचायत क्षेत्रामध्ये कोविड संसर्गाने मृत पावलेल्या रुग्णांच्या मृतदेहाची विल्हेवाट लाबण्याबाबत 1 ते 10 सुचना दिल्या आहेत.त्यानुसार याबाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी नगरपालिकेची आहे.नस्ती पाहता सरपण पुरवठादार राजेंद्र कदम यांना दिलेले पत्र जा.क्र.सानप/आरोग्य/269/1 दिनांक 23/03/2021 अन्वये तोंडी तक्रारीनुसार समक्ष पाहणी केली असता सरपण कमी असल्याचे दिसुन आले.याबाबत समर्पक खुलासा न केल्याने उपरोक्त प्र.क्र.375 अन्वये दिनांक 15/04/2021 ते 30/04/2021 या कालावधीतील देयकातुन रुपये 422000/- इतका दंड वसुल केला आहे.तथापी उपरोक्त पत्र दिनांक 23/03/2021 चे असल्याने तत्पुर्वीच्या किती कालावधीकरीता सरपण कमी वापरले याचा उल्लेख नाही.सबब केलेला दंड योग्य असल्याचे प्रमाणीत होत नाही.

2.पुरवठादार राजेंद कदम यांनी सादर केलेल्या उपप्रमाणकाप्रमाणे देयके अदा केली आहेत.सदर उपप्रमाणकावर नमुद सरपण वापरले किंवा कसे याची पडताळणी केल्याचे आढळले नाही.यामुळे उपरोक्त पुर्ण कालावधी दरम्यान मक्तेदाराने दरपत्रकानुसार प्रति व्यक्ती 10 मण सरपण वापरले बाबत एकदाही प्रमाणीत केलेले नाही.नस्तीमधील

मा.जिल्हाधिकारी सातारा यांना काही नागरीकांनी सादर केलेले व नगरपरिषदेकडील आवक क्रमांक **** 5026 दिनांक 22/04/2021 अन्वये प्राप्त अर्जानुसार ldquo;संबंधित नागरीकांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता असे दिसुन आले की सरपण करीताचे लाकुड रायवळ असुन त्याचा बाजारभाव रुपये 250/- प्रति मण आहे.व अंत्यसंस्कार करीत असलेल्या अग्निकुंडात 7 मण लाकुड बसत असुन त्यानुसार प्रति मण रुपये 1750/- वाहतुक खर्च रुपये 50/- एकुण रुपये 1800/- प्रति मृत कोविड रुग्णाचा खर्च असुन प्रत्यक्षात 12 मण दर रुपये 300/- प्रमाणे रुपये 3600/- व वाहतुक रुपये 200/- असा रुपये 3800/- खर्च होत असुन तफावत रुपये 2000/- प्रमाणे पत्राच्या दिनांका पर्यंत 1500 अंत्यसंस्कार झाले असुन रुपये 3000000/-इतका अपहार झाला आहेrdquo;.अशा आशयाचा मजकुर नमुद आहे. सदरच्या पत्रासोबत संबंधितानी पावत्या,फोटो,इ.बाबी पुराव्यादाखल संलग्न केल्या आहेत.पत्रातील बाब प्रत्यक्ष पडताळणी ( physical verification ) बाबतची असल्याने प्राधान्याने दखलपात्र आहे विशेषत: अग्निकुंडाचे परिमाण व त्यामध्ये बसणारे लाकुड याबाबत प्रत्यक्ष प्रमाण व परिमाण पडताळणे आवश्यक होते.याबाबत साकल्याने कार्यवाही करणे आवश्यक होते.मात्र या अनुषंगाने अभिलेखे आढळले नाहीत.सदर बाब गंभीर आहे.यामुळे नाहक जादा प्रदान झाल्याचे सकृतदर्शनी दिसते.

3.मा.जिल्हाधिकारी सातारा यांनी वैकुंठ स्माशनभुमी माहुली येथील कार्यवाहक बालाजी चॅरिटेबल ट्रस्ट यांना दिलेले सन्मानपत्र क्र.पीए/जीमा/6/2022 दिनांक 13/06/2022 नुसार महामारीच्या सुरवातीपासुन त्यांनी 4510 इतके अंत्यसंस्कार केले आहेत. सन्मानपत्राच्या अनुषंगाने सदर मृत व्यक्ती संख्ये संदर्भात नागरीकांच्या उपरोक्त दिनांक 22/04/2021 अन्वये प्राप्त पत्राची नगरपरिषदेच्या अधिकारात वस्तुनिष्ठ शहानिशा केल्याचे अभिलेख आढळले नाहीत. सबब उपरोक्त जादा दर रुपये 1800/- तफावतीनुसार परिगणना केल्यास रुपये 8118000/- इतके पुरवठादार राजेंद्र कदम यांना जादा प्रदान झालेचे दिसते.याबाबत तत्कालिन बाजारभावाबाबत नगरपालिकेने तपशिल पडताळुन जादा होणारे प्रदान वसुल करणे आवश्यक आहे.तोपर्यंत सदरचे प्रदान तात्पुरते अमान्य करणेत येत आहे.तसेच या व्यतीरिक्त जयभवानी सप्लायर्स यांना उपरोक्त प्रमाणकानुसार प्रति कि.ग्रॅ.रुपये 5.50 प्रमाणे सरपण पुरवणेकरीता प्रदान केले आहे.सदरचे प्रदान घाऊकरित्या पुरवठयाबददल केले आहे.तर राजेंद्र कदम यांना प्रति मृत व्यक्ती नुसार प्रदान केले आहे.एकच बाब असताना दोन पुरवठादारांकडुन वेगवेगळया पध्दतीनुसार बिले स्विकारुन तसे प्रदान करण्याचे प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे.

4.देयके पडताळली असता पुरवठादार राजेंद्र कदम यांना दिनांक 16/09/2021 ते 30/09/2021 या कालावधीत रुपये 164285/- इतके प्रदान सरपणाकरीता केले आहे.तथापी देयकासोबत मृत व्यक्ती यादी जोडलेली नाही.या अभावी सदरचे प्रदान योग्य असल्याचे खात्री होत नाही.

5.उपरोक्त देयकापैकी काही देयकामधुन आयकर कपात केली आहे. तथापी खालील नमुद देयकातुन आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार आयकर कपात करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.सबब रक्कम रुपये 68088/- वसुल करुन शासन सदरी भरणा केल्याची पुर्तता दाखवावी.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | आवश्यक आयकर कपात रक्कम |
|---|---|---|---|
| 514 | 07/09/2020 | 155800 | 1558 |
| 515 | 07/09/2020 | 396000 | 3960 |
| 516 | 07/09/2020 | 133000 | 1330 |
| 675 | 06/10/2020 | 636000 | 6360 |
| 1290 | 05/02/2021 | 771000 | 7710 |
| 1472 | 09/03/2021 | 639000 | 6390 |
| 360 | 01/07/2021 | 456000 | 4560 |
| 428 | 16/07/2021 | 456000 | 4560 |
| 771 | 24/09/2021 | 400000 | 4000 |
| 1036 | 01/11/2021 | 1209000 | 12090 |
| 1215 | 14/12/2021 | 355000 | 3550 |
| 1615 | 25/02/2022 | 300000 | 3000 |
| 1752 | 17/03/2022 | 200000 | 2000 |
| 1795 | 17/03/2022 | 702000 | 7020 |
| | **एकुण** | | **68088** |

6.कोविड ने मृत झालेल्या व्यक्तींबाबतचे नगरपरिषदेने ठेवलेले अभिलेखे पडताळता यामध्ये कच्च्या स्वरुपाच्या नोंदवह्या ठेवल्या आहेत.यामधील नोंदी प्राधिकृत कर्मचारी/अधिकारी यांनी केल्या किंवा कसे हे समजु शकले नाही.नोंदवहयांची पृष्ठे मोजुन नोंदवही प्रमाणीत केलेली नाही.नोंदवहीतील नोंदी तसेच केलेली खाडाखोडीच्या नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत.यामुळे नोंदवहयांमधील नोंदी दिनांक 31/07/2020 ते 29/03/2022 अखेर नोंद असलेली मृत व्यक्तींची संख्या 4703 योग्य असल्याचे प्रमाणीत होत नाही.तसेच देयकांसोबतची मृत व्यक्तींची यादी प्रमाणीत केलेली नाही.मृत व्यक्तींचे मृत्यु दाखले क्रम निहाय नस्तीबध्द केलेले नाहीत.सबब यामुळे पुरवठादारास दुबार प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.याबाबत अभिलेखे अदयावत करुन पुर्तता दाखवावी.

7.उपरोक्त विकास जाधव यांना जा.क्र.112/2 दिनांक 14/08/2020 अन्वये प्रति मृतदेह अंत्यविधी रुपये 3000/- प्रमाणे कार्यादेश दिले आहेत.तथापी या कामाचे निविदा करारनामा इत्यादी अभिलेख आढळले नाहीत.प्रदान देयके पाहता दिनांक 01/11/2021 ते 30/11/2021 या दरम्यानच्या प्रदानाबाबतच्या टिपणीवरील अतिरिक्त मुख्याधिकारी यांच्या शे-यानुसार ldquo;सदर कामासाठी लाकुड व डिझेल नगरपालिका देत आहे.त्यामुळे प्रति मृत व्यक्ती दर रुपये 3000/-

जास्त वाटतो पुढील कामी निविदा काढणे आवश्यक वाटतेrdquo; असे नमुद आहे.मात्र निविदा काढल्याचे आढळले नाही.तसेच अंत्यविधी करीता श्री व्ही जाधव व त्यांचे तीन कर्मचारी यांचे करीता सदरचे दर मंजुर आहेत.तथापी त्यानुसार एकुण 4 व्यक्ती दहनासंबंधीचे कार्य करत असल्याबाबत नगरपरिषदेने पडताळणी केल्याचे आढळले नाही.सबब सदरचे दर व त्यानुसार केलेले प्रदान योग्य असल्याचे प्रमाणीत होत नाही.

8.नगरपरिषद सातारा कडील जा.क्र.सानप/आरोग्य/245 दिनांक 18/02/2021 अन्वये उपरोक्त खर्चाकरीता जिल्हा निधीतुन अंत्यविधीसाठी अनुदान मागणी केली आहे.सदर पत्रानुसार 14 वा वित्त आयोगातुन रुपये 1500000/- व जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन एकुण रुपये 3933100/- असे एकुण रुपये 5433100/- इतके अनुदान प्राप्त झाले असुन उर्वरित अनुदानाची मागणी केली आहे.तथापी याबाबत अदयावत स्थिती समजु शकली नाही.सबब याकरीता झालेले प्रदान व उर्वरित प्रदान कोणत्या निधीमधुन व किती प्रमाणात केले याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

DATMVJM7001 (Ref No : 85, Hmm No : 127)

## 50 पथविक्रेत्यांना नगरपरिषदेमार्फत कोविड संसर्ग आपत्ती कालावधीत अनुदान अदा करणे बाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 6000.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये पथविक्रेत्यांना नगरपरिषदेमार्फत कोविड संसर्ग आपत्ती कालावधीत अनुदानाचे वाटप खालील प्रमाणकान्वये करण्यात आले आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| 505 | 03/08/2021 | 1730000 | 1000 प्रमाणे पथविक्रेता अनुदान वाटप<br>1730 लाभार्थी |
| | **एकुण** | 1730000 | |

उपरोक्त बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.सदरचे प्रदान लॉकडाऊन घोषीत केल्यामुळे नागरी पथ विक्रेत्यांना व्यवसाय बंद करावे लागले सबब नगरपरिषदेने यापोटी प्रति पथ zwj;विक्रेता केवळ एकदाच रुपये 1000/- प्रमाणे नुकसान भरपाई अनुदाना करीता रुपये 2060000/- एवढी तरतुद केली आहे.यापैकी 1730 लाभार्थींना वरील प्रमाणे प्रदान केले आहे.प्रस्तावासंदर्भात आवश्यक असणारी लाभार्थी आकडेवारी यादी एन.यु.एल.एम.विभागाकडे कार्यरत व्यक्तीकडुन घेतली आहे.मात्र नगरपरिषदेकडील

प्राधिकृत कर्मचारी अधिकारी यांनी सदरची यादी प्रमाणीत केल्याचे आढळले नाही.

2.एन.यु.एल.एम.करीता पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी अंतर्गत 1729 अर्ज भरलेल्यांपैकी 169 पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण झाल्याचे नमुद आहे.याशिवाय 331 अन्य पथ विक्रेत्यांचे सर्वेक्षण झाले आहे.असे मिळुन एकुण 2060 लाभार्थी गृहित धरले आहेत.मात्र त्यापैकी 1560 पथ विक्रेते सर्वेक्षणा शिवायचे आहेत.सदरचे पथविक्रेते पात्र लाभार्थी असल्याबाबत खात्री काय आधारे केली याबाबत खुलासा आवश्यक आहे.

3.उपरोक्त प्रमाणकाप्रमाणे 1730 लाभार्थींना प्रदान केले आहे.मात्र यादी 1729 जणांची आहे.सबब जादा प्रदान रुपये 1000/- झाले आहे.तसेच 1729 लाभार्थी पैकी 1.बबन शंकर पवार 2.कृष्णाजी बाबुराव कारंडे 3.मंदा संजय चव्हाण 4.संगिता राजु वायदंडे 5.राधिका अनिल भोसले यांचे बँक खाते क्रमांक नमुद नाहीत.सबब त्यांचे खाती प्रदान झाले नसल्याचे आढळते मात्र रक्कम खर्च नोंदली आहे.सबब रुपये 6000/- वसुलपात्र आहेत.

उपरोक्त एकुण खर्चास नगरपरिषदेची मान्यता असलेची आढळले नाही.याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

DATMVJM7001 (Ref No : 86, Hmm No : 128)

## 51 पाणी पुरवठा विभागाकडील पाईपलाईन लिकेज व नगरपरिषदेच्या मालकीची बोअरींग दुरुस्तीवर झालेल्या खर्चाबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 6626.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये पाणी पुरवठा विभागाकडील पाईपलाईन लिकेज व नगरपरिषदेच्या मालकीची बोअरींग दुरुस्तीवर झालेल्या खर्चाबाबत

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| 345 | 01/07/2021 | 122554 | यतीराज एंटरप्रायजेस बोअर दुरुस्ती |
| 934 | 11/11/2020 | 503216 | श्रवण औधकर ndash; उपप्रमाणक 1 ते 6- व्हॉल्ब चेंबर फ्रेम करणे,63 एमएम पाईपलाईन करणे,पाईपलाईन व लिकेज,उपळी केटीवेअर निडल्स काढणे.90 एमएम व्यासाची पाईपलाईन टाकणे, 63 एमएम पाईपलाईन करणे |
| 1204 | 29/11/2021 | 231183 | श्रवण औधकर शहापुर निडल्स काढणे |

| | | | |
|---|---|---|---|
| 1642 | 31/03/2021 | 304637 | श्रवण औधकर लिकेज ,व्हॉल्व,पाईपलाईन टाकणे |
| | एकुण | 1161590 | |

उपरोक्त बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.संबंधित नस्तीची पडताळणी केली असता सदर निविदांबाबत अंदाजपत्रकीय रक्कम नमुद केलेली नाही तसेच अंदाजपत्रक केले आहे.तथापी सदरचे अंदाजपत्रकामध्ये दरपृथ्थकरण पत्रक जोडलेले नाही.सबब दरसुची मधील मुळ दरावर लावलेले अतिरिक्त दर व त्याची परिगणना योग्य असल्याचे खात्री करता आली नाही.

2.शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/35 दिनांक 8/5/2002 व शासकीय विमा निधी यांचे पत्र दिनांक 8/9/2010 अन्वये कामगारांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. सबब उपरोक्त प्र.क्र.345,934,1204 चे देयकातुन 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम कपात करणे आवश्यक असता कमी कपात अनुक्रमे रक्कम रुपये 613/-,1156/-,2457 असे एकुण रक्कम रुपये 4226/- मक्तेदार यांचेकडुन वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

3.उपरोक्त प्रशासकीय मान्यता 12 महिन्याकरीता आहे.नवीन निविदा प्रक्रीया राबविण्याऐवजी जुन्या मक्तेदारास ठेका कायम ठेवला आहे. वाढीव मुदत मंजुरीच्या ठरावानुसार कार्यादेश दिल्याचे आढळले नाही.मुळ करार 12 महिन्याकरीता वैध असुन तो रुपये 1200/- मुल्याच्या मुद्रांकावर केला आहे.सबब त्यानुसार तेवढया मुद्रांकावर नवीन करारनामा करणे आवश्यक होते तो न क़ेल्याने सन 2020-21 व 2021-22 करीता रक्कम रुपये 1200/-प्रमाणे रुपये 2400/- मुद्रांक शुल्क वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

4.कामगार कायदा व किमान वेतन कायदा ठेकेदारांस बंधनकारक करण्यांत आलेला आहे. त्यामुळे कामगार कायदा 1970 व नियम 1971 अन्वये कामगारांना दिले जाणारे किमान वेतन , कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण उपबंध अधिनियम 1952 मधील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीची कपात, कामगार विमा याचे पालन होणे आवश्यक आहे.तसेच करारनामा शर्त क्रमांक 24 मध्ये याबाबत शर्त नमुद आहे.तथापी देयकासोबत याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे जोडलेले नाहीत. सबब मक्तेदाराकडे असलेले कामगार यांना नियमित वेतन व उपरोक्त कपाती शासन निर्देशाप्रमाणे होत असल्याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

5.मोजमाप पुस्तकातील कामाबाबत अंदाजपत्रकातील संबधित कामाचा अनुक्रमांक संदर्भ नोंदला नाही. सदर लिकेज चे काम कोठे केले याचा तपशिल नाही तसेच सदरची कामे केलेच्या नोंदी योग्य असल्याबाबत पाणी पुरवठा विभागाकडील प्राधिकृत कर्मचारी, अधिकारी यांनी प्रमाणित केले नाही.याचप्रकारे अन्य महिन्यात प्रदान केले आहे. सबब मक्तेदाराने दरमहा दर्शविलेले काम व त्यापोटी केलेले प्रदान योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही. तसेच कामाची निविदेनुसार कामाचे मुळ स्वरुप लिकेज काढणे,व्हॉल्व बसविणे, निडल्स काढणे,पाईपलाईन करणे इ. स्वरुपाचे आहे.मात्र प्रदान मोजमाप पुस्तकातील मोघम नोंदी प्रमाणे केले आहे.कामाची धावती देयके अदा करताना देयकावर व मोजमाप नोंदवहीवर धावते देयक क्रमांक व तसेच अंदाजपत्रकीय तरतुद त्यापैकी केलेले मागील प्रदान

चालु प्रदान उर्वरीत तरतुद याबाबत अदयावत नोंद केली जात नाही.सबब यापूर्वी सदर कामावर केलेल्या एकूण खर्चाचा कोणताही मेळ लागत नाही. एकाच कामाची दुबार अदाई यामुळे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत तात्काळ सुधारणा करणे आवश्यक आहे.तसेच कामामध्ये वापरलेल्या साहित्याच्या नोंदी साठा नोंदवहीमध्ये अदयावत केल्याचे आढळले नाही.

6.साहित्य मक्तेदाराने स्वत:चे वापरावयाचे आहे.मात्र सदर साहित्याच्या दर्जाबाबतचे योग्य मानकानुसार निकष नमुद केले नाहीत. मक्तेदाराने वापरावयाच्या साहित्याच्या दर्जाची तपासणी करण्याची जबाबदारी नगरपालिकेकडील तांत्रिक कर्मचारी/अधिकारी यांचेकडे सुपुर्द केलेली नाही. करारनामा अट शर्त क्रमांक 15 नुसार शासकीय प्रयोगशाळेतुन साहित्याचा चाचणी अहवाल मक्तेदाराने आणावयाचा आहे.मात्र असे चाचणी अहवाल घेतले नाहीत.सबब योग्य दर्जाच्या साहित्या अभावी वारंवार दुरुस्तीची पुनरावृत्ती झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच लिकेज दुरूस्तीबाबत संबंधित ठिकाणच्या नागरीकांच्या तक्रारी अथवा वॉर्ड ऑफीसर,नगरसेवक यांच्या सुचना झाल्याबाबत नोंदवही ठेवलेचे आढळले नाही.सबब लिकेज व तत्सम कामाची आवश्यकता असलेची पडताळणी काय आधारे केली याचा तपशिल उपलब्ध होणे आवश्यक आहे.

7.करारनामा शर्त क्र.10 नुसार कामाच्या ठिकाणी तपशिल दर्शविणारा बोर्ड काम पुर्ण होईपर्यंत मक्तेदाराने लावणे बंधनकारक आहे.असे न केल्यास बिलातुन रुपये 2000/- कपात करण्यात येईल तसेच शर्त क्र.20 नुसार सुचनेप्रमाणे zwj; थर्ड पार्टी ऑडीट करुन घ्यावे लागेल मात्र याप्रमाणे एकदाही कार्यवाही झाल्याचे आढळले नाही.

DATVGCM7701 (Ref No : 87, Hmm No : 129)

## 52 पथदिवे देखभाल व दुरुस्ती खर्चाबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 26828.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा ने सन 2015-16 मध्ये ई निविदा प्रक्रीयेचा अवलंब करुन एल.ई.डी. दिवे खरेदीबाबतची प्रक्रीया राबविली होती. याबाबत दि. 02/04/15 रोजी दैनिक सकाळ मध्ये जाहिरात देऊन त्यानुसार ई निविदेव्दारे प्रज्वल भारत स्ट्रीट लाईट सोल्यूशन प्रा. लि. सांगली या पुरवठादारास याबाबतचा ठेका 5 वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेला होता. सन 2016-17 मध्ये करारातील अटी व शर्तीनुसार खालील तपशिलानुसार एकूण देयकाच्या 30 टक्के रक्कम अदा करण्यात आलेली आहे तसेच उर्वरित रक्कम 42 हप्त्यांमध्ये देण्याचे नमुद आहे त्यापैकी सन 2020-21 व 2021-22 मध्ये खालील प्रमाणे रक्कमा अदा करणेत आलेल्या आहेत .

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 112 | 29/05/2020 | 1771285 | डिसेंबर 2019 ते मार्च 2020 |
| 404 | 12/08/2020 | 2102720 | एप्रिल 2020 ते जुलै 2020 |
| 314 | 18/06/2021 | 1533770 | ऑगस्ट 2020 ते फेब्रुवारी 2021 |
| 627 | 24/08/2021 | 255010 | ऑगस्ट 2020 ते फेब्रुवारी 2021 |
| 1050 | 01/11/2021 | 612927 | ऑगस्ट 2020 ते फेब्रुवारी 2021 |
| 1066 | 01/11/2021 | 1565851 | मार्च 2021 ते सप्टेंबर 2021 |
| 1271 | 24/12/2021 | 87570 | मार्च 2021 ते सप्टेंबर 2021<br>उपकर |
| 1791 | 24/03/2022 | 1030337 | मार्च 2021 ते सप्टेंबर 2021 |
| | | 8959470 | |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.उपरोक्त (अ) मधील अ.क्र.1 व 2 या प्रमाणकान्वये रक्कम मक्तेदार प्रज्वल भारत एस एस प्रा लि. सांगली यांना सन 2016-17 च्या मंजुर मक्त्याप्रमाणे एल ई डी दिवे पुरवविणेकामी अदा केलेचे दिसुन येते सदर मक्तेदार यांना ठेका 6 महिने कालावधीमध्ये जुने दिवे काढुन नवीन दिवे बसवणे व 10 वर्षे देखभाल व दुरूस्ती करणे यासाठी पुरवठा आदेश देणेत आल्याचे दिसुन येते.सदरचे प्रमाणकासोबत नवीन एल.ई.डी. दिवे बसविलेचा कालावधी नमुद केलेला नाही.सदरचे दिवे 6 महिने पेक्षा अधिक कालावधीनंतर बसविले असल्यास करारनामा तसेच प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक कालावधी होत आहे. विलंबाने बसविलेल्या zwj;दिव्यांकरिता दंड आकारणीची तरतुद केलेचे आढळले नाही.तसेच शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग कडील शासन निर्णय दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील प्रकरण क्रमांक 2.13 नुसार प्रशासकीय मान्यतेची मुदत एक वर्ष कालावधीपर्यंतच ग्राह्य राहील असे नमूद आहे.सबब दरवर्षी खर्चास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे दिसुन येत नाही.

2.उपरोक्त खर्च प्रमाणकाबाबतची नस्ती तपासणी केली असता मंजुर ठेक्या व्यतिरिक्त नगरपरिषद हददीतील उर्वरित 15 स्ट्रीट लाईट बॉक्सवर एलईडी दिवे बसविणेकरिता प्रस्तावित केले आहे. केंद्रशासनादवारे प्राधिकृत केलेल्या EESL या संस्थेच्या दिनांक 03/05/2019 च्या ईमेल नुसार जुन्याच मक्तेदाराकडुन सदरचे काम करुन घ्यावे असे नमुद केले आहे.नगरपरिषदेने त्याआधारे उपरोक्त प्रज्वल भारत सांगली यांनाच वरील वाढीव एलईडी दिवे बसविण्याचा मक्ता दिलेला आहे. सदर वाढीव खर्चास ठराव क्रमांक 17 दिनांक 20/07/2019 अन्वये मंजुरी घेण्यात आली आहे.तथापी

सदरचा खर्च कोणत्या निधीतुन प्रस्तावित आहे.याबाबत तसेच याकरीता तरतुद केलेबाबत तपशिल आढळला नाही.कार्यादेशानुसार कामाची मुदत तीन महिने आहे.सदर वाढीव कामाकरिता सन 2019-20 अखेर एकुण 30 टक्के रक्कम अदा केली आहे.सन 2020-21 व 2021-22 मध्ये उर्वरित प्रदान केले आहे.तथापी काम किती पुर्ण झाले आहे व त्याचे प्रदान किती बाकी आहे.याबाबत तपशिलवार नोंद आढळली नाही.सबब अदयाप काम अपुर्ण असल्याचे दिसते.करारनाम्याप्रमाणे मुदतीत काम पुर्ण होऊन मुल्यांकना आधारे उर्वरित रक्कम अदा करणे आवश्यक आहे.

3.महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र. 108/कामगार-7अदि.17 जून 2010 अन्वये कामावरील खर्चाच्या 1% रक्कम कामगार कल्याण उपकरासाठी वसुल करणे आवश्यक असताना, वसुल केलेली नाही. सबब उपरोक्त प्र.क्र.1066,1271 व 1791 या देयकमधुन अनुक्रमे 15650/-,875/-,10303/- अशी एकुण 26828/- रक्कम वसुलपात्र ठरते.

4.करारनामा अटी शर्ती क्रमांक 4 नुसार जुन्या काढलेले दिवे मक्तेदाराने स्वखर्चाने नगरपरिषदेच्या गोडावुन मध्ये जमा करावयाचे आहेत.नस्ती पाहता जुने दिवे व साहित्य काढलेबाबत खालील प्रमाणे नोंद आहे

| अ.क्र. | तपशिल | दिनांक 14/02/2020 रोजी जमा | दिनांक 11/03/2022 रोजी जमा |
|---|---|---|---|
| 1 | 250 वॅट सोडीअम वेपर दिवे | 420 | 0 |
| 2 | 150 वॅट सोडीअम वेपर दिवे | 1581 | 0 |
| 3 | टयुब फिक्चरर्स | 932 | 100 |
| 4 | टी 5 लॅम्प | 221 | 40 |
| 5 | एल ई डी फिक्चरर्स | 0 | 50 |
| | एकुण | 3154 | 190 |

तथापि चालू स्थितीतील दिवे काढून त्याठिकाणी नवीन एलईडी दिवे बसविण्यात आले. त्याचवेळी काढण्यात आलेल्या दिव्यांच्या तसेच साहित्याच्या वापराबाबत योग्य नियोजन करणे आवश्यक असताना तशी कोणतीही कार्यवाही न करता केवळ सदर दिवे / साहित्य भांडार विभागाकडे जमा करण्यात आले व भांडार विभागाकडेही ते तसेच विनावापर पडून असलेचे दिसून आले. याबाबत यथास्थिती वापर अथवा निर्लेखन किंवा लिलावादवारे विक्री करणे आवश्यक होते.मात्र याप्रमाणे कार्यवाही न केलेने नगरपरिषद निधीचे आर्थीक नुकसान झाले आहे.

5.अटी शर्ती क्रमांक 5.1 नुसार 50 टक्के वीज बचतीसाठी फीडर पॅनेलचे अपग्रेडेशन करणे आवश्यक आहे.शर्त क्रमांक 6.b नुसार दिव्यांची प्रकाशमानता लक्समीटर ने तपासली जाईल त्याची तुलना जुन्या दिव्यांच्या प्रकाशमानतेसोबत

तसेच टेंडरमधील लक्सलेवल सोबत केली जाईल शर्त क्रमांक 6.c नुसार 95 टक्के दिवे कोणत्याही क्षणी सुरू राहिले पाहिजेत 5 टक्के पेक्षा अधिक दिवे बंद असतील तर त्याप्रमाणानुसार देयकात कपात केली जाईल तथापी सदर अटी शर्तींचे पालन झाले किंवा कसे याबाबत नोंदी आढळल्या नाहीत.तसेच नियंत्रण ठेवलेबाबतचा अहवाल अथवा ठेकेदाराने केलेले काम योग्य असलेबाबतची कागदपत्रे अथवा नोंदवही ठेवलेली नाही.तसेच करारनाम्यामध्ये स्थायी निदेश क्रमांक 36 परिशिष्ठ क (9) नुसार विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाहीची तरतुद करणे आवश्यक असता अशी तरतुद केल्याची आढळली नाही.

6.मोजमाप पुस्तकातील नोंदीनुसार धावत्या देयकांचे पुर्ण प्रदान न करता अंशत: प्रदान केले आहे.याबाबतच्या नोंदी अदयावत नसल्याने केलेल्या कामाच्या देय रक्कमेपैकी मागील प्रदान,चालु प्रदान व उर्वरित प्रदान किती आहे हे समजुन येत नाही.याबाबत मागील धावत्या देयकाच्या नोंदीचा मोजमाप पुस्तक व पृष्ठ क्रमांक संदर्भ नोंदवुन झालेले काम व केलेले प्रदान याबाबत अदयावत नोंद ठेवुन देयकांचे दुबार प्रदान होणार नाही या करीता नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

7.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 144 नुसार विद्युत पोलांची नोंद नगरपरिषदेच्या प्राधिकृत अधिका-यांच्या आद्याक्षरी निशी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 147(1) नुसार नमुना नंबर 119 मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात पुस्तक ठेवून त्यात नगरपरिषदेने बसविलेल्या विद्युत दिव्यांची संख्या दर्शविणे आवश्यक आहे.नगरपरिषद सातारा विद्युत विभागाने विद्युत साहित्याची / दुरुस्ती बाबत कोणत्या प्रभागातून किती मागणी आहे याबाबत प्रभागनिहाय मागणी प्रमाणे आस्थापित केल्याबाबत पुर्तता आवश्यक आहे.

DATVGCM7701 (Ref No : 88, Hmm No : 130)

## 53 न.प.हद्दीमध्ये हायमास्ट दिवे बसविणे,पोल बसविणे, शिफटींग करणे,न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल करणे कामातील अनियमिततेबाबत (सन 2016-17 ठेक्याप्रमाणे)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 0 | **वसुलपात्र** | : | 8294.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये विदयुत विभागाकडील नगरपरिषद हद्दीमध्ये हायमास्ट दिवे बसविणे,पोल बसविणे शिफटींग करणे,न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल करणे कामातील सन 2016-17 मध्ये मंजुर ठेक्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

| अनु.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | नगरपरिषद हददीमध्ये पोल | अंदाजपत्रकीय रक्कम - नाही |

| | | |
|---|---|---|
| | बसविणे व शिफटींग करणे | तांत्रिक मान्यता - मंजुरी घेतलेली नाही.<br>प्रशासकीय मंजुरी - ठराव क्र. 302, दिनांक 30-04-2016 टेंडर नोटीस प्रसिध्दी- सानप/विद्युत-3, दिनांक 29-02-2016 (फेर निविदा)<br>निविदाकार दोन<br>टेंडर मंजूर केलेला ठराव व दिनांक - ठराव क्र. 302, दि.30-04-2016<br>मक्तेदार - श्री. वरद विनायक इलेक्ट्रीक डेकोरेटर्स, सातारा<br>कार्यादेश क्रमांक व दिनांक - क्र. सानप/इले/88/2016, दि.10-10-2016<br>कालावधी ndash; 1 वर्ष |
| 2 | स्ट्रीट लाईट देखभाल दुरूस्ती | तांत्रिक मान्यता नाही<br>प्रशासकीय मंजुरी 1.ठराव क्र. 112 दिनांक 24/08/2017<br>निविदाकार दोन<br>मक्तेदार - श्री. वरद विनायक इलेक्ट्रीक डेकोरेटर्स, सातारा<br>कार्यादेश आवश्यकतेनुसार<br>कालावधी 3 महिने |
| 3 | न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे | तांत्रिक मान्यता - मंजुरी घेतलेली नाही.<br>प्रशासकीय मंजुरी - ठराव क्र. 302, दिनांक 30-04-2016 टेंडर नोटीस<br>प्रसिध्दी- दिनांक 19-03-2016<br>मुदतवाढ- ठराव क्रमांक 113 दि.24/08/2017<br>निविदाकार तीन<br>मक्तेदार - श्री. वरद विनायक इलेक्ट्रीक डेकोरेटर्स, सातारा<br>कार्यादेश क्रमांक व दिनांक 145,145अ,145 ब दिनांक 22/02/2018 |

| | | |
|---|---|---|
| | | कालावधी 1वर्ष |

उपरोक्त बाबींकरीता खर्च करण्यात आलेल्या प्रमाणकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र. | प्र. क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 664 (1 ते 29) | 06/10/2020 | 829359 | पोल शिफटींग व लाईन शिफटींग |
| 2 | 727 | 09/09/2021 | 789068 | लाईन शिफट करणे,पोल टाकणे इ.कामे |
| 3 | 990 (1 ते 4) | 28/10/2021 | 4343524 | वेगवेगळया ठिकाणी लाईन शिफट करणे,पोल टाकणे इ.कामे |
| | | एकुण | 5961951 | |

उपरोक्त खर्चा बाबत अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे कडील स्थायी निर्देश क्र. 36 मधील उपपरिच्छेद क्र. 23 व महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 01 डिसेंबर, 2016 सुधारित नियमपुस्तिका मधील अनु. क्र. 3.3.2 नुसार पूर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुनर्प्रत्ययी आदेश, सुरुवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्या पूर्वी देता येईल. तथापि नगरपालिकेने श्री. वरद विनायक इलेट्रिक डेकोरेटर्स, सातारा यांना स्थायी समिती सभा, ठराव क्र. 94, दि. 20-06-2017 ने मुदत वाढ दिली आहे.तसेच मुदतवाढ कालावधी नंतर देखील अदयाप सदरचे काम सुरू आहे.त्यामुळे नियमबाहयता झाली आहे.

2.संबंधित नस्तीची पडताळणी केली असता सदर निविदांबाबत अंदाजपत्रकीय रक्कम किती याचा बोध होत नाही. पोल शिफटींग व लाईन शिफटींग करणे कामाचे अंदाजपत्रक हे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम क्रमांक 121 प्रमाणे अंदाजपत्रक करुन त्यास नियम क्रमांक 124 प्रमाणे तांत्रिक मान्यता घेण्यात येईल. त्याप्रमाणे कार्यवाही न करता कामाचे अंदाजपत्रक तयार न करता काम सुरु केलेने अनियमितता झालेली आहे.

3.महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 16(1)(झ), कलम 44(1)(ग) मधील तरतुदीनुसार कंत्राटदारांचे नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणा-या संविधेमध्ये नगरपारिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा भागीदारी नसले बाबत प्रतिज्ञापत्र घेतल्याचे आढळले नाही

4.कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 (EPFO) कायदयानुसार मक्तेदार कामगारांच्या भविष्य

निर्वाह् निधीच्या रक्कमांचा भरणा करीत असलेबाबतचे अभिलेख्यांची पडताळणी होणे आवश्यक आहे.

5.नगरपरिषद हददीमध्ये पोल बसविणे व शिफटींग करणे बाबत करारनाम्यातील अट क्र. 14 नुसार सदर कामामध्ये वापरलेल्या साहित्याच्या आवश्यक नमुन्यांचा चाचणी अहवाल विदयुत निरीक्षक सातारा यांचेकडुन तपासुन घेणे आवश्यक आहे. तथापी असा साहित्या चाचणी अहवाल घेणेत आलेला नाही. तसेच अट क्रमांक 9 नुसार कामासाठी वापरणेत आलेले साहित्य महावितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयाकडुन तपासुन घेणे बंधनकारक असताना तशी तपासणी करण्यात आलेली नाही. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाची पाहणी करून मा. विद्युत निरीक्षक उद्योग व कामगार विभाग यांचेकडून करून घेवून त्यांनी दिलेला निरीक्षण अहवालाची प्रत कंपनीचे उपविभागिय कार्यालय, शाखा कार्यालय यांचेकडून सदरची लाईन चालू करून घेणेची आहे. याबाबत कार्यवाही केल्याचे आढळले नाही.

6.निविदे मध्ये वायरमन अथवा तांत्रिक किती कामगारांची आवश्यकता आहे याबाबत उल्लेख नाही तसेच ठेकेदाराचे देयक तपासता त्यामध्येही याबाबत उल्लेख नाही.तसेच ठेकेदाराकडील कामगार हे विद्युत विभागाशी सबंधित कामे असल्याने वीजतंत्री/तारतंत्री अथवा वायरमन असल्याची प्रमाणपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

7.न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल दुरूस्ती करणेबाबत मक्तेदाराने करानाम्यांत नमूद केल्याप्रमाणे स्ट्रीट लाईट देखभालीकरीता प्रत्येक महिन्यांत, कोणकोणत्या प्रभागात कोणती कामे/दुरुस्ती केली याबाबत नगरपरिषदेने नोंदी ठेऊन आढावा घेतल्याचे आढळले नाही.

8.महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र. 108/कामगार-7अदि.17 जून 2010 अन्वये कामावरील खर्चाच्या 1% रक्कम कामगार कल्याण उपकरासाठी वसुल करणे आवश्यक असताना, उपरोक्त प्रमाणक क्र.664 चे देयकामधुन उपकर रककम रुपये 8294/- वसुल केलेली नाही. सबब उपकर रक्कम वसुलपात्र ठरते.

DATVGCM7701 (Ref No : 89, Hmm No : 132)

## 54 न.प.हद्दीमध्ये हायमास्ट दिवे बसविणे,पोल बसविणे शिफटींग करणे,न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल करणे कामातील अनियमिततेबाबत (सन 2019-20 ठेक्याप्रमाणे)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 18580.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये विदयुत विभागाकडील न.प.हद्दीमध्ये हायमास्ट दिवे बसविणे,पोल बसविणे शिफटींग करणे,न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल करणे

कामाचा सन 2019-20 मध्ये मंजुर ठेक्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अनु.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | नगरपरिषद हद्दीमध्ये नवीन पोल रोवणे व शिफटींग करणे | अंदाजपत्रकीय रक्कम - नव<br>तांत्रिक मान्यता - मंजुरी घेतलेली नाही.<br>प्रशासकीय मंजुरी - ठराव क्र. 302, दिनांक 30-04-2016<br>मुदतवाढ ठराव क्र.94 दिनांक 20/06/2017<br>टेंडर नोटीस प्रसिध्दी- सानप/विद्युत-376, दिनांक 07/02/2019<br>निविदाकार तीन<br>टेंडर मंजूर केलेला ठराव व दिनांक - ठराव क्र. 12, दि.04/09/2019<br>मक्तेदार - ओम इलेक्ट्रीक , सातारा<br>कार्यादेश क्रमांक व दिनांक - क्र. सानप/इले/74 दि.18/09/2019<br>कालावधी 2019-20 |
| 2 | स्ट्रीट लाईट देखभाल दुरूस्ती | तांत्रिक मान्यता नाही<br>प्रशासकीय मंजुरी 1.ठराव क्र. 112 दिनांक 24/08/2017<br>निविदाकार तीन<br>मक्तेदार - ओम इलेक्ट्रीक , सातारा<br>कार्यादेश कार्यादेश क्रमांक व दिनांक - क्र. सानप/इले/82 दि.23/09/2019<br>कालावधी ndash; 3 महिने |
| 3 | न.पा.इमारतींचे विदयुतीकरण करणे वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे | तांत्रिक मान्यता - मंजुरी घेतलेली नाही.<br>प्रशासकीय मंजुरी - ठराव क्र. 302, दिनांक 30-04-2016 |

| | | |
|---|---|---|
| | | मुदतवाढ ठराव क्र.113 दिनांक 240/08/2017<br><br>टेंडर नोटीस प्रसिध्दी- दिनांक 07/02/2019<br><br>निविदाकार तीन<br><br>मक्तेदार - ओम इलेक्ट्रीक , सातारा<br><br>कार्यादेश क्रमांक व दिनांक 69 दिनांक 17/09/2019<br><br>कालावधी 1वर्ष |

.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 114<br><br>(1 ते 4) | 29/05/2020 | 2278995 | स्ट्रीट लाईट देखभाल |
| 495 | 27/08/2020 | 649779 | स्ट्रीट लाईट देखभाल |
| 1139<br><br>(1 ते 3) | 01/01/2021 | 1919570 | पोल शिफट व नवीन बसवणे |
| 1275<br><br>(1 ते 4) | 02/02/2021 | 2213984 | केबल,स्ट्रीट लाईट,रोषणाई |
| 1634<br><br>(1 ते 2) | 31/03/2021 | 2071261 | सोनगाव केबल,कास पॉवर सप्लाई |
| 34 | 08/04/2021 | 1110165 | एलईडी,विदयुत रोषणाई,जनरेटर दुरूस्ती |
| 117<br><br>(1 ते 3) | 28/04/2021 | 823154 | हायमास्ट,एलईडी |
| 426<br><br>(1 ते 6) | 16/07/2021 | 4617024 | हायमास्ट,पोल शिफटींग, ट्रान्सफॉर्मर शिफट |

| | | | |
|---|---|---|---|
| 1077<br>(1 ते 3) | 03/11/2021 | 2377035 | जकातवाडी,सांबरवाडी,शहापुर केबल व ट्रॉन्सफॉर्मर दुरूस्ती |
| 1598<br>(1ते4)<br>(6ते12) | 25/02/2022 | 5103995 | एलईडी,पोल शिफट,इमारत मेंटेनन्स |
| 318 | 18/06/2021 | 1354059 | पोवई नाका ग्रेड सेपरेटर केबल, हायमास्ट पोल |
| 336 | 23/06/2021 | 921287 | विदयुत पोल रोवणे |
| 1205 | 29/11/2021 | 360000 | सोनगाव केबल व मेन स्वीच |
| 1866 | 30/03/2022 | 1058030 | पोल शिफट |
| | एकुण | 26858338 | |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग कडील शासन निर्णय दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील प्रकरण क्रमांक 2.13 नुसार प्रशासकीय मान्यतेची मुदत एक वर्ष कालावधीपर्यंतच ग्राह्य राहील असे नमूद आहे.तथापी उपरोक्त मुदतवाढ ठराव दिनांक 20/06/2017 व दिनांक 24/08/2017 या ठरावानंतर उपरोक्त निविदा प्रसिध्दीस ठरावाने मान्यता घेतली असल्याबाबत अभिलेखे आढळले नाहीत.मात्र प्राप्त निविदा मधील मंजुर निविदा व दर यास स्थायी समिती सभा दिनांक 04/09/2019 अन्वये मंजुरी घेतली आहे.तथापी सदर खर्चास प्रशासकीय मान्यता घेतल्याचे दिसुन येत नाही.याबाबत खुलासा आवश्यक आहे.

2.संबंधित नस्तीची पडताळणी केली असता सदर निविदांबाबत अंदाजपत्रकीय तरतुद नमुद केलेली नाही तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक हे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम क्रमांक 121 प्रमाणे करुन त्यास नियम क्रमांक 124 प्रमाणे तांत्रिक मान्यता घेण्यात येईल.परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

3.उपरोक्त निविदा प्रसिध्दी व कामाचा करारनामा मधील अटी शर्ती नुसार कामाचा कालावधी 1 वर्ष आहे.तथापी मुदतीनंतर देखील जुन्या मक्तेदारास ठेका कायम ठेवला आहे.वास्तविक करारनामा 1 वर्षानंतर वैध राहिला नसलयाने नव्याने करारनामा करणे आवश्यक होते.सबब या प्रमाणे विहित मुल्याच्या मुद्रांकावर करारनामा न केल्याने उपरोक्त कामाचे अनुक्रम अन्वये 1. रक्कम रुपये 4500/- 2.रुपये 2000/- 3. रुपये 1500/- असे एकुण रक्कम रुपये 8000/- वसुल करुन शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

4.अटी शर्ती क्रमांक 5 नुसार वापरलेले,निघालेले बाद,जळालेले विदयुत साहित्य नगरपरिषदेच्या मालकीचे राहील अट क्र.6 नुसार विदयुत निरीक्षक व zwj;विदयुत वितरण कंपनी यांची परवानगी मक्तेदार घेईल अट क्र.9 नुसार पथदिव्यावरील लाईन एकदिवसापेक्षा जास्त व कोणताही प्रकारचा दिवा दोन दिवसापेक्षा जास्त बंद राहणार नाही.तसे आढळल्यास अनुक्रमे रुपये 50/- व 150/- प्रति दिवसास दंड आकारला जाईल असे नमुद आहे.तथापी ठेक्यातील अटी शर्तीनुसार कामकाज होत असलेबाबत नगरपरिषदेमार्फत नियंत्रण ठेवलेबाबतचा अहवाल अथवा ठेकेदाराने केलेले काम योग्य असलेबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळली नाही.

5.उपरोक्त काम क्रमांक 2 अन्वये एलईडी दिवे सोडुन इतर सर्व दिव्यांचा वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे यासाठीचे साहित्य स्टॅण्डर्ड कंपनीचे वापरणे इ.कामकाजाचा समावेश आहे. असे दिवे व साहित्य कोणत्या प्रभागात किती बसविण्यात आले याबाबतच्या नोंदी मोजमाप पुस्तकात नोंदल्या आहेत.मात्र सदरचे दिवे व साहित्य नादुरूस्त असलेबाबत अहवाल आढळले नाहीत.तसेच सदरचे दिवे जुन्या प्रकारचे असल्याने उदा.सोडीअम वेपर,टयुब लाईट,मेटल अलाईड,सीएफएल या प्रकारच्या दिव्यांचा वापर शासकीय धोरणानुसार कमी अथवा अजिबात करणेचा नाही,सबब या जागी दुरूस्ती ऐवजी एलईडी दिवे वापरण्याच्या प्रयोजनास नगरपरिषदेने प्राधान्य दिल्याचे आढळले नाही.

6.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 144 नुसार विद्युत पोलांची नोंद नगरपरिषदेच्या प्राधिकृत अधिका-यांच्या आद्याक्षरी निशी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 147(1) नुसार नमुना नंबर 119 मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात पुस्तक ठेवून त्यात नगरपरिषदेने बसविलेल्या विद्युत दिव्यांची संख्या दर्शविणे आवश्यक आहे. याबाबत साधार पुर्तता आवश्यक आहे.

7.कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 (EPFO) कायदयानुसार मक्तेदार कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमांचा भरणा करीत असलेबाबतचे अभिलेख्यांची पडताळणी होणे आवश्यक आहे.

8.महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र. 108/कामगार-7अदि.17 जून 2010 अन्वये कामावरील खर्चाच्या 1% रक्कम कामगार कल्याण उपकरासाठी वसुल करणे आवश्यक असताना, उपरोक्त प्रमाणक क्र.1866 चे देयकामधुन उपकर रककम रुपये 10580/- वसुल केलेली नाही. सबब उपकर रक्कम वसुलपात्र ठरते.

DATVGCM7701 (Ref No : 90, Hmm No : 132)

## 55 सन 2021/2022 या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता धारकांकडे मोठया प्रमाणात कर थकबाकी असलेबाबत.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 452991928.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2021/2022 चे लेखापरीक्षण वेळी कर विभागाकडील थकबाकीची पडताळणी केली असता कर वसुलीमध्ये थकबाकी असल्याचे आढळून आले. सदर बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.सन 2021/2022 मध्ये नगरपरिषदेतर्फे झालेल्या करांची वसुली पडताळणी केली असता एकूण कर रक्कम रुपये 452991928/- थकीत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 150 नुसार बिल देणे व कलम 141 नुसार मागणीचे नोटीस देणे, कलम 152 नुसार अधिपंज (वारंट) बजावून तसेच स्थायी निर्देश क्रमांक 05 मधील बाब क्रमांक (06) नुसार मालमत्ताकराचे निर्धारण करण्याकरिता नवीन घरांचे मोजमाप दरवर्षी करावे. तसेच जुन्या मालमत्तेबाबत नियमानुसार सुधारित करनिर्धारण नियमित स्वरुपात करून वसुली लवकरात लवकर करावी असे असतांना नगरपरिषदेची मोठया प्रमाणात थकीत मागणी वाढत असल्याचे निदर्शनास येते सोबत जोडलेले परिशिष्ठानुसार थकीत रक्कम रुपये 452991928/- कर धारकांकडून वरील कलमाचा वापर करून वसूल करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही. तरी नियमाप्रमाणे कार्यवाही करून रक्कम रुपये 452991928/- वसूल करावी. कर विभागाने कराची 100% वसुली केलेली नसल्यामुळे नगरपरिषदेला करापासून मिळणा-या उत्पन्नापासून वंचित राहावे लागले आहे तसेच आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. सदर थकीत रक्कम नगरपरिषद निधीमध्ये वेळेत जमा झाल्यास विविध विकास कामांसाठी तरतूद करता येईल तसेच अशा थकीत रक्कमा वेळोवेळी विलंब शुल्कासह वसूल करणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2.महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगर अधिनियम 1965 चे प्रकरण 10 कलम 149 ते 170 प्रमाणे कार्यवाही करून नगरपरिषदेस कर रूपाने देय असलेल्या रक्कमांची वसुली करून नगरपरिषद निधीचे उत्पन्न वाढविणे आवश्यक त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे. तरी सदरची थकबाकी वसुलात आणून स्थायी निदेश क्रमांक 05 दिनांक 13/10/2000 व स्थायी निदेश क्रमांक 14 दिनांक 26/11/2001 मधील नगरपरिषदेची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत वसुलीसाठी करावयाच्या उपाययोजना याबाबत दिलेल्या निदेशांचे पालन केलेले नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

3.महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 77 अनुसार कर वसुलीबाबत योग्य ते नियंत्रण तसेच योग्य ती कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तरी सदर बाबत योग्य ती नियमाप्रमाणे कार्यवाही करून थकबाकीची रक्कम त्वरित वसूल करून नगरपालिका निधीमध्ये जमा करावी.

4.महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 123 मध्ये नमूद केलेनुसार कोणत्याही कारणाने मागणीमध्ये झालेला प्रत्येक बदल महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 63 अन्वये नोंदवही नमुना क्रमांक 39 मध्ये नमूद करणे आवश्यक आहे. नगरपरिषद क्षेत्रातील दरवर्षी मालमत्तेमध्ये होणारी वाढ व घट सदर नोंदवही मध्ये करणे आवश्यक आहे. वाढील मालमत्तांवरील करांची विहित मुदतीत विनाविलंब वसुली केली जात असलेबाबत पूर्तता होणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु :- 452991928/-

सदर बाबत अनुपालन सादर करावे अन्यथा तसा आक्षेप कायम करणेत येईल.

DATSBCM7401 (Ref No : 102, Hmm No : 46)

## 56 शाहू चौक ते मोती चौक ते डीसी.सी.बँक अखेरचा रस्ता डांबरीकरण करणे खर्चाबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 616610.00/- |

| अ.क्र. | कामाचे नाव | शाहू चौक ते मोती चौक ते डी.सी.सी.बँक अखेरचा रस्ता डांबरीकरण करणे |
|---|---|---|
| 1 | निधी | दलितेतर योजना शासकीय निधी |
| 2 | अंदाजपत्रकीय रक्कम | 90,45,050 |
| 3 | प्रशासकीय मान्यता | ठराव क्रमांक 63 दिनांक 28/03/2020 |
| 4 | तांत्रिक मान्यता | मजिप्रा 226/2020 दिनांक 27/01/2020 |
| 5 | जाहिरात निविदा प्रसिध्दी | दैनिक ऐक्य |
| 6 | प्राप््zwj;त निविदा धारक संख््zwj;या | 04 |
| 7 | मंजुर निविदा धारक | मे.ए.एस.देसाई |
| 8 | निविदा मंजुरी ठराव | स्थाई समिती ठराव क्रमांक 69 दिनांक 14/08/2020 |
| 9 | कार्यारंभ पुरवठा आदेश | 600/12.10.2020 |
| 10 | करारनामा | 12/10/2020 |
| 11 | कामाचा कालावधी | 300 दिवस |
| 12 | काम पुर्णत््zwj;वाचा दिनांक | 20/02/2020 |
| 13 | कामाचे मुल्यांकन रक्कम | 9052441/- |

| | | |
|---|---|---|
| 14 | मुदतवाढ ठराव व दिनांक | -- |
| 15 | मोजमाप पुस्तीका क्र. व पान क्र. | 130/21 |

.

| प्र.क्र | दिनांक | देयकाची एकुण रक्कम | सुरक्षा अनामत | आयकर | जीएसटी | कामगार कल्याण उपकर | विमा | गौण खनिज रक्कम | देयकाची अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1158 | 07/01/2021 | 9052441 | 4041258 | 80825 | 161650 | 80525 | 00 | | |

सदर विकास कामाच्या नस्तीची तपासणी केली असता सदर नस्तीमध्ये खालील अनियमितता आढळुन आल्या.त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक जीईएन -1087/2573/सीआर/89/ नवि-14/ दिनांक 30/11/1989नुसार वर्ग नगरपरिषदांनी बांधकाम विभागामार्फत विकास कामांना तांत्रिक मंजुरी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेणे आवश्यक असताना विकास कामांचे अंदाजपत्रकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन घेतलेली असल्याने नियमबाहयता झालेली आहे.

2.महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक- संकिर्ण /2004/प्र.क्र.85/रस्ते-2 दिनांक 11/6/2004 नुसार ब-1 निविदेतील खंड -38 अन्वये अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा कामाच्या परिमाणामध्ये एखादया बाबीवर 25 टक्के किंवा रु. 5000/- पेक्षा जादा खर्च होत असल्यास त्यास क्षेत्रिय अधिक्षक अभियंता यांची मंजुरी प्राप्त झाल्यावरच वाढीव परिमाणाचे प्रदान करता येईल असे असताना ब-1 निविदा अट क्र. 38 नुसार सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेता खालील बाबींच्या वाढीव परिमाणावर जादा खर्च झाला आहे.

3.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता -2011मधील नियम -138 प्रमाणे मोजमाप पुस्तकात लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमुद करुन स्वाक्षरी करणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

4.स्थायी निर्देश क्रमांक -37 प्रमाणे मुख्याधिकारी यांनी 10% कामाची तपासणी करुन गुणवत्ता तपासणी करणे आवश्यक असताना या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5.सदर कामाच्या ठेक्यावरील काम करणा-या कर्मचा-यांचे कर्मचारी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी नियम-1952 व मा.आयुक्त भ.नि.नि. यांचे पत्र जा.क्र. MH/PF/PN/306960/CIR/IV/272/दिनांक 16 मार्च2015 नुसार ठेकेदाराने नेमलेल्या कर्मचा-याचे भ.नि.नि खाते उघडणे बंधनकारक आहे. व सदर कर्मचा-यांच्या खात्यावर रक्कम भरणे बंधनकारक आहे. सबब प्रत्येक कर्मचा-याचे हजेरी रजिस्टर ठेवणे बंधनकारक आहे. तसेच ठेकेदारने बिल सादर करताना कर्मचा-याची भ.नि.नि.ची भरलेल्या रक्कमेची बिलासोबत जोडलेली नाही. पुर्तता दाखवावी.

6.महाराष्ट्र शासन सार्वजनकि बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएसटी/2018/प्र.क्र./127/इमा-2-मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रिया अंतर्गत निविदा तपासणी,स्वीकृती,देयके अदा करणे व निविदा अंतिम झाल्यावर उत्तर दायित्वा बाबत सुधारीत सुचना नुसाररुपये 3लाखाचे आतील स्थानिक व रुपये -3 लाखावरील किंमतीच्या 9(ई) निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-1)रु.500/- च्या मुद्रांकावर लिफाफा क्र.-1 मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार नस्ती सोबत रु.500/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र केलेले नाही. त्यामुळे एल-1 व इतर सर्व निविदाधारकांकडून रु.500/- व रुपये 100/- वसूलांत आणावेत. एकुण र.रु.600X3= 1800/-वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

7.सुरक्षा अनामत २ टक्के सुरुवातीला व ८ टक्के धावत्या देयकातून वसूल करण्याची होती, तथापि धावत्या देयकातून फक्त 5 टक्के रक्कम वसूलात आणली आहे. यावरुन नगरपालिकेची आर्थिक हानी करणारी कार्यवाही केल्याचे निदर्शनास आले

8.सदर काम सुरु असतांना मक्तेदारांनी कामाची माहिती असलेला फलक स्वखर्चाने लावण्याचा आहे. तथापि नस्तीसोबत जोडलेल्या कामाच्या छायाचित्रामध्ये बोर्ड दिसून येत नाही. राज्य दर सूची नुसार रुपये 4500/- माहिती बोर्डासाठी वसूलात आणावेत.

9.रस्ता कामासाठी वापरलेल्या डांबर खरेदीच्या पावत्या तसेच त्यांचा वाहतूक परवाना सोबत जोडलेला नाही. कामावर वापरलेल्या डांबराचे परिमाणाची पडताळणी करता आली नाही.

10.मोजमाप पुस्तकातील नोंदीप्रमाणे बाब क्रमांक 1 अन्वये 180 घ.मी.इतके खोदकाम असतांना त्यामधून निघालेल्या मालाचे परिमाण 359.50घ.मी. इतके दर्शविले आहे. त्यावर मुरुम पसरण्याचे काम 637.50 घ.मी इतके नमूद आहे, खोदकाम,काढणी व नवीन मुरुमाची पसरणी यांच्या परिमाणांमध्ये परस्पर विसंगती दिसून आली. कमी-जादा कामाचे परिशिष्ट सोबत जोडलेले नाही. यावरुन अंदाजपत्रकापेक्षा 30. टक्के जादा काम झाल्याचे दिसून आले. यासाठी वाढीव बाबींवर वेगळे अंदाजपत्रक करणे आवश्यक असतांना आहे त्यातच कमी अधीक बाबींच्या नोंदी घेवून कामांची मोजमापे जागेवर घेतली नाहीत असे दिसून येते. ही बाब लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येत असून बाब क्रमांक 1,2 व 3 मधील जादा कामांच्या दरांची परिगणना करून रक्कम वसूलात आणावी.

11.सदर कामाच्या अंदाजपत्रकाची व मोजमाप पुस्तकाची तपासणी केली असता या कामासाठी सन 2019-20 चा शासकीय बांधकाम विभागाची दरसूची पाहता उप अंदाजपत्रक ब मधील बाब क्रमांक 4 आणि 5 या बाबींसाठी SCADA प्रणाली साठी दर लागू केले आहेत. तथापि प्रत्यक्षात SCADA प्रणालीशिवाय काम केले असल्याचे दिसून आले. सदर प्रणाली उपयोगात न आणता त्याचा दर ठेकेदारास देणे ही बाब गंभीर असून शासकीय दरप्रणाली च्या सर्वसाधारण सूचनांप्रमाणे SCADA प्रणालीचा दरासाठी गैरवापर केल्यास 10 टक्के इतकी शास्ती करण्याचे प्रावधान आहे. खालील तक्त्याप्रमाणे जादा दर अदा झाला आहे.

| बाब क्रमांक | परिमाण | दर | एकूण अदा | 10 टक्के रक्कम |
|---|---|---|---|---|
| 4 | 6173.64 घ.मी. | 294.15 | 1815576.21 | 181557.62 |
| 5 | 18943.49 घ.मी. | 207.65 | 3633615.70 | 3633615.57 |
| | | | 5449191.91 | 544919.91 |

वरीलप्रमाणे जादा रक्कम अदा करण्यात आली असून त्यावर दिलेल 12% जीएसटी म्हणजेच 544920X12%=65390+544920= 6,10,310/- इतकी रक्क्म जादा अदा झाली असून संबंधीतांकडून वसूलात आणावी.

वरील मुदयांच्या आधारे रक्कम रुपये 6,16,610/- लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

DATMSSM6801 (Ref No : 113, Hmm No : 46)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

--------------------- निरंक --------------------

# भाग दोन

## सर्वसाधारण  अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## 57 नगरपरिषदेमध्ये द्विनोंदीय लेखापध्दतीची अंमलबजावणी करणेबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : o | **लेखाशीर्ष** | : oo | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

1.नगरविकास विभागाकडील दिनांक 6/7/2005 च्या शासन निर्णयाप्रमाणे द्विनोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक व्यवहारात अचूकता व पारदर्शकता आणण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाबरोबर केलेल्या ज्ञापन समझोत्या नुसार (Memorandum of understanding) राज्य शासनाने द्विनोंद लेखापध्दती लागू करणेचे मान्य केले आहे. त्यानुसार शासनाने महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. लेखासं 102004/71/ प्र.क्र. 5/04/नवि-31,दिनांक- 6 जुलै 2005 नुसार राज्यातील सर्व नगरपरिषदांमध्ये द्विनोंद लेखापध्दती (Accrual Base Double Entry System) ची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिलेले आहेत. नगरपरिषदेने दुहेरी नोंद पध्दतीचे लेखे हे सनदी लेखापाल यांचेकडुन तयार करुन घेतल्याचे नमुद केले गेले.तथापी सदर लेखे व अनुषंगिक लेखासंहिता 2011 मधील नमुना क्र. 1 ते 33 मधील लेखे अदयावत नाहीत.तसेच दुहेरी नोंद लेखापध्दतीनुसार रोखवही ठेवली नसल्याचे आढळले आहे.सबब दुहेरी नोंद पध्दतीचे लेखे परिपुर्ण ठेवल्याचे प्रमाणीत होत नाही.

2.नगरपरिषदेने दुहेरी नोंद पध्दतीचे लेखे हे सनदी लेखापाल यांचेकडुन तयार करुन घेणेबाबत शासन आदेशाप्रमाणे जिल्हास्तरीय प्रशासनाच्या संमतीनुसार सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेबाबत राबविणेत आलेली निविदा प्रक्रीया बाबतचे अभिलेखे,कामाचे आदेश व त्यापोटी प्रदान करावयाच्या रक्कमांच्या पध्दती याबाबतच्या तपशिलासह अदयावत नोंदी ठेवल्याचे आढळले नाही.सबब याबाबत मा.आयुक्त तथा संचालक न.पा.प्रशासन संचालनालय यांचे पत्र क्र.नपप्रसं/2019/DEAS/5333 दिनांक 20/12/2019 मध्ये सनदी लेखापाल नियुक्तीबाबत करावयाची कार्यवाहीचा तपशिल नमुद केला आहे.त्यानुसार कार्यवाही केलेबाबत पुर्तता आवश्यक आहे.

DATNBYM8601 (Ref No : 53, Hmm No : 15)

## 58 5 टक्के दिव्यांग कल्याण योजना खर्चाबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 ते 2021-22 मधील लेखापरीक्षणात 5% दिव्यांग कल्याण अंतर्गत केलेल्या खर्चाबाबत अर्धसमास पत्र क्र. 82 दि. 6/2/2023 अन्वये खुलासा मागविला असता त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय

नोंदविण्यात येत आहे.

1.महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.-दिव्यांग 2018/प्र.क्र.52/18/नवि-28, दिनांक 10 मे 2018 अन्वये खर्चयोग्य निधीपैकी किमान 5 टक्के इतका निधी हा दिव्यांग व्यक्तींना दारिद्रय निर्मुलन योजनेअंतर्गत राखून ठेवणे आवश्यक असुन त्याप्रमाणे प्रत्यक्षात खर्च करणे आवश्यक आहे. तथापी दिव्यांग कल्याणासाठी सन 2020-21 मध्ये एकुण रु.3500000/- इतकी तरतुद केली असुन प्रत्यक्षात रु.3250170/- इतका खर्च करण्यात केल्याचे दिसून येते. म्हणजेच अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रु 249830/- इतका कमी खर्च केलेला आहे. त्यामुळे रु. 249830/- इतक्या रकमेचा अनुशेष राहिल्याने दिव्यांग लाभार्थी त्यांच्या देय लाभापासुन वंचीत राहिलेले आहेत.

2.दरवर्षी 5 टक्के रक्कम वर्ग करुन दिव्यांग कल्याण विकासासाठी खर्च करणेबाबत मागील काही अनुशेष आहे किंवा कसे याबाबतची माहिती उपलब्ध झालेली नाही.

सदरबाबत साधार खुलासा लेखापरीक्षणास करण्यात यावा.

DATSPUM8301 (Ref No : 73, Hmm No : 139)

## 59 5 टक्के दुर्बल घटक कल्याण योजना खर्चाबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र. बीसीसी 1085/93/सीआर 8/85/नवि-10/दिनांक 2 फेब्रुवारी 1988 अन्वये नगरपालिकांनी आपल्या महसूली उत्पन्नाचा बांधील खर्च वजा जाता 5 टक्के रक्कम दुर्बल घटकांच्या म्हणजेच अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवणे आवश्यक असुन त्याप्रमाणे प्रत्यक्षात खर्च करणे आवश्यक आहे.

नगरपरिषदेने सन 2020-21 मध्ये दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी अंदाजपत्रकात एकुण रक्कम रु. 6641094/- इतकी तरतुद केली असुन प्रत्यक्षात खर्च रक्कम रु. 1360379/- इतका केल्याचे दिसते. म्हणजेच अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रु 5280715/- इतका कमी खर्च केलेला आहे. तसेच सन 2021-22 मध्ये एकुण रक्कम रु. 9180000/- इतकी तरतुद केली असुन प्रत्यक्षात खर्च रक्कम रु. 2316830/- इतका केल्याचे दिसते. म्हणजेच अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रु 6863170/- इतका कमी खर्च केलेला आहे. त्यामुळे मागासवर्गीय दुर्बल घटक लाभार्थी त्यांच्या देय लाभापासुन वंचीत राहिलेले आहेत.

सदर बाबत साधार खुलासा करण्यात यावा.

DATSPUM8301 (Ref No : 74, Hmm No : 139)

## 60 नगरपरिषदेच्या चतुर्थश्रेणी महिला व पुरुष कर्मचम्यांना पावसाळयात काम करणम्यांना रेनकोट व रेणीसुट पुरविणे कामाच्या  नस्तीतील उणिवांबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : ९ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा येथील सन 2020- व 2021-2022 वित्तीय वर्षातील नगरपरिषदेच्या चतुर्थश्रेणी महि ला व पुरुष कर्मचा-यांना पावसाळयात काम करणा-यांना रेनकोट व रेणीसुट पुरविणे कामाच्या नस्तीतील उणिवांबाबत.खालीलप्रमाणे पुढील प्रमाणे. निविदेचा तपशिल पुढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 695 व 696 दिनांक 19.6.2018 |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 500000/- |
| तांत्रिक मान्यता | उपलब्ध नाही |
| दर मंजुरी | में. स्थायी समिती ठराव नं.63 दि.14.8.2020 |
| पुरवठादार | रेणुका एंटरप्रायजेस सातारा. |

.

| प्र.क./दिनांक | रक्कम | आयकर | जी.एस.टी | सुरक्षा अनामत | निव्वळ र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1033/11.12.2020 | 591136 | 10556/- | 10556 | 26390 | 543634/- |

खालील प्रमानकान्वये आयकर,जी.एस.टी व सुरक्षा अनामत कमी कपात केलेली आहे.

| प.क्र./दिनांक | आयकर,जी.एस.टी व सुरक्षा अनामत कपात करणे योग्य रक्कम | कपात करण्यात आलेली रक्कम | कमी कपात रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1033/11.12.2020 | 53203/- | 47502/- | 5701/- |
| | वसुलपात्र रक्कम रुपये | | 5701/- |

सदर खर्चाबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदवण्यात येत आहे.

1.सदर बाबीसाठी अंदाजपत्रक तरतुद 5 लक्ष करण्यात आलेली असुन प्रत्यक्ष खर्च र.रु. 591136 करण्यात आलेला

आहे.याबाबत महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 131 व 132 नुसार कार्यवाही केलेली नाही.

2.उपरोक्त देयक तपासले असता देयकातुन 2टक्के आयकर व जीएसटीची रक्कम कपात करणेची आहे.सुरक्षा अनामत 7 टक्कयापैकी 5टक्के सुरक्षा अनामत देयकातुन वसुल करणेची आहे.तथापि नगरपालीकेने याबाबत कार्यवाही न करताच देयके अदा केलेली आहेत.याबाबत महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार नियम 147 नुसार लेखा विभागाने बिलांची तपासणी न करताच देयके मंजुर करण्यात येवुन रक्कम अदा करण्यात आल्याने नियमबाह्यता झालेली आहे.तरी उपरोक्त र.रु. 5701/-वसुलात आणुन शासन निधीत भरणा करावी.

3.महाराष्ट्र शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार क्र.भाखंस-201/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.01/12/2016 नुसार ई-निविदा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच मंजूर करण्यात आलेले दर हे बाजारभावाशी तुलना केली असता योग्य असलेबाबत दर मंजूर करणा-या प्राधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. मंजूर करण्यात आलेले दर हे बाजारभावाशी तुलना केली असता योग्य असलेबाबत दर मंजूर करणा-या प्राधिका-याने प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे मंजूर करण्यात आलेले दर वाजवी असल्याबाबत लेखापरीक्षाची खात्री पटत नाही

4.दरपत्रकाची प्रसिध्दी दैनिक पुढारीमध्ये करण्यात आली आहे. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पीयुबी-1000/प्र.क्र.73/2000/34 दिनांक 1 मे 2001 व शासन शुध्दीपत्रक दिनांक 8 ऑगस्ट 2001 नुसार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देताना जिल्हा माहिती अधिकारी यांचे मार्फत जाहिरात वितरीत करुन प्रकाशित करणे आवश्यक असताना जिल्हा माहिती अधिकारी यांचे मार्फत जाहिरात वितरीत केल्याचे दिसून आले नाही.

5.नगरपरिषद प्रशासन संचालनालय निविदा मागविणे स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 अन्वये परिशिष्ट अ.क्र. 23 नुसार फेर आदेश मुळ कार्यादेशातील कालावधीनंतर सहा महिन्याच्या कालावधीपेक्षा जास्त नाही अशा कालावधीकरीता फेर आदेश देऊ शकते तसेच शासन निर्णय भांखस/2014/प्र.क्र.82/भागIII/उद्योग-4 दिनांक 1 डिसेंबर 2016 अन्वये 3.3.2 पुन:प्रत्यायी आदेश सुरुवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्यापुर्वी आवश्यक राहील. परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.तथापि नगरपरिषदेने सन 2018-2019 पासुन नव्याने ई निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक असतांनाही त्याप्रमाणे कार्यवाही न करता मुदतीनंतर देखील जुन्याच मक्तेदारांना पुरवठा आदेश देण्याचे प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे.

6.पुरवठा आदेशानुसार पुरुष कर्मचारी रेनकोट 290 नग (प्रति नग 1400)व महिला कर्मचारी 84 (प्रति नग 1450) खरेदी करण्यात आलेत.सदर खरेदी वाटप पोहोच नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही.

उपरोक्त उप परिच्छेद 1 ते 6 ची पुर्तता करेपर्यंत खर्चाची रक्कत रुपये आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र र.रु. 5701/-

आक्षेपाधीन र.रु. -585435/-

## 61 रोख रक्कम हाताळणा-या कर्मचा-यांचे जामीन कदबे न घेतलेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2020/2021 व 2021/2022 चे लेखापरीक्षण वेळी लेखा विभागाकडील रोख रक्कम हाताळणा-या कर्मचा-यांचे जामीन कदबे व तारणपत्रे करून घेतली नसलेचे आढळून आले. सदर बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1.महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 80 (अ) मध्ये नमूद केलेनुसार ज्या कर्मचा-यास नगरपरिषदेच्या मालकीची मालमत्ता, रोख रक्कम किंवा तिचे रोखे यांच्या संबंधात व्यवहार करावा लागत असेल अशा कर्मचा-यांच्या बाबतीत योग्य रक्कम व स्वरूप निश्चित करून प्रतिपूर्ती बंधपत्र घेणे आवश्यक आहे. तसेच मुंबई वित्तीय नियमावली 1959 मधील नियम 57 अनुसार नगरपरिषदेतर्फे रोख रक्कम हाताळणा-या कर्मचा-यांचे जामीन कदबे व तारणपत्रे नोंदवही ठेवून त्यामध्ये प्रतिवर्षी रोखपाल, भांडारपाल, उपभांडारपाल, मुंद्राक लिपिक तसेच नगरपरिषदेच्या वतीने रक्कम जमा करणे, ताब्यात ठेवणे इत्यादी कामे करणेबाबत कर्मचारी किंवा ज्यांच्याकडे नगरपरिषदेच्या मालकीची मालमत्ता सोपविली आहे त्यांच्याकडून प्रतिपूर्ती बंधपत्र घेऊन प्रतिवर्षी त्याचे जामिनदार हयात व लायक असल्याचे प्रमाणपत्र घेऊन तशी नोंद नोंदवहीत घेणे घेणे आवश्यक असताना त्यानुसार नगरपरिषदेने तशी कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

सदर बाबत अनुपालन सादर करावे अन्यथा तसा आक्षेप कायम करणेत येईल.

DLFSSPF9701 (Ref No : 95, Hmm No : 46)

## 62 जी. आय. एस. मॅपिंग प्रणालीची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही न केलेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2021/2022 चे लेखापरीक्षण वेळी नगरपरिषदेने जी. आय. एस. मॅपिंग (G I S MAPPING) प्रणालीची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेने योग्य ती कार्यवाही व पाठपुरावा केलेला नसलेचे आढळून आले. सदर बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/प्र.क्र.157/नवि-33, मंत्रालय, मुंबई

400032 दिनांक 20 जुलै 2015 अनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या अनुषंगाने भौगोलिक माहिती प्रणाली जी. आय. एस. मॅपिंग (G I S MAPPING) प्रणालीवर आधारित मालमत्ता करप्रणालीची राज्यातील क व ड वर्ग महानगरपालिका व सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये त्यांच्या हद्दीतील मालमत्तांचे जी. आय. एस. सर्वेक्षण व मॅपिंग नगरपरिषद प्रशासन संचालनालयमार्फत होईल असे नमूद केलेले आहे. सदर योजनेची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेने योग्य ती कार्यवाही व पाठपुरवठा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

सदर बाबत अनुपालन सादर करावे अन्यथा तसा आक्षेप कायम करणेत येईल.

DLFSSPF9701 (Ref No : 96, Hmm No : 46)

## 63 मालमत्ता कर मंडळ स्थापन न केलेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2021/2022 चे लेखापरीक्षण वेळी नगरपरिषदेने मालमत्ता कर मंडळाची स्थापना करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 21 एप्रिल 2011 मध्ये नमूद केलेनुसार नगरपरिषदेने मालमत्ता कर मंडळाची स्थापना करणे आवश्यक असताना नगरपरिषद सातारा यांनी मालमत्ता कर मंडळाची स्थापना केलेली नाही. तरी याबाबत योग्य तो खुलासा करून उपरोक्त नियमानुसार मालमत्ता कर मंडळाची स्थापना करणे आवश्यक आहे.

सदर बाबत अनुपालन सादर करावे अन्यथा तसा आक्षेप कायम करणेत येईल.

DLFDAWM9101 (Ref No : 98, Hmm No : 85)

## 64 सन 2021/2022 मध्ये पाणीपट्टी मागणी नोंदवही न ठेवलेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2021/2022 चे लेखापरीक्षणावेळी कर विभागाकडील पाणीपट्टी आकारासंबंधात मागणी नोंदवहीची मागणी केली असता सदर नोंदवही ठेवली नसल्याचे आढळून आले. सदरबाबत खालीलप्रमाणे

अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सन 2021/2022 मध्ये वार्षिक लेख्यानुसार पाणीपट्टी पोटी रक्कम रुपये 11889245/- जमा झालेले असून पाणीपट्टी वसुली पत्रकानुसार 11873186/- जमा झालेले दिसून येत आहेत. वार्षिक लेखा व पाणीपट्टी वसुली पत्रकानुसार रक्कम रुपये 16059/- एवढी तफावत दिसून येत आहे. तरी सदर तफावतीबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 62, 327, 332 व 345 अनुसार पाणीपट्टी आकारा संबंधात, पाण्याचा पुरवठा करण्याकरिता निश्चित केलेल्या पाण्याच्या दरांच्या संबंधात मागणी नोंदवही नमुना क्रमांक 27 प्रमाणे विहित नमुन्यामध्ये ठेवणे आवश्यक असून त्यात नमुना 35 मध्ये नमूद केलेल्या व्यक्तींकडून केलेल्या मागणीच्या संबंधात मागणी करण्यात आलेली रक्कम, वसूल करण्यात आलेली रक्कम, थकीत रक्कम इत्यादी तपशिलाची (निर्धारण यादी/नोंदवहीतील नोंदीच्या आधारे) नोंद नमुना 35 मध्ये करणे असताना त्याप्रमाणे पाणीपट्टी आकारा संबंधात मागणी नोंदवही ठेवणेत आलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

3.नगरपरिषदेमार्फत देण्यात आलेल्या खाजगी नळजोडण्यांची मोजणी / गणना वर्षातून किमान एकदा तरी, कुठलीही नळजोडणी पाणीपट्टी आकारांतून सुटली नाही हे पाहण्यासाठी जालादाय व्यवस्थापन अभियंत्याने किंवा त्याने प्रतिनियुक्त केलेल्या दुस-या अधिका-याने केली पाहिजे. जेव्हा जोडणी तात्पुरती तोडली जाईल तेव्हा मागणी पुस्तकांत तशी टीप दिली पाहिजे असे नमूद असताना तशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

सदर बाबत अनुपालन सादर करावे अन्यथा तसा आक्षेप कायम करणेत येईल.

DLFDAWM9101 (Ref No : 99, Hmm No : 85)

## 65 कर्जनिवारण निधी (सिंकींग फंड)ची स्थापना न केलेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2021/2022 चे लेखापरिक्षणावेळीलेखा विभागाकडील अभिलेखे पडताळणी केली असता कर्जनिवारण निधीची (सिंकींग फंड) स्थापना केलेली नसल्याचे आढळून आले. सदर अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1.महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : सिंकींग-2011/प्र.क्र.63/नवि-33 दिनांक 22/03/2011 अनुसार राज्यातील नागरी स्वराज्य संस्थांना विविध उपक्रमाकरिता कर्ज पुरवठा करणा-या संस्थांकडून दिल्या जाणा-या कर्जाच्या रक्कमेची व त्यावरील व्याजाची परतफेड नियमितपणे होईल याची खात्री करण्यासाठी स्वयंस्पष्ट आर्थिक प्रतीपुर्तीच्या स्वरुपात किंवा काही पुरेशा महसूली स्त्रोतांच्या माध्यमातून शाश्वती मिळण्याची अपेक्षा कर्ज पुरवठादार

करीत असतात. सर्वसाधारणपणे 05 वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी घेतलेल्या प्रत्येक कर्ज रकमेसाठी प्रत्येक नागरी स्वराज्य संस्थेने कर्ज निवारण निधीची स्थापना करणे तसेच प्रत्येक कर्जासाठी कर्ज निवारणनिधीचे वेगळे खाते ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

सदर बाबत अनुपालन सादर करावे अन्यथा तसा आक्षेप कायम करणेत येईल

DLFDAWM9101 (Ref No : 100, Hmm No : 85)

## 66 सन 2021/2022 मध्ये पाणीपट्टी मागणी नोंदवही न ठेवलेबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2021/2022 चे लेखापरीक्षणावेळी कर विभागाकडील पाणीपट्टी आकारासंबंधात मागणी नोंदवहीची मागणी केली असता सदर नोंदवही ठेवली नसल्याचे आढळून आले. सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.सन 2021/2022 मध्ये वार्षिक लेख्यानुसार पाणीपट्टी पोटी रक्कम रुपये 11889245/- जमा झालेले असून पाणीपट्टी वसुली पत्रकानुसार 11873186/- जमा झालेले दिसून येत आहेत. वार्षिक लेखा व पाणीपट्टी वसुली पत्रकानुसार रक्कम रुपये 16059/- एवढी तफावत दिसून येत आहे. तरी सदर तफावतीबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 62, 327, 332 व 345 अनुसारपाणीपट्टी आकारा संबंधात, पाण्याचा पुरवठा करण्याकरिता निश्चित केलेल्या पाण्याच्या दरांच्या संबंधात मागणी नोंदवही नमुना क्रमांक 27 प्रमाणे विहित नमुन्यामध्येठेवणे आवश्यक असून त्यात नमुना 35 मध्ये नमूद केलेल्या व्यक्तींकडून केलेल्या मागणीच्या संबंधात मागणी करण्यात आलेली रक्कम, वसूल करण्यात आलेली रक्कम, थकीत रक्कम इत्यादी तपशिलाची (निर्धारण यादी/नोंदवहीतील नोंदीच्या आधारे) नोंद नमुना 35 मध्ये करणे असताना त्याप्रमाणे पाणीपट्टीआकारासंबंधातमागणी नोंदवही ठेवणेत आलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

3.नगरपरिषदेमार्फत देण्यात आलेल्या खाजगी नळजोडण्यांची मोजणी / गणना वर्षातून किमान एकदा तरी, कुठलीही नळजोडणी पाणीपट्टी आकारांतून सुटली नाही हे पाहण्यासाठी जालादाय व्यवस्थापन अभियंत्याने किंवा त्याने प्रतिनियुक्त केलेल्या दुस-या अधिका-याने केली पाहिजे. जेव्हा जोडणी तात्पुरती तोडली जाईल तेव्हा मागणी पुस्तकांत तशी टीप दिली पाहिजे असे नमूद असताना तशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

सदर बाबत अनुपालन सादर करावे अन्यथा तसा आक्षेप कायम करणेत येईल.

DATSBCM7401 (Ref No : 103, Hmm No : 46)

## 67 जामीन कदबे उपलब्ध करणे बाबत(शिक्षण मंडळ)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद शिक्षण मंडळ सातारा सन 2020-2021 व 2021-2022 चे लेखापरीक्षणात जामीन कदबे उपलब्ध करणे विषयी मागणी करणेत आली होती. तथापी सदर माहिती उपलब्ध झाली नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहे.

1.नगरपरिषद शिक्षण मंडळ, सातारा सन 2020-2021 व सन 2021-2022 चे लेखापरीक्षणात मुंबई प्राथमिक शिक्षण लेखासंहिता १९५२ चे नियम ३४ (१) नुसार आर्थिक व्यवहार हाताळणारे कार्यालयीन कर्मचारी यांचे जामीन कदबे घेणे आवश्यक आहेत. तथापी मुख्याध्यापकांकडे तांदूळ मानधन, शिष्यवृत्या, सादिल व अनुषंगिक महत्वाची जबाबदारीची कामे असलेने त्यांच्याकडून जमीन कदबे घेणे आवश्यक आहे. या संदर्भात शिक्षण मंडळाने केलेल्या कार्यवाहीची पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

DATSBCM7401 (Ref No : 107, Hmm No : 46)

## 68 मुख्याधिकारी यांनी लेख्यांची तपासणी करणेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2020/2021 ते 2021/2022 चे लेखापरीक्षणवेळी मुख्याधिकारी यांनी विविध लेख्यांची तपासणी केली नसलेचे आढळून आले. सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

01.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 77 अन्वये मुख्याधिकारीचे अधिकार व कर्तव्ये नमुद केलेली आहेत. तसेच कलम 77 (अ) (ब) (क) (ड) (इ) (फ) (ग) (ह) (घ) (छ) अनुसार नगरपरिषदेचे सर्व निर्णय तसेच सर्व ठराव यांची अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करणे, नगरपरिषदेच्या लेख्यावर व नोंदवह्यांवर नियंत्रण व देखरेख ठेवणे, नगरपरिषदेच्या लेखा परीक्षकाने दर्शविलेली नियमबाह्यता दूर करण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणे व ते स्थायी समितीस सादर करणे. नगरपरिषदेचा आर्थिक तसेच मालमत्ता यांच्या संदर्भात लबाडी, अपहार किंवा हानी झाल्यास सदरबाबत नगरपरिषदेचे अध्यक्ष व समितीस कळविणे, सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे तसेच त्यांचे वेतन व भत्ते, रजा व इतर सर्व प्रश्न निकाली काढण्याची

जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच नगरपरिषद लेखा संहितेमध्ये विहीत नमुने नोंदवह्या ठेवणे व त्याच्या तपासणीबाबत सविस्तर नमुद करण्यात आले असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

02. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 233 अनुसार मुख्याधिकारी यांनी रोखपालाच्या नाण्यातील रोख रकमेची महिन्यातून एकदा प्रत्यक्ष किंवा अचानकपणे पडताळणी करून रोखवहीतील शिलकेबरोबर मेळ घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे रोखपालातील रोखपुस्तिकेवर दररोज व्यवहार बंद झालेनंतर स्वाक्षरी करणे तसेच नियम 234 अनुसार रोख शिल्लक रक्कम योग्य असलेबाबत तसेच नगरपरिषदेस विविध स्वरूपात प्राप्त झालेली रक्कम विहित वेळेत बँकेमध्ये जमा होत असल्याबाबतची खात्री करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

DATBPSM6701 (Ref No : 115, Hmm No : 46)

## 69 वार्षिक प्रशासकीय तपासणीबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : | 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : शासन निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020/2021 ते 2021/2022 चे लेखापरीक्षण वेळी नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे स्थायी निदेश क्रमांक 11 व नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे पत्र क्रमांक आयएनएस-10.01 प्र.क्र.183-6 दिनांक 28 मार्च 2001 नुसार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अधिनस्थ कार्यालयाची वार्षीक तपासणी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसलेचे आढळून आले. सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

01.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 व नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे स्थायी निदेश क्रमांक 11 व नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे पत्र क्रमांक आयएनएस-10.01 प्र.क्र.183-6 दिनांक 28 मार्च 2001 नुसार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अधिनस्थ कार्यालयाची वार्षीक तपासणी होणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. स्थायी निदेश क्रमांक 11 मधील मुद्दा क्रमांक 02 प्रमाणे वार्षिक तपासणी न झालेने कार्यालयामध्ये किंवा संस्थेमध्ये कामकाजाची सद्यस्थिती काय आहे याबाबतचा उद्देश सफल झालेला नाही. कामकाजाची सद्यस्थिती समोर आल्यावर त्या कार्यालयामध्ये काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी यांना आपल्या कामकाजाच्या पद्धतीबद्दल आत्मनिरीक्षण करून कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्यास उद्युक्त करणे, तपासणीमध्ये आढळून आलेल्या चुका, त्रुटी, अनियमितता इत्यादींची संबंधितांना जाणीव करून देणे व त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उपाययोजना करणे, तपासणीमध्ये आढळून आलेल्या गंभीर त्रुटी, गैरप्रकार, अनियमितता इत्यादींवर आळा बसविण्यासाठी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुद्ध आवश्यक ती शासन कारवाई करणे तसेच

वरिष्ठ प्राधिका-याकडून कामकाजाबद्दल मार्गदर्शन करणे या उद्देशांची ख-या अर्थाने प्रत्यक्षात पूर्तता व्हावी याकरिता प्रत्येक नगरपरिषद कार्यालयाची दरवर्षी प्रशासकीय तपासणी होणे आवश्यक अनिवार्य आहे. त्यामुळे स्थायी निदेश क्रमांक 11 मधील मुद्दा क्रमांक 04 प्रमाणे तपासणी ही योग्य त्या प्राधिकृत अधिकारी/ कार्यालयाकडून होणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

DATBPSM6701 (Ref No : 116, Hmm No : 46)

## 70 स्थावर, जंगम, अमूर्त मत्तांची नोंदवही न ठेवल्याने झालेल्या अनियमिततेबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा,सन 2020-2021 ते 2021-2022 चे लेखापरीक्षणामध्ये स्थावर, जंगम, अमूर्त मत्तांची नोंदवही न ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, याबाबत पुढील माहिती सादर करावी.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 62 व 191 नुसार नमुना क्रमांक- 15 मध्ये जमिनींची नोंदवही ठेवुन त्यामध्ये नगरपरिषदेकडील जमिनी किंवा इमारती, रस्ते, पुलांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे अशी नोंदवही लेखापरीक्षणांस सादर करावी.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 62 व 191 नुसार नमुना क्रमांक- 16 मध्ये जंगम मालमत्ता नोंदवही ठेवुन त्यामध्ये नगरपरिषदेकडील फर्निचर, वाहने, कार्यालयीन सामग्री यांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. अशी नोंदवही लेखापरीक्षणांस सादर करावी.

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 62 व 191 नुसार नमुना क्रमांक- 17 मध्ये अमुर्त मत्ता नोंदवही ठेवुन त्यामध्ये नगरपरिषदेकडील आज्ञावली यांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. या नोंदवही अभावी कोणत्या रस्त्यावर चालू वर्षाआधी किती खर्च झाला याची माहिती घेता आली नाही.एखादया कामावर दुबार खर्च झाला किंवा कसे याबाबतची पडताळणी करता आली नाही. कोणत्याही बांधकामाआधी त्याचा दुरुस्ती कालावधी किती होता याची माहिती असणे आवश्यक असून नोंदवही अभावी पडताळणी करणे शक्य होत नसल्याने अशी नोंदवही ठेवून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

DATBPSM6701 (Ref No : 117, Hmm No : 46)

## 71 सातारा नगरपालिका २०२०-२१-२२ कार्यवृत्तांत नोंदवहीतील अनियमिततांबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | o | **लेखाशीर्ष** | : | oo | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

निधी

१. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील 40 चे कलम 81 चे (घ) पो.क्र. (10) मधील 1 ते 3 सुधारणा केलेल्या नियमानुसार नगरपरिषद प्रशासन संचालनालय परिपत्रक क्रमांक नपप्रंस/2019/नप ठराव /प्र.क्र.66/कक्ष-(12)6/1667 दिनांक 4 मे 2019 अन्वये पीठासन प्राधिकारी यांनी 7 दिवसांच्या आंत कार्यसुचीवर स्वाक्षरी करावी तसेच नगरपरिषद व नगरपंचायतीने घेतलेले ठराव 7 दिवसांत नगरपरिषद व संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक असतांना पीठासन अधिकारी यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही याबाबत साधार खुलासा सादर करण्यात यावा.

२. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील प्रकरण ६ चे नियम 81 अन्वये नगरपालिका सभासबंधी तरतुदी मधील १ अनुसार नगरपालिकेचे अधिकार,कर्तव्ये, कामे आणि विख्यात पाहुण्याचा स्वागतपर ,भाषणाचा.विख्यात पाहुण्यांना मानपत्र देण्याबाबतचा किंवा दुखवटयाचा प्रस्ताव या संदर्भातील कामकाजनिकाली काढण्यासाठी 2 महिन्यातून एकदा सर्वसाधारण सभा घेतली पाहिजे अशी पहिली सभा ज्या तारखेस घेतली त्या तारखेपासून 2 महिन्याच्या आत घेतली पाहिजे तसेच त्यानंतरची प्रत्येक सर्वसाधारण सभा 2 महिनाच्या आत घेतली पाहिजे तसेच त्यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा झालेली असून महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील 40 चे कलम 81 चे (घ) पो.क्र. (10) मधील 1 ते 3 सुधारणा केलेल्या नियमानुसार नगरपरिषद प्रशासन संचालनालय परिपत्रक क्रमांक नपप्रंस/2019/नप ठराव /प्र.क्र.66/कक्ष-(12)6/1667 दिनांक 4 मे 2019 अन्वये प्रत्येक महिन्यास एकदा सर्वसाधारण सभा घेण्यात यावी तरी उपरोक्त नियमाप्रमाणे नगरपालिका सातारा यांनी २०२०-२१-२२ मध्ये सर्वसाधारण सभा न घेतल्याबाबत साधार खुलासा सादर करण्यात यावा. उदा. अ)सन २०-२१ मध्ये घेतलेल्या सभा संख्या उदा. सर्वसाधारण सभा- 2,विशेष सभा-५ ब)सन २१-२२ मध्ये घेतलेल्या सभा संख्या उदा. सर्वसाधारण सभा-2

3. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील प्रकरण ६ चे नियम 81 मधील 4(अ )नुसार सर्वसाधारण सभेपूर्वी ७ दिवस अगोदर नोटीस सर्व नगरपालिका सदस्यांना दिल्याबाबत व नोटीस नगरपालिकेत लावल्याबाबत तसेच नोटीसेमध्ये तारीख ,वेळ ,जागा तसेच सभेतील विषय /कामकाज असल्याबाबत अभिलेख सादर करावेत.

उपरोक्तबाबत साधार खुलासा करणेत यावा

DATNBYM8601 (Ref No : 2, Hmm No : 28)

## 72 सुरक्षा अनामत रकमांबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगर परिषद सातारा येथे सन 2020-2021 व सन 2021-2022 च्या लेखपरीक्षणात सुरक्षा अनामत नोंदवहीची तपासणी केली असता खालील रकमा नियमबाह्य परत केलेचे आढळून आले आहे. याबाबत लेखपरिक्षकाने अर्धसमास पत्र क्रमांक 31 दिनांक 07 /12/2022 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत

| अनु क्रमांक | प्रमाणक क्रमांक | प्रमाणकाची दिनांक | रक्कम रुपये | ठेकेदार | पावती क्रमांक | पावतीची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 535 | 16/09/2020 | 56405 | गणेश कन्स्ट्रक्शन्स | 669 | 08/07/2016 |
| 2. | 551 | 12/08/2021 | 61361 | चेअरमन रामजीबुवा मजूर सहकारी संस्था लि. | 753 | 21/07/2016 |
| 3. | 535 | 16/09/2020 | 190831 | गणेश कन्स्ट्रक्शन्स | 1202 | 01/09/2016 |
| 4. | 1719 | 11/03/2022 | 31739 | सातारा इलेक्ट्रिकल्स | 1254 | 08/09/2016 |
| 5. | 1174 | 25/11/2021 | 186840 | मे. हाब्रोमीन रिसर्च लॅबोरटरीज , सोलापूर | 1295 | 20/09/2016 |
| 6. | 551 | 12/08/2021 | 14520 | मे. हाब्रोमीन रिसर्च लॅबोरटरीज , सोलापूर | 1943 | दिनांक नमूद नाही. |

लेखासंहिता 2011 मधील नियम 299 अन्वये , 3 वर्षावरील ठेवी व्यपगत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. उपरोक्त अनामत रकमांबाबत स्थायी समितीच ठराव नस्तीसोबत उपलब्ध झाला नाही. तसेच परतावा केलेल्या रकमांच्या समोर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी केलेली नाही.

सदर बाबत योग्य तो खुलासा करून अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे .

DATTNPF9601 (Ref No : 66, Hmm No : 85)

## 73 नगरपरिषद स्वनिधी व इतर सर्व शासकीय योजनांच्या बँक ताळमेळ बाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये नगरपरिषद स्वनिधी व इतर सर्व शासकीय योजनांच्या बँक ताळमेळ बाबत अर्धसमास पत्र क्र. 78 दि.6/2/2023 अन्वये मागणी अभिलेखे मागणी करण्यात आली होती. सदरबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 चे नियम 50 नुसार, रोकडवही नमूना 1 मध्ये ठेऊन मिळालेल्या रकमांच्या अभिलेख्यांच्या नोंदी स्तंभ 7 मध्ये करुन प्रदानित रकमांच्या नोंदी स्तंभ 8 मध्ये करणे आवश्यक आहे. नियम 51 नुसार, प्रत्येक रोकडवही रोखपालाच्या सहीनिशी बंद करण्यात येऊन रोजच्या रोज जमाखर्च ताळमेळ काढून शिल्लक रक्कमेची पडताळणी होऊन मुख्याधिकाऱ्याकडून स्वाक्षरी होणे आवश्यक आहे. व नियम 228 नुसार सर्वसाधारण रोकडवहीतील महिना अखेरीस शिल्लक व बँक पासबुकातील महिना अखेरची शिल्लक याचा ताळमेळ नोंदविणे आवश्यक आहे.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 चे नियम 52, 53, 54 व 94 नुसार प्रत्येक रोकडवही व बँक नोंदवही नमुना अनुक्रमे 01 व 02 मध्ये ठेऊन रोजच्या रोज जमाखर्च ताळमेळ काढणे, जमा रकमा व प्रदानाच्या प्रत्येक व्यवहाराची नोंद घेऊन त्यांवर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. महिनाखेरीस बँक नोंदवहीमधीली नोंदी व बँक विवरणपत्रामधील नोंदी तुलना करुन नमुना 5 मध्ये बँक मेळ विवरणपत्र तयार करणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. उपरोक्त बाबत साधार खुलासा लेखापरीक्षणास करण्यात यावा.

AGRSRBM7301 (Ref No : 70, Hmm No : 46)

## 74 विविध भागांसाठी फलेक्स बोर्ड बनविणे व रंगविणे कामातील अनियमिततेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा येथील सन 2020- व 2021-2022 वित्तीय वर्षातील नगरपरिषदेच्या हददीतील विविध भागातील सर्व प्रकारचे फलेक्स बोर्ड माल मजुरीसह पेंटींग करुन देणे नस्तीचे लेखापरिक्षण केले असता नस्तीतील उणिवांबाबत.खालीलप्रमाणे पुढील प्रमाणे

| | |
|---|---|
| दर मंजुरी | में. स्थायी समिती ठराव नं.198 दि.27.8.2021 |
| पुरवठादार | अथर्व डिजीटल सातारा. |
| पुरवठा आदेश | 180/1/16.12.2021 |

सदर खर्चाबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदवण्यात येत आहे.

1.नगरपालीका हददीतील जेष्ठ नागरिक व दिव्यांग बंधु यांना कृत्रीम अवयव वाटप शिबिर दिनांक 15 व 16 डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले होते.त्याकरिता फेक्स प्रिंटसह पुरवठा उपरोक्त पणे देण्यात आला.शिबिरच 15 व 16.12.2021 रोजी होते.शिबिर संपल्यावर पुरवठा आदेश देण्यात आल्याने सदर योजनेचा उदेश सफल झाल्याचे दिसुन येत नाही.तरी सदर बाबीकरिता प्रमाणक क्रमांक 1813 दि.25.3.2021 र.रु.26144/- अदा करण्यात आल्याने रक्कम वसुलपात्र करण्यात येत आहे.

वसुलपात्र र.रु.26144/-

सदरचे नस्तीवरील खर्च हा उदा.देण्यात आलेले आहे.सन 2020-2021 व 2021-2022 याआर्थिक वर्षात लसीकरण,दुर्गा उत्सव व इतर अनेक योजनांवर वरीलप्रमाणे खर्चात अनियमितता झालेली आहे.

2.उपरोक्त देयक तपासले असता देयकातुन 2टक्के आयकर व जीएसटीची रक्कम कपात करणेची आहे.सुरक्षा अनामत 7 टक्कयापैकी 5टक्के सुरक्षा अनामत देयकातुन वसुल करणेची आहे.तथापि नगरपालीकेने याबाबत कार्यवाही न करताच देयके अदा केलेली आहेत.याबाबत महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार नियम 147 नुसार लेखा विभागाने बिलांची तपासणी न करताच देयके मंजुर करण्यात येवुन रक्कम अदा करण्यात आल्याने नियमबाह्यता झालेली आहे.तरी उपरोक्त र.रु. 1307/-वसुलात आणुन शासन निधीत भरणा करावी.

3.महाराष्ट्र शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार क्र.भाखंस-201/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.01/12/2016 नुसार ई-निविदा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच मंजूर करण्यात आलेले दर हे बाजारभावाशी तुलना केली असता योग्य असलेबाबत दर मंजूर करणा-या प्राधिका-याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. मंजूर करण्यात आलेले दर हे बाजारभावाशी तुलना केली असता योग्य असलेबाबत दर मंजूर करणा-या प्राधिका-याने प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे मंजूर करण्यात आलेले दर वाजवी असल्याबाबत लेखापरीक्षाची खात्री पटत नाही.

4.मुंबई वित्तिय नियम 1959 मधील नियम क्र.58 (अ) खालील टिप क्रमांक 5 चे पालन झालेले नाही.त्यामुळे वित्तिय औचित्याचा भंग झालेला असुन सदर नियमानुसार कार्यवाही न करताच नियमबाहयपणे देयके पारित करण्यात आल्याने अनियमितता झालेली आहे.

DATRSDF7201 (Ref No : 79, Hmm No : 139)

## 75 सेवानिवृत्तीवेतन नोंदवही बाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

1.नगरपरिषद साताराने सन 2020-21 व 21-22 मध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची नोंदवही लेखापरीक्षणास सादर केलेली नाही त्यामुळे एकूण किती कर्मचारी सेवानिवृत्त झाले पैकी किती जणांची निवृत्तीवेतन प्रकरणे मंजूर केली व किती मंजूर करणे बाकी आहेत याची पडताळणी करता आलेली नाही.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 466 (5) व परिशिष्ठ 4 नुसार नमूद केलेल्या निवृत्तीवेतन विषयक नियमांचे पालन केलेले नाही.

3.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ठ 4(ब) नुसार निवृत्तीवेतन नोंदवही नमुना नं. 91 मध्ये ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

4.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ठ 4(प) नुसार निवृत्तीवेतन प्रदान आदेश नोंदवही नमुना नं. 95 मध्ये ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

5.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ठ 4(ढ) नुसार महिला निवृत्तीवेतन धारकाचे सहामाही घोषणापत्र नमुना नं. 94 मध्ये घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

6.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील परिशिष्ठ 4(म) नुसार लेखापरीक्षा नोंदवही नमुना नं.97 मध्ये ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही

7.सेवानिवृत्त धारकांपैकी ज्यांनी 15 वर्ष पुर्ण केली आहेत त्यांना पेन्शन विक्रीची रक्कम पुर्ववत दराने अदा केली किंवा नाही याबबात पुर्तता सादर करावी.

8.निवृत्ती वेतन धारकांचे निवृत्ती वेतन आदेश नोंदवही ठेवणेबाबतची कार्यवाही पुर्तता सादर करावी.

उपरोक्त नोंदवहयांबाबत नगरपरिषदेकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर नोंदवहयां अभावी तसेच हयातिच्या दाखल्या अभावी भविष्यात दुबार अदाई, जादा अदाई, इत्यादी गंभीर अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही .

DATBPSM6701 (Ref No : 110, Hmm No : 85)

## 76 सातारा नगरपरिषदेकडील CCTV खरेदीच्या कामातील अनियमिततेबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद कराड सन 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षण वर्षात सातारा नगरपरिषदकडील cctv खरेदी खर्चाची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

देण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष 2020-21 व 2021 मध्ये सदर कामावरती झालेला खर्च

प्रमाणाक क्रमांक 810 दिनांक 30/09/2021 रक्कम रुपये ndash; 286091

एकूण खर्च - 286091 नगरपरिषद निधी

मक्तेदार : श्रीकॉम ऑफिस ऑटोमेशन

मोजमाप पुस्तिका : 12 पान क्रमांक 36 ndash; 38

1. उपरोक्त कामासाठी लागणारा खर्च हा cctv च्या लेखाशीर्ष मधून करणे आवश्यक असताना सदर खर्च हा विद्युत दिवे व पोल बसविणे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकणेत आलेला आहे.

2. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-2016/प्र.क्र.215/उदयोग-4 दि. 24 ऑगस्ट 2017 अन्वये शासकिय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणमध्ये सुधारणा करुन केंद्र शासनाने विकसीत केलेल्या गर्व्हमेंट इ-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनाने स्वीकृत केली असून नमूद शासन तरतूदीप्रमाणे नगरपरिषदेणे कार्यवाही करुन वस्तूंची खरेदी केलेली नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद कामांकरीता केलेल्या साहित्य खरेदी करीता नगरपरिषदेला स्पर्धात्मक दरांचा अचुक लाभ झाला नाही.

3. निविदा नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये आर्थिक लिफापा उघडून Comparative Chart तयार करून त्याला निविदा समितीची मान्यता घेतलेची कागदपत्रे आढळून आली नाहीत.

4. निविदा फॉर्म वरती निविदाधारकांच्या स्वाक्षऱ्या नाहीत तसेच कामाची नावे नमूद केलेली नाहीत त्यामुळे सदर निविदा फॉर्म याच कामाचे असल्याबाबत खात्री करता येत नाही.

5. सदर कामासाठी 3 दरपत्रके प्राप्त झालेली आहेत 1) ओम कॉम्पुटर्स 2) श्रीकॉम ऑफिस ऑटोमेशन 3) सॉफ्टटेक कॉम्पुटर्स सदर 3 निविदाकरांची cctv डिलरशिप ची लायसन्स लेखापरीक्षणास उपलब्ध करून द्यावी.

6. मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता त्यामध्ये प्राप्त झालेले मटेरीअल हे कोणत्या कंपनीचे आहे व कोणत्या स्पेसिफिकेशन चे आहे याबाबत नोंदी केलेल्या नाहीत त्यामुळे पुरवठा आदेशातील, निविदेतील आणि प्राप्त झालेले मटेरीअल एकच असल्याची खात्री करता येत नाही.

7. खरेदी केलेल्या मटेरीअल च्या नोंदी साठा नोंदवहिला घेतलेल्या नाहीत त्यामुळे पूर्वीचे cctv व आत्ता किती cctv बसविले याची खात्री होत नाही.

## 77 सातारा नगरपरिषद कार्यालयात CCTV बसविणे कामाच्या अनियमिततेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद कराड सन 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षण सातारा नगरपरिषद कार्यालयात CCTV बसविणे खर्चाची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 मध्ये सदर कामावरती झालेला खर्च

प्रमाणाक क्रमांक 651 दिनांक 05/10/2020 रक्कम रुपये - 199538

प्रमाणाक क्रमांक 935 दिनांक 29/07/2020 रक्कम रुपये - 1795837

एकूण खर्च - 1995386 नगरपरिषद निधी

मक्तेदार : समर्थ सिक्युरिटी सिस्टीम Pvt.ltd

मोजमाप पुस्तिका : 10 पान क्रमांक 54

1. सदर कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक हे ढोबळ पद्धतीने तयार करण्यात आलेले आहे त्यामध्ये कोणते साहित्य कशासाठी खरेदी करण्यात आलेले आहे याबाबत नोंदी नाहीत. उदाहरणादाखल item no. 9 प्रमाणे खरेदी करण्यात आलेल्या 11 hdd या कोठे वापरण्यासाठी घेण्यात आलेल्या आहेत याबाबत नोंदी आढळून आल्या नाहीत.

2. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-2016/प्र.क्र.215/उदयोग-4 दि. 24 ऑगस्ट 2017 अन्वये शासकिय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणमध्ये सुधारणा करुन केंद्र शासनाने विकसीत केलेल्या गर्व्हमेंट इ-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनाने स्वीकृत केली असून नमूद शासन तरतूदीप्रमाणे नगरपरिषदेणे कार्यवाही करुन वस्तूंची खरेदी केलेली नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद कामांकरीता केलेल्या साहित्य खरेदी करीता नगरपरिषदेला स्पर्धात्मक दरांचा अचुक लाभ झाला नाही.

3. सदर कामाची निविदा हि item rate प्रमाणे मागविली असल्याने ज्या निविदाकाराचे दर हे कमी असतात त्याच्याकडून तेवढे साहित्य खरेदी करणे आवश्यक असताना एकाच निविदाकाराकडून सर्व साहित्य खरेदी केलेले आहे त्यामुळे नगरपरिषदेला नाहक नुकसान झालेले आहे सदर नुकसान संबंधितांकडून वसूल करून घेणे आवश्यक आहे.

4. सदर खरेदी केलेल्या 53 cctv चा access कोठे किती cctv चा आहे याबाबत नोंदी आढळून आल्या नाहीत.

5. सदर कामाच्या करारनाम्याची तपासणी केली असता सर्व मटेरीअल हे ब्रांडेड कंपनीचे खरेदी करणे आवश्यक होते

मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता त्यामध्ये खरेदी केलेल्या साहित्याची स्पेसिफिकेशन नमूद केलेली नाहीत.

6. निविदा ऑनलाईन केल्यानंतर त्याची मुदत कमीत कमी 15 दिवस ठेवणे आवश्यक असताना सदर कामासाठी अल्पमुदतीची निविदा केलेली आहे त्यामुळे नगरपरिषदेला स्पर्धात्मक दरांचा योग्य असा फायदा झाला नसल्याचे आढळून येते.

7. निविदा ऑनलाईन केल्यानंतर त्यामध्ये निविदा किंमत प्रसिद्ध केलेली नाही.

8. सदर खरेदी केलेले व बसविलेले साहित्य यांची शासकीय नियमाप्रमाणे तांत्रिक तपासणी केल्याचे अहवाल लेखापरीक्षणास आढळून आले नाहीत.

9. मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता त्यामध्ये प्राप्त झालेले मटेरीअल हे कोणत्या कंपनीचे आहे व कोणत्या स्पेसिफिकेशन चे आहे याबाबत नोंदी केलेल्या नाहीत त्यामुळे पुरवठा आदेशातील, निविदेतील आणि प्राप्त झालेले मटेरीअल एकच असल्याची खात्री करता येत नाही.

DATVBSM9301 (Ref No : 6, Hmm No : 69)

## 78 बांधकाम परवाना नोंदवहीबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद कराड सन 2020-21 व 2021 च्या लेखापरीक्षण वर्षात सातारा नगरपरिषदकडील इमारत बांधकाम परवान्यांची तपासणी केली असता त्यामध्ये आढळून आलेल्या उणीवाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

1. बांधकाम परवाना नोंदवही नमुना नंबर 38 ची तपासणी केली असता सदर नोंदवही विहित नमुन्यात ठेवली आहे. नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 63 अन्वये विहित नमुना क्र. 38 नुसार 16 रकाने असुन त्यामध्ये एका प्रकरणाबाबत प्रकरण प्राप्त ते अंतिम निकाली निघेपर्यंत सलग नोंद होणे आवश्यक असते व अंतिम भोगवटा प्रमाणपत्र दिल्याची व त्यानुसार कर निर्धारण झालेबाबत अशी कोणतीही नोंद सलग दिसत नाही व त्याचा मेळ घेता येत नाही.

2. अंतिम परवाना दिलेल्या प्रकरणामध्ये त्या प्रकरणाचा अर्ज नेमका केव्हा प्राप्त झाला याची नोंद नसल्याने मेळ घेता येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपरिषद व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 189 (7) तसेच इमारत बांधकाम परवानगी आदेशामधील अटी व शर्ती अन्वये इमारत बांधकाम परवानगी प्रथम एक वर्षा पर्यंत राहील व त्यानंतर नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तथापी वरीलप्रमाणे विहित नोदी केल्या नसल्याने विलंबाने कार्यवाही झालेल्या प्रकरणात त्यापोटी आकारावयाचे शुल्क घेतले जात असल्याबाबत आढळले नाही.

3. बांधकाम परवाना बाबतच्या अर्ज नोंदी प्राप्त दिनांकास नोंदवहीत नोंदविल्या जात नाहीत. त्याऐवजी बांधकाम परवाना दिलेल्या दिनांकास नोंदविल्या आहेत. त्यामुळे एकुण प्रलंबित प्रकरणे व त्यांचा कालावधी समजुन येत नाही. याबाबत प्रतिवर्षी सुरवातीची शिल्लक प्रकरणे प्राप्त प्रकरणे निकाली प्रकरणे, शिल्लक प्रकरणे या क्रमाने गोषवारा नोंदविणे आवश्यक आहे. तथापी या प्रमाणे कार्यवाही जात नाही,

4. महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपरिषद व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 189 नुसार प्राप्त बांधकाम परवानगी अर्जाची छाननी करून बांधकामास परवागनी दिल्यानंतर कलम 193 नुसार बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र देवून त्याची नमुना क्र. 38 मध्ये घेण्यात येईल. तसेच बांधकाम सुरु करणे परवाना (CC) घेतलेल्या बांधकामांना महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपरिषद व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 193 अन्वये इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यापासून एक महीन्याच्या आत इमारत पुर्ण झाल्याचे कळविणे आवश्यक आहे. व नगर रचना विभागाकडून सदरची माहीती कर विभागास देण्यात येईल व त्यानुसार कर विभाग नगर परिषद लेखा संहीता 2011 मधील नमुना नं. 35 मध्ये करनिर्धारण करुन नमुना क्र. 27 मध्ये कर मागणी नोंदवही मध्ये नोंद घेईल. तथापी याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे आढळले नाही.

5. बांधकाम जोते हे मंजूर नकाशा नुसार असणे आवश्यक आहे. परंतु जोते तपासणी प्रमाणपत्र न घेता जोत्यावरील बांधकाम केले असल्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे अशी अनधिकृत बांधकामे शोधून त्यावर शास्ती/ दंड आकारानेबाबतची कार्यवाही नगरपरिषदेने करणे आवश्यक आहे. एकूण भोगवटा प्रमाणपत्राशिवाय इमारतीचा वापर सुरु करण्यात आला असल्यास नियमानुसार योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे.

6. नगरपरिषद लेखा संहीता 2011 मधील नियम 63(10) नुसार नमुना क्र. 38 मध्ये बांधकाम परवाना नोंदवही ठेवून सर्व माहीती संकलीत करून नोंदवहीनुसार प्रकरणे कर आकारणीसाठी मासीका विवरण कर विभागास देणे आवश्यक आहे.

7. लेखापरीक्षण कालावधीमधील विभागाने सादर केलेले अभिलेखे पाहता काही परवाने हे ऑफलाईन पद्धतीने दण्यात आले असल्याचे दिसून येते. शासनाने इमारतीच्या बांधकामासाठी लागणाऱ्या विविध परवानगी प्रकरणात एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून संगणकीय आज्ञावली व BPMS संकेतस्थळ वापरात आणली आहे. असे असताना उक्तप्रमाणे ऑफलाईन पद्धतीने परवाने देण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नाही. त्यामुळे संगणकीय आज्ञावलीमधून 100% परवाने देण्याच्या शासन निर्देशाचे पालन झाले नसल्याचे दिसते.
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र. 108 / कामगार 7-अ दिनांक 17/06/2010 व शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108 / कामगार 7-अ दिनांक 21/07/2011 अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम 1996 तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 अंतर्गत उपकर वसूल करावयाची कार्यपद्धती निश्चित करणेत आली आहे. त्यामधील परिच्छेद क्रमांक 1 (3) नुसार नगरपालिकेने त्यांना त्यांच्या विभागीय प्रमुखांना नोंदवही ठेवणे व मासिक विवरण पुढील महिन्याच्या 10 तारखेपूर्वी

अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याण मंडळ, मुंबई (परिशिष्ट 2 प्रमाणे) याच्याकडे पाठवावे, जेणेकरून यांना जमा केलेल्या उपकाराच्या रक्कमेचा तसेच बँकेत कोषागारात जमा झालेल्या रक्कमेचा (परिशिष्ट 3 प्रमाणे) ताळमेळ घेणे शक्य होईल. परंतु नगरपरिषदेने सदरप्रमाणे मंडळाशी कोणताही ताळमेळ घेतलेचे दिसून येत नाही. उपकराच्या रक्कमा नियमानुसार काटेकोरपणे विहित कालावधीत शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

9. विकास शुल्काकरिता स्वतंत्र खाते ठेऊन त्यासाठीच्या नियमानुसार प्राप्त रक्कमांचा विनियोग नियमानुसार करणे आवश्यक आहे. तथापी नगरपरिषदेने असे खाते व त्याकरीता स्वतंत्र नोंदी ठेवलेल्या आढळले नाही. प्राप्त रक्कमांचा विनियोग काय केला याचा खुलासा आवश्यक आहे. उपरोक्त उणीवा पाहता नगरपरिषदेने बांधकाम परवाना बाबत कार्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

DATVBSM9301 (Ref No : 8, Hmm No : 73)

## 79 नगरपरिषद हद्दीतील अनधिकृत बांधकामांबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

नगरपरिषद सातारा कडील सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये अनधिकृत बांधकाम नोंदवहीची तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. अनधिकृत बांधकाम नोंदवहीची तपासणी केली असता ती विहित नमुन्यात आढळून आली नाही. नोंदवही मोहोरबंद केलेली दिसून येत नाही. तसेच नोंदवहीमध्ये सर्व पाने पृष्टांकित केलेली नाहीत. सन 2020-21 मध्ये 14 अनधिकृत बांधकामाच्या नोंदी आढळून आल्या तसेच सन 2021-22 मध्ये 12 अनधिकृत बांधकामाच्या नोंदी आढळून आल्या. यातील किती मिळकतींना नंतर परवानगी देण्यात आली व किती मिळकतींना नियमानुसार शास्ती लावण्यात आली याबाबत खुलासा लेखापरीक्षणास करण्यात यावा.

2. अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठी नगरपरिषदेने काय उपाययोजना केल्या याबाबत कार्यवाहीची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावी.

3. नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-2016/पर.क्र.468 /नवि- 20, दि.03.2017 अन्वये नागरी क्षेत्रात विकास प्रस्ताव अंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींची यादी सविस्तर विकास प्रस्ताव, त्यांची मंजूरीबाबतची सर्व माहिती नगरपरिषद संकेतस्थलावर प्रसिद्ध करून व तसेच स्थानिक व राज्यस्तरीय वृत्तपत्रात, स्थानिक वृत्तवाहिनी, आणि होर्डिंगचा वापर करून अनधिकृत बांधकामांची यादी प्रसिद्ध करणे याप्रमाणे नगरपरिषदेने कार्यवाही केलेली आहे काय याबाबत लेखापरीक्षणास खुलासा करावा.

4. सदर आर्थिक वर्षात प्रदान बांधकाम परवानगी व त्यानुशंगाणे प्रदान भोगावत प्रमाणपत्रे यांचा ताळमेळ

नगररचना विभागाने घेणे आवश्यक असताना तशा प्रकारची कार्यवाही केलेली आढळून आली नाही. त्यामुळे नगरपरिषदेचे आर्थिक नुकसान होत असलेचे दिसून येत आहे.

5. R.T.P. Act 1966 च्या तरतुदीस अधिन राहुन नगर रचना विभागाकडुन बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केले जाते. सन 2021-22 या वित्तीय वर्षापर्यंत सदर विषयातंर्गत प्रदान बांधकाम परवानगी आणि त्यानुषंगाने प्रदान भोगवटाप्रमाणपत्रे संख्या तसेच या अंतर्गत प्रलंबित महसूल बाबत नगर रचना विभागाने ताळमेळ घेतल्याचे दिसुन आले नाही. सबब गत वर्षात नगरपरिषदेणे प्रदान केलेल्या बांधकाम परवानगी अंतर्गत किती बांधकामे पुर्ण झाली, किती बांधकामाकरिता भोगवटा प्रमाणपत्रे घेण्यात आली. किती बांधकामे भोगवटा प्रमाणपत्रा शिवाय बेकायदा ठरतात तसेच भोगवटा प्रमाणपत्र न घेतल्याने नगरपरिषदेचा किती महसूल गुंतुन पडलेला आहे याबाबत तपासणी होणे आवश्यक आहे.

6. नगरपरिषद सातारा कडील सन 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये अनधिकृत बांधकाम नस्ती तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपरिषद व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 189 (अ) नुसार अवैध बांधकामाबाबतीत त्यांच्या विरुद्ध दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत अशा इमारतींवर बसविण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल तसेच याबाबत अधिसूचना महाराष्ट्र अधिनियम 2018 क्रमांक 53 दिनांक 10/08/2018 अनुसरुन शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. एमसीओ-2018/प्र.क्र.73/नवि- 14 दिनांक 27/09/2018 अन्वये निवासी बांधकामाच्या क्षेत्रफळानुसार आकारावयाचा शास्तीचा दर नमुद केला आहे परंतू सातारा नगरपरिषदे कडील अनधिकृत बांधकाम संबंधित विभागाने याबाबत नोंदवही व इ. अनुषंगिक अभिलेखे अदयावत ठेवलेले आढळले नाही.

7. महाराष्ट्र शासन राजपत्र 4 जानेवारी 2008 व महाराष्ट्र नगरपरिषद व नगर पंचायती औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 189 नुसार तसेच वेळोवळीच्या शासन निर्देशानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतू सन 2021-22 या लेखापरीक्षण कालावधीत नगरपरिषद हददीत जी अनाधिकृत बांधकामे झाली आहेत, तसेच राखीव जागांवर अतिक्रमण झाली आहेत. अनाधिकृतपणे टप-या अथवा शेड बांधकाम करुन अतिक्रमण केले आहे किंवा कसे याबाबत नगरपरिषदकडील अनधिकृत बांधकाम संबंधित विभागाकडे अदयावत अभिलेखे असल्याचे आढळले नाही. तरी अशा राखीव जागांवरील अनाधिकृत बांधकामांबाबत आजअखेर नगरपरिषदेने कोणती कार्यवाही केली याबाबत नस्तीसह व अहवालासह खात्री पटवावी. तसेच अतिक्रमण होणार नाही, याबाबत योग्य ती उपाययोजना करुन दक्षता घेणे आवश्यक आहे.

## 80 नगरपरिषदे कडील अग्निशमन वाहन खर्चाबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020-21 च्या लेखापरीक्षण कालावधीत नगरपरिषद मालकीच्या खालील अग्निशमन वाहन संबधी अभिलेखे तपासण्यात आले असता त्यामध्ये उणीवा आढळून आल्या.

| अ.क्र. | वाहन नोंदणी क्रमांक | वाहन प्रकार |
|---|---|---|
| 1 | MH11 AB 8200 | अग्निशमन |
| 2 | MH11 CH 5862 | अग्निशमन |

उपरोक्त वाहनांच्या इंधन व देखभाल दुरुस्ती साठी झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

1) अग्निशमन वाहनाचा सन 2020-2021 व 2021-22 मध्ये आपत्कालीन प्रसंगांव्यतिरिक्त अन्य कामासाठी म्हणजेच खाजगी/ सार्वजनिक पाणीपुरवठा करणे, सार्वजनिक कार्यालये धुणे / साफसफाई करणे, मंदिरे / पुतळे धुणे, गटर सफाई करणे / गाळ काढणे, व इतर अन्य कामांकरिता खाली नमूद केलेप्रमाणे अग्निशमन वाहनाचा वापर अन्य कामांसाठी झालेला आहे. तसेच स्थायी आदेश 31 नुसार विहित केलेल्या दरानुसार अग्नीशमन वाहनाचा खाजगी वापर रक्कम वसूल केलेली दिसून येत नाही सदर बाब नियमबाह्य आहे.

| अ.क्र. | दिनांक | खाजगी वापराचा तपशील | अग्निशमन वाहन क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 11/.03/2021 | आंबेकर घर येथे हौदात पाणी सोडणे | MH11 CH 5862 |
| 2 | 03/03/2022 | सोमवार पेठ गटर मध्ये पाणी सोडणे | MH11 CH 5862 |
| 3 | 04/03/2022 | खाजगी मालमत्ता पाणी खेपा | MH11 CH 5862 |
| 4 | 05/03/2022 | खाजगी मालमत्ता पाणी खेपा | MH11 CH 5862 |
| 5 | 08/03/2022 | खाजगी मालमत्ता पाणी खेपा | MH11 CH 5862 |
| 6 | 09/03/2022 | खाजगी मालमत्ता पाणी खेपा | MH11 CH 5862 |
| 7 | 18/03/2022 | खाजगी मालमत्ता पाणी खेपा | MH11 CH 5862 |
| 8 | 27/03/2022 | खाजगी मालमत्ता पाणी खेपा | MH11 CH 5862 |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | 10/11/2020 | जांभळे घरा शेजारी पाणी मारणे | MH11 AB 8200 |

उपरोक्त तपशील हा सन 2020-2021 व 2021-22 मधील निवड महिन्यांच्या लॉगबुकची तपासणी केली असता दिसून आला इतर महिन्यामध्ये देखील याप्रमाणे संबधित वाहनाचा वापर केल्याची शक्यता नाकारता येत नाही.सदर बाब नियमबाह्य आहे.

2) उपरोक्त अग्निशमन वाहनासाठी खरेदी केलेल्या डीझेल खर्चाची तपसणी केली असता खर्च प्रमाणकानुसार दिनांक 11/10/2020 व 12/10/2020 रोजी वाहन क्रमांक MH11 CH 5862 साठी प्रत्येकी 100 लि. याप्रमाणे 200 लिटर इंधन चे र.रु. 15262/- आदा केले आहे परंतु प्रतक्ष संबधित अग्निशमन वाहन लॉगबुक ची तपासणी केली असता सदर दिनांकास संबधित वाहनात इंधन भरलेची नोंद नाही. लॉगबुक मध्ये इंधन न नोंदविलेमुळे झालेल्या खर्चाची सत्यता पडताळता येत नाही सबब याबाबत साधार खुलासा करावा अन्यथा रक्कम रुपये 15262/- वसूल करून पूर्तता सादर करावी.

3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता नियमान्वये विहित विहित नमुन्यामध्ये त्या त्या वर्षामध्ये प्रत्येक वाहनाकरीता केलेल्या देखभाल दुरुस्ती खर्चाचा तपशील विहित नमुन्यातील नोंदवहीमध्ये नोंदविणे आवश्यक असताना वाहन क्रमांक MH11 CH 5862 बाबत त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.सदर इतिहास नोंदवही विहित नमुन्यात ठेऊन त्यामध्ये परिपूर्ण नोंदी घेऊन त्यावर मुख्यधिकारी यांच्या स्वाक्षरीने वाहनांवर केलेला खर्च शासन निर्णयाच्या मर्यादेत असलेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) उपरोक्त अग्निशमन वाहनांच्या लॉगबुकमध्ये त्यातील नोंदीवर नियमित संबधित ड्रायवर व अग्निशमन निरीक्षक यांच्या स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही सदरच्या स्वाक्षरी घेऊन पूर्तता सादर करावी.

उपरोक्त 01 ते 04 मध्ये नमूद बाबींची पूर्तता करून अनुपालन सादर करावे.

DLFSGJM9401 (Ref No : 14, Hmm No : 59)

## 81 वृक्ष लागवड, त्यांचे जतन व वृक्ष गणना करणे याबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

नागरी क्षेत्र झाडाचे जतन अधिनियम 1975 अनुसार नगरपालिकेने खालील बाबींची कटाक्षाने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

1. नगरपरिषदेने वृक्ष प्राधिकरणाचे गठन करणे त्या करिता 9 ते 15 सदस्यांची समिती नेमणे आवश्यक आहे. तसेच

वृक्ष प्राधिकरणाच्या बैठका नियमित (45 दिवसाच्या आत) घेणे आवश्यक आहे.

2. वृक्ष प्राधिकरणाचे वेगळे बजेट 31 ऑक्टोबर पुर्वी करण्यात येवून त्यास प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

3. वृक्ष प्राधिकरणाचे वेगळे खाते उघडणे आवश्यक आहे.

4. वृक्ष प्राधिकरण केवळ वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन व संरक्षण यावर खर्च करणेस मान्यता देणे (बगीचे निर्मिती व लॉन लावणे, सौन्दर्यीकरण, रस्ता सौन्दर्यीकरण इत्यादी बाबी वगळून) कार्यवाही होणे आवश्यक आहे.

5. वृक्ष प्राधिकरणाने नागरी क्षेत्रातील संपूर्ण जमिनीवरील असणाऱ्या वृक्षांची गणना दर पाच वर्षांनी करणे आवश्यक आहे .

6. निकामी मृत झाडांच्या जागी नवीन झाडे लावणे तसेच पडीक भागामध्ये झाडे लावून विकसित करणे याबाबत नियोजन करणे आवश्यक आहे.

7. वृक्ष तोडीवर प्रतिबंध करणे व त्याबाबत उपाययोजना करणे आवश्यक आहे.

8.गेल्या पाच वर्षात करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीपैकी किती वृक्ष जिवंत आहेत याचा आढावा घेणे आवश्यक आहे. याचा पाठपुरावा न केलेस केलेला खर्च वाया जावून आर्थिक अनियमितता होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

DLFSSPF9701 (Ref No : 22, Hmm No : 39)

## 82 करवसुलीच्या संगणकीय आज्ञावली MAINet (मायनेट) बाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | कर निर्धारण | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2020/2021 व 2021/2022 चे लेखापरीक्षणावेळी कर विभागाकडील करवसुलीच्या संगणकीय आज्ञावली MAINet (मायनेट) मध्ये आढळून आलेल्या त्रुटींबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

मालमत्ता कर व पाणीपट्टी तसेच इतर बाबींकरिता जमा होणा-या करांच्या हिशेबासाठी मे. एबीएम नॉलेजवेअर लिमिटेड या कंपनीने तयार केलेली MAINet हि आज्ञावली नगरपरिषदेमध्ये वापरण्यात येते. या आज्ञावलीमधून जमा होणा-या रकमांबाबत मूळ मागणी, वसुली व थकबाकी यांचे अचूक व परिपूर्ण अहवाल महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नमूद नमुन्यामध्ये तयार होत नाहीत. त्यामुळे संगणकीकरणाचा मूळ उद्देश साध्य होत नाही.

1.महाराष्ट्र शासन, ई प्रशासन धोरण 2011 दिनांक 13/09/2011 मधील नमूद मुद्दा क्रमांक3 अनुसार शासनाची संकेतस्थळे, संगणकीय प्रणालींचे नियमित सायबर सिक्युरिटी ऑडिट करणे सक्तीचे केलेले आहे. तसेच मुद्दा क्रमांक

15.4 अनुसार संकेतस्थळ, पोर्टल आणि संगणकीय कार्यक्रम नियमितपणे अद्ययावत करणे आवश्यक आहे. सातारा नगरपरिषदेमध्ये वापरण्यात येणा-या संगणक आज्ञावलीचे सिक्युरिटी ऑडीट केलेले नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे. माहिती तंत्रज्ञान विभागांतर्गत राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र किंवा मान्यताप्राप्त संस्थेकडून आज्ञावलीचे सिक्युरिटी ऑडीट करून घेणे आवश्यक आहे. तसेच दैनंदिन काम करताना येणा-या अडचणींचे निराकरण करून संगणक आज्ञावली अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

DATIRMM8501 (Ref No : 35, Hmm No : 35)

## 83 मालमत्तेचे पुनर्निर्धारण व नगरपंचायतीचे उत्पन्न वाढविणेबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** : | | **लेखाशीर्ष** : | कर निर्धारण | **वसुलपात्र** : | 0.00/- |
| **निधी** : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** : | 9ड | **अंतिम अमान्य** : | 0.00/- |

1.नगरपरिषद प्रशासन संचालनालय क्र. नपसं 2001/प्र.क्र.6/2001/2 दिनांक 26 नोव्हेंबर, 2001 स्थायी निदेश क्र. 14 मधील परिशिष्ट अ मध्ये नुसार नगरपरीषदांसाठी उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना नमूद केलेले आहेत. त्यानुसार मालमत्ता करासाठी दर चार वर्षांनी मालमत्तेचे पुनर्विलोकन करणे, शहरातील प्रत्येक इमारतीस कर लावला आहे याची खात्री करणे, दरवर्षी नवीन इमारतींसाठी पुरवणी यादी तयार करून कर लावणे, झोपडपट्टीसाठी व केंद्र सरकारी इमारतींसाठी सर्विस चार्ज लावणे, घरपट्टीचा दर वाढविणे / थकबाकीवर व्याज आकारणे, अनधिकृत नळ नियमित करणे, बखळ / मोकळया जागांनाही कर आकारणे, अग्निशामन कर आकारणे, शासनास भरावयाचा एन.ए. टॅक्स ज्यांना जागा दिली आहे, त्यांचेकडून वसूल करणे, रुग्णालयांची नोंदणी करून वार्षिक नूतनीकरण फी आकारणे, शिक्षण कर / रोजगार कर / रोजगार हमी कर याचा रिबीट मिळवणे, पार्किंग जागा पे अँन्ड पार्क पद्धतीने विकसित करणे, सार्वजनिक शौचालये पे अँन्ड पार्क पद्धतीने विकसित करणे, सार्वजनिक सुविधांसाठी (बगीचा वगेरे) फी आकारणे, सर्व थियटर, पेट्रोलपंप, गॅस एजन्सी, मंगलकार्यालय, सभागृहे, फटाक्यांची दुकाने इत्यादींची वार्षिक तपासणी करून फी आकारणे, अग्निशामन, रस्ता खोदाई चार्जेस वसूल करणे, बांधकाम करताना नगरपरिषदेच्या मत्तेचे नुकसान झाल्यास ते वसूल करणे आवश्यक आहे.

2.महाराष्ट्र नगरपरिषद नागरी औद्योगिक अधिनियम 1965 चे कलम 114 व 115 नुसार चतुर्थ वार्षिक कर आकारणी करुन त्यासाठी वार्षिक भाडे मूल्यावर आधारित करयोग्य मूल्य ठरविण्यासाठी दर निश्चिती करणे आवश्यक आहे,परंतु नगरपंचायतीने सन 2014-2015 नंतर चतुर्थ वार्षिक कर आकारणी केलेली नाही. त्यामुळे सदर करापासुन मिळणारी कराची रक्कम नियमानुसारदर निश्चिती न केल्याने नगरपरिषदेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे नियम 6 नुसार खुलासा व माहिती लेखापरीक्षणास सादर करावी.

DATIRMM8501 (Ref No : 37, Hmm No : 37)

## 84 संगणकीकृत  लेखे मुद्रित स्वरुपात न ठेवलेबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | कर निर्धारण | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2020/2021 व 2021/2022 चे लेखापरीक्षण वेळी कर विभागाकडील मागणी नोंदवही, जमा पावत्या, चलन, रोजकीर्द इत्यादी संगणकीकृत लेखे मुद्रित स्वरुपात ठेवले नसलेबाबत आढळून आले. सदर बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 65 (01) व 83 मध्ये नमूद केलेनुसार संगणकीकृत स्वरुपात लेखे ठेवण्यात आले असतील तर, पुस्तके आणि नोंदवह्या यांची अनुक्रमांक दिलेल्या पृष्ठासह घट्ट बांधणी करून प्रत्येक पृष्ठ नगरपरिषदेच्या सामान्य मुद्रेने मोहरबंद करण्यात यावीत व त्यानंतर प्रत्येक पुस्तक किंवा नोंदवही यांची एकूण पृष्ठे शेवटच्या पृष्ठावर पडताळणी झाल्यानंतर लेखी स्वरुपात प्रमाणित करून त्यावर प्राधिकृत अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे प्रकरण 34 नियम क्रमांक 478 मध्ये नमूद केलेप्रमाणे जर कोणतेही लेखे अथवा नोंदवह्या संगणकीकृत स्वरुपात ठेवणेत येत असतील तर प्रकरण 05 मध्ये नमूद केलेप्रमाणे जबाबदार अधिकारी विहित मुदतीमध्ये सदर लेख्यांच्या मुद्रांकित प्रती (प्रिंट) घेऊन सारांशावर प्राधिकृत अधिका-यांकडून पडताळणी करून नंतर स्वाक्षरी करेल तसेच सदर नोंदवहीस योग्य ते क्रमांक देऊन सदर नोंदवहीची बांधणी करून ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे. नियम क्रमांक 477 मध्ये नमूद केलेनुसार लेखा पुस्तकांचे परिरक्षण हि नगरपरिषदेच्या लेखा अधिका-याची किंवा लेखा प्रमुखाची जबाबदारी असून लेखे संगणकीकृत स्वरुपात ठेवण्यात आले असतील तर मुख्य अधिकारी यांनी वापरलेली आज्ञावली योग्य स्वरुपात व विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी उद्दिष्टांची निर्मिती करण्यास समर्थ आहे याची खातरजमा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

DATIRMM8501 (Ref No : 38, Hmm No : 38)

## 85 भांडवली मूल्यावर कर आकारणी न केलेबाबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | कर निर्धारण | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2020/2021 व 2021/2022 चे लेखापरीक्षणावेळी कर विभागाकडील कर आकारणी भांडवली मूल्यावर केलेली नसलेचे आढळून आले. सदर बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1.महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग क्र. 2008/466/प्र.क्र.167/2008/ नवि-32, मंत्रालय, मुंबई, दिनांक 05 जून 2010 प्रमाणे कर आकारणी हि भाडेमुल्यावर आधारित आकारणी न करता भांडवली मूल्यावर आकारणी करणेबाबत सर्व नगरपरिषदांना सूचित केलेले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे नियम क्रमांक 40 मधील कलम 105 मधील पोटकलम (01) मधील खंड (क) मध्ये योग्य मूल्यावर या मजकुरानंतर किंवा यथास्थिती भांडवली मूल्यावर हा मजकूर समाविष्ठ करण्यात आला आहे. तसेच नगरविकास विभाग, मंत्रालय दिनांक 31 मे 2010 च्या अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे भांडवली मूल्यावर आकारणी करणेची अंमलबजावणी दिनांक 01 जून 2010 पासून अमलात आणणे आवश्यक आहे. तसेच संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचे पत्र क्रमांक नपाप्रशा/कक्ष/11/मालमत्ताकर/सं.क1605/2010 दिनांक 29/09/2010 नुसार भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणाली लागू करण्यासाठी सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करून प्रत्येक मालमत्तेवर भांडवली मूल्य ठरवून या भांडवली मूल्यावर नगरपरिषदामार्फत आकारण्यात येणा-या विविध करांचे दर ठरवून कायद्यातील तरतुदीनुसार मालमत्ता कराची परिगणना दिनांक 11 मार्च 2011 पूर्वी करण्यात यावी व दिनांक 01 एप्रिल 2011 पासून भांडवली मूल्यावर मालमत्ता कर आकारणी करण्यात यावे असे आदेश असताना नगरपरिषद सातारा सन 2021/2022 पर्यंत सदरबाबत कार्यवाही केलेली नाही.

2.सन 2010 नंतर नविन वाढ झालेल्या मालमत्ता धारकांची कर आकारणी भांडवली मूल्यावर करणे आवश्यक असताना व जागेची / बांधकामाची किंमत उपलब्ध असताना देखील त्याप्रमाणे कार्यवाही न करणेचे प्रयोजन स्पष्ट करावे.

DATIRMM8501 (Ref No : 39, Hmm No : 33)

## 86 पाणीपुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने विशेष पाणीपट्टी दराची आकारणी न केलेमुळे नगरपरिषद निधीचे नुकसान झालेबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2021/2022 चे लेखापरीक्षण वेळी पाणीपट्टी वसुली विभागाकडील कर आकारणी पडताळणी केली असता नगरपरिषदेने विशेष पाणीपट्टी दराची आकारणी केली नसलेचे आढळून आले. सदर बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2009/प्र.क्र.207/09/नवि-20 दिनांक 02 ऑगस्ट 2010 अन्वये नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थेचा पाणी पुरवठा योजना व मलनिस्सारण योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने पाण्याचे व मलनिःसारणाचे दर ठरविणे बाबतची विहित मार्गदर्शक तत्वे निर्णयातील अनुक्रमांक 01 ते 04 बाबत कार्यवाही

झालेली नसल्याने नगरपरिषदेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

2.पाणीपट्टीचे दर हे नळजोडणीच्या व्यासाशी निगडीत न ठेवता व्हॉल्यूमेट्रिक पद्धतीने दर प्रति किलो लीटर या स्वरुपात विहित करणेत यावे. ज्या ठिकाणी रहिवाशी मालमत्तांना अद्याप जलमापके बसविण्यात आलेली नाहीत त्या ठिकाणी जलमापके बसवेपर्यंत सर्वसाधारणपणे प्रतिकुटुंब 05 माणसे गृहीत धरून दरडोई दर दिवशी होणा-या पाणी पुरवठ्याच्या प्रमाणाशी गुणाकार करून 30 दिवसांत पुरवठा होणा-या पाण्याचे प्रमाण व त्याची व्हॉल्यूमेट्रिक पद्धतीने होणारी किंमत विचारात घेऊन तत्सम दरमहा पाणीपट्टीचे दर ठरविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

3.घरगुती पाण्याच्या दराची आकारणी करताना जीवनावश्यक पाणी पुरवठ्याचा किमान दर हि संकल्पना स्वीकारणे आवश्यक आहे. तसेच जीवनावश्यक पाणीपुरवठा किमान दरडोई दरदिवशी 40 लिटर या पद्धतीने सुरु करून दरडोई दरदिवशी 40 ते 70 लिटर, 70 ते 135 लिटर आणि त्यापुढे असे वर्गीकरण करून प्रत्येक वर्गाला उत्तरोत्तर अधिक दर आकारणी विहित करून पाण्याच्या उपलब्धतेनुसार जीवनावश्यक पाण्याचे प्रमाण 45 लिटर दरडोई दर दिवशी असे गृहीत धरून 45 ते 90, 90 ते 150 लिटर दरडोई दर दिवशी असे वर्गीकरण करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

4.सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीमध्ये तसेच झोपडपट्टीवासीयांच्या, सहकारी संस्थांनी जर गटजोडणीची मागणी केल्यास गटजोडण्या विहित दर्जाच्या जलमापकाद्वारे मान्य करून तिथे किती व्यक्ती वास्तव्य करीत आहेत या माहितीच्या आधारे जीवनावश्यक पाणीपुरवठा व त्यापुढील पाणीपुरवठ्याच्या टप्प्याचे दर ठरविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

5.व्यवसायिक व औद्योगिक ग्राहकांचे वर्गीकरण करून विविध प्रवर्गांसाठी वेगवेगळे दर ठरवून वापर होणा-या पाण्याकरिता जास्तीचे दर आकारणी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे

6.ग्राहकांना पाणीपुरवठा विहित जलमापकाद्वारे करण्यात यावा. सदरची विहित दर्जाची जलमापके शक्यतो ग्राहकांकडून बसवून घ्यावीत किंवा नगरी स्थानिक स्वराज संस्थेनी अशी जलमापके बसविल्यास जलमापकाचे भाडे ग्राहकांकडून हप्ते पडून वसूल करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

7.नागरी स्वराज्य संस्थांची पाणी पुरवठा योजनेची कार्यक्षमपणे देखभाल व दुरुस्ती करून नागरिकांना शुद्ध व पर्याप्त पाणी पुरवठा करणे हि त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी आहे. पाणी पुरवठा व्यवस्था कार्यक्षम ठेवण्यासाठी पाणी गळती कमी करणे, जलशुद्धीकरण केंद्रांच्या यंत्रसामुग्रीची निगा राखणे, अवैध नळ जोडण्या नियमित करणे अथवा काढून टाकणे, नळ जोडण्यांना मिटर बसविणे आणि केलेल्या पाणीपुरवठ्याचे बिलिंग व वसुली प्रभावीपणे

करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

8.नगरपरिषद क्षेत्राबाहेरील निवासस्थान व इतर मालमत्ताधारकांना नगरपरिषद योजनेमधून पाणीपुरवठा केलेस महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 चे कलम 97 (अ) अनुसार संचालक अथवा रीतसर प्राधिकृत अधिकारी यांची मंजुरी घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे.

सदर बाबत अनुपालन सादर करावे अन्यथा तसा आक्षेप कायम करणेत येईल.

DATSBCM7401 (Ref No : 101, Hmm No : 46)

## 87 अपूर्ण बांधकामांबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा,सन2020-2021 ते 2021-2022चे लेखापरीक्षण कालावधीत सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे बांधकामे अपूर्ण असल्याचे दिसून आले.त्याबाबत लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

1.विविध शासकीय योजनाअंतर्गत व न. पा. निधी अंतर्गत विकासकामाना प्रशासकीय मंजूरी, तांत्रिक मंजूरी व काम सुरू करणेबाबत कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच सदर कामांची कामपूर्ण करणेची मुदत संपूनही सदरची कामे दिनांक 31.03.2022 या लेखापरीक्षण कालावधी अखेर पूर्ण करण्यात आलेली नाहीत. तरी सदरची कामे विहित मुदतीत पूर्ण केलेली नाहीत तसेच करारामध्ये अनावश्यक जादा मुदत मक्तेदारास देणे जसे शाहू चौक ते मोतीचौक ते राजवाडा या 1400 मिटर लांबीच्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी 300 दिवसांची मुदत दिली आहे. म्हणजे जेणेकरुन मक्तेदारास खुली सूट देवून त्या दरम्यान नागरी वाहतूकीचे नुकसान करणे इत्यादी भारतीय करार कायदा 1879 सुधारीत 2009 मधील नियमांनुसार करारातील अटी व शर्तींचा भंग करणारी बाब बांधकाम विभागाने जाणीवपूर्वक केली असे वाटते.

2.या अहवालासोबत जोडलेल्या अपूर्ण कामांच्या परिशिष्टामध्ये नमुद केलेप्रमाणे शासन व नगरपरिषदेच्या वेगवेगळया लेखाशिर्षांतर्गत कामे मंजुर केली आहेत. परंतू सदरचे परिशिष्टात नमुद केलेनुसार अपुर्ण कामांमध्ये मोठया प्रमाणात निधी गुंतला आहे. तरी एवढया मोठया प्रमाणावर कामे अपुर्ण असलेने नगरपरिषद व शासन योजनेचा मुळ उद्देश सफल झालेला नाही. सदरचे परिशिष्टात नमूद केलेनुसार बांधकाम विभाग,पाणीपुरवठावि भाग व विद्युत विभागकडील कामाना प्रशासकीय मंजूरी, तांत्रिक मंजूरी व काम सुरू करणेबाबत कार्यारंभ आदेश दिलेला असतानाही विहित मुदतीत कामे पूर्ण केलेली नाहीत.सदर बाबत मक्तेदार यांचेवर दंडात्मक कार्यवाही करून सदरची अपूर्ण कामे त्वरित पूर्ण करून परिशिष्टातिल नमूद सर्व कामांच्या नस्ती,मोजमापे, काम पूर्णत्वाचे दाखले व विनियोग दाखले

लेखापरीक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

DATMSSM6801 (Ref No : 112, Hmm No : 46)

## 88 स्वच्छ महाराष्ट्र अभियानमधील अनियमिततेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : शासन निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा सन 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणात नगरपरिषदेकडील स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची रोकडवही तपासात असताना पुढीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या:

पुढील देयकामध्ये आढळून आलेल्या त्रुटी :-

| प्रमाणक.क्र. | दिनांक | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| ५०३ | ०२/०९/२०२० | युवरसेल्फ RTGS प्रिन्ससिटी<br><br>प्र.६ ते ८ -स्वच्छ सर्वेक्षण घोषवाक्ये लिहणे | २८७५७४ |

1 ) सदर बाबीवरील खर्च हा स्वच्छ सर्वेक्षण अभियान ( लेखा संकेतांक-३४०२२९००१०००१ ) मधून करणे आवश्यक असताना स्वच्छ महाराष्ट्र अभियान (लेख संकेतांक- ६२०२१६००००२ ) मधून करणेत आला आहे. देय निधी दुसऱ्या निधीकडे वळवण्यात आल्याने नियमबाह्यता झालेची आढळून येते.

2 ) सदर देयकामध्ये अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम रुपये ११५०२+ ६९०१८= ८०५२० तसेच सुरक्षा अनामत रक्कम रुपये १४३७९/- अशी घेण्यात आली आहे तरी ती कशाच्या आधारे घेण्यात आली हे स्पष्ट होत नाही.

3 ) सदर कामाची नस्ती तपासली असता पुढीलप्रमाणे आढळून आले

| | |
|---|---|
| दरपत्रके सदर दिनांक | २४/०१/२०१८ |
| प्रशासकीय मान्यता | स्थायी समिती ठराव ६७६/दिनांक १९/०६/२०१८ |
| कामाचे आदेश दिनांक | २७/०१/२०१८ |
| पुरवठा मुदत | १५ दिवस |
| पुरवठादाराचे नाव | प्रिन्ससिटी सातारा |

सदर कामासाठीचा आदेश हा प्रशासकीय मान्यतेपुर्वी देण्यात आला आहे. सदर स्वच्छ सर्वेक्षण घोषवाक्ये भिंतीवर रंगवणे बाबत च्या कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही . तसेच काम पूर्ण झाले बाबत पुरवठा आदेशही नस्ती सोबत आढळून आला नाही.

4 ) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-2 दिनांक 24/4/2015 क्रमांक महाराष्ट्र स्टॅम्प अॅक्ट मधील परिच्छेद क्रमांक 34 मध्ये केलेल्या सुधारणाअन्वये 10 लाखापर्यंतच्या कामांकरीता रुपये 500 व त्या पुढील प्रत्येक 1 लाखाकरीता रुपये 100 प्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक होते. परंतू कार्यवाही केलेली नाही. सदरचा करारनामा रुपये 500 इतके मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक होते. परंतू रक्कम रुपये 100 रुपयाचे मुद्रांकावरच करारनामा केला आहे. त्यामुळे रुपये 400 संबंधितांकडून वसुल करणेत यावे .

DATNRCF9301 (Ref No : 33, Hmm No : 78)

## 89 कोविड संदर्भात वरद एजन्सीकडून करणेत आलेल्या खरेदीतील अनियमिततेबाबत

**योजना** :
**निधी** : नगर परिषद स्व-निधी व शासन निधी
**लेखाशीर्ष** : 0
**कलम** : 9ड
**वसुलपात्र** : 0.00/-
**अंतिम अमान्य** : 0.00/-

नगरपरिषद सातारा सन 2020-2021 व 2021-2022 च्या लेखापरीक्षणात, कोरोना व्हायरस प्रतिबंधात्मक उपाययोजने संदर्भात वरद एजन्सीकडून आरोग्य विभाग व भांडार विभागाकडून पुढील उदाहरणादाखल प्रमाणकानुसार करणेत आलेल्या विविध खरेदीत पुढीलप्रमाणे नमूद अनियमितता दिसून आल्या.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशील | निधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 18 | 22/04/2020 | 271014 | वरद एजन्सी | 14 वा वित्त |
| 2 | 895 | 11/11/2020 | 287186 | वरद एजन्सी | न प भांडार |
| 3 | 100 | 27/04/2021 | 397469 | वरद एजन्सी | न प भांडार |
| 4 | 289 | 17/06/2021 | 413910 | वरद एजन्सी | न प भांडार |
| 5 | 970 | 25/11/2020 | 459428 | वरद एजन्सी | न प आरोग्य |
| 6 | 1020 | 07/12/2020 | 514317 | वरद एजन्सी | न प आरोग्य |
| | | एकूण | 2343324 | | |

1.नगरपरिषद सातारा यांनी कोरोना व्हायरस प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी व अति तातडीने कार्यवाही करणेसाठी त्यासंबंधीचे प्रतिबंधात्मक साहित्य वरद एजन्सीज सातारा, यांचेकडून खरेदी केले. याबाबत, महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-2014/प्र. क्र. 82/भां 3/उद्योग ndash; 4 दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील 3.3 विशेष् परिस्थितीमधील खरेदी करिता तातडीचा खरेदी आदेश देण्याबाबत करावयाची कार्यवाही नमुद केली आहे. यास्तव परिशिष्ठ 3 मधील नमुन्यात Urgent Order Procedure Certificate देणे आवश्यक होते, मात्र याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

2.शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.भाखसं/2014/प्र.क्र.82/भाय-III/उदयोग-4 दिनांक 01.12.2016 मधील परि.क्र.2.13 अन्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेशातच खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तुचा विनियोग तातडीने केले जाणार आहे, असे प्रमाणित करणे आवश्यक आहे. तथापी प्रशासकीय मान्यतेचे आदेश सदर अभिलेख्यांमध्ये निदर्शनास आले नाही. याबाबत सदर खर्चास प्रशासकीय मान्यता अथवा कार्योत्तर मंजुरी घेनेची कार्यवाही होणे आवश्यक होते. याबाबत, उपरोक्त शासन नियमाचे पालन होणे आवश्यक आहे.

3.उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं 2016/प्र.क्र.215/उदयोग-4, दि.24.8.2017 नुसार केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई मार्केट प्लेस (Gem) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्वीकृत केलेली आहे. नगरपरिषदेने त्यानुसार Gem पोर्टलवरुन खरेदी प्रक्रिया करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4.मुख्याधिकारी यांचे आदेश जावक क्रमांक 17 दिनांक 17/04/2020 नुसार, सोडियम हायपोक्लोराईड चा पुरवठा करणेकरिता वरद एजन्सी, सातारा यांना खरेदी/पुरवठा आदेश देणेत आला आहे, यासंदर्भात सदर संस्थेच्या डिलिवरी चलनानुसार, दिनांक 23/06/2020, 13/07/2020, 23/07/2020, 10/08/2020 या दिवशी, साहित्य पुरवठा केला. जावक क्रमांक 84 दिनांक 07/07/2020 नुसार, सोडियम हायपोक्लोराईड च्या पुरवठ्याकरिता आदेश देणेत आले, तथापि पुरवठा डिलिवरी चलन क्र. 84 दिनांक 07/09/2020 नुसार केल्याचे सादर केलेल्या डिलिवरी चलनावरून दिसून आले. जावक क्रमांक 61 दिनांक 19/06/2020 नुसार 500 रबर हॅन्ड ग्लोव्ज करिता पुरवठा आदेश देणेत आला असताना फक्त 300 रबर हॅन्ड ग्लोव्ज चाच पुरवठा केलेचे अभिलेख्यांवरून दिसून आले. जावक क्रमांक 50 दिनांक 03/06/2020 नुसार, N 95 मास्क व पी.पी.इ. कीट च्या पुरवठ्याकरिता आदेश देणेत आले असताना, दिनांक 02/07/2020 ला N 95 मास्क चा व दिनांक 20/07/2020 ला पी.पी.इ कीट चा पुरवठा केला आहे. तसेच सदर आदेशाने 100, N-95 मास्क व 300 पी.पी.इ. कीट चा पुरवठा करणेस सांगितले असताना इनवाईस क्रमांक 55 दिनांक 13/07/2020 ने 130 मास्क चे बिल सोबत जोडले आहे. 100 ची मागणी असताना 30 जादा मास्कचे बिल देणेत आले आहे. तथापि, सादर डिलिवरी चलनावरून केवळ 60 मास्क चाच पुरवठा केलेचे दिसून आले, उर्वरित 70 मास्कचे डिलिवरी चलन दिसून आले नाही. तसेच 300 पी.पी.इ. कीट च्या मागणी आदेश असताना प्रत्यक्षात फक्त 160 किटचेच इन्वाइस व डिलिवरी चलन सोबतच्या नस्तीत दिसून आले. याबाबत वस्तूंची मागणी, सादर केलेले देयक व करणेत आलेला पुरवठा यामध्ये ताळमेळ दिसून आला नाही, त्यामुळे आवश्यकतेनुसार साहित्य/वस्तु नगरपरिषदेस

प्राप्त होऊन त्याचा प्रत्यक्ष उपयोग, विनियोग व लाभ संबंधीतांपर्यंत पोहचणे विषयी नगरपरिषदेचे योग्य नियंत्रण असलेबाबत साशंकता निर्माण होते. यावर विभाग प्रमुख यांनी नियंत्रण ठेवणे आवश्यक होते, तसेच कोरोना सदृश परिस्थितीत इतक्या विलंबाने आवश्यक व तातडीने खरेदी करावयाच्या साहित्याचा पुरवठा केलेबाबत, संबंधित संस्थेला दंड आकारणे व तश्या आशयाचा पुरवठा आदेशात उल्लेख करणे आवश्यक होते, तथापि अशी कार्यवाही केली नाही. तसेच, आरोग्य व भांडार विभागाने पुरवठादारास करारनामा न करताच साहित्य पुरवठा आदेश दिलेला आहे. महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग आठ असाधारण दिनांक 24/04/2015 क्रमांक 47 Maharashtra Stamp Act (Amendment) 2015 (mah.act No.XX of 2015) मधील परिच्छेद क्रमांक 34 मध्ये केलेल्या सुधारणा नुसार रु.10 लक्षपर्यंत 500/- व त्यापुढील (रकमेच्या 0.1 टक्के दराने) प्रत्येक एक लाखास रुपये 100/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. तथापी साहित्य पुरवठादारांसोबत करारनामा केलेला नाही. याबाबत विहित रकमेचा करारनामा केला नाही सबब मक्तेदाराकडून रुपये 1900/- वसूल करून शासन निधीत भरणा केल्याची पूर्तता दाखवावी.

5.उपरोक्त नमूद प्रमाणकांच्या अनुषंगाने वरद एजन्सीकडून वेगवेगळया तारखांना कोविड संदर्भातील साहित्य खरेदी करणेत आली आहे. त्याकरिता संबंधित संस्थेला देणेत आलेले कार्यादेश/पुरवठा आदेश व संस्थेने केलेला पुरवठा, यामध्ये ताळमेळ दिसून येत नाही. तसेच उपरोक्त खरेदी वेगवेगळया निधीतून करणेत आलेली आहे, न.प. फंड (आरोग्य विभाग, भांडार विभाग), 14 वा वित्त आयोग इत्यादी निधीतून सदर खरेदी करणेत आल्या असून, आरोग्य विभागाने कोणतीही खरेदी प्रक्रिया न राबविता साहित्य खरेदी केले आहे. भांडार विभागातून एक खरेदी ई-निविदा प्रक्रियेने व एक खरेदी दरपत्रके मागवून करणेत आली, एकाच पुरवठादाराकडून साहित्य खरेदी करताना, त्यावर सक्षम अधिकारी यांनी ताळमेळ व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे, तथापि अशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही. त्यामुळे अशी वेगवेगळी खरेदी 4प्रक्रिया राबविलेचे दिसून येते. याबाबत, वस्तूची गरज, पुरवठा, व परिस्थितीचा आवाका लक्षात घेवून कार्यवाही करणे आवश्यक होते. याबाबत खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा.

6.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 266 नुसार प्रत्यक्ष वस्तुसुचीची पडताळणी केलेचे साठा नोंदवहीवर भांडार अधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी नमूद करील. नियम 274 नुसार भांडार अधिकारी नमुना 73 मध्ये वर्षाच्या शेवटी शिल्लक मालाचा अहवाल पाठवील. तसेच नियम 251 ते 254 मध्ये नमूद केलेल्या वस्तुसुची प्राप्त करण्याकारीताच्या कार्यपद्धती नुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. तथापि सादर अभिलेख्यामध्ये उपरोक्त लेखासंहिता नियमाचे यथोचित पालन केलेचे दिसून येत नाही.

7.महसुल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक सीएलएस-2020/प्र.क्र.123/म-3 दिनांक 16/03/2020 मधील मुददा क्रमांक 3 नुसार शासनादवारे वितरित निधी खर्च करताना इतर विभागांच्या योजनांमधुन खर्चाची दवीरुक्ती होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तथापि साहित्य खरेदीबाबत दवीरुक्ती होणार नाही याबाबत नियंत्रण ठेवल्याच्या उपाययोजना केल्याबाबत तपशिल आढळला नाही.

## 90 सार्वजनिक शौचालय सफाई ठेक्यातील अनियमिततेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा, सन 2020-2021 व 2021-2022 चे लेखापरीक्षणात, सार्वजनिक शौचालय सफाई करिता, ई-निविदा 31/08/2019 नुसार, कार्यादेश क्रमांक 237 दिनांक 05/11/2019 अन्वये, राजमाता अहिल्यादेवी होळकर, स्वयम रोजगार सेवा, सहकारी संस्था मर्यादित, पुणे यांना ठेका देणेत आला असून पुढील उदाहरणादाखल प्रमाणकाअन्वये यावर एकूण 4971300/- रुपये खर्च करणेत आले आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|---|
| 1 | 66 | 20/05/2020 | 134541 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 2 | 456 | 21/08/2020 | 598707 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 3 | 497 | 27/08/2020 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 4 | 577 | 18/09/2020 | 403624 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 5 | 747 | 16/10/2020 | 403624 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 6 | 894 | 11/11/2020 | 403624 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 7 | 1277 | 2/2/2021 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 8 | 1406 | 26/2/2021 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 9 | 1495 | 17/03/2021 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 10 | 1583 | 26/03/2021 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 11 | 186 | 18/05/2021 | 101265 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 12 | 251 | 09/06/2021 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 13 | 288 | 17/06/2021 | 302359 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14 | 429 | 16/07/2021 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 15 | 772 | 24/09/2021 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 16 | 927 | 21/10/2021 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 17 | 956 | 26/10/2021 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 18 | 1293 | 24/12/2021 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 19 | 1457 | 31/01/2022 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| 20 | 1822 | 25/03/2022 | 201812 | राजमाता अहिल्यादेवी होळकर |
| | | | 4971300/- | |

1.मक्तेदाराने दरमहा केलेल्या कामाचा अहवाल परिनिरीक्षीत करुन त्याची तांत्रीक तसेच लेखाविषयक छाननी करुन अहवालात नमुद कामे योग्य असल्याबाबत अथवा कामातील त्रुटीबाबत यथास्थिती दंड, विलंब आकार, इ.आकारणी करुन देयक पारीत करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दरमहाचे प्रमाणक तसेच नस्ती पाहता आढळले नाही. केवळ मक्तेदाराच्या मागणी अर्जावर देयकांचे प्रदान केले आहे.अटी शर्तीनुसार मक्तेदारांनी दररोज शौचालय व मुता-या साफ करणे बंधनकारक आहे. मात्र सदर सफाई होत असल्याबाबत कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवले नसल्याचे दिसुन येते. सबब नमुद केलेल्या कामापोटी अदा केलेल्या रक्कमांचे प्रदान योग्य असल्याचे प्रमाणीत होत नाही.

2.इ-निविदा सूचना क्रमांक 74 दिनांक 11/06/2019 मधील अट क्रमांक 29 नुसार ठेकेदाराने दराची इ-निविदा भरताना टेक्निकल बीड मध्ये ई.पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र ई-निविदेसोबत साक्षांकित करून देणे आवश्यक आहे. असे नमूद आहे, त्यामुळे कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 (EPFO) कायदयानुसार मक्तेदार कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमांचा भरणा करीत असलेबाबतचे अभिलेख्यांची पडताळणी होणे आवश्यक आहे. सदर अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केलेल्या नस्तीत दिसून आले नाही. अट क्र. 13 नुसार ठेकेदाराने कर्मचाऱ्यांची तीन महिन्यातून एकदा वैदयकिय तपासणी करणे व त्यांचा वीमा उतरविणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रे संबंधित अभिलेख्यांमध्ये आढळुन आली नाहीत.

3.करारनामा क्रमांक 29863 दिनांक 19/09/2019 नुसार प्रभाग क्रमांक 1 ते 10 मधील 524 सीट करिता करारनामा करणेत आला, व प्रभाग क्रमांक 11 ते 20 मधील 564 सीट करिता दुसरा करारनामा करणेत आला आहे. त्यामधील अट क्रमांक 1 नुसार, स्वच्छतेसाठी चालक, टँकर, मशनरी, मजूर यांचा मक्तेदाराने, पुरवठा करणे आहे यावर त्या भागातील संबंधित मुकादम व आरोग्य निरीक्षक यांचे नियंत्रण राहील. मक्तेदार यांनी याबाबत दैनंदिन कामाची

माहिती रोज आरोग्य विभागाकडे लेखी स्वरुपात देनेची आहे. तथापि अशी लेखी स्वरुपातीतील माहिती लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेख्यांमध्ये दिसून आली नाही.

4.करारनामा अट क्रमांक 4 नुसार मक्तेदार यांनी संबंधित भागाचे आरोग्य निरीक्षक यांचे नियंत्रणाखाली दररोज चे काम करणेचे आहे, याकामी आवश्यक असणारी सर्व प्रकारची जंतुनाशके मक्तेदार यांनी दररोज संबंधित आरोग्य निरीक्षक यांचेकडून उपलब्ध करून घेनेचे आहे. तथापि, अशाप्रकारे जंतुनाशके संबंधित मक्तेदारास दिलेबाबत तसेच मक्तेदाराने जंतुनाशकांची मागणी केलेबाबातचे कोणतेही अभिलेखे आढळून आले नाही. त्यामुळे सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या सफाई करिता किती जंतुनाशके वितरीत करणेत आली, व प्रत्यक्षात किती जंतुनाशके वापरनेत आली तसेच जंतुनाशकांचा पुरवठा बरोबर झाला किंवा कमी पुरवठा झाला अथवा पुरवठा झाला किंवा नाही याबाबत लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेख्यावरून योग्य ती खात्री करता आली नाही.

5.करारनामा अट क्रमांक 14 नुसार आरोग्य निरीक्षक/मुकादम यांनी दैनंदिन नेमून दिलेले काम व्यवस्थित पार न पाडलेस प्रति दिन रुपये 500/- व किमान कामगार उपलब्ध न ठेवलेस प्रति दिन प्रति कामगार रुपये 200/- याप्रमाणे दंड आकारणी करणेत येईल व त्याची बिलातून कपात करणेत येईल. तथापि दैनंदिन कामाबाबतचा अहवाल व नोंदी याबाबत चे अभिलेखे, व संबंधित कागदपत्रे सादर अभिलेख्यांत दिसून आले नाही.

6.नगरपरिषद जावक क्रमांक 217 दिनांक 26/11/2018 ने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय, सातारा यांचेकडे तांत्रिक मान्यता घेणेसाठी पत्रव्यवहार केलेचे, दिसून आले तथापि, महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 124 नुसार सदर कामाची तांत्रिक मान्यता उपलब्ध झाली नाही. तांत्रिक मान्यता नसताना काम कसे करण्यात आले. याचा खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा.

7.सातारा नगरपरिषद हद्दीमध्ये 20 प्रभागातील एकूण सार्वजनिक शौचालये व मुता-या यांची संख्या योग्य असलेबाबत व शौचालये सुयोग्य स्थितीत असलेबाबतचे अभिलेखे संबंधित नस्तीत दिसून आले नाही.

8.आरोग्य विभागाकडील स्वच्छता निरीक्षक यांनी दैनंदिनी कामाचे अहवाल रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही करणेत आली नाही

9.राजमाता अहिल्यादेवी होळकर, स्वयम रोजगार सेवा, सहकारी संस्था मर्यादित, पुणे यांचेकडील दिनांक 07/10/2020 चे पत्रानुसार, सदर संस्थेने दिनांक 04/11/2020 रोजी कामाच्या आदेशानुसार काम संपत आहे, तरी सदरचे काम किंवा मुदतवाढ सदर संस्थेस देऊ नये अशी विनंती करून पुढील व्यवस्था करणेसंदर्भात पत्रव्यवहार केला आहे. सबब यासंदर्भात, निविदा, ई-निविदा मागविनेत आले नाही. तसेच संस्थेसोबत केलेल्या करारातील अटीनुसार 1 वर्ष कालावधीचा करार संपुष्टात आल्यानंतर, पुनप्रत्ययी आदेश देणे आवश्यक असता तशी कार्यवाही केली नाही तसेच संबंधित संस्थेला मुदतवाढ आदेश न देता, तसेच याबाबत ठराव अथवा कार्योत्तर मंजुरी न घेता व संबंधित संस्थेची सदरचे काम करणेची तयारी नसताना देखील संबंधित संस्थेला माहे मार्च 2022 अखेर पर्यंत देयके प्रदान करणेत आली आहेत. करारनामा कालावधी संपल्यानंतर केलेले काम व प्रदान अटी शर्ती शिवाय झाले आहे. तसेच महाराष्ट्र शासन

राजपत्र दिनांक 27.04.2015 नुसार विहित मूल्याच्या मुद्रांकावर करारनामा केला नसल्याने दिनांक 05.11.20.20 पासून पुढील कामाकरिता सविहित मुद्रांकावर करारनामा केला नसल्याने नियमबाह्यता झाली आहे. खुलाशासह रक्कम रुपये 2100/- वसूल करून शासन सदरी भरणा करावे. याबाबत सदर संस्थेने केलेल्या कामाचा अहवाल देखील सादर केलेल्या नस्तीत दिसून आला नाही. असे असताना कशाच्या आधारे संस्थेस देयके प्रदान करणेत आली याचा साधार खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा.

उपरोक्त अभिप्रायांच्या पुर्ततेस्तव रक्कम रुपये 4971300/- लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेनेत येते.

DATPPSF8901 (Ref No : 93, Hmm No : 122)

## 91 जन्म मृत्यू नोंदणी फी शासन निधीमध्ये जमा न केलेबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : जन्म मृत्यू | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा सन 2020/2021 व 2021/2022 चे लेखापरीक्षण वेळी जन्म मृत्यू नोंदणी फी शासन निधीमध्ये जमा केली नसल्याचे आढळून आले.

1.शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग साआवि/विभुति/1091/300/सीआर 18/कुक 03 दिनांक 07/12/1992 व आरोग्य संचालनालय पुणे यांचे पत्र क्रंमांक HIVS/कस/83/1030/62/02 दिनांक 13/04/1993 अन्वये जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम 1969 व महाराष्ट्र राज्य नोंदणी नियम 1986 अंतर्गत प्राप्त होणारे शुल्क शासन निधीत जमा करणे आवश्यक आहे. सन 2020/2021 अखेर वार्षिक लेख्यानुसार नगरपरिषदेकडे जन्म मृत्यू नोंदणी फी पोटी रक्कम रुपये 3029/- जमा झालेली आहे व सन 2021/2022 अखेरzwj; वार्षिक लेख्यानुसार नगरपरिषदेकडे जन्म मृत्यू नोंदणी फी पोटी रक्कम रुपये 4258/- जमा झालेली आहे. वार्षिक लेख्यानुसार सदरची एकूण जमा रक्कम रूपये 7287/- शासन निधीमध्ये जमा करून पूर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

DATIRMM8501 (Ref No : 36, Hmm No : 37)

## 92 पावती पुस्तके व पावती पुस्तके साठा नोंदवहीबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : 00 | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

सातारा नगरपरिषद सातारा चे सन 2020-2021 व सन 2021-2022 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण कालावधीत पावती पुस्तक साठा नोंदवहीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे आक्षेप / अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

01 महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 चे नियम 80 प्रमाणे पावती पुस्तकांचा हिशेब नमुना क्रमांक 57 मध्ये ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

02 महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 चे नियम 80 प्रमाणे लेखे हस्तलिखित स्वरुपात ठेवण्यात येत असतील तर, मुद्रणालयाकडून पावती पुस्तक प्राप्त झाल्यानंतर लगेच प्राधिकृत अधिकाऱ्याकडून प्रत्येक पुस्तकामध्ये अंतर्भूत असलेल्या पावत्यांच्या एकूण संख्येची तपासणी करण्यात येईल आणि पुस्तकाच्या शेवटच्या पृष्ठावर तसे नमूद करण्यात येईल. पावती पुस्तक देतेवेळी, प्रत्येक पावतीवर नगरपरिषदेच्या सामान्य मुद्रेचा ठसा उमटवण्यात येईल. पावती पुस्तकाच्या साठ्याची नोंद नमुना 57 मध्ये घेण्यात येवून प्रत्येक प्रत्येक पावती पुस्तक देण्यासंबंधीच्या व पुर्ण झाल्यानंतर त्या परत करण्यासंबंधीच्या तपशिलाची नोंद घेण्यात येईल आणि आणि प्राधिकृत अधिकाऱ्याकडून ते साक्षांकीत करण्यात येईल असे असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

03 महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 चे नियम 81 प्रमाणे लगेचच वापर करण्याची आवश्यकता नसेल तर, वसुली वर्गचारी वर्गाला कोणतेही पावती पुस्तक देण्यात येणार नाही.पुर्ण झालेली पुस्तके परत करण्यात येत नाहीत तोपर्यंत नवीन पुस्तके देण्यात येणार नाहीत असे असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

04 पावती पुस्तक साठा नोंदवहीमध्ये वसुली वर्गचारी वर्गाला दिलेल्या पुस्तकची नोंद आहे परंतू शिल्लक पुस्तकाच्या नोंदी केलेल्या नाहीत त्यामुळे किती पुस्तके शिल्लक आहेत याचा बोध होत नाही.

DLFSSPF9701 (Ref No : 44, Hmm No : 40)

## 93 गणेश मंडप डेकोरेटर्स यांना प्रदान रकमेतील अनियमिततेबाबत

**योजना** :
**निधी** : नगर परिषद स्व-निधी व शासन निधी

**लेखाशीर्ष** : 0
**कलम** : 9ड

**वसुलपात्र** : 0.00/-
**अंतिम अमान्य** : 0.00/-

नगरपरिषद सातारा, सन 2020-2021 व 2021-2022 चे लेखापरीक्षणात, नगरपरिषदेच्या कार्यक्रमासाठी स्टेज मंडप, कमान, बॅराकेटिंग करणे, खुर्च्या, टेबल, स्पीकर, माईक पुरविणे याकरिता श्री गणेश मंगल सेवा मंडप डेकोरेटर्स यांना कामाचे आदेश देणेत आले आहेत, व पुढीलप्रमाणे उदाहरणादाखल प्रमाणकाअन्वये संबंधित मक्तेदारास 6895396/- रुपयांची देयके प्रदान केली असून त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|---|
| 1 | 505 | 02/09/2020 | 967406 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 2 | 888 | 11/11/2020 | 364582 | गणेश मंडप डेकोरेटर्स |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | 922 | 11/112020 | 132255 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 4 | 1186 | 15/01/2021 | 420416 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 5 | 1578 | 26/03/2021 | 472282 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 6 | 1037 | 11/12/2020 | 427991 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 7 | 54 | 19/04/2021 | 347221 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 8 | 158 | 05/05/2021 | 238487 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 9 | 203 | 19/05/2021 | 235000 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 10 | 238 | 09/06/2021 | 116783 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 11 | 281 | 17/06/2021 | 261447 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 12 | 419 | 16/07/2021 | 2534153 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 13 | 986 | 28/10/2021 | 134171 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| 14 | 1266 | 24/12/2021 | 243202 | गणेश मंडप डेकोरेटर्स |
| | | एकूण | 6895396/- | |

1.शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.भाखसं/2014/प्र.क्र.82/भाय-III/उदयोग-4 दिनांक 01.12.2016 मधील परि.क्र.2.13 अन्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेशातच खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तुचा विनियोग तातडीने केले जाणार आहे असे प्रमाणित करणे आवश्यक आहे. तथापी प्रशासकीय मान्यतेचे आदेश सादर अभिलेख्यांमध्ये निदर्शनास आले नाही. सदर खर्चास प्रशासकीय मान्यता अथवा कार्योत्तर मंजुरी घेनेची कार्यवाही केली नाही. याबाबत, उपरोक्त शासन नियमाचे पालन होणे आवश्यक आहे.

2.उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखसं 2016/प्र.क्र.215/उदयोग-4, दि.24.8.2017 नुसार केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई मार्केट प्लेस (Gem) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्वीकृत केलेली आहे. नगरपरिषदेने त्यानुसार Gem पोर्टल वरून सदर सेवा घेणेची प्रक्रिया करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3.ई-निविदा सूचना क्रमांक 2019-DMA-427006-1 दिनांक 22/02/2019 नुसार ई-निविदा मागविनेत आली असून,

स्थायी समिती ठराव क्रमांक 55 दिनांक 14/08/2020 ने दरास मंजुरी देणेत आली. व सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 244 दिनांक 10/04/2018 ने खर्चाच्या मंजुरीचा ठराव घेणेत आल्याचे लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेख्यांवरून दिसून आले, तथापि सदर खर्च मंजुरीच्या ठरावाची प्रत संबंधित नस्तीत निदर्शनास आली नाही. सदर प्रत लेखापरीक्षणास सादर करून अनुपालन सादर करावे.

4.सन 2020-2021 मध्ये मुद्रांक विक्री अ.क्र. 4186 दिनांक 19/08/2020 ने रुपये 500/- चा करारनामा करणेत आला असून, अ.क्र. 2242 दिनांक 02/06/2021 ने त्यापुढील 500/- रुपयांचा करारनामा करणेत आला आहे. तथापि सदर करारनाम्यावर कराराचा कालावधी नमूद केलेला नाही. तसेच दिनांक 02/06/2021 ला दुसरा करारनामा करताना स्थायी समिती अथवा सर्वसाधारण सभेची फेरमान्यता घेतलेचे सादर अभिलेख्यांवरून दिसून आले नाही. याबाबत सक्षम अधिकारी यांची तसेच सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच शासन राजपत्र दिनांक 24.04.2015 अन्वये विहित मूल्याच्या मुद्रांकावर करारनामा केला नाही सबब कमी मूल्य रक्कम रुपये 5900/- वसूल करून शासन खाती भरणा केल्याची पूर्तता दाखवावी. सक्षम अधिकारी/यंत्रणा यांची मान्यता अथवा कार्योत्तर मंजुरी लेखापरीक्षणास सादर करणेत यावी.

5.उपरोक्त करारनाम्यातील अट क्रमांक 25 नुसार मक्तेदार यांनी काम सुरु करणेपूर्वी कामाच्या ठिकाणाचे दोन फोटो व काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या ठिकाणाचे दोन फोटो सादर करणे आवश्यक आहे. तथापि सादर अभिलेखे तपासणीत केलेल्या कामांचे फोटो निदर्शनास आले नाही. सदर कामाचे मोजमाप पुस्तिकेमध्ये नियमित नोंद करणे आवश्यक असताना काही प्रदानाबाबत दिनांक नमूद केले नाहीत. ज्या ठिकाणी मंडप व इतर सेवा पुरविल्याचे नमूद आहे तेथील उपलब्ध क्षेत्रफळ व मंडपाचे क्षेत्रफळ प्रमाण योग्य असल्याचे फोटोसह प्रमाणित करणे आवश्यक होते. मात्र याप्रमाणे कार्यवाही केली नाही उदाहरणार्थ प्र.क्र. 888 कामाची ठिकाणे 7 नमूद केली आहेत मात्र बॅराकेटीग परिमाण तीन ठिकाणाकरिता 2700/- असे दर्शवून अनुक्रमे रुपये 75/-, 37.50/-, 18.75/- असे दराने प्रदान केले आहे.तसेच खुर्च्या 486 नग पुरविल्याचे दर्शविले आहे. सदरचे भाग हे प्रतिबंधित क्षेत्र असून उपस्थिती अत्यंत मर्यादित असताना 486 नग खुर्च्या पुरविण्याचे प्रयोजन शासन निर्देशाचे उल्लंघन करणारे आहे. सबब अटी प्रमाणे फोटो घेतले नसल्याने व उपरोक्त उणिवांनुसार केलेले खर्च वाजवी व योग्य असल्याचे प्रमाणीत होत नाही.

6.अट क्रमांक 26 नुसार मक्तेदारांकडे काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या EPF च्या रकमा संबंधित विभागाकडे नियमानुसार जमा करणे गरजेचे आहे, सदरची रक्कम जमा केलेची पावती / प्रमाणपत्रे नगरपरिषदेकडे बिलापुर्वी जमा करणेत यावे, अन्यथा सदरची रक्कम बिलातून कपात करणेत येवून संबंधित विभागाकडे जमा करणेत येईल. असे स्पष्ट नमूद असताना, अशी कार्यवाही करणेत आली नाही. याबाबत करारनाम्यातील अटी व शर्तींचे यथोचित पालन केलेचे दिसून येत नाही. याचा साधार खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा.

## 94 बंद व जुनी वाहने निर्लेखनाबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा , सन 2020-2021 व 2021-2022 चे लेखापरीक्षणामध्ये वाहनविभागाकडील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता, नगरपरिषदेच्या मालकीची खालील वाहने बंद स्थितीत असुन त्यांचे निर्लेखन केले नसल्याचे दिसुन आले. याबाबत लेखपरिक्षकाने अर्धसमास पत्र क्रमांक 74 दिनांक 16/02/2023 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत:

| अ.क्र. | वाहनक्र. | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | MH 11 AB 8004 | फायर फायटर | बंद स्थितीत |
| 2 | MH 11 F 4999 | सक्शन वाहन | बंद स्थितीत |
| 3 | MH 11 AB 8221 | कॉम्पॅक्टर | बंद स्थितीत |

1.नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडील स्थायी निर्देशक्र. 32 दि. 10 मे 2005 मधील परिच्छेद क्र. 35 नुसार ज्या नगरपरिषदेकडे स्वत:ची वाहन उपलब्ध आहेत व जी वाहने मैलअंतर कमी देतात व ज्यांच्यावरील दुरुस्तीचा खर्च जादा आहे अशी वाहने त्वरीत निर्लेखित करणेबाबत सुचित केलेले आहे. तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 अंतर्गत शासन निर्णय क्र. विअप्र-10.08/प्र.क्र. 70/2008/विनियम दि. 15 मे 2009 मधील भाग-पहिला, उप-विभाग-दोन, अनुक्रमांक 19-क नियम क्र. 69 अन्वये वाहन निर्लेखनाचे अधिकार कार्यालय प्रमुख यांना असून, सदर नियमातील पोट नियम 2 अन्वये एखादे वाहन (अपघात किंवा मोठ्याप्रमाणावरील बिघाड) निरुपयोगी ठरवावयाचे झाल्यास शासकीय परिवहन सेवा किंवा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडून "वाहन दुरुस्त करुन या पुढे उपयोगात आणणे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर राहणार नाही" असे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन सदर वाहनाच्या निर्लेखनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2.उपरोक्त वाहनांबाबत प्रादेशिक / उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून मुल्य ठरविण्यात येऊन नियमानुसार लिलाव प्रक्रिया अवलंबिण्यात आली नाही.

3.वाहन निर्लेखन / लिलाव प्रक्रिया वेळीच पार न पडल्यास सदर वाहनाचे अपेक्षित मुल्य नगरपरिषदेस प्राप्त होणेस अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही .सबब याबाबत वेळीच कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. तसेच लिलावप्रक्रियेसाठी प्रतिसाद मिळावा यासाठी जिल्हास्तरीय वर्तमानपत्रात जाहिर निविदा देण्याची कार्यवाही करण्यात यावी.सदर बाबत योग्य तो खुलासा करून अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे

## 95 सातारा नगर परिषदेचे पेठ केसरकर येथील मंगल कार्यालयाबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** : | | **लेखाशीर्ष** : | 00 | **वसुलपात्र** : | 0.00/- |
| **निधी** : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** : | 9ड | **अंतिम अमान्य** : | 0.00/- |

नगर परिषद सातारा येथील सन 2020-2021 व सन 2021-2022 च्या लेखपरीक्षणात नगर परिषदेचे पेठ केसरकर सि.स.क्र. 1 व 2 येथील मंगल कार्यालय बांधा , वापरा व हस्तांतर करा तत्वावर मक्ता पद्धतीने चालविणेस दिले असल्याचे आढळून आले आहे. याबाबत लेखपरिक्षकाने अर्धसमास पत्र क्रमांक 32 दिनांक 07/12/2022 अन्वये खुलासा मागविला होता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत

1.करारनामा श्री. निलेश नागनाथ बडेकर व नगर परिषद सातारा यांच्यामध्ये 2008 साली विशेष सभा ठराव क्र. 773 दिनांक 31/08/2008 अन्वये झालेला आहे .

2.महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965 अन्वये करारनाम्याच्या तारखेपासून 9 वर्षे कालावधीसाठी प्रतिमाह भाडे रक्कम रुपये 4200/- प्रमाणे करारनामा करण्यात आला आहे. यानुसार दिनांक 30/08/2018 रोजी करारनाम्याची मुदत संपलेली आहे. मे. सर्वसाधारण सभा ठराव क्र. 1363 दिनांक 08/10/2011 अन्वये 9 वर्षांमध्ये 6 वर्षांची मुदतवाढ देण्यात आलेली होती परंतु सदर ठरावानुसार मक्तेदार व नगर परिषद सातारा यांचेत कोणताही करारनामा झालेला दिसून येत नाही.

3.जा.क्र./सानप/स्थाजिवि:1258 सातारा नगर परिषद सातारा दिनांक 07/01/2022 नुसार संबंधित मक्तेदारला मंगल कार्यालय नगर परिषदेकडे हस्तांतरित करणेबाबत नोटिस देण्यात आली होती, तरी सुद्धा संबंधित मक्तेदाराने अद्यापही मंगल कार्यालय नगर परिषदेकडे हस्तांतरित केलेचे आढळून येत नाही.

4.दिनांक 31/03/2022 अखेर मंगल कार्यालयाची थकबाकी रक्कम रुपये 694446/- + 125000.28/- जीएसटी (18%) एवढी असून महाराष्ट्र नगरपालिका (स्थावर मालमत्तांचे हस्तांतरण सुधारणा नियम) 2019 चे कलम 8 अ(9) नुसार जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 168 ते 182 मधील तरतुदीनुसार जमिन महसुलाची थकबाकी वसूल होणे आवश्यक आहे तसेच कायदेशीर कारवाई करून नगर परिषदेने मंगल कार्यालयाचा ताबा घेणे आवश्यक आहे आणि नवीन करारनामा करून भाडे वसूली होणे आवश्यक आहे .संबंधित बाबीची दखल न घेतलेने नगर परिषदेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे दिसून येते.

सदर बाबत योग्य तो खुलासा करून अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे .

## 96 नगरपरिषदे अंतर्गत असलेल्या व्यापारी गाळे थकीत भाडे रक्कमेबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद साताराचे सन 2020-2021 ते 2021-2022 चे लेखापरीक्षणात गाळा भाडे वसुलीबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1.नगरपालिकेने स्वत:च्या मालकीचे गाळे भाडयाने दिलेचे आढळून आले. महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 92(3) (महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नमुना क्रमांक 10, नियम क्रमांक 62) अन्वये नगरपरिषद सुरुवातीला 3 वर्षाच्या कालावधीसाठी आपली स्थावर मालमत्ता भाडयाने देऊ शकेल परंतू नगरपरिषदेने 9 वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही संबंधित गाळे धारकांकडून गाळे ताब्यात घेतलेले नाहीत. तसेच याबाबतीत शासनाकडे प्रस्ताव सादर केले नाहीत.. त्यामुळे नगरपरिषद या नुकसानीस जबाबदार आहे.

2.नगरपरिषदेने सदर गाळे वर्षानुवर्षे एकाच व्यक्तीस भाडयाने दिले आहे या वरून असे दिसून येते कि महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व ओद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९२ चे पालन केले नाही.

3.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 155 नुसार नमुना न. 128 व 129 यामध्ये नोंदवही ठेवलेली नाही. नगर परिषदेने ठेवलेल्या नोंद्वही प्रमाणे मार्च 2022 अखेर खालीलप्रमाणे थकबाकी आढळून आली आहे.(सोबतच्या विवरणपत्रानुसार)

| कर | मागणी | वसुली | थकबाकी |
|---|---|---|---|
| गाळा भाडे | 1,77,22,985 | 72,85,832 | 1,04,37,153 |

यानुसार मागील थकबाकी रक्कम रुपये 1,77,22,985 /- पैकी केवळ रक्कम रुपये 72,85,832 /-इतकी थकबाकी वसूल झाली असून रक्कम रुपये 1,04,37,153 /- इतकी थकबाकी वसूल होणे बाकी आहे. यावरून थकबाकी वसूल होण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून आले नाही. तसेच नगरपरिषदेचे उत्पनाअभावी आर्थिक नुकसान झाले आहे. मार्च 2022 अखेर एकूण थकबाकी रक्कम रुपये 1,04,37,153/- इतकी थकबाकी दिसून येत आहे.

4.गाळे भाडेची 100 टक्के वसुली का केली जात नाही. तरी थकीत भाडयाची वसुली दंडनीय व्याजासह करण्यात यावी. स्थायी निर्देश क्रमांक 24 व 39 अधिनियम कलम 92 च्या तरतुदी व महाराष्ट्र शासन राजपत्र नगरविकास विभाग मुंबई यांचे दिनांक 25/3/2011 रोजीच्या अधिसुचनेनुसार स्थापित त्रिस्तरीय समितीच्या भाडेमुल्य अहवालाप्रमाणे नगररचना विभागाने दर तीन वर्षांनी 10 टक्के वाढ करणेविषयी सुचीत केले आहे. मात्र त्याप्रमाणे नगरपरिषदेने अंमलबजावणी न केल्याने नगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

5.नस्तीसोबतची विवरणपत्रे पाहता खालील गाळे संबंधित गाळे धारकांच्या ताब्यात दिलेचा ठराव क्रमांक, दिनांक व कालावधी नोंदविलेला नाही.

| अ.क्र. | पेठ/ठिकाण | संकुलाचे नांव | गाळे धारकाच्या ताब्यात दिलेची नोंद नसलेला गाळा क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | सदाशिव पेठ | श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे व्यापारी संकुल | गाळा क्रमांक 5,9,11,13,14,15 (तळ मजला)<br>गाळा क्रमांक 4,8,13,18 (पहिला मजला) |
| | भवानी पेठ सि.स.नं. 271,272 | श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज व्यापारी संकुल | 15 (पहिला मजला) |
| 2 | भवानी पेठ सि.स.नं.35 अबक | श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज व्यापारी संकुल | 1,2,6,7,9,10 (दुसरा मजला) |
| 3 | सदाशिव पेठ | मच्छी मार्केट | 10,15,17,20,22 (तळ मजला) |
| 4 | सदरबझार | लो कॉस्ट शॉपींग सेंटर | गाळेक्रमांक 10,13,21,23,29,30,31,37,40, 43,44,49,50,56,58,61 ते 72,74,75,79,80,82 (तळ मजला) |
| 5 | मल्हारपेठ | सि.स.नं. 75 शॉपींग सेंटर | गाळे क्रमांक 4,8,9,13 |

उपरोक्त गाळा वाणिज्यीक कारणास्तव हस्तांतरीत केलेबाबतचा (भाडे पट्टयान दिलेबाबतचा) ठराव क्रमांक, दिनांक व अंतिम मुदत या नोंदी नसल्याने गाळे केव्हापासून संबंधितांच्या ताब्यात आहेत हे समजू शकले नाही. सदर बाब गंभीर असून नगरपरिषदेच्या उत्पन्नविषयक बाबींसंदर्भात अनास्था निदर्शक आहे.

6.सदरबझार लोकॉस्ट शॉपिंग सेंटर येथे 82 गाळे असून त्यापैकी गाळा क्रमां 14,20,41,48,81 वगळता अन्य 77 गाळयांची मुदत संपलेली आहे. सोबतचे प्रपत्र पाहता सदरचे गाळे ठराव क्रमांक 1417 दिनांक 6/9/2001 अन्वये भाडेपट्टयाने दिले आहेत. दिनांक 5/9/2010 रोजी मुदत संपली आहे. म्हणजे मुळ मुदतीपेक्षा दुप्पट कालावधी

होऊनदेखील गाळे संबंधित गाळेधारकांच्या ताब्यात आहेत.

7.मा. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्रमांक 24 दिनांक 28/10/2004 नुसार गाळे भाडयाने देतांना करारनाम्याचा प्रारुप नगरपरिषद व तत्सम भाडेधारक यांचे दरम्यान स्वयंस्पष्ट असलेल्या अटी व शर्ती नमुद करुन लेख स्वरुपात करारनामा व मुंबई स्टॅम अ‍ॅक्ट 1958 नुसार योग्य मुल्याच्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक आहे.परंतु नगरपरिषदेन गाळा धारकांकडुन करारनामे करुन घेतलेले नाहीत.नगरपरिषदेकडे 347 गाळे आहेत त्यापेकी48 गाळेनचा करारनामा सन 2016 ते 2019 पर्यंत केलेला आहे तदनंतर सन 31मार्च 2022 अखेर एकही करारनामा करण्यात आलेला नाही त्यामुळे करारांच्या अटी व शर्ती तसेच जुन्या गाळयांचे नोंदणीकृत करारनामे नगरपालिकेकडे उपलब्ध नसल्याने स्थायी निर्देश क्रमांक 24 चे पालन झाल्याचे आढळून आले नाही

8.गाळे भाडे मागणी पुस्तकात भाडेपट्टा क्रमांक, दिनांक नमुद केलेला नाही. भाडेपट्टा मंजूर आदेश क्रमांक, दिनांक नमुद नाही. पट्टयाची मुदत नमूद नाही. नुतनीकरण केलेले नाही. भाडे मागणी हस्याने ठरविली असल्यास संख्या नमूद नाही.

DLFDAWM9101 (Ref No : 97, Hmm No : 85)

## 97 महिला बालकल्याण योजना खर्चाबाबत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | **लेखाशीर्ष** | : 00 | **वसुलपात्र** | : 0.00/- |
| **निधी** | : नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : 0.00/- |

नगरपरिषद सातारा चे सन 2020-21 ते 2021-22 मधील लेखापरीक्षणात महिला बालकल्याण अंतर्गत केलेल्या खर्चाबाबत अर्धसमास पत्र क्र. 81 दि. 6/2/2023 अन्वये खुलासा मागविला असता त्यास उत्तर प्राप्त न झाल्याने त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1. नगरपालिकाने सन 2020-21 वार्षिक लेख्यामध्ये महिला बाल कल्याणार्थ रक्कम रुपये 3500000/- लाखांची तरतूद केलेली दिसून आली परंतु प्रत्यक्ष खर्च रक्कम रुपये 1413075/- नोंद्विणेत आलेला आहे. तसेच सन 2021-22 मध्ये रक्कम रुपये 3900000/- लाखांची तरतूद केलेली दिसून आली परंतु प्रत्यक्ष खर्च रक्कम रुपये 2212291/- नोंद्विणेत आलेला आहे. महाराष्ट्र शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. जीईएन/1093/1998/नवि-14, दि. 14/07/1993 तसेच महाराष्ट्र शासन निर्णय नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्र.जीईएन/1093/1998/नवि-14, मुंबई दि. 01/07/1994 मध्ये नमूद केलेप्रमाणे नगरपालिकाने महिला बाल कल्याण समितीचे नावे बँकेत खाते उघडून दरवर्षी 5 टक्के रक्कम वर्ग करुन महिला बाल कल्याण विकासासाठी खर्च करणे आवश्यक असताना कमी खर्च करण्यात आला आहे.

2.सन 2020-21 मध्ये रक्कम रुपये 3500000/- व सन 2021-22 मध्ये रक्कम रुपये 3900000/- तरतूद काय आधारे करणेत आली याबाबत खुलासा होत नाही. नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या 5 टक्के एवढी तरतूद दरवर्षी करणे आवश्यक

आहे, त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

3.दरवर्षी 5 टक्के रक्कम वर्ग करुन महिला बाल कल्याण विकासासाठी खर्च करणेबाबत मागील काही अनुशेष आहे किंवा कसे याबाबतची माहिती उपलब्ध केलेली नाही.

सदरबाबत साधार खुलासा लेखापरीक्षणास करण्यात यावा.

DATSPUM8301 (Ref No : 72, Hmm No : 139)

## 98 दावे व खटले यांच्या संबधातील खर्चाबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषदसातारा 2020-2021 व 2021-2022 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणा मध्ये न्यायालयीन प्रकरणे आणि त्या संबंधीच्या झालेल्या खर्चाची प्रमाणके तपासली असता, नगर परिषदेकडुन दैनंदिन दिवाणी न्यायालय जिल्हा स्तर न्यायालय कामागार न्यायालय उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या दावा प्रकरणे केली आहेत आणि त्यावर नगरपरिषद निधीतुन वकील फी आणि त्यासंबंधीची कागदपत्रे पुर्ततेकरिता रक्कमा अदा आहेत. लेखा परीक्षण कालावधीत सदर बाबीवर एकुण रुपये ndash; 860047/- इतका खर्च झालेला आहे. सदर बाबत खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

1.नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्र. 29 दि. 29/03/2005 नुसार व सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.एसपीओ/2804/ प्र.क्र.11/2004/ 11ऐ दि. 26/05/2006 मधील अट क्र. 2 ते 7 नुसार प्रशासनाने वेळोवेळी प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2.नगरपरिषदेच्या वतीने न्यायालयात दावे चालविण्याकरिता वकीलांना रक्कमांच्या प्रदानांच्या बाबत न्यायालयाकडुन प्राप्त झालेल्या हुकुमनामा (जजमेंट) देय रक्कमांची वसुली प्रदानाच्या रक्कमा दर्शविण्याकरिता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 63 अन्वये न. नं. 29 मध्ये नोंदवही ठेवणे आवश्यक होते. अशी नोंदवही ठेवलेली नाही.

3.न्यायालयीन प्रकरणांबाबत सन- 2021-2022अखेर एकुण 130 प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रलंबित प्रकरणांमुळे आणि प्रती वर्षी नवीन प्रकरणांचे संख्या वाढत असल्याने केवळ वकील फी प्रवास भत्ता आणि न्यायालयीन खर्चा पोटी नगरपरिषद निधीवर अर्थिक बोजा वाढल्याचे दिसुन येते. तरी याबाबत जास्तीत जास्त प्रलंबीत असलेली प्रकरणे निकाली काढणे बाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

DATRSDF7201 (Ref No : 77, Hmm No : 92)

## 99 प्रभागनिहाय रस्ते गटारे, मंडई, गाळ काढणे, साफसफाई इत्यादी विविध कामांसाठी सेवापुरविणे ठेक्यातील अनियमिततांबाबत

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | | **लेखाशीर्ष** | : 0 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | नगर परिषद स्व- निधी | **कलम** | : 9ड | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

नगरपरिषद सातारा येथील सन 2020-2021 ते 2021-2022 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना साफसफाईबाबतची नस्ती तपासली असता आढळून आलेल्या उणिवांबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

नगरपरिषदेने रस्ते, नाली, गटारे सफाई या बाबींवर आर्थिक वर्षात रक्कम रुपये 49746053/- एवढा खर्च झालेला आहे. यासाठी सन 2018-2019 मध्ये निविदा मंजुर करणेत आलेल्या दराने प्रदान केले आहे याबाबत तपशिल खालीलप्रमाणे

| प्रभाग निहाय कामे | निविदा प्रसिध्दी - दिनांक 11/06/2018 दैनिक सकाळ |
|---|---|
| प्रभाग 11 व 17 ते 20 राजवाडा भागातील रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे. | श्री. सचिन लेबर सप्लायर्स सातारा,<br>ठराव क्र.244 दिनांक 10/04/2018<br>कार्यादेश- 193 दिनांक 24/10/2018<br>कर्मचारी संख्या-20<br>प्रती कर्मचारी दर 11652/- प्रती महिना |
| सन 2020-2021 चा एकुण खर्च | 4329788/- |
| सन 2021-2022 चा एकुण खर्च | 10395426/- |
| गुरूवार परज 1 भागातील रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे | श्री. राजदीप ॲग्रो सर्विसेस सातारा,<br>ठराव क्र.244 दिनांक 10/04/2018<br>कार्यादेश- 194 दिनांक 24/10/2018<br>कर्मचारी संख्या- 15<br>प्रती कर्मचारी दर 12220/- प्रती महिना |

| | |
|---|---|
| सन 2020-2021 चा एकुण खर्च | 3565005/- |
| सन 2021-2022 चा एकुण खर्च | 7895112/- |
| 1)गुरूवार परज 2 भागातील रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे<br>2)सदरबझार भागातील प्रभाग 1 ते 5 रस्ते व भाजी मंडई परिसर दैनंदिन साफसफाई करणे व कचरा गाडीत भरुन देणे | स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर सेवा संस्था सातारा,<br>ठराव क्र.244 दिनांक 10/04/2018<br>कार्यादेश- 196 दिनांक 24/10/2018<br>प्रती कर्मचारी दर 9950/- प्रती महिना<br>कर्मचारी संख्या- 15<br>प्रती कर्मचारी दर 9960/- प्रती महिना<br>कर्मचारी संख्या- 20 |
| सन 2020-2021 चा एकुण खर्च | 6561606/- |
| सन 2021-2022 चा एकुण खर्च | 16999116/- |

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक : भाखसं- 2014/प्र.क्र. 82/भाग III/उद्योग 4, दिनांक 01/12/2016 मधील नियम 3.3.2 (अ) नुसार पुनर्प्रत्यायी आदेश फक्त एकदाच देता येईल आणि त्याचे मूल्य आणि संख्या सुरुवातीच्या आदेशाच्या 50% किंवा रुपये दहा कोटी यापैकी जे कमी असेल, त्यापर्यंतची खरेदी करता येईल असे असताना मागील सन 2020-2021 ते 2021-202220 मधील पुरवठादार यांची मुदत दिनांक 24/10/2019 रोजी संपली असल्याने सन 2020-2021 आणि सन 2021-2022 साठी ई-निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक होते. मात्र नगरपरिषदेने सन 2019-2020 मधील पुरवठादार यांना नियमबाह्यरित्या मुदतवाढ दिलेली आहे. वाढीव मुदतीप्रमाणे सन 2021-2022 अखेर रक्कम अदा करणेत आली आहे. यांस मा.जिल्हाधिकारी सातारा यांची मान्यता असलेबाबत खुलासा आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 124 अन्वये अनुक्रमे तांत्रिक मान्यता घेतलेली नाही. याबाबत प्रयोजन स्पष्ट करणे आवश्यक आहे.

2.सदर पुरवठादार यांनी मुदतवाढीसाठी विहीत मुदतीत अर्ज केलेबाबतचे तसेच मुदतवाढ दिलेबाबतचे अभिलेखे नस्तीसोबत उपलब्ध झाले नाहीत.

3.सदर कामाचे एकूण रक्कम रु. 49746053/- इतके प्रदान झाले आहे. उपरोक्त ठेकेदारासोबतच्या मुळ करारनाम्याची

वैधता दिनांक 24/10/2019 रोजी संपुष्टात आली आहे. सदरचे जुन्या कराननामाप्रमाणे प्रदान सन 2021-2022 मध्ये देखील चालु राहिले आहे. सबब नव्याने करारनामा करणे आवश्यक असता तो केला नसल्याने उपरोक्त तीनही मक्तेदार अटी शर्तींच्या जबाबदारीपासुन मुक्त राहिले आहेत.

4.उपरोक्त बाबी मध्ये रस्ते, गटारे साफसफाईच्या कामावर प्रत्यक्ष कोणते कर्मचारी कोणकोणते काम करीत होते या बाबत त्यांचे हजेरीपुस्तक, संस्थेच्या पर्यवेक्षीय कर्मचाऱ्याची त्यावर नोंद, मुकादम/ स्वच्छता निरीक्षक यांचे क्षेत्रीय कामाचे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील दैनंदिन अहवाल नमुना क्रमांक 43 व 44, स्वच्छता निरीक्षकाद्वारे खासगी मेहतरकामाबाबत महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नुसार ठेवावयाचा नमुना क्रमांक 46,घनकचरा व्यवस्थापन प्रणाली 2000 चे प्रकरण क्रमांक 23.3.1.4(I)(a) नुसार साफसफाईबाबत नियुक्त कंत्राटी/कायम कर्मचाऱ्यांचे आरोग्य विभागादवारा परिनिरीक्षित दैनिक उपस्थिती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.तसेच करारनामा अट क्रमांक 30 अन्वये तक्रार रजिस्टर ठेवणेले आहे परंतु ते अदयावत नाही.

5.कामगार कायदा व किमान वेतन कायदा ठेकेदारांस बंधनकारक करण्यांत आलेला आहे. त्यामुळे कामगार कायदा 1970 व नियम 1971 अन्वये कामगारांना दिले जाणारे किमान वेतन , कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण उपबंध अधिनियम 1952 मधील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीची कपात, कामगार विमा इत्यादीचे पालन झाले नाही.

6.नगरविकास विभाग परिपत्रक क्रमांक जीईएन/1093/2336/प्र.क्र.126/93/नावि-4 दि. 20/10/1993 मधील मार्गदर्शक सुचना (इ)(फ)(ग) नुसार कोणत्याही ठराविक व्यक्तिला किंवा संस्थेला अशी कामे नेहमी देत असल्याचे आढळल्यास अन्य कंत्राटदार कामे घेण्यासाठी पुढे येतील असे पहावे. अशा कामांसाठी शासकीय/निमशासकीय सहकारी संस्थाना प्राधान्य देण्यात यावे. मात्र वरील मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी झालेचे आढळले नाही.याबाबत नगरपरिषदेचे आर्थिक हित तसेच कामाचा दर्जा याकरिता अधिकाधिक प्रतिसाद मिळणेकरिता वेगवेगळे ठेकेदारांच्या सहभागादवारे पारदर्शक पध्दतीने ठेक्याची कार्यवाही होणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही तसेच जुनाच ठेका मुदतवाढ देऊन पुढे चालु ठेवणेत आल्याने नियमबाहयता झाली आहे.

